
मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष - फाल्गुन 1928
जानेवारी - मार्च 2007, / खंड 30, अंक 4

- जागतिकीकरण व भारताच्या शिक्षण क्षेत्रातील आर्थिक आव्हाने
- ऊसाचे दर-युद्ध : काल्पनिकता आणि वास्तविकता (उत्तरार्ध)
- एडमंड एस. फेल्पस् आणि आधुनिक समष्टि अर्थशास्त्र
- केंद्रीय अर्थसंकल्प 2007 - 08
- जॉन स्ट्यूअर्ट मिल (1806 ते 1873) : एक स्मरण
- कुपोषण एक दृष्टिक्षेप
- तिसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल
- एकतिसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रूपरेषा





ा भोवतालचा
नाही, आणि
कर्जाचा अर्ज
त्तम सल्लाही
द्वारे आम्ही
FC
OANS
THROUGH
APUR: "Pitru Chhaya",
oor, Opp. RLT College,
Amravati 444 601. Tel:
3 001. Tel: 246301-02.
g Days & Hours: Thu &
L: Plot No. 1/1, Next to
HDFC231-06 Nag Mar



मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक


# अर्थसंवाद


जानेवारी - मार्च, 2007 / खंड 30, अंक 4



प्रमुख संपादक
विनायक श्रीधर देशपांडे

सहायक संपादक
रवीन्द्र शंकर जोशी

सल्लागार मंडळ
(2006-09)
अवधूत नाडकर्णी
अ. ब. देवगिरीकर
किशोर वाघमारे
जयश्री खांबेटे



संपादकीय पत्रव्यवहार
विनायक श्रीधर देशपांडे
'श्रीकमल', 48 विद्या-विहार
प्रतापनगर, नागपूर - 440022
दूरध्वनी क्र.(95712) 2237042


## । अनुक्रमणिका ।


- जागतिकीकरण व भारताच्या शिक्षण क्षेत्रातील आर्थिक आव्हाने
  दिलीप कदम ........ 289
- ऊसाचे दर-युद्ध : काल्पनिकता आणि वास्तविकता (उत्तरार्ध)
  वसंतराव जुगळे ........ 306
- एडमंड एस. फेल्पस् आणि आधुनिक समष्टि अर्थशास्त्र
  अतुल देशपांडे ........ 319
- केंद्रीय अर्थसंकल्प 2007 -2008
  शि. ना. माने ........ 335
- जॉन स्टूअर्ट मिल (1806 ते 1873) : एक स्मरण
  लिला सर्वोत्तम कुळकर्णी ........ 340
- कुपोषण एक दृष्टिक्षेप
  सुनीता सिनगारे ........ 347
- तिसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल
  जगन्नाथ पाटील / मेधा देशपांडे / सर्वोत्तम कुळकर्णी /
  विनायक देशपांडे / चारुदत्त गोखले ........ 360
- एकतिसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रूपरेषा
  ज. फा. पाटील / अ. रा. पडोशी / वि. व्यं. जहागिरदार ........ 381

मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ (2006-07)

● अध्यक्ष
दिलीप सयाजी कदम ( पुणे)

● कार्याध्यक्ष
ज.फा. पाटील (कोल्हापूर)

● कार्यवाह, खजिनदार
चारुदत्त गोखले (जळगाव)

● प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'
विनायक श्रीधर देशपांडे (नागपूर)

● सदस्य
1 केशव घोरूडे (ठाणे)
2 सुभाष दगडे (सांगली)
3 बबन आदिक (अहमदनगर)
4 हिरालाल चव्हाण (जळगाव)
5 वसंत पाटील (जळगाव)
6 राजेन्द्रकुमार गव्हाळे (खामगाव)
7 कृष्णराव पाटील (नागपूर)
8 सुभाष टकले (आखाडा बाळापूर)
9 माधव गायकवाड (औरंगाबाद)
10 जगन्नाथ पाटील ( सातारा)
11 श्रीराम जोशी (जळगाव)
12 अशोक गाढवे (अहमदनगर)

● अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार :
1) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली.
2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
(टिप : म. रा. सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

● कार्यालयीन पत्रव्यवहार
(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, आणि अर्थसंवाद वितरणाविषयी)
चारूदत्त गोखले
कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'अक्षय' प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राचे मागे, जळगाव - 425001
(दूरध्वनी : 95257 - 2252375)

● परिषदेचे प्रमुख कार्यालय
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेंज, एम.एन.रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कॅंपस, फ्लॅट क्रमांक 6 'एफ' ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे(पूर्व), मुंबई 400 051

## वर्गणी

अ) परिषदेचे सदस्य

| | |
|---|---|
| ● आजीव सदस्य | : रु. 1200 (एकरकमी) |
| ● साधारण सदस्य | : रु. 250 (वार्षिक) |
| आ) संस्था सदस्य : | |
| ● शैक्षणिक संस्था | : रु. 250 (वार्षिक) |
| ● व्यावसायिक संस्था | : रु. 250 (वार्षिक) |
| इ) अर्थसंवाद वर्गणीदार | |
| ● ग्रंथालये | : रु. 250 (वार्षिक) |
| ई) वर्षगणना | : 1 एप्रिल ते 31 मार्च |

● परिषदेच्या सदस्यांना अर्थसंवाद त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.

● कृपया वर्गणी डिमांड ड्राफ्ट नेच 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी.
संपादकांकडे पाठवू नये. रीतसर पावती कार्यवाहांमार्फतच प्राप्त होईल.

# जागतिकीकरण व भारताच्या शिक्षण क्षेत्रातील आर्थिक आव्हाने

✦ **दिलीप कदम, पुणे.**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर.*
*रा.ब.ना. बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 30 व्या वार्षिक अधिवेशनात दि. 26 नोव्हेंबर 2006 रोजी केलेले अध्यक्षीय भाषण.*

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 30 व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी, आपण माझी निवड करुन जो सन्मान केला त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. अर्थशास्त्रीय प्रश्नांची सैद्धांतिक व व्यावहारिक पातळीवर मराठी भाषेत चर्चा घडवून आणणे, आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी उपाययोजना सुचविणे, अर्थशास्त्रीय लिखाणाला उत्तेजन देणे व त्याद्वारे अर्थशास्त्रीय समस्यांचे विवेचन जनसामान्यांपर्यंत पोहचवून देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणे, या उद्देशाने मराठी अर्थशास्त्र परिषदेची स्थापना करण्यात आली. मराठी अर्थशास्त्र परिषद गेली तीस वर्षे हे कार्य निष्ठेने व समर्थपणे पार पाडत आहे. परिषदेच्या या कार्यात अनेक कार्यकर्ते, प्राध्यापक, माजी अध्यक्ष व अर्थसंवादचे संपादक यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या परिश्रमांमुळेच परिषद यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'' हा महामंत्र देणाऱ्या आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील तथा अण्णांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालयाच्या प्रांगणात हे अधिवेशन होत आहे याचा मला मनस्वी आनंद होत आहे. कर्मवीर अण्णांनी समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षण प्रसार केला. अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या बहुजन समाजाला शिक्षित करण्यासाठी त्यांनी जो हा ज्ञानाचा कल्पवृक्ष रूजवला, त्या रयत शिक्षण संस्थेचा मी माजी विद्यार्थी आहे याचा मला सार्थ अभिमान वाटतो. एका ग्रामीण गरीब शेतकरी कुटुंबातील माझ्यासारख्या असंख्य मुलांना श्रमाची प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या 'कमवा व शिका' योजनेद्वारे स्वावलंबी शिक्षणाची प्रेरणा मिळाली ती अण्णांच्या महामंत्रामुळेच. महात्मा फुले यांच्या सामाजिक सत्यशोधनात सहभागी होणारा एक विद्याव्रती, बहुजन समाजाचा कैवारी ही कर्मवीर अण्णांच्या रूपाने महाराष्ट्राला लाभलेली एक दैवी देणगीच मानली पाहिजे. कर्मवीरांनी

पारंपरिक गुणवत्तेपेक्षा माणुसकीचे तत्त्वज्ञान जपत गोरगरीब, दीनदलित, दुर्लक्षित आणि तळमळीच्या प्रामाणिक माणसांना आधार दिला. तसेच रयत शिक्षण संस्था ही केवळ शिक्षण देणारी संस्था नाही तर सामाजिक परिवर्तनाची एक प्रयोगशाळा असल्याचे काळाच्या ओघात सिद्ध झाले आहे. परमपूज्य कर्मवीर अण्णांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करून मी आपले सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.

आज मी आपल्यासमोर ''जागतिकीकरण आणि भारताच्या शिक्षण क्षेत्रातील आर्थिक आव्हाने'' या विषयावर काही विचार मांडणार आहे. आपण सर्वजण विविध शिक्षण संस्थांमध्ये काम करीत आहोत. भारतातील शिक्षणाचा आकृतिबंध, शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षण क्षेत्रातील वर्तमान व भविष्यकालीन घडामोडी या सर्वांमध्ये आपल्याला आस्था आहे. जागतिकीकरण, त्यामुळे होऊ घातलेले बदल, तसेच या शतकात निर्माण होत असलेली ज्ञानाधिष्ठित समाजरचना व अर्थव्यवस्था हे माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचे विषय आहेत. नव्या शतकाच्या समाजरचनेचा आणि अर्थव्यवस्थेचा 'ज्ञान' हाच आधार असेल. जागतिक पातळीवर ज्ञानाच्या निर्मितीचा जो प्रयत्न चालू आहे, त्यात वस्तुनिष्ठ व शास्त्रीय ज्ञानाची भर घालणे आणि त्याला शहाणपणाची जोड देऊन मानवतेच्या कल्याणासाठी ज्ञानाचा उपयोग करून घेणे हेच आपल्या देशासमोरचे खरे आव्हान आहे. जागतिकीकरणाच्या परिस्थितीत या दृष्टीने शिक्षणक्षेत्राचे कार्य फार मोलाचे ठरणार आहे. ज्ञानाधिष्ठित समाजरचनेत ज्ञान की काही थोड्या लोकांची मक्तेदारी होणार नाही, तसेच प्रत्येकाला ज्ञान मिळविण्याची समान संधी प्राप्त होईल अशा प्रकारची धोरणे शिक्षणक्षेत्रात अवलंबणे आवश्यक ठरणार आहे. सध्या भारताच्या शिक्षणक्षेत्रात जी धोरणे अवलंबली जात आहेत, त्यातून भविष्यकाळात कोणत्या शक्यता संभवतात आणि त्यातील धोके कोणते आहेत किंवा त्यातून कोणत्या संधी उपलब्ध होऊ शकतात याचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. शिक्षणविषयक धोरणे जरी तज्ज्ञ मंडळी व शासनकर्ते ठरवित असली तरी त्याचे परिणाम आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनावर होत असतात. हे परिणाम त्वरित जाणवत नसले तरी ते दूरगामी होत असतात. म्हणून त्याबाबतची जाणीव गंभीरपणे व्हायला हवी.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे. प्रगती आणि शिक्षण यांचा परस्परसंबंध फार जवळचा आहे, म्हणूनच शिक्षणाच्या संदर्भात ज्या-ज्या वेळी आपण विचार करतो, त्या-त्या वेळी महात्मा ज्योतिबा फुले यांचे मार्मिक आणि अत्यंत चिंतनीय विचार आजही दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात.

''विद्ये विना मति गेली। मति विना नीती गेली। नीती विना गति गेली। गति विना वित्त गेले। वित्ता विना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।''

याचा शांतपणे विचार करून शिक्षणाचे धोरण आणि व्यवस्थापन ठरविले पाहिजे. राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या मते - देशाच्या विकास व उत्कर्षातला शिक्षण हा मोठा घटक आहे. इसवी सन 2020 पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून प्रगती करण्याच्या मार्गावर भारत आहे. तरीही आपल्याकडे 350 द.ल. लोकांना साक्षर करण्याची गरज आहे. त्याहीपेक्षा जास्त लोकांना आधुनिक भारतात नोकरी-धंद्यासाठी आवश्यक असलेले कसब शिकण्याची आवश्यकता आहे. आपल्या समाजातील दुर्बल घटकातील लोकांची मुले कुपोषित असतात, त्यातील फारच थोड्या प्रमाणात मुले-मुली 8 व्या वर्गापर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकतात. आपण त्यांचा विचार करण्याची गरज आहे. प्रत्येक भारतीय मुला-मुलींना शिक्षण

मिळणे हा खरोखर मूलभूत हक्क आहे. दुर्बल घटकातील लक्षावधी मुलांना जन्मभर दारिद्र्याच्या खाईत ढकलले जात आहे ही परिस्थिती आपण बदलली पाहिजे. अनेक कारणांमुळे शिक्षणाची संधी अजून बऱ्याच लोकांना मिळत नाही. विशेषत: ग्रामीण भागात तीन पद्धतींची कुटुंबे आहेत, कोणतीही किंमत देऊन आपल्या मुलांना शिक्षण देणारी व सर्व कठीण प्रसंगांचा सामना करता येईल या दृष्टीने मुलांना आर्थिक पायावर सुस्थितीत आणण्याचे महत्त्व ओळखणारी काही कुटुंबे असतात. काही कुटुंबांना शिक्षणाचे महत्त्व समजलेले असते, परंतु योग्य वेळी मुलांना कोणत्या शिक्षण संधी आहेत, त्या मिळविण्यासाठी कोणते योग्य मार्ग व पद्धती आहेत यांची जाणीव त्यांना नसते, तर तिसऱ्या प्रकारात आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्याने शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजलेले नसते. त्यामुळे पिढ्यान्‌पिढ्या त्यांच्या मुलांकडे दुर्लक्ष होऊन ती बाजूला पडतात आणि दारिद्र्यात खितपत राहतात. म्हणून समाजाच्या सर्व स्तरांवर जागृती निर्माण करून शिक्षणाचे महत्त्व व जाणीव पसरवली पाहिजे. समाजातील दुर्लक्षित लोकांना शिक्षणाचे लाभ देण्यासाठी आवश्यक ते स्रोत एकत्रित व सज्ज केले पाहिजेत.

भारतात शिक्षण हा, केन्द्र आणि राज्य या दोहोंच्याही अखत्यारीतील विषय आहे. शिक्षणासंदर्भात भारतीय राज्यघटना भाग चौथा 'राज्यधोरणाची निर्देशक तत्त्वे' या प्रकरणातील कलम 45 प्रमाणे ''राज्य हे या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षांच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयास चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यासाठी प्रयत्नशील राहील'' डॉ. आंबेडकरांना शिक्षण आणि समाजपरिवर्तन यांची समांतर प्रक्रिया अभिप्रेत होती म्हणूनच त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि समतेसाठी संघर्ष करा' असा संदेश दिला होता. प्रत्यक्षात याबाबतीत वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेणे उद्‌बोधक ठरेल.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने वेळोवेळी विविध आयोग स्थापन करून शिक्षण क्षेत्रात सुधारणा व बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केलेले दिसून येतात. जानेवारी 1948 मध्ये पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी एक परिषद बोलावून त्यामध्ये शिक्षणासंबंधीची भविष्यकालीन दिशा निश्चित केली. त्यानंतरच्या काळात भारतातील शिक्षण व्यवस्था निर्दोष करण्यासाठी पुढील माध्यमातून विचारमंथन झालेले दिसून येते.

(1) 1948 च्या डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखालील 'विद्यापीठ शिक्षण आयोगाने' असे म्हटले होते की, ''सामाजिक जीवनाची नैतिक व आध्यात्मिक पातळी उंचावणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.''

(2) 1952 च्या डॉ मुदलियार यांच्या अध्यक्षतेखालील 'माध्यमिक शिक्षण आयोगाने' शिक्षणाद्वारे चारित्र्यविकास, बौद्धिक क्षमता संपादन आणि सामाजिक न्यायाची तळमळ निर्माण व्हावी असे म्हटले होते.

(3) 1964 मध्ये डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली एकूणच सर्व शिक्षणव्यवस्थेसाठी आयोग नेमला होता. या आयोगाने ''शिक्षण, जीवन, गरजा व आकांक्षा यांच्याशी संबद्ध असावे आणि सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिवर्तनाचे ते माध्यम ठरावे'' असे म्हटले होते. कोठारी आयोगानंतर 1968 च्या सुमारास देशाची सर्वंकष शिक्षणविषयक धोरणे जाहीर झाली. त्याचा चौथ्या व पाचव्या पंचवार्षिक योजनेतील शिक्षणविषयक नियोजनाला मोठा हातभार लागला.

(4) सन 1986 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ही भारतीय शिक्षणातील अत्यंत महत्त्वाची घटना होय. या धोरणानुसार 1992 मध्ये राज्यसरकारे, शिक्षणसंस्था आणि शिक्षण तज्ज्ञ यांच्यातील परस्पर विचारमंथनातून कृतिकार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी सुरू झालेली दिसून येते. त्यामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर भर देण्यात आला आहे. तसेच शिक्षणाच्या समान संधी या बाबीला महत्त्व दिलेले दिसून येते. त्यासाठी युनिसेफ भारत सरकारला सहकार्य करीत आहे. भारतानेही आंतरराष्ट्रीय सहकार्याचा पुरस्कार केला आहे.

आपण 21 व्या शतकात पदार्पण केले आहे. जागतिकीकरणाचे वारे जगभर वाहू लागले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या विकासाचा वेग अफाट वाढला आहे. प्रसारमाध्यमांच्या शक्तीमुळे व वाढत्या विस्तारामुळे जग लहान झाले आहे. मानवाच्या आर्थिक विकास व कल्याणाबरोबरच दैनंदिन उद्‌भवणाऱ्या अनेक समस्यांमुळे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. भारतासारख्या विकसनशील देशात लोकसंख्या वाढ, दारिद्र्य, बेरोजगारी, वाढत्या कर्जाचा भार, कुपोषण, बालमृत्यू, स्त्रियांची दुरावस्था, पर्यावरणाचा वाढता ऱ्हास यासारख्या गंभीर समस्या आहेत. त्या सोडविण्यासाठी 'किमान मूलभूत शिक्षणावर' भर देणे व ते साध्य करणे हे जगासमोरील प्रमुख आव्हान आहे. त्या दृष्टीने जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी मानवी हक्काच्या विश्वव्यापी जाहीरनाम्याद्वारे 'प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा हक्क आहे' हे ठामपणे मान्य केले आहे. शिक्षणाचा हक्क खरोखर किती लोकांना मिळतो आहे, कितीजण त्यापासून पूर्णपणे किंवा अंशत: वंचित आहेत, मिळालेले शिक्षण व्यवहारात कितपत उपयोगी पडते अशा अनेक बाबींचा आढावा जागतिक स्तरावरून घेण्यात आला. त्यातून आश्चर्यकारक परंतु धक्कादायक वस्तुस्थिती समोर आली आहे. त्यानुसार जगात जवळजवळ 10 कोटी बालकांना प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध नाही. त्यामधील 6 कोटी केवळ मुली आहेत. जगातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे 96 कोटींपेक्षा अधिक लोक प्रौढ निरक्षर आहेत. त्यामध्ये 64 कोटी स्त्रिया आहेत. कित्येक लाख मुले व प्रौढ मूलभूत शिक्षण घेण्यासाठी उपस्थित असतात, परंतु आवश्यक ज्ञान व कौशल्य आत्मसात करू शकत नाहीत. त्यासाठी लागणाऱ्या तांत्रिक प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध नाहीत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन थायलंडमधील जोमटीयन येथे 1990 मध्ये भरलेल्या जागतिक शिक्षण परिषदेने मूलभूत अध्ययन गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वांसाठी शिक्षणाचा जागतिक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये सर्वांसाठी शिक्षणाचे ध्येय साकार करण्यासाठी सर्व देशांनी परस्पर सहकार्य व जबाबदारीने अविश्रांत प्रयत्न करण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली आहे. भारतात त्या दृष्टीने केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा व यशापयशाचा अभ्यास करणे तसेच त्या दृष्टीने येणाऱ्या अडचणी सोडविणे आवश्यक आहे.

(II)

शिक्षणाच्या अर्थशास्त्रात शिक्षणाचा श्रमशक्तीच्या व्यावसायिक रचनेवरील परिणाम, नेमणुका आणि बढती, श्रमिकांची अंतर्गत व बाह्य गतिक्षमता, बचत प्रवृत्ती, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकृतिबंध आणि भविष्यकालीन आर्थिक विकासाची शक्यता इत्यादी घटकांचा समावेश होतो. शिक्षणामुळे मानवी भांडवलाच्या विकासाला चालना मिळते. शिक्षण आणि विकास या दोन स्वतंत्र बाबी नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिक्षणामुळे आर्थिक विकास घडून येतो आणि आर्थिक विकासामुळे जास्त शिक्षण घेण्याची प्रेरणा निर्माण होते. शिक्षण ही मानवाची प्राथमिक गरज

आहे. शिक्षणाचा परिणाम पोषण, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि निवारा इत्यादींवर घडून येतो. शिक्षणामुळे प्रशिक्षित श्रमिकांचा पुरवठा वाढतो. त्यामुळे भांडवल, तंत्रज्ञान, सेवा आणि प्रशासन इत्यादींचे व्यवस्थापन सुलभरित्या करता येते. शिक्षणामुळे समाजातील काही समस्यांचे निवारण करता येते. शिक्षणामुळे जीवन अधिक समृद्ध बनते. म्हणून शिक्षण ग्रामीण भागात घरोघरी पोहोचले पाहिजे. त्याचा मानवसमाजाच्या सेवेसाठी उपयोग झाला पाहिजे. अशा प्रकारचे शिक्षण मानवी विकासासाठी आवश्यक आहे. अर्थशास्त्रात शिक्षणाचा विचार प्राचीन काळापासून केला जात आहे. ॲडम स्मिथच्या मते, शिक्षण हे उत्तम प्रशासनासाठी आवश्यक असून आर्थिक विकासासाठी ते महत्त्वाचे मानले जाते. माल्थस यांनी शिक्षणाच्या बाह्य फायद्यांचा विचार केला असून त्यांच्या मते, एका व्यक्तीच्या शिक्षणामुळे दुसऱ्या व्यक्तीच्या कल्याणात वाढ होते. त्यांनी लहान कुटुंबांच्या आर्थिक फायद्यावर भर दिला होता. जे. एस मिल यांच्या मते शिक्षण आणि कुटुंबाचा लहान आकार यामध्ये अप्रत्यक्ष संबंध असतो. डॉ. मार्शल यांचा भर शिक्षणाच्या फायद्यांच्या मापनावर होता. आर्थिक वृद्धी मध्ये शिक्षणाचे योगदान महत्त्वाचे असते. शिक्षणामुळे केवळ राष्ट्रीय विकासाला चालना मिळते असे नाही तर त्याद्वारे उद्दिष्टे निश्चित करता येतात. साधनांचा उपयोग करण्याच्या दृष्टीने योजना आखता येतात. शिक्षण हा मानवाचा मूलभूत अधिकार असून त्याद्वारे व्यक्तिविकास साध्य करता येतो पर्यायाने सामाजिक विकास साध्य करता येतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करण्यासाठी शिक्षणाचे योगदान महत्त्वाचे आहे. उत्पादन प्रक्रियेसाठी उपयुक्त अशा विशेष कौशल्याची शिक्षणामुळे निर्मिती होते. आधुनिक तंत्रानुरूप व्यक्तीच्या मनोवृत्तीत बदल घडून येतो. मानवसंसाधन विकास शिक्षणामुळेच घडून येतो. शिक्षण आणि संशोधन याद्वारे साधनांचे नियोजन आणि व्यवस्थापन करता येते. देशाचा विकास लोकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो म्हणून शिक्षणाचे विविध प्रकार आणि स्तर यामध्ये योग्य समन्वय साधणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीने शिक्षणाच्या विकासाला अग्रक्रम देणे ही अपरिहार्य बाब आहे.

शिक्षणावरील खर्च आणि उत्पादकता यांची तुलना करण्याचा प्रयत्न केला जातो. किती विद्यार्थी शिक्षण घेतात याचे मापन केले जाते परंतु त्याच्या फायद्यांचे पैशात मापन करणे कठीण असते. विद्यार्थ्यांवर किती खर्च झाला याचे मापन करता येते. परंतु शिक्षण क्षेत्रातील उत्पादकता किंवा कार्यक्षमतेची खर्चाशी तुलना करणे कठीण असते. असे असले तरी शिक्षणाच्या खर्चाचे मापन करणे महत्त्वाचे आहे. शिक्षणावरील खर्च किंवा वित्तीय तरतुदींचे अनुमान करणे, त्यावरील गुंतवणुकीची कार्यक्षमता वाढविणे, खर्चाच्या कार्यक्षमतेचे मापन करणे यांसाठी शैक्षणिक खर्चाचा विचार महत्त्वाचा ठरतो. काही विचारवंताना शिक्षणावरील खर्च अनुत्पादक वाटतो अर्थात शिक्षणावरील खर्चामुळे मिळणाऱ्या फायद्यातोट्यांची तुलना करता येत नाही असे असले तरी शिक्षणावरील गुंतवणुकीमुळे अप्रत्यक्षरित्या उत्पादकता वाढते म्हणून शिक्षण हा मानवसंसाधन विकासाचा महत्त्वाचा घटक मानला जातो.

शिक्षण हा मानवी विकासाचा मूलभूत घटक आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. शिक्षणाचा परिणाम हा विकासाशी निगडित इतर अनेक बाबींवर होतो. जन्मदर-मृत्युदर, आरोग्याशी संबंधित प्रश्न, कृषी, औद्योगिक विकास, कुटुंब कल्याण, स्त्री-पुरूष समानता यांच्याशी शिक्षणाचा संबंध आहे. 1990 च्या मानवी विकास अहवालाप्रमाणे शैक्षणिक विकास म्हणजे मानव विकास होय. शिक्षण आणि

तत्त्वज्ञान यांचा जसा जवळचा संबंध आहे तसाच शिक्षण आणि आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध आहे. आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रातील गुंतवणूक, रोजगार व मागणी यात सतत वाढ होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, दरडोई राष्ट्रीय उत्पन्न व उपभोगातील वाढ, राजकीय व सामाजिक स्थैर्य प्रस्थापित होणे होय. अशा प्रकारे व्यापक अर्थाने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी राष्ट्रातील जनता वास्तव दृष्टिकोनातून बुद्धिमान असली पाहिजे. म्हणजेच तेथील जनतेजवळ बुद्धी, खूप कष्ट करण्याची तयारी आणि सभ्य वर्तणूक हे तीन गुण असले पाहिजेत तसेच परंपरागत सामाजिक व सांस्कृतिक नीतिमूल्यांची जपणूक करून आधुनिकीकरणाचा पुरस्कार करता येण्यासारखी परिस्थिती तेथे असली पाहिजे. यावरून शिक्षण आणि आर्थिक विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे स्पष्ट होते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत नियोजन करताना उद्दिष्टे ठरविणे, अग्रक्रम लावणे, साधनसंपत्तीची जुळवा जुळव करणे, उत्पादनात वाढ घडवून आणणे, आधुनिकीकरणाचा पुरस्कार करणे, वाटप व्यवस्था सुधारून आर्थिक व सामाजिक न्याय प्रस्थापित करणे आणि जीवनमानाचा दर्जा सुधारणे या सर्व बाबींसाठी शिक्षण हा एकमेव आधार मानला जातो. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ मिर्डाल यांनी आपल्या 'आशियान ड्रामा' या ग्रंथात आशिया खंडातील विकास प्रक्रियेचे विश्लेषण करताना 'शिक्षण हा आर्थिक विकासाचा कणा असतो असे म्हटले आहे. कोणत्याही राष्ट्रातील गरिबी हा त्या राष्ट्रातील विकासाचा निकष असतो म्हणून दारिद्र्य निर्मूलनासाठी आर्थिक परिवर्तन आवश्यक आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी देखील भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचे प्रभावी साधन म्हणून शिक्षणास प्राधान्य दिले होते. शिक्षणामुळे मानवाचे कौशल्य वाढून रोजगारक्षमता वाढते आणि जीवनमान उंचावण्यास मदत होते. सर्व समस्यांची वास्तव स्वरूपात ज्ञान व जाण येते. शिक्षण हेच मानवाला खऱ्या अर्थाने दारिद्र्यातून बाहेर काढते आणि विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रोत्साहन देते म्हणून शिक्षण हे आर्थिक विकासासाठी प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे वैज्ञानिक व तांत्रिक दृष्टी समाजाला येते, तिचा उपयोग विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचा मानला जातो. तांत्रिक प्रगतीसाठी शिक्षणाची खूप मोठी मदत होत असते आणि याच तांत्रिक प्रगतीमुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलून उच्च शिक्षित युवकांची मागणी वाढते. अशा प्रकारे श्रमशक्तीची गुणवत्ता वाढून आर्थिक विकासाचा दर वाढण्यास मदत होते कारण मानवी साधनसंपत्तीचा विकास आणि देशाचा आर्थिक विकास यांचा 'धनात्मक' स्वरूपाचा सहसंबंध असतो. या संदर्भात मार्शल यांनी शिक्षणावरील खर्च ही राष्ट्रीय गुंतवणूक असून या गुंतवणुकीला, सर्वाधिक मौल्यवान भांडवल असे म्हटले आहे. अमर्त्य सेन यांनी देखील शिक्षण व मानवी भांडवलाचा विकास यांच्यातील धनात्मक सहसंबंध स्पष्ट केला आहे, त्यांच्या मते, मानवी साधनसंपत्तीचा विकास शिक्षणाच्या प्रचार व प्रसारामुळे होतो आणि आर्थिक विकासाला चालना मिळते. देशातील राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न यात होणाऱ्या वाढीबरोबर शाळांतील प्रवेशाचे प्रमाण वाढताना दिसते. यासंदर्भात एस.सी. गोयल यांनी शिक्षण व आर्थिक विकास यावर संशोधन करून भारतात 1951-52 ते 1970-71 या कालखंडात चालू किमतीनुसार दरडोई उत्पन्नात जी वाढ झाली त्याबरोबरच त्या कालखंडात प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणातील विद्यार्थी संख्या यांच्या वाढीचा सहसंबंध गुणक अनुक्रमे 0.85,0.94 व 0.95 इतका होता असे स्पष्ट केले आहे. याचा अर्थ उत्पन्नाच्या वाढीचे व शैक्षणिक प्रवेशाचे प्रमाण

जवळपास तेवढेच राहिले. वाढत्या उत्पन्न पातळीबरोबर शैक्षणिक सेवांची मागणी त्याच दिशेने व त्याच प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येते.

शिक्षणाला एकाच वेळी उपभोग्य वस्तू व गुंतवणुकीची वस्तू मानले जाते. यादृष्टीनेही शिक्षणक्षेत्राचे आर्थिक वृद्धीतील योगदान महत्त्वाचे आहे. शिक्षणाचे आर्थिक वृद्धीमध्ये नेमके किती योगदान असते हे मोजण्याचा प्रयत्न डेनिसन यांनी केला होता. त्यांच्या मते, अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पन्नातील 23 टक्के वाढ ही श्रमिकांच्या वाढीव शिक्षणामुळे घडून आली होती. मॅकलोच यांच्या मतेही यंत्रसामग्री पेक्षा मानव आणि त्याच्या शिक्षण व प्रशिक्षणावर केलेली प्रत्येक गुंतवणूक आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाची मानली पाहिजे.

शैक्षणिक विकास म्हणजे मानवी संसाधनांच्या नियोजनाची प्रक्रिया असते. आर्थिक विकासासाठी ज्या प्रकारचे मानवी भांडवल हवे असेल तेवढे शैक्षणिक विकासामुळे निर्माण होऊ शकते. शिक्षणातून जे कौशल्य व ज्ञान प्राप्त होते त्यामुळे व्यक्तिगत लाभ अधिक होत असला तरी सामाजिक लाभही होत असतो हे सर्वमान्य आहे. म्हणूनच आज शिक्षणाक्षेत्रातील गुंतवणुकीमूळे विज्ञान, तंत्रज्ञान तसेच मूलभूत व उपयोजित संशोधनासारख्या क्षेत्रात भारत हे राष्ट्र उच्च दर्जाचे मानवी संसाधन बाळगून आहे.

(III)

भारतात सर्वांना मूलभूत शिक्षण देण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळातच सुरू झाले. परंतु जनसामान्यांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी निश्चित योजना स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच झाली. सुरूवातीला हे ध्येय सहजसाध्य वाटले खरे, पण भरमसाठ लोकसंख्या वाढीमुळे हे प्रयत्न अपुरे पडू लागले. जरी साक्षरतेचे व शाळेत जाणाऱ्यांचे प्रमाण वाढले तरी निरक्षर लोकांचीही संख्या वाढली. सर्वांना मूलभूत शिक्षण देण्याचे ध्येय 10 वर्षात साध्य करण्याविषयी घटनेत म्हटले असले तरी गेल्या 55 वर्षातही हे ध्येय साध्य झाले नाही. 1950 साली सर्वांना मूलभूत शिक्षण देण्याच्या प्रकल्पाला सुरुवात झाली, तेव्हा प्रौढ साक्षरतेचे प्रमाण अगदी कमी होते व फारच थोडी मुले शाळेत जात होती. त्यानंतरची प्रगती समाधानकारक नसली तरी प्रगती होत आहे हे निश्चित. 2001 सालचे साक्षरतेचे प्रमाण 65.34% होते, तर आधीच्या दशकात हेच प्रमाण 52.21% होते. साक्षरतेचे सर्वात जास्त प्रमाण केरळमध्ये (90.92%) व सर्वात कमी बिहारमध्ये (47.53%) आहे (तक्ता क्र. 1 मध्ये भारताच्या लोकसंख्येतील साक्षरता प्रमाण दर्शविले आहे.)

प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा सर्वदूर पसरल्या आहेत. लहान वसाहती व दुर्गम खेड्यांमध्येही त्या उपलब्ध आहेत. असे असले तरी अजूनही 6 ते 14 वर्षे वयोगटातील अनेक मुले (सुमारे 230 लाख मुले) शालेय शिक्षणापासून वंचित आहेत. याशिवाय शिक्षण अर्धवट सोडणाऱ्यांची संख्या ही चिंतेची बाब आहे. प्राथमिक शिक्षणात 2002-2003 साली ही टक्केवारी 35.05 होती. उच्च प्राथमिक शिक्षणात ही टक्केवारी 53.79 होती. (तक्ता क्र. 3 पहा.)

माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीतही 2001 च्या जनगणनेनुसार 14 ते 17 वयोगटातील 91.7 दशलक्ष मुले आहेत. सन 2011 पर्यंत त्यामध्ये 98.2 दशलक्ष वाढ होईल. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाकडेही प्रकर्षाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे तसेच उच्च शिक्षणाकडे हा वयोगट आकर्षित होईल, अशा योजना व कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. तसेच त्यासाठी लागणारी वित्तसाधने उभारण्यासाठी केन्द्र सरकार, राज्य सरकारे व समाज यांनी एकत्रित जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

'सर्व शिक्षण अभियान' या योजनेखाली 2007 पर्यंत प्राथमिक शिक्षण सर्वांना देण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. तसेच 2010 पर्यंत सर्वांना मूलभूत शिक्षण मिळेल असे ठरविले असले तरी पंचवार्षिक योजनेच्या आढाव्यावरून ही लक्ष्ये साध्य होण्याची शक्यता दिसत नाही. तसेच राज्या -राज्यात या बाबतीत प्रादेशिक भिन्नता आढळते. 2002-2003 च्या शैक्षणिक सर्वेक्षणात प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांपैकी 69 टक्के मुले आंध्रप्रदेश, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश व बंगाल या सात राज्यातील होती. तर 33.87% मुले केवळ बिहार व उत्तरप्रदेश राज्यातील होती. मुलींच्या शिक्षणाबाबत गुजराथ व हरियाणाची पिछेहाट झाली आहे. राज्या-राज्यात याबाबत खूपच विषमता आहे. ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे शैक्षणिक नीतिचा गंभीरपणे पुनर्विचार करायला हवा. मुलींनी शिक्षण घेण्याचे प्रमाण गेल्या 10-15 वर्षांत खूप वाढले असले तरी युनेस्कोच्या जागतिक सर्वेक्षणानुसार आपली ही प्रगती फारशी समाधानकारक नाही. 'सर्व शिक्षा अभियान' यासारखे कार्यक्रम राबविताना प्रत्येक राज्यातील परिस्थितीनुसार त्यात लवचिकता आणली पाहिजे व राज्यसरकारांमध्ये उत्साह निर्माण केला पाहिजे. त्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवरील कार्यक्रमांचा समावेश व्हायला हवा व अशा कार्यक्रमांना राज्यसरकारांचीही मान्यता हवी. सध्याचे कार्यक्रम जिल्हा पातळीवरील गरजा लक्षात न घेता राष्ट्रीय पातळीवरचे निकष लक्षात घेऊन केले जातात. ही परिस्थिती बदलायला हवी. त्या-त्या राज्यांच्या गरजा लक्षात घेऊन कार्यक्रमांचे विकेंद्रीकरण करायला हवे, हे शैक्षणिक विकास कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी खर्च वाटून घेणे व परस्पर सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. याद्वारे राज्ये शैक्षणिक कार्यक्रम स्वतंत्रपणे राबवू शकतील. नवव्या योजनेत यासंबंधी निश्चित सूत्र अवलंबले नव्हते. जेव्हा सर्व शिक्षा अभियान राबविले, तेव्हा केंद्र व राज्य सरकारे 85:15 या प्रमाणात खर्च वाटून घेऊ लागली. परंतु खर्च कोणीही केला तरी मूलभूत शिक्षणाचे सर्व राष्ट्रीय कार्यक्रम सर्वशिक्षा अभियानाच्या छत्राखाली आणले गेले. दहाव्या योजनेत हा खर्च 75:25 या प्रमाणात वाटला जाईल तर अकराव्या योजनेत हेच प्रमाण 50:50 असे असेल. अर्थात, शैक्षणिक कार्यक्रम राबविण्याच्या या खर्च वाटप करण्याच्या पद्धतीचा व्यवस्थितपणे अभ्यास झालेला नाही. राज्या-राज्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये प्रचंड तफावत आहे. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात मागासलेल्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल राज्यांना शिक्षणक्षेत्रात सुधारणा घडवायला एकच सूत्र लागू पडणार नाही. एकच सूत्र लागू केल्यास राज्या राज्यातील शैक्षणिक प्रगतीमध्ये तफावत मोठ्या प्रमाणात वाढेल. म्हणून सध्याच्या सूत्राचे काळजीपूर्वक विश्लेषण करणे आवश्यक आहे. त्याद्वारे अकराव्या योजनेसाठी योग्य नीती अवलंबिता येईल. मूलभूत शिक्षणासाठी केंद्रसरकार वाढती आर्थिक मदत करीत आहे. परंतु राज्य सरकारांकडून पुरेसे सहकार्य मिळत नसल्याचे दिसून येते. आर्थिक पेच प्रसंग सोडविण्याच्या नादात राज्यसरकार शैक्षणिक व्यवस्थेच्या बाबतीत पूर्णपणे केंद्रसरकारवर अवलंबून राहत आहेत. शैक्षणिक कार्यक्रम राबविताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लक्ष्ये गाठण्याच्या दबावाखाली केवळ संख्यात्मक लक्ष्य गाठण्याची धडपड केली जाते. त्यामध्ये शाळांची संख्या किती वाढली व शालेय वयोगटातील किती मुले शाळेत जातात यावरच सगळा भर दिला जात आहे. परंतु शालेय शिक्षण व्यवस्थेची क्षमता व गुणवत्ता वाढविण्याच्या प्रक्रियेकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसते. शाळांच्या व्यवस्थापनामध्ये सुधारणा करणे व प्रत्यक्ष

वर्गामध्ये शिकणे व शिकविणे या प्रक्रियेमध्ये सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता आहे. शालेय कार्याच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने विशेषत: मागासलेल्या राज्यात प्रगती कशी झाली आहे ? जिल्हा व शालेय पातळीवर उपलब्ध स्रोतांचा कितपत उपयोग केला जातो ? या बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे. ज्या राज्यात या बाबींकडे विशेष लक्ष दिले जाईल त्यांची शिक्षण क्षेत्रातील प्रगती दीर्घकाळ टिकेल. थोडक्यात संख्यात्मक व गुणात्मक बाबींमध्ये एकाच वेळी सुधारणा होणे आवश्यक आहे.

(IV)

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था ही जागतिक संदर्भात तुलना करता फार मोठी आहे. तरीही 17 ते 24 वर्षे वयोगटातील तरुणांना शिक्षण देण्यास ती अपुरी ठरत आहे. गेल्या 55 वर्षात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था आणि शिक्षण घेणारे विद्यार्थी यांची संख्या वाढत आहे. 1947 च्या तुलनेत शिक्षण घेणारे 1997 मध्ये 29 पटीने वाढलेले आहेत, असे असले तरी या वयोगटातील केवळ 6 टक्के तरूणच उच्च शिक्षणात सामावलेले आहेत. इतर राष्ट्रांच्या तुलनेत हे प्रमाण फार कमी आहे. इतर विकसित व विकसनशील देशात उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण भारताच्या मानाने जास्त आहे. उदा. इंडोनेशिया 10 टक्के, ब्राझील 12 टक्के, मेक्सिको 14 टक्के थायलंड 19 टक्के, अर्जेंटिना 41 टक्के, इंग्लंड 30 टक्के, फ्रान्स 50 टक्के आणि अमेरिका 81 टक्के यावरून भारत उच्च शिक्षण क्षेत्रात फारच मागे असल्याचे स्पष्ट होते. इतर देशांमध्ये उच्च शिक्षणाचा मोठा भार हा सरकार पेलत असते. भारत सरकारने देखील उच्च शिक्षणावरील खर्चाला सुरूवातीपासून अग्रक्रम दिला, परंतु त्याचा लाभ मात्र कमी लोकांना मिळाला. आर्थिक धोरण ठरविताना सरकारच्या हे लक्षात आले की, प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्याने मिळणारे लाभ जे विद्यार्थीसंख्येत मोजले जातात ते उच्च शिक्षणापेक्षा अधिक आहेत. परंतु त्यावर खर्च मात्र कमी केला जातो. थोडक्यात उच्च शिक्षणावरील खर्चाच्या मानाने विद्यार्थी संख्या कमी व प्राथमिक शिक्षणावरील खर्चाच्या मानाने विद्यार्थी संख्या जास्त असते. (उच्च शिक्षणावरील खर्च तक्ता क्र. 4 व तक्ता क्र. 5 मध्ये दर्शविला आहे.) उच्च शिक्षणावरील खर्च कमी पण विद्यार्थी संख्या मोठी असते. हा अनुभव लक्षात घेऊन उच्च शिक्षणावरील खर्च कमी करण्याबाबतचे धोरण सरकारने स्वीकारलेले दिसून येते. विविध पंचवार्षिक योजनात उच्च शिक्षणावरील खर्चाच्या प्रमाणात घट झालेली दिसून येते. त्यामानाने गेल्या 50 वर्षात विद्यापीठे, शिक्षणसंस्था, विद्यार्थी व शिक्षक यांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे शिक्षणाचा विस्तार झाला तसेच खाजगी संस्थांचा या क्षेत्रातील शिरकाव अपरिहार्य झाला. 1947 ते 1997 या काळातील उच्च शैक्षणिक संस्थांची वाढ तक्ता क्र. 6 प्रमाणे झालेली दिसून येते, शिक्षणाच्या वाढत्या विस्ताराबरोबर सरकारने आपले धोरण बदलून प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचे ठरविले. त्यामुळे उच्च शिक्षणातील सरकारी सहभाग कमी झाला. परिणामी खाजगी संस्थांमार्फत शिक्षण देण्याची पद्धत अस्तित्वात आली. त्याला सरकारने देखील प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले. शिक्षण घेणाऱ्यांची वाढती संख्या, माहिती व तंत्रज्ञानातील प्रचंड सुधारणा, तांत्रिक कौशल्य असलेल्या मानवी संसाधनांची वाढती मागणी इत्यादींमुळे शिक्षणाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठ विस्तारत गेली. कमीत कमी वेळात सुविधायुक्त शिक्षणसंस्था काढून मनुष्यबळ पुरविण्यासाठी खाजगी क्षेत्र उपयुक्त आहे हा विचार बळावला. मान्यवर, प्रतिष्ठित व श्रीमंत मंडळी शिक्षणसंस्था काढण्यास पुढे आलीत आणि सरकारने

अशा खाजगी संस्थांना परवानगी देण्याचे उदार धोरण स्वीकारले. उच्च शिक्षणासाठी फार मोठ्या गुंतवणुकीची गरज असते. तसेच अशा शिक्षणासाठी लागणाऱ्या सुविधा दर्जेदार असणे आवश्यक असल्यामुळे केवळ सरकारी अनुदानावर अवलंबून राहणे पुरेसे ठरणार नाही. म्हणून उच्च शिक्षणाच्या विस्तारासाठी खाजगी शिक्षण संस्थांच्या प्रसाराला सुरूवात झालेली दिसून येते. सध्या एकतृतीयांश पेक्षा अधिक तर काही राज्यात निम्म्याहून अधिक उच्च शिक्षणसंस्था विना-अनुदानित किंवा खाजगी क्षेत्रात आहेत. अशा शिक्षणसंस्थांमध्ये शिक्षणावरील खर्च शुल्का च्या स्वरूपात शिक्षण घेणाऱ्यांकडूनच वसूल केला जातो. त्यामुळे सर्वसामान्य व गरीब कुटुंबातील हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागेल काय अशीही भीती व्यक्त केली जात आहे. अर्थात् सरकारी नियंत्रणामुळे त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जात आहे.

भारत सरकारने 1991 पासून नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून विविध क्षेत्रांत उदारीकरण व खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. उच्च शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. जागतिकीकरणामुळे उच्च शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे तसेच स्पर्धा वाढल्यामुळे उच्चशिक्षित मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठीच सरकारने उच्चशिक्षणाच्या खाजगीकरणास प्रोत्साहन दिलेले दिसून येते. आज संपूर्ण भारतात 100 पेक्षा अधिक परदेशी विद्यापीठे व त्यापेक्षा अधिक खाजगी विद्यापीठे उच्च शिक्षणक्षेत्रात कार्यरत आहेत. थोडक्यात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उच्च शिक्षणक्षेत्रातील खाजगीकरण एक आव्हान ठरणार आहे.

आर्थिक प्रेरणा ही शिक्षण विस्तारामागे आहे. तसेच संधी मिळणे हे शिक्षणामुळे शक्य होणार असल्याने शिक्षणाकडे धाव घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शिरकाव जागतिकीकरणामुळे जसा आपल्या देशात झाला आहे त्याचप्रमाणे इतर देशातील शिक्षणसंस्थाही आपल्या देशात प्रवेश करीत आहेत. जागतिकीकरणामुळे जगातील राष्ट्रे इतकी जवळ आलेली आहेत की एखादे तंत्र, माहिती, शोध आणि विचार हा परस्परांमध्ये जात असून त्याची स्वीकृती व वापर होऊ लागला आहे. तसेच सांस्कृतिक संलग्नीकरण देखील वाढत आहे. परिणामी काही विशिष्ट कौशल्ये व जीवनशैली आत्मसात करणे अपरिहार्य ठरले आहे. त्यासाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता आहे. विदेशी विद्यापीठे व शिक्षण संस्थांच्या प्रवेशामुळे स्पर्धेत टिकून राहण्यासाठी भारतीय शिक्षणसंस्थांना आपला दर्जा व गुणवत्ता वाढवावी लागेल. उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढल्याशिवाय जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेला आपण सामोरे जाऊ शकणार नाही. म्हणूनच 'नॅक' (NAAC) सारख्या संस्थांकडून विद्यापीठे व महाविद्यालयांचे मोठ्या प्रमाणावर मूल्यांकन केले जात आहे. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य झालेले निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. नॅक ही संस्था 'इंटरनॅशनल नेटवर्क ऑफ क्वालिटी ॲशुरन्स एजन्सीज इन हायर एज्युकेशन'ची संस्थापक सदस्य आहे. विदेशी विद्यापीठे व शिक्षण संस्थांच्या कार्यपद्धतीवरही नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. अशा नियंत्रणाचा मुख्य उद्देश आपल्या देशातील शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांशी त्या विद्यापीठांची धोरणे मिळतीजुळती आहेत की नाहीत याची कठोरपणे पडताळणी करण्याचा असावा.

(V)

जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) कक्षेत ज्या सेवांचा समावेश करण्यात आला

आहे, त्यामध्ये शिक्षणक्षेत्राचा समावेश आहे. त्यामुळे शिक्षण आता कायदेशीरदृष्ट्या व्यापार शाखेत गणले जात आहे. व्यापाराची आणि बाजाराची सर्व तत्त्वे शिक्षणक्षेत्राला लागू झाली आहेत. एकाने उत्पादन करावयाचे आणि इतरांनी त्याचे ग्राहक व्हावयाचे अशा पद्धतीने जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू आहे. याचाच अर्थ, सध्याचा जमाना जागतिकीकरणाचा किंवा बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेचा आहे. अशा अर्थव्यवस्थेत प्रगतीसाठी, पुढे जाण्यासाठी व टिकून राहण्यासाठी जीवघेणी स्पर्धा आहे. या स्पर्धेत जो हरला, तो केवळ मागे पडला असे नव्हे तर तो संपला ! मग तो देश असो, समाज असो किंवा व्यक्ती असो अशा जीवघेण्या स्पर्धेच्या युगात भारताला तारून नेणारी शक्ती किंवा भारताचे बलस्थान म्हणून शिक्षणक्षेत्राकडे पाहिले जात आहे. आपला देश मागे का पडतो याची कारणे आपण सहजपणे सांगू शकतो. आपली प्रचंड लोकसंख्या, दारिद्र्य, बेरोजगार, भ्रष्टाचार अशी अनेक कारणे सांगितली जातील. अर्थात, ती खोटीही नाहीत, परंतु जिथे आपण आपली गुणवत्ता निर्विवादपणे सिद्ध केली आहे, जागतिक पातळीवर सिद्ध केली आहे अशी कोणती बाब आपल्याकडे आहे ? कोणते क्षेत्र आहे ? या प्रश्नाचे उत्तर मोलाचे आहे कारण ते क्षेत्र हे आपले बलस्थान आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी तेच आपली गुरूकिल्ली ठरणार आहे. आपण थोडा विचार केला तर लक्षात येईल की, ते क्षेत्र आहे शिक्षण क्षेत्र ! आज भारताची ओळख जगात प्रभावीपणे या क्षेत्रामुळे होत असल्याचे दिसून येते.

भारतात शिकलेले उच्च विद्याविभूषित तरूण, डॉक्टर्स, संशोधन, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्यामुळे आधुनिक भारताची ओळख जगाला होत आहे. दरवर्षी हजारो उच्च शिक्षित तरूण परदेशात जातात, कारण त्यांच्या सेवेला प्रचंड मागणी आहे. हे तरूण यशस्वीपणे या स्पर्धेला तोंड देऊ शकतात हे सिद्ध झालेले आहे. त्यांच्यापैकी काहीजण छोट्या-मोठ्या शिक्षणसंस्थांतून, लहान खेड्यातील शाळांतून एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणच्या महाविद्यालयात शिकलेले असतात. त्यांची महाविद्यालये किंवा विद्यापीठे ख्यातनाम असतातच असे नाही. तरीही प्रचंड स्पर्धा असलेल्या विकसित देशांत आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे तरूण निरपवादपणे यशस्वी होताना दिसून येतात याचे श्रेय त्या तरूणांना तर आहेच, पण आपल्या देशातील शिक्षण क्षेत्रालाही आहे. निर्यातक्षम उत्पादन बनविणे हा गुणवत्तेचा एक महत्त्वाचा निकष मानला जातो. आपल्या शिक्षणक्षेत्राने वर्षानुवर्षे असे उत्पादन बनविले आहे याची दखल घ्यायला हवी. उच्च शिक्षित तरूण परदेशात जातात. त्यामुळे 'ब्रेन-ड्रेन' होतो हे योग्य की अयोग्य हा चर्चेचा वेगळा मुद्दा होऊ शकेल, परंतु आपल्या देशातील शिक्षणक्षेत्राच्या उत्पादनाची गुणवत्ता जगाच्या बाजारपेठेत कसाला उतरण्याइतकी उत्तम आहे, हे सत्य त्यामुळे बदलत नाही. म्हणून शिक्षणक्षेत्र हे भारताचे बलस्थान आहे हे मान्य करायला हवे. त्याचे श्रेय या क्षेत्रातील सर्व घटकांना द्यावे लागेल. शिक्षणाचे महत्त्व आपल्या समाजात अगदी मुळापासून आणि पूर्वापार आहे. त्यातूनच हे बलस्थान आज निर्माण झाले आहे.

(VI)

भारतात जागतिकी करणाच्या, खाजगीकरणाच्या प्रक्रियेत 21 व्या शतकात वाटचाल करीत असताना शिक्षण क्षेत्रासमोर

अनेकविध आव्हाने आज उभी आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात या क्षेत्रातील यशाच्या जोडीला अपयशाची बाजूदेखील तेवढीच मोठी आहे. गेल्या 55 वर्षात शिक्षणक्षेत्राच्या बाबतीत आपल्याला कोणते अपयश आले ते पाहून व त्याची काही कारणे नोंदवून आज जी आव्हाने उभी आहेत, त्यांचा आपण परामर्श घेवू या.

(1) भारतीय राज्यघटनेच्या 45 व्या कलमानुसार प्राथमिक क्षेत्रातील शिक्षण सार्वत्रिक असले पहिजे परंतु त्या संदर्भात आपणास अपेक्षित यश मिळालेले नाही.

(2) प्राथमिक शाळांतील गळतीचा प्रश्न आपण सोडवू शकलेलो नाही. त्यामुळे पट नोंदणीही कमी असल्याने जगातले सर्वाधिक निरक्षर असलेले राष्ट्र म्हणून आपली गणना होत आहे.

(3) भारतातील सर्व राज्ये एका लयीत शैक्षणिक विकास करत नाहीत. केरळ, महाराष्ट्र, कर्नाटक, अशी राज्ये आघाडीवर असली तरी राजस्थान,बिहार, उत्तरप्रदेश अशा राज्यातील परिस्थिती भयावह आहे.

(4) आघाडीवर असलेल्या राज्यातही मुली आणि सामाजिक-आर्थिक दुर्बल घटकातील लोकांच्या शिक्षणाची आबाळ थांबलेली नाही.

(5) प्रादेशिक असमतोलाचे शहरी व ग्रामीण असेही एक परिमाण आहे. शहरी भागात ज्या दर्जाचे शिक्षण मिळते ते ग्रामीण भागाला मिळतेच असे नाही.

(6) सतत स्थलांतर करणाऱ्या जमाती, ऊस तोडणी कामगार अशा समाजातील मुलांचे शिक्षण दुर्लक्षित आहे.

(7) अपंग, वेश्यावस्त्यांतील मुले, बालमजूर यांच्या शिक्षणाच्या बाबतीत म्हणावा तसा विचार केलेला दिसून येत नाही.

(8) स्वातंत्र्योत्तर काळात व्यावसायिक शिक्षणाकडे आपण पुरेसे लक्ष देऊ शकलेलो नाही.

(9) परीक्षापद्धतीत सुधारणा झाल्या पाहिजेत असे मत मांडले जाते, परंतु त्यात अपेक्षित यश मिळालेले दिसून येत नाही. त्यामुळे विद्यार्थी ज्ञानार्थी बनण्याऐवजी केवळ परीक्षार्थी बनतात.

(10) शाळा, विद्यालये, महाविद्यालये, विद्यापीठे, तांत्रिक व व्यावसायिक संस्था तसेच विद्यार्थी व शिक्षक यांची संख्यात्मक वाढ प्रचंड झालेली असली तरी गुणात्मक वाढ समाधानकारक दिसून येत नाही.

(11) निरक्षर व साक्षर लोकांची बेरोजगारी, दारिद्र्य हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे.

याशिवाय भारततील उच्च शिक्षणाच्या बाबतीत काही आव्हाने व प्रश्न पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(1) प्राथमिक शिक्षणाच्या किमान गरजांचा अभाव असल्यामुळे उच्च शिक्षणाला संधी प्राप्त होत नाही.

(2) ग्रामीण भागातील निरक्षरतेचे प्रमाण मोठे असल्यामुळे मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयात व शहरात पाठविण्याची पालकांची मनोभूमिका तयार होत नाही.

(3) शाळा व महाविद्यालयातून शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमावर शहरी वातावरणाचा प्रभाव अधिक असतो. ग्रामीण जीवनाच्या गरजांशी व दैनंदिन व्यवहाराशी प्रचलित

अभ्यासक्रमांचा संबंध कमी येतो.

(4) उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयातून प्रवेश घेऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांचा जो वयोगट आहे (सामान्यत: 18 ते 23 वर्षे) त्यापैकी केवळ 6% उच्च शिक्षण घेतात. इतरांचा उच्च शिक्षणाशी कसलाही संबंध येत नाही.

(5) शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण अल्प आहे. जगात शिक्षणावर सर्वात कमी खर्च करणारा देश म्हणून भारत ओळखला जातो.

(6) विना अनुदानीत शिक्षणसंस्थांतून द्यावे लागणारे शिक्षणशुल्क सतत वाढत असल्याने सर्वसामान्य दुर्बल घटकातील विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहतो.

(7) विनाअनुदान महाविद्यालयाचा व संस्थांचा वेतन व प्रशासनावरील खर्च सतत वाढत असल्याने उच्चशिक्षण हे दिवसेंदिवस अधिक खर्चीक बनले आहे.

(8) ग्रामीण भागातील उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांची आर्थिक स्थिती मजबूत असण्याची गरज आहे.

अशा अनेक बाबी या संदर्भात आपणास नोंदवता येतील.

भारताच्या शिक्षण क्षेत्रासमोरील वरील आव्हाने व प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिने स्वातंत्र्योत्तर काळात प्रयत्न केले गेले असले तरी त्याबाबतीत मिळालेले यश समाधानकारक नाही. स्वातंत्र्याच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्था अविकसित होती. भांडवल निर्मिती हा सरकारपुढचा मोठा प्रश्न होता. अर्धी प्रजा भुकेली होती, इतरांपैकी 50% अर्धपोटी होते. उद्योग-व्यवसाय मागासलेले होते. अशा परिस्थितीत 1948 चे भारत-पाक युद्ध, 1962 मधील चीनचा हल्ला, 1965 व 1971 मधील पाकिस्तान बरोबरची युद्धे इत्यादीमुळे शिक्षणक्षेत्राच्या विकासाला पुरेसा अग्रक्रम देता आलेला दिसून येत नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे दारिद्र्य, बेरोजगारीसारख्या समस्यांनी उग्र स्वरूप धारण केले होते. अर्थात असे असले तरी भारतातील शिक्षण व्यवस्था स्थूलमानाने दर्जेदार व चांगली आहे. परंतु तिचा लाभ आजही आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या तथाकथित वरच्या वर्गांना मिळतो व तथाकथित खालचे वर्ग वंचित राहतात, असे का ? ही विषमता दूर करणे हा राजकीय इच्छाशक्तीच्या दृष्टीने दुर्बल घटकांसाठी खर्च करण्याची इच्छाशक्ती राज्यकर्ते व धोरणकर्त्यांकडे असणे आवश्यक आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण व खुल्या स्पर्धेच्या या आधुनिक युगात ही विषमता वाढणार नाही याचीही दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच विद्यमान शिक्षणक्रमांमध्ये सिद्धान्ताबरोबर मिळालेल्या ज्ञानाचे उपयोग ही शिकविले पाहिजेत आणि विद्यार्थ्यांना आपल्या विद्याक्षेत्रात अभ्यासक्रम निवडीचे स्वातंत्र्य असले पाहिजे. देशातील स्थानिक परिस्थितीनुसार रोजगाराभिमुख व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करून बेरोजगारी कमी करणे हे एक मोठे आव्हान ठरणार आहे.

सध्याच्या जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या प्रक्रियेत महाविद्यालये, विद्यापीठे यांनी शासनावरील आर्थिक अवलंबित्व कमी करून उत्पन्नाचे स्वत:चे स्रोत निर्माण करणे ही काळाची गरज आहे. शिक्षणसंस्थांनी अनेक व्यवसाय संस्थांशी करार करून संशोधनाचा समाजासाठी व पर्यायाने देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी वापर केला पाहिजे. त्यासाठी विद्यापीठे व उच्च शिक्षण व संशोधन संस्थांनी उत्तम प्रतीच्या तांत्रिक व बौद्धिक मानवी साधनसामग्रीची निर्मिती

केली पाहिजे. 21व्या शतकात अशा विविध आव्हानांना सामोरे जाऊन भारताला आर्थिक विकासात अग्रेसर बनविण्यासाठी रोजगाराभिमुख शिक्षण, प्रौढ शिक्षण, मूल्यशिक्षण, नैतिक शिक्षण,स्वयंरोजगार या मूलभूत उद्दिष्टांची पूर्तता करणे आवश्यक आहे. तरच आपला देश 21 व्या शतकात जगाचे आर्थिक नेतृत्व करण्यास समर्थ होईल.

बदलत्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत समाजघटकांना स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी व वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी पारंपरिक शिक्षणाचा मूलभूत पाया बदलून नव्या गुणात्मक व स्पर्धात्मक पायावर उभी राहणारी शिक्षणव्यवस्था निर्माण केली पाहिजे. त्यासाठी सर्वक्षेत्रांतील तज्ज्ञांनी एकत्र येऊन योगदान देणे गरजेचे आहे. तरच या बदलाच्या प्रवाहाला सामोरे जाण्यासाठी क्षमता असलेला युवावर्ग तयार होईल. म्हणून शिक्षणाची बदलती दिशा ठरविण्याची आज खरी गरज आहे. तरच स्पर्धात्मक अशा बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेत भारत स्वत:चे असे एक निश्चित स्थान निर्माण करू शकेल.थोडक्यात, आपल्या सुप्त अशा मानवी संसाधन शक्तीचा पुरेपूर लाभ घेऊन आपल्या शैक्षणिक संरचनेच्या पायाकडे आपण लक्ष देण्याची हीच वेळ आहे.

**तक्ता क्र . 1**

**भारताच्या लोकसंख्येतील साक्षरता प्रमाण (टक्केवारी)**

| वर्ष | एकूण | पुरुष | स्त्री |
|---|---|---|---|
| 1951 | 18.3 | 27.2 | 8.9 |
| 1961 | 28.3 | 40.4 | 15.3 |
| 1971 | 34.5 | 46.0 | 22.0 |
| 1981 | 43.7 | 56.5 | 29.5 |
| 1991 | 52.2 | 64.1 | 39.3 |
| 2001 | 65.4 | 75.8 | 52.1 |

संदर्भ : भारताची जनगणना - 2001

* 1951, 1961या वर्षातील साक्षरता प्रमाण हे 5 वर्षे वयावरील लोकसंख्येतील असून 1981,1991,व 2001 या वर्षातील साक्षरता प्रमाण हे 7 वर्षे वयावरील लोकसंख्येचे आहे.

**तक्ता क्र . 2**

**भारतातील पंचवार्षिक योजनातील एकूण खर्चाशी शैक्षणिक क्षेत्राचे शेकडा प्रमाण**

**(सन 1950 ते 2007)**

| | एकूण शिक्षण क्षेत्र | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| योजना | प्राथमिक शिक्षण | माध्यमिक शिक्षण | उच्च शिक्षण | प्रमाण |
| 1ली योजना | 4.3 | 1.00 | 0.7 | 6.00 |
| 2 री योजना | 2.00 | 1.1 | 1.0 | 4.1 |
| 3 री योजना | 2.3 | 1.2 | 1.0 | 4.5 |
| 4 थी योजना | 1.5 | 0.9 | 1.2 | 3.6 |
| 5 वी योजना | 0.8 | 0.4 | 0.5 | 1.7 |
| 6 वी योजना | 0.8 | 0.7 | 0.5 | 2.0 |
| 7 वी योजना | 1.3 | 0.8 | 0.5 | 2.6 |
| 8 वी योजना | 2.1 | 0.8 | 0.3 | 3.2 |
| 9 वी योजना | 3.2 | 1.1 | 0.5 | 4.8 |

संदर्भ : इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली अंक - 21: 2004

**तक्ता क्र . 3**

**भारतातील प्राथमिक शिक्षण स्तरावरील गळतीचे प्रमाण (1960-61 ते 1997-98)**

| कालखंड | प्राथमिक स्तर (1 ली ते 5 वी) | | | उच्च प्राथमिक स्तर (6 वी ते 8 वी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | मुली | मुले | एकूण | मुली | मुले |
| 1960-61 | 61.70 | 70.90 | 64.90 | 75.00 | 85.00 | 78.30 |
| 1970-71 | 64.50 | 70.90 | 67.00 | 74.60 | 83.40 | 77.90 |
| 1980-81 | 56.20 | 62.50 | 58.70 | 68.00 | 79.40 | 72.70 |
| 1990-91 | 40.10 | 46.00 | 42.60 | 59.10 | 65.10 | 60.90 |
| 1997-98 | 38.20 | 41.30 | 39.60 | 50.70 | 58.60 | 54.10 |

संदर्भ : Education in Indian, Padma Ramchandran & Vasantha Ramkumar.

**तक्ता क्र . 4**

**उच्च शिक्षणावरील सरकारचा प्रति विद्यार्थी खर्च (रूपयात)**

| वर्ष | चालू किमतीनुसार | 1993-94 च्या किमतीनुसार | निर्देशांक |
|---|---|---|---|
| 1990-91 | 5652 | 7676 | 100 |
| 1995-96 | 6944 | 5812 | 75.72 |
| 1999-2000 | 10683 | 6954 | 90.59 |
| 2000-2001 | 11989 | 7484 | 97.50 |
| 2001-2002 | 9723 | 5873 | 76.57 |

संदर्भ : इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली अंक - 21: 2004 पृष्ठ 2161

**तक्ता क्र . 5**

**उच्च शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाचे प्रमाण (टक्केवारी)**

| वर्ष | एकूण सरकारी खर्चातील उच्च शिक्षणावरील खर्चाचे शेकडा प्रमाण |
|---|---|
| 1990-1991 | 1.58 |
| 1995-1996 | 1.35 |
| 1999-2000 | 1.61 |
| 2000-2001 | 1.71 |
| 2001-2002 | 1.33 |

संदर्भ : इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली अंक - 21: 2004 पृष्ठ 2161

**तक्ता क्र .6**

**उच्च शिक्षणात शैक्षणिक संस्थांची वाढ (1947 ते 1997)**

| संस्था | 1947 | 1997 | या कालावधीतील वाढीचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| 1. विद्यापीठे | 20 | 178 | 8.9 |
| 2. महाविद्यालये | | | |
| (अ) कला आणि विज्ञान | 459 | 6759 | 15 |
| (ब) व्यावसायिक | 132 | 1770 | 13.4 |
| 3. विद्यार्थी | | | |
| (अ) कला आणि विज्ञान | 1,83,238 | 53,32,782 | 29.1 |
| (ब) व्यावसायिक | 45,643 | 5,65,625 | 12.4 |
| 4. शिक्षक | 24,000 | 3,20,000 | 13 |
| 5. शिक्षक-विद्यार्थी प्रमाण | 1:8 | 1:20 | |

संदर्भ : योजना; अंक 5 डिसेंबर 2001 पृष्ठ 3

## संदर्भ सूची


(1) जागतिक शिक्षणाचा सामाजिक इतिहास - अरविंद वैद्य - ग्रंथाली प्रकाशन, प्रथम आवृत्ती 2003

(2) जागतिकीकरण आणि शिक्षण क्षेत्र - सुधीर पानसे - लोकवाडमय गृह 2004

(3) शिक्षणाचे खाजगीकरण धार्मिकीकरण हा राष्ट्रद्रोह-प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी जुलै - 2003

(4) सर्वांसाठी शिक्षण - भारतातील शिक्षण रूपरेखा-शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन-महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, ऑक्टो. 1994.

(5) योजना - अंक 2, सप्टेंबर 2005.

(6) अर्थसंवाद -जुलै-सप्टेंबर 2004, खंड 28, अंक 2.

(7) शिक्षणाचे आव्हान-महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.

(8)Education in India - Padma Ramachandran and Vasantha Ram Kumar, National Book Trust, India New Delhi, 110016 First Edition 2005.

(9) योजना अंक 7 फेब्रुवारी - 2004.

(10) योजना अंक 1 ऑगस्ट - 2004.

(11) शिक्षणाची आव्हाने - डॉ रावसाहेब कसबे - सुगावा प्रकाशन, पुणे 30.

(12) योजना अंक 1 ऑगस्ट - 2004.

(13) योजना अंक 10 मे 2002

(14) Shultz, Theodore W : Investment in Human Capital, American Economic Review March - 1961

(15) Ansari M.M. - University Finances - Higher Education in India Retrospect and Prospect, AIU New Delhi, 1991

(16) Goel S.C. Education and Economic Growth in India.

(17) Edward Denison : The Sources for Economic Growth in United States, New York 1962.

(18) Report of the Education Commission : NCERT New Delhi, 1970.

(19) Government Subsidies in India, Department of Economic Affairs, Ministry of Finance Dew Delhi, 1997.

(20) University News, Vol. 36 1998.

(21) University News Vol. 40 June 2002

(22) University News Vol. 43 Jan. 2005.

(23) University Niws Vol. 40 No. 12. March 2002.

(24) University News Vol. 40 No. 23 June 2002. Higher Education : Challenges and Visions, University of Pune - 1999

(25) Financing of Education : Mohd. Muzammil, Ashish Publishing House, New Delhi.

(26) Economic and Political weekly - Vol.21,2004

(27) Sharma G.D. "Enrolment in Higher Education, A Trend Analysis AIU, New Delhi, 1977.

(28) दास्ताने संतोष - उच्च शिक्षणाचे अर्थशास्त्र, अर्थसंवाद, जानेवारी-मार्च 2003/खंड 26, अंक4

(29)Panchmukhi P.R. : Economics of Education Fianance, Indian Institute of Education, Himalaya Publishing House, Mumbai 1989.


✦✦✦

# ऊसाचे दर-युद्ध : काल्पनिकता आणि वास्तविकता (उत्तरार्ध)

✦ वसंतराव जुगळे, कोल्हापूर.
*प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ.*

## एकंदर उत्पन्नाचा विचार

साखर कारखानदारीमध्ये केवळ साखर हे एकमेव उत्पन्नाचे साधन नाही. पण काही कारखाने फक्त साखरेचेच उत्पादन करतात. त्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च आणि उत्पन्न याचा ताळेबंद सातत्याने प्रतिकूल राहिला आहे. खर्चात काटकसर नाही, उत्पन्नाची अन्य साधने नाहीत, आणि साखरेची सरासरी किंमत स्थिर किंवा घटत राहिल्याने असे कारखाने मेटाकुटीला आले. पण काही कारखान्यांनी मळीपासून काही उपपदार्थ निर्माण करून आणि अन्यमार्गाने खर्चात काटकसर करून कारखाना नेहमी किफायतशीर ठेवण्याचा खटाटोप केला आहे.

उत्पादित केलेल्या साखरेपैकी 10 टक्के साखर ही कराच्या स्वरूपात केंद्र सरकार खरेदी करते. मात्र ही प्रापण किंमत (procurement price) बाजारभावापेक्षा कमी (रू. 13.45 प्रति कि.ग्रॅ.) असते. त्यामुळे साखर कारखान्यांना सरासरी प्रति कि.ग्रॅ. साखरेमागे तीन ते साडेतीन रूपयांचा तोटा होतो. हा तोटा त्यांना 90 टक्के साखरेच्या विक्रीतून भरून काढावा लागतो. अशावेळी लेव्ही साखरेचे दर वाढवून मागणे क्रमप्राप्त ठरते. अथवा हा तोटा अर्थसहाय्याच्या स्वरूपात केंद्र सरकारने द्यावा हे उचित ठरते.

याशिवाय ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांना स्वस्त दरात साखर द्यावी लागते. हा दर वेगवेगळा राहीला आहे. याचा आवाका रू. 5 ते 7.50 प्रति कि.ग्रॅ. असा राहीला आहे. यामुळे प्रत्येक कि.ग्रॅ. मागे बाजार दराच्या तुलनेने रू. 9.50 ते 10 इतका तोटा होतो. प्रत्येक सभासदाला वर्षाला सरासरी 50 ते 75 कि.ग्रॅ. साखर द्यावी लागते. ह्यातील गाळा, (margin) उर्वरित साखर विकून मिळणाऱ्या उत्पन्न-खर्चामध्ये समाविष्ट करावा लागतो.

साखर कारखान्यांचे प्रमुख उत्पादन स्रोत पुढीलप्रमाणे आहेत. साखर मळीपासून बनविलेली डिस्टीलरी व दारू, बगॅस, प्रेसमड, इथेनॉल, प्रक्रिया केलेली साखर (कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून तयार होणारी साखर) उपनिर्मितीपासून तयार होणाऱ्या वीजेची विक्री करून मिळणारे उत्पन्न, खत प्रक्रियाद्वारे मिळणारे उत्पन्न आणि इतर सेवाद्वारे मिळणारे आधिक्य इ. बाबींचा समावेश होतो.

एकट्या साखरेचा विचार केला तर आगामी 24 महिन्यामध्ये साखरेची खुल्या बाजारातील किंमत सातत्याने वाढणार आहे. तक्ता क्र. 10 मध्ये साखरेच्या विविध किंमतीला किती उत्पन्न मिळू शकते याचे तयार कोष्टक (Ready Recknor) दर्शविलेले आहे. याशिवाय मागणी-पुरवठ्याचा विचार केल्यास आगामी दोन वर्षामध्ये त्यात तफावत निर्माण होणार आहे (आकृती क्र. 1 पहा) यामुळे बाजारभाव प्रति कि.ग्रॅ. मागे सरासरी रू. 21 ते 22 पर्यंत राहील असा अंदाज आहे.

इ.स. 2006-07 मध्ये सर्वसाधारण साखरेचा उतारा 10.25 टक्के गृहित धरल्यास साधारणत: 23 द.ल. टन साखर उत्पादन होईल. सध्या साखरेचा साठा आणि एकूण मागणी याचा विचार केल्यास बरीच तफावत निर्माण होईल असे दिसते. त्यामुळे साखरेची किंमत सातत्याने वाढत राहील असा संकेत मिळतो(आयात गृहीत न धरता) अर्थातच याचा लाभ साखर कारखान्यांना होईल.

जर साखर कारखान्याकडे डिस्टिलरी युनिट आणि देशी दारू उत्पादनाचे विभाग असतील, तर प्रति टन मळीतून खर्च वजा जाता रू. 40 चे अल्कोहोल आणि त्या अल्कोहोलपासून दारू निर्माण केल्यास प्रति टन रू. 25 असे मिळून रू. 65 प्रति मे.ट. उत्पन्न मिळेल. एक टन मळीमधून महत्तम (विदेशी तंत्राने) 280 लिटर अल्कोहोल तयार होते. परदेशातील साखर कारखान्यामध्ये प्रति मे. टन मळीमधून 240 लिटर अल्कोहोल तयार होते. आपल्याकडच्या कारखान्यांमध्ये हे प्रमाण 64 ते 80 लिटर इतके किमान पातळीवर आहे. म्हणजे याबाबतीत देखील बऱ्याच साधनसंपत्तीचा अपव्यय होताना दिसतो. सर्वसाधारणपणे ऊसाच्या रसाच्या 4 टक्के इतके मळीचे उत्पादन होते. कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक कारखान्यांनी मळीच्या विक्रीपासून साधारणत: रू. 832 ते 1,222 प्रति मे. टन इतके उत्पन्न मिळविलेले आहे. (तक्ता क्र. 11 पहा) सहवीज निर्मितीद्वारे प्रति मे.ट.रू. 99.64 इतके उत्पन्न जवाहर सहकारी साखर कारखान्याने मिळविले आहे. म्हणजे याद्वारे 99.64 - 40= 59.64 इतके अधिक उत्पन्न सहवीज निर्मितीमुळे मिळते. (वीजेचा दर साधारणत: रू. 3.50 प्रति युनिट आहे) त्यामुळे प्रत्येक कारखान्याने सह-वीज निर्मिती प्रकल्प राबविला पाहिजे. वीजेचा भावदेखील प्रतियुनिट वाढतच आहे. या व्यतिरिक्त अन्य उत्पन्नाच्या साधनांमध्ये विविध प्रकारच्या सेवा पुरविल्याच्या मोबदल्यात मिळणारे उत्पन्न, प्रेसमड, संचित तोटा भरपाई आणि अन्य किरकोळ साधनांचा समावेश होतो. प्रेसमड आणि ऊसाच्या पाल्यावर प्रक्रिया करून सेंद्रिय खत निर्माण करण्याचा फायदेशीर प्रकल्प उभारता येतो. 'ऊगार शुगर' ह्या खाजगी कंपनीने हे काम यशस्वीरित्या हाताळले आहे. त्यावर या कारखान्याला पेटंटसुद्धा मिळू शकेल. प्रेसमड विकून साधारणत: प्रेसमडच्या एका टनाला रू. 125/- या दराने एक टन ऊसातून 3 ते 4 टक्के प्रेसमड तयार होते, असे गृहीत धरल्यास उत्पादित होणारे प्रेसमडचे (40 कि.ग्रॅ.) उत्पन्न रू. 5/- इतके होते. ज्या कारखान्याकडे डिस्टीलरी व उत्पादन करण्याची संयंत्रे आहेत त्या देशी दारू विभागातून मिळणारे उत्पन्न उदा. अल्कोहोलपासून प्रति टन रू. 40. व अल्कोहोलपासून तयार केल्या जाणाऱ्या देशी दारूपासूनचे उत्पन्न प्रति टन रू. 25 इतके जादा उत्पन्न मिळू शकते. हे संयंत्र नसणारे कारखान्याकडे

डिस्टीलरी व देशी दारू उत्पादन करण्याची संयंत्रे आहेत, त्या कारखान्यांना डिस्टीलरी व देशी दारू विभागातून मिळणारे उत्पन्न उदा. अल्कोहोलपासून प्रति टन रू. 40 व अल्कोहोलापासून तयार केल्या जाणाऱ्या देशी दारूपासूनचे उत्पन्न प्रति टन रू. 25 जादा उत्पन्न मिळू शकते. हे संयत्र नसणारे कारखाने किफायतशीर दराने मळी विकून उत्पन्नाची साधने शोधतात. साखरेच्या दरात घट होऊन अथवा नैसर्गिक कारणाने (लोकरी मावा) साखर उतारा कमी राहून साखर कारखान्यांना तोटा होतो. न्यूनतम आधार किंमती पेक्षा कमी ऊस दर शेतकऱ्यांना द्यावा लागू नये, म्हणून भरपाई केली जाते याला संचित तोटा असे संबोधले जाते. या तोट्याच्या मोबदल्यात नुकसान भरपाई मिळते. 2001-02 ते 2003-04 या काळात वरील परिस्थिती निर्माण झाली. हा तोटा साधारणत: प्रति कारखाना रू. 15 ते 25 कोटीपर्यंत पोहोचलेला आहे. ह्या तोट्याचे प्रमाण 25 टक्के ते 100 टक्के या आवाक्यात आहे.

खुल्या बाजारपेठेत साखरेची जी किरकोळ किंमत प्राप्त होते, त्यामध्ये अबकारी कर + जकात + वाहतूक भाडे + व्यापारी नफा यांचा समावेश असतो. त्यामुळे खुल्या बाजारातील साखरेच्या किंमतीइतके उत्पन्न साखर कारखान्यांना मिळत नाही. साखरेला साधारणत: रू. 1,650 प्रतिक्विंटल दर असेल, तर त्यातले रू. 1,300 ते रू. 1,350 या दरम्यान कारखान्यांना उत्पन्न मिळते. या परिस्थितीमुळे इ.स. 2005-06 सालात कारखान्यांच्या चालू खर्चासाठी बँकांकडून मिळणारे कर्ज प्रति क्विंटल साखरेच्या मागे रू. 1345 इतके आहे. त्यामध्ये प्रति मे. टन ऊसाला द्यावयाचा पहिला अग्रीम रू. 850+ उत्पादन प्रक्रिया खर्च रू. 1200 (प्रति मे. टन) + पूर्व हंगामी कर्ज रू. 100 (प्रति मे. टन) + गनी बॅग रू. 20+ चालू भांडवली कर्जाचे हप्ते रू. 50 (प्रति मे. टन)+ व्याज वसुली रू. 125 (प्रति मे. टन) असे गृहित धरून बँकांनी कारखान्यांना अग्रीम देण्याचा हिशोब केला आहे.

### ऊस उत्पादनाचा खर्च

केंद्रीय कृषि व्यय व मूल्य आयोगाकडे राज्य कृषि मूल्य समितीने शिफारस करावयाच्या विविध कृषि मालाची आधारभूत किंमत प्रमुख चार बाबींवर निर्धारित केली जाते. त्यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च, उत्पादन खर्चावर 15 टक्के नफा, आणि शेतमालाच्या विक्रीकरिता कराव्या लागणाऱ्या वाहतूक खर्चाचा समावेश होतो. उत्पादन खर्चाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या बाबीमध्ये रोजंदारीवरील मजूरांचा खर्च, बैलजोडीच्या श्रमाचा खर्च, यंत्रसामुग्री, बी-बियाणे, खते, सिंचन खर्च, जंतुनाशके, शेतसारा, विमा आणि इतर अनुषंगिक खर्च (निविष्टी प्राप्त करण्यासाठीचा खर्च) अशा दहा बाबींवरच्या खर्चांचा समावेश होतो. अप्रत्यक्ष खर्चामध्ये अवजारांच्या किंमतीतील घसारा, भू भाडे (खंड = कृषि उत्पादन मूल्याच्या कर व उपकर वजा जाता शिल्लक राहणाऱ्या उत्पादन मूल्याच्या 1/6 हिस्सा) स्थिर (12 टक्के) व खेळत्या भांडवलावरील 15 टक्के व्याज, कौटुंबिक मजूरीचा खर्च (रोजंदारीवरील मजूरीपेक्षा 25 टक्के जादा दराने) व प्रत्यक्ष खर्चावर 10 टक्के देखरेख खर्च अशा सहा बाबींचा समावेश होतो. इ.स. 2005-07 ह्या हंगामासाठी ऊस पिकाची किमान किंमत रू. 84.50 प्रति क्विंटल पर्यंत निश्चित होईल असे वाटते. डिझेलच्या किंमती वाढलेल्या असल्यामुळे उत्पादन व पणन खर्चामध्ये थोडी वाढ गृहीत धरल्यास, त्यामध्ये आणखी रू. 0.50 ची वाढ होईल. पण कृषि क्षेत्रासाठी असलेला व्याज दर घटल्यामुळे, काही अंशी खर्चाची बचत होते. त्यातून अधिकच्या खर्चाची भरपाई होते. ऊसाची किमान किंमत निश्चित करीत असताना सुमारे 500 ऊसकरी शेतकऱ्यांची ऊस पीक व्यवस्थापनाची तपशीलवार माहिती घेऊन, त्याची चालू किंमतीमध्ये रूपांतर करून आधारभूत

किंमत काढली जाते. ऊस व्यवस्थापनाची माहिती किमान तीन वर्षांची असावी लागते. कारण एखाद्या वर्षाच्या आकडेवारीमध्ये निसर्गाच्या अनुकूल तसेच प्रतिकूलतेचा प्रभाव राहतो. शिवाय किंमतीच्या चढ-उतारामुळे उत्पादन खर्चात तफावत येऊ शकते. त्यामुळे वास्तव बाजूला पडते. म्हणून सरासरी तीन वर्षांची भारित (Weighted) सरासरी माहिती ही प्रमाणभूत मानली जाते. महाराष्ट्र राज्यासाठी सरासरी साखर उतारा साधारणत: 10 ते 11 ह्या दरम्यान गृहीत धरून किमान किंमत मोजली जाते. तक्ता क्र. 12 मध्ये ऊस उत्पादन खर्चाच्या विविध बाबी निर्देशित केलेल्या आहेत.

तक्त्याच्या स्तंभ 3 व 4 मध्ये दिलेल्या निविष्टींची आणि परिमाणाची किंमत चालू दराने मोजल्यास निविष्टींचा प्रतिहेक्टरी खर्च काढता येतो. त्यासाठी 2003-04 ते 2005-06 या काळातील निविष्टांच्या किंमतीची सरासरी काढावी लागेल. तसे केल्यास इ.स. 2006-07 साठीची ऊसाची किमान किंमत (साखर उतार 9 टक्के गृहित धरून) रू. 81 ते 82 प्रति क्विंटल दरम्यान निश्चित होईल. म्हणजे ऊसाच्या प्रत्येक टनाला (महाराष्ट्रातील सरासरी साखर उतारा 11 टक्के आणि वाढीव उताऱ्यावरील अधिमूल्यन रू. 0.96 गृहित धरल्यास) ऊसाची वैधानिक किमान किंमत रू. 840 प्रति मे.ट. अशी राहील असा एक अंदाज आहे.

### उत्तर प्रदेश सरकारने दिलेल्या सवलती आणि त्याचे महाराष्ट्रावर होणारे परिणाम

उत्तर प्रदेश सरकारने साखर उद्योगाच्या दीर्घकालीन विकासासाठी या उद्योगाला द्विस्तरीय प्रलोभने दिलेली आहेत. दि. 1-4-2004 ते 31-3-2007 या कालावधीत अनुक्रमे रू. 500 कोटी व रू. 350 कोटी उत्तर प्रदेशच्या साखर उद्योगात गुंतवणूक करून सुमारे 1000 लोकांना रोजगार देऊन अनुक्रमे 5 व 3 वर्षांच्या कालावधीसाठी, उत्पादन सुरू झाल्यापासून दि. 31-3-2007 पासून किंवा उत्पादन चालू झाल्यापासून त्यापुढील अनुक्रमे 10 वर्षे व 5 वर्षांसाठी खालील सवलती मिळणार आहेत.

1. साखर प्रवेश कर पूर्ण माफ (यामुळे निव्वळ 2 टक्क्यांची बचत होते).

2. मळीवरील प्रशासकीय शुल्क-परतावा (रू. 150. प्रति मे. टनची बचत)

3. मळीवरील उलाढाल कर माफ (10.2 टक्के ची निव्वळ बचत)

4. संपादित जमिनीवर नोंदणी शुल्क माफ

5. ऊसावर विक्रीकर माफ व परतावा (रू. 20/- प्रति मे. टन निव्वळ बचत)

6. सोसायटी कमिशन माफ व परतावा (3 टक्केची निव्वळ बचत)

7. ऊस वाहतूक अनुदान परतावा

8. राज्यांतर्गत व राज्याबाहेर 600 कि.मी. साखर वाहतूकीवरील खर्चाचा 100 टक्के परतावा.

9. आर्थिक गुंतवणुकीवर 100 टक्के अनुदान इ.

अस्तित्वातील जुन्या साखर कारखान्यांनी आपल्या उत्पादन क्षमतेचा विस्तार अथवा साखर उद्योगाशी संबंधित उप-पदार्थांच्या निर्मितीमध्ये (इथेनॉल, अल्कोहोल सह-विद्युत उत्पादन) रू. 300 ते 500 कोटी रूपयांपर्यंत गुंतवणूक करणाऱ्या साखर कारखान्यांना देखील वरील सवलती मिळणार आहेत. यामुळे 2005 पर्यंत उत्तरप्रदेशा मधील गुंतवणूक 1500 कोटीने वाढून सुमारे 70,000 TCD उत्पादन क्षमतेचा विस्तार होईल आणि ऑक्टोबर 2007 पर्यंत आणखी 1,400 कोटींची गुंतवणूक वाढून नवीन कारखान्यांची क्षमता 37,000 TCD आणि जुन्या कारखान्यांची विस्तार क्षमता 3,40,000 TCD होईल. त्यामुळे उत्तरप्रदेशाची एकूण उत्पादनक्षमता 4,47,000 TCD होईल. या धोरणांतर्गत मान्य

असलेल्या वेगवेगळ्या सवलतींची धनराशी कंपनी करीत असलेल्या गुंतवणुकीच्या धनराशीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत जास्त असणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे. तसेच ऊसाच्या किंमतीच्या 100 टक्के परतावा दिल्यानंतरच, ह्या सवलती देता येणार आहेत. कंपनीने या सवलतीचा दुरूपयोग केल्यास सर्व सवलतीची वसुली होणार आहे. या सवलतीमुळे साखरेच्या प्रति किलो मागे सर्वसाधारपणे रू. 2/- मिळणार असल्यामुळे तेवढ्या कमी दराने साखर विक्री करणे तिथल्या साखर उद्योगांना परवडणारे आहे. परिणामी महाराष्ट्राच्या साखरेच्या किंमतीच्या तुलनेने प्रतिकिलो रू. 2/- ने उत्तर प्रदेशातील साखर स्वस्त होणार. त्यामुळे उत्तरप्रदेशाच्या साखरेची मागणी वाढेल आणि तेवढ्याच प्रमाणात महाराष्ट्राच्या साखरेला असलेली मागणी कमी होईल. महाराष्ट्रातून सुमारे 60 ते 65 टक्के साखर उत्पादन बाहेरच्या राज्यांना विशेषत: प. बंगाल, झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, उत्तर-पूर्व राज्यांना पाठविली जाते. या राज्यांची साखरेची मागणी उत्तर प्रदेश पुरविणार असल्यामुळे महाराष्ट्राची साखर या राज्यांमध्ये खपणार नाही. महाराष्ट्राला अन्य बाजारपेठा शोधाव्या लागतील.

महाराष्ट्रातील साखर उद्योगाला मिळणाऱ्या सवलती खालीलप्रमाणे आहेत.

1. ऊस खरेदी कर माफ(मर्यादित कालावधीसाठी)

2. कर्जाचे दीर्घकालीन कर्जात रूपांतर (नाबार्ड पॅकेजप्रमाणे)

3. शासकीय भाग भांडवल (3 टक्के)

4. परिस्थितीजन्य सवलती. उदा.रस्ते विकास योजनेसाठी रू. 4 प्रति मे. टन अनुदान, साखर उतारा घट अनुदान -संचित तोटा नुकसान भरपाई, खरेदीवर माफी, साखर निर्यातीतील सवलती, रोग किड नुकसान भरपाई, पाणी पट्टीतील सवलती, वीज शुल्क माफी, सरकारची थक हमी.

उत्तर प्रदेश सरकारप्रमाणे महाराष्ट्रातल्या साखर धंद्याला सवलती द्यावयाचे झाल्यास ह्या सवलतींची किंमत काही हजार कोटीपर्यंत जाईल. शिवाय अन्य कृषी मालाच्या उत्पादनाला देखील सवलती देणे क्रमप्राप्त ठरेल. एकंदर या बाबी अल्पकाळासाठी जाचक वाटत नसल्या तरी दीर्घकाळामध्ये या सवलतींचा परिणाम महाराष्ट्राच्या साखर उद्योगावर झाल्यावाचून राहणार नाही.

**प्रारूप आराखडा**

ऊस हा कल्पवृक्ष आहे. त्यापासून मिळणारे लाभ अनेक आहेत. लाभ संपादित करण्यासाठी व्यवस्थापकीय कौशल्याची व तंत्रज्ञानाच्या वापराची आवश्यकता आहे. कारखानदारी निव्वळ साखर उत्पादनावर अवलंबून राहिली तर ती कारखानदारी फार काळ टिकणार नाही. त्याच्या उपफूलांवर आधारित उत्पादनांची निर्मिती फायदेशीर ठरते. पश्चिम महाराष्ट्रातील उच्च उताऱ्याचा नैसर्गिक लाभ उठविण्याची व्यवस्था केली पाहिजे. हंगाम आणि बिगर हंगामी काळात कारखानदारी चालू ठेवता आली पाहिजे. बिगर हंगामी काळात परिष्कृत साखरेची (Refined) निर्मिती होऊ शकते. तसेच कोणत्या वेळी कोणते युनिट कार्यान्वित करावेत, कोणते युनिट केंव्हा बंद करावेत, याचे नियोजन आखले गेले पाहिजे. उत्पादन प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यातील कार्यक्षमता मोजता येते, त्या अनुषंगाने ज्या त्या टप्प्याची जबाबदारी ज्या त्या विभाग प्रमुखाकडे सोपवावी. साखर कारखानदारांनी सर्व व्यवहारामध्ये ''सार्वजनिक जबाबदारी''स्वीकारली पाहिजे.

साखर कारखानदारीने गेल्या अनेक वर्षातील शासनाची विकास कामे आपआपल्या परिसरात सुलभ केलेली आहेत. त्यामुळे अशा भागाला राजस्वाच्या काही सवलती (कर सवलती) दिल्या पाहिजेत.

''वस्तुची नम्यता'' आणि ''उत्पादित

मिश्रण'' तांत्रिकदृष्ट्या विकसित झाले पाहिजेत. यावरच्या संशोधनाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. वस्तुनिहाय ''व्यापारविषयक बुद्धिमत्ता''विकसित करून फक्त ''मूल्य वृद्धिस पोषक'' वस्तुंची निर्यात करावी.


ऊस तोडणी कामगार व वाहतूक कामगारांच्यासाठी स्वतंत्र माथाडी मंडळाची स्थापना करावी. त्याचे नियोजन सर्व घटकांना विश्वासात घेऊन करावे. तसे पाहिल्यास साखर कारखानदारीशी संबंधित सर्वच घटकांचा प्रमंडळीय पद्धतीने विचार होणे आवश्यक आहे. प्रमंडळीय समन्वयाची योजना, हे महत्त्वाचे सामुदायिक कृती क्षेत्र आहे. या क्षेत्राचे स्वरूप नेहमी बदलत आले आहे.

ऊस शेतीच्या पातळीवर किमान ऊस उताऱ्याच्या आणि साखरेच्या प्रचलित किंमतीच्या आधारावर अग्रीम देण्याची व्यवस्था करावी. अर्थात, हे काम मंत्रिमंडळ समिती करीत असते. साखरेची किंमत आणि ऊस दरासाठीचे अग्रीम यामध्ये साधारणत: रू. 300 ते 350 चा फरक असलाच पाहिजे. सर्वच साखर कारखान्यांना ऊस देयक देण्यासाठी (चालू खर्चासाठी) कर्जाचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे ''अल्प फरकाचा''तांत्रिक पेच सोडविण्यासाठी बँकांना आधार (Support) द्यावा लागतो. ऊसाचा पहिला हप्ता निर्धारित करण्याच्या प्रक्रियेत बँकांनाही चर्चेत सामावून घेणे आवश्यक आहे. चालू वर्षात प्रति टन साखरेच्या रू. 1350 इतके अग्रीम ठरवून साखर हंगामाचा सर्व हिशोब केला आहे. या पार्श्वभूमीवर पुढील हंगामाच्या काळात ऊसाचे पहिले अग्रीम रू. 1000 चे असावे. पुढील वर्षात साखरेची सरासरी किंमत रू. 1800 ते 1900 प्रति क्विंटल असेल असा एक अंदाज आहे. भारतातील आणि जगाच्या बाजारपेठेतील अतिरिक्त साखरेचा साठा पुढील वर्षापर्यंत संपेल. शिवाय 2005-06 सालातील साखरेचे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होणार असल्याने साखरेच्या पुरवठ्याचा प्रश्न निर्माण होणार असे दिसते. ह्या पार्श्वभूमीवर पहिला हप्ता रू. 1000/- चा असावा. त्यानंतरचा म्हणजे अर्धा हंगाम संपण्याच्या (जानेवारी) पार्श्वभूमीवर मंत्री परिषदेची दुसरी बैठक होऊन सर्व कारखान्यांच्या आदर्श तक्त्याच्या आधारे दुसरा अंदाज बांधून ऊस देयकाचा दुसरा हप्ता देण्यात यावा आणि तिसरा हप्ता साखर हंगाम संपल्यानंतर साखर आणि इतर सर्व उपपदार्थांची विक्री करून मिळणाऱ्या उत्पन्नातून खर्च वजा जाता उर्वरित उत्पन्नाचा हिस्सा, ऊस देयक म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अदा करण्यात यावा. असे करताना पुढील काळात येणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी कायम स्वरूपी स्थिरीकरण निधी विकसित करणे हिताचे ठरणार आहे. जे सभासद शेतकरी एखाद्या वर्षात ऊस पुरविणार नाहीत अशा सभासदांना लाभांश स्वरूपात त्याच्या भाग-भांडवलावर परतावा देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

सर्वच साखर कारखान्यांनी त्यांना लागणाऱ्या ऊसाची खरेदी ''गेटकेन'' पद्धतीने करावी. ''फिल्डगेट'' ते ''गेटकेन'' म्हणजे, ऊस शेती ते कारखान्याच्या गवाणीपर्यंतच्या वाहतुकीचा व तोडणीचा खर्च शेतकऱ्यांनी अथवा वाहतूक संस्था/संघटनांनी करावा. ऊसाची तोडणी व वाहतूकीची जबाबदारी श्रमिक संस्था, न्यास, श्रमिक सहकारी संस्था अथवा माथाडी मंडळामार्फत व्हावी. साखर कारखाने आणि अशा संस्था, यांच्या मध्ये परिणामकारक व्यवहारिक सहसंबंध विकसित केले पाहिजेत. प्रत्येक तीन वर्षांनी त्रिपक्षीय कराराद्वारे ऊस तोडणी व वाहतुकीचे दर निश्चित करावेत. ऊस तोडणीनंतर पहिल्या आठ तासात, ते गवाणीत गेले पाहिजे. त्यामध्ये विलंब झाल्यास विलंबाच्या प्रत्येक तासाला (शेतकऱ्यांना) नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. साखर कारखान्यातील सर्व घटक आपआपले मजूरी, पगार घेऊन स्वस्थ आणि

आकृती क्र. 1

उत्पादन आणि उपभोग



निवांत असतात. शेतकऱ्याला मात्र संपूर्ण अव्यवस्थेचा बकरा बनविला जातो, म्हणून ही नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे.

वरील प्रारूप आराखडा सहकारी साखर कारखान्यांसाठी आहे. सहकारी पद्धतीने शेतकऱ्यांचे अधिक हित होते. खाजगी क्षेत्राचा ह्या दृष्टीने विचार झाला पाहिजे. साखर कारखानदारी नामशेष होऊ शकत नाही. सहकारावरचे आघात ह्या कारखानदारीच्या माध्यमाने व्यक्त होतात. म्हणून सहकार संपला अशी हाकाटी केली जाते. पण या देशातल्या सामान्य माणसाला उमेदीने जगविण्याचे साधन म्हणजे सहकार आहे. या क्षेत्रातला सरकारी हस्तक्षेप कमी करून, हे क्षेत्र राजकारणमुक्त ठेवल्यास ह्या क्षेत्राचे महत्त्व वाढेल. वरवर हे अवघड वाटत असले तरी यातून देखील तोडगा निघू शकतो.

### संदर्भ सूची


1). Jugale V.B. (2003) - Sugarcane Pricing - Atlantic Publishers and Distributers, New Delhi.

2) जुगळे व्ही.बी. (2004) - साखर उद्योगाची परवानामुक्ती आणि विनियंत्रण - सेंटर फॉर सोशल स्टडिज अँण्ड रिसर्च, सांगली.

3) Jugale V.B. (1993) Employment Wages, Industrial Relations of Farm Sector in Sugar Industry-Classical Publishing Co., New Delhi.


**तक्ता क्र. 8**

**उत्पन्नाची माहिती**

| कारखान्याचे नांव | खुल्या विक्रीचा साखर दर प्रति पोते रू | ऊसाची मळी विक्री रू.मे.टन | बगॅस विक्री रू.मे.टन | आसवनी रू.मे.टन ऊस | इथेनॉल | सहवीज निर्मिती | कागद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शाहू | 1161 | 1222.76 | 953.37 | (+)12.71 | निरंक | निरंक | निरंक |
| कुंभी | 1086 | 832.49 | 729.77 | 50.14 | - | - | - |
| मंडलिक | 1380 | 4230.00 | 1204.00 | - | नाही | नाही | नाही |
| जवाहर | 1102.24 | 1037.77 | 837.50 | -- | - | 99.64 | - |
| पंचगंगा | 1122.32 | 866.55 | -- | (-)9.59 | -- | -- | -- |
| शरद | 1119 | 1658 | 798 | -- | -- | -- | -- |
| गडहिंग्लज | 1125.81 | 1000.00 | - | 20.24 | -- | -- | -- |

संदर्भ - विभागीय साखर संचालनालय, कोल्हापूर.

तक्ता क्र. 9

लेखा परीक्षण माहिती

| कारखान्याचे नांव | संचित नफा/तोटा लाख | मूल्य लाख | कर्ज उभारणी मर्यादा लाख | प्रत्यक्ष कर्ज लाख | अपुरा पुरावा |
|---|---|---|---|---|---|
| शाहू सह., कागल | (+)11.73 | 1226.90 | 12269.00 | 1744.61 | नाही |
| कुंभी कासारी, कुडित्रे | तोटा 2659.55 | (-)1709.34 | (-)17054.00 | 2036.55 | – |
| मंडलिक सह., कागल | (+) 0.41 | 1971.91 | 17091.47 | 2627.63 | – |
| जवाहर शेतकरी, हुपरी | तोटा 31.16 | 1521.14 | 15211.40 | 12546.90 | – |
| पंचगंगा सह. | तोटा 5065.38 | 3665.02 | 31907.42 | 11716.53 | 959.85 |
| शरद सह., नरंदे | नफा 9.29 | 1696.54 | 16965.40 | 6005.42 | नाही |
| गडहिंग्लज सह. | (-) 478.15 | 517.00 | 6984.00 | 5063.53 | नाही |

संदर्भ - विभागीय साखर संचालनालय, कोल्हापूर.

तक्ता क्र. 10

थकीत वसुली/ठेवी

| कारखान्याचे नांव | ठेवी | ऊस तोडणी व वाहतूक अग्रीम | इतर अग्रीम |
|---|---|---|---|
| शाहू सह., कागल | निरंक | 2.07लाख | 18.75 |
| कुंभी कासारी, कुडित्रे | -- | 12.79 | 80.20लाख |
| मंडलिक सह., कागल | -- | --- | --- |
| जवाहर शेतकरी, हुपरी | -- | --- | 7.29 |
| पंचगंगा सह. | 1337.63 | 23.60 | 136.71 |
| शरद सह., नरंदे | 619.88 | --- | --- |
| गडहिंग्लज सह. | 1155.78 | 16.74 | 22.14 |

संदर्भ - विभागीय साखर संचालनालय, कोल्हापूर.

तक्ता क्र. 11

उत्पन्नाचे तयार कोष्टक (Ready Recknor)

| दैनिक गाळप क्षमता टन | साखर उतारा % | साखर उत्पादन क्विंटल | साखरेचा भाव व किंमत (प्रति क्विंटल) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रू. 1800 | रू.1850 | रू.1900 | रू.1950 | रू. 2000 | रू.2050 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 2500 | 9 | 225 | 40.50 | 41.625 | 42.75 | 43.875 | 45.00 | 46.125 |
| | 10 | 250 | 45.00 | 46.250 | 47.50 | 48.750 | 50.00 | 51.250 |
| | 11 | 275 | 49.50 | 50.875 | 52.25 | 53.625 | 55.00 | 56.375 |
| | 12 | 300 | 54.00 | 55.500 | 57.00 | 58.500 | 60.00 | 61.500 |
| 3000 | 9 | 270 | 48.60 | 49.95 | 51.30 | 52.65 | 54.00 | 55.35 |
| | 10 | 300 | 54.00 | 55.50 | 57.00 | 58.500 | 60.00 | 61.500 |
| | 11 | 330 | 59.40 | 61.05 | 62.70 | 64.35 | 66.00 | 67.65 |
| | 12 | 360 | 64.80 | 66.60 | 68.40 | 70.20 | 72.00 | 73.80 |
| 4000 | 9 | 460 | 64.80 | 66.60 | 68.40 | 70.20 | 72.00 | 73.80 |
| | 10 | 400 | 72.00 | 74.00 | 76.00 | 78.00 | 80.00 | 82.00 |
| | 11 | 440 | 79.20 | 81.40 | 83.60 | 85.80 | 88.00 | 90.20 |
| | 12 | 480 | 86.40 | 88.80 | 91.20 | 93.60 | 96.00 | 98.40 |
| 5000 | 9 | 450 | 81.00 | 83.25 | 85.50 | 87.75 | 90.00 | 98.40 |
| | 10 | 500 | 90.00 | 92.50 | 95.00 | 97.50 | 100.00 | 102.50 |
| | 11 | 550 | 99.00 | 101.75 | 104.50 | 107.25 | 110.00 | 112.75 |
| | 12 | 600 | 108.00 | 111.0 | 114.00 | 117.00 | 120.00 | 123.00 |
| 6000 | 9 | 540 | 97.20 | 99.9. | 102.60 | 105.30 | 108.00 | 110.70 |
| | 10 | 600 | 108.00 | 110.00 | 114.00 | 117.00 | 120.00 | 123.00 |
| | 11 | 660 | 118.80 | 122.10 | 125.40 | 128.70 | 132.00 | 135.30 |
| | 12 | 720 | 129.60 | 133.20 | 136.80 | 140.40 | 144.00 | 147.60 |
| 7000 | 9 | 630 | 113.40 | 116.55 | 119.70 | 122.85 | 126.00 | 129.15 |
| | 10 | 700 | 126.00 | 129.50 | 133.00 | 136.50 | 140.00 | 143.00 |
| | 11 | 770 | 138.60 | 142.45 | 146.30 | 150.15 | 154.00 | 157.85 |
| | 12 | 840 | 151.20 | 155.40 | 159.60 | 163.80 | 168.00 | 172.20 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8000 | 9 | 720 | 129.60 | 133.20 | 136.80 | 140.40 | 144.00 | 147.60 |
| | 10 | 800 | 144.00 | 148.00 | 152.00 | 156.00 | 160.00 | 164.00 |
| | 11 | 880 | 158.40 | 162.80 | 167.20 | 171.60 | 176.00 | 180.40 |
| | 12 | 960 | 172.80 | 177.60 | 182.40 | 187.20 | 176.00 | 196.80 |
| 9000 | 9 | 810 | 145.80 | 149.85 | 153.90 | 157.95 | 162.00 | 166.00 |
| | 10 | 900 | 162.00 | 166.50 | 171.00 | 175.50 | 180.00 | 184.50 |
| | 11 | 990 | 178.20 | 183.15 | 188.10 | 193.05 | 198.00 | 202.95 |
| | 12 | 1080 | 194.40 | 199.80 | 205.20 | 210.60 | 216.00 | 221.40 |
| 10,000 | 9 | 900 | 162.00 | 166.50 | 171.00 | 175.50 | 180.00 | 184.50 |
| | 10 | 1000 | 180.00 | 185.00 | 190.00 | 195.00 | 200.00 | 205.00 |
| | 11 | 1100 | 198.00 | 203.50 | 209.00 | 214.50 | 220.00 | 225.50 |
| | 12 | 1200 | 216.00 | 222.00 | 228.00 | 234.00 | 240.00 | 246.00 |

**तक्ता क्र. 12**

**विवरणपत्र**

**महाराष्ट्रातील सन 2006-07 विक्री हंगामाकरिता 'ऊस' या पिकाच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेला प्रतिहेक्टरी खर्च**

| अ. क्र. | निविष्टे | | परिमाण | प्रतिहेक्टरी निविष्टे | निविष्टीच्या प्रति परिमाणित खर्च | प्रतीहेक्टर एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | रोजंदारीवरील मजूरी | पुरूष | दिवस | 96.62 | 62.68 | 6056.14 |
| | | स्त्री | दिवस | 91.96 | 47.00 | 4322.12 |
| 2 | बैलांचे श्रम | | बैलजोडीचे दिवस | 12.50 | 187.40 | 2342.50 |
| 3 | यंत्रसामुग्री | | रूपये | | | 1967.33 |
| 4 | बी-बियाणे | | किलो | 7074.11 | 1.08 | 7640.04 |
| 5 | सेंद्रिय खते | | बैलगाडी | 13.82 | 170.83 | 2360.87 |
| 6 | रासायनिक खते | एन पी के | किलो | 216.85 | 10.50 | 2276.93 |
| | | | किलो | 124.77 | 16.25 | 2027.51 |
| | | | किलो | 91.72 | 7.43 | 681.48 |

| 1 | 2 | | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|---|
| | **उपबेरीज - (बाब क्र.6)** | | रूपये | | | 4985.92 |
| 7. | सिंचन खर्च | | रूपये | | | 5396.48 |
| 8. | जैविक खते व अणुपोषक द्रव्ये | | रूपये | | | 59.67 |
| 9. | तृण नाशके | | रूपये | | | 36.02 |
| 10 | जंतुनाशके | | रूपये | | | 101.59 |
| 11 | विम्याचा हप्ता | | रूपये | | | 0.00 |
| 12 | अनुषंगिक खर्च (निविष्टे मिळविणे) | | रूपये | | | 209.15 |
| | **खेळते भांडवल (बाब क्र. 1 ते 12)** | | रूपये | | | 35477.83 |
| 13 | खेळत्या भांडवलावरील व्याज | | रूपये | | | 4966.10 |
| 14 | जमिनीचा महसूल, उपकर व कर | | रूपये | | | 203.85 |
| 15 | अवजारे व गोदामावरील घसारा | | रूपये | | | 960.11 |
| | **खर्च ''अ'' (बाब क्र. 1 ते 15)** | | रूपये | | | 41608.69 |
| 16 | जमिनीचा खंड/जमिनीचे भाडे | | रूपये | | | 9693.10 |
| 17 | स्थिर भांडवलावरील व्याज | | रूपये | | | 2899.65 |
| | **खर्च ''ब'' (बाब क्र. 1 ते 17)** | | रूपये | | | 54201.43 |
| 18 | कौटुंबिक मानवी श्रम | पुरूष | दिवस | 57.26 | 78.35 | 4486.32 |
| | | स्त्रिया | दिवस | 15.02 | 58.75 | 882.43 |
| 19 | देखरेखीवरील खर्च | | रूपये | | | 4160.87 |
| | **खर्च ''क'' (बाब क्र. 1 ते 19)** | | रूपये | | | 63731.05 |
| 20 | खर्च ''क'' म्हणजेच प्रतिहेक्टरी उत्पादनाचा एकूण खर्च | | रूपये | | | 63731.05 |
| 21 | प्रतिहेक्टरी मुख्य उत्पन्न | | क्विंटल | | | 797.07 |
| 22 | प्रतिहेक्टरी मुख्य उत्पन्नाची किंमत | | रूपये | | | 59381.72 |
| | | | राज्य सरासरी 11.49 प्रतिशत उतान्याकरिता | | | 8.5 प्रतिशत उतान्याकरिता |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|
| 23. | प्रतिक्विंटल निव्वळ उत्पादन खर्च ( 20/21) | रूपये | | 79.96 | 51.14 |
| 24. | प्रतिक्विंटल | | | | |
| | अ. उत्पादन खर्चावर 15 टक्के नफा | रूपये | | 11.99 | 8.87 |
| | ब. बाजार व वाहतुकीवरीच खर्च | रूपये | | 17.87 | 13.22 |
| 25. | बाब क्र. 25 सह प्रतिक्विंटल किंमत (23+24) | रूपये | | 109.82 | 81.23 |

संदर्भ - कृषी मूल्य समिती, मुंबई

✦✦✦

## श्रद्धांजली
## प्रा. सदानंद वर्दे

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद, समाजवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते, पोद्दार महाविद्यालयाचे व वांद्र्याच्या नॅशनल महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, एस.एम. जोशी फाऊंडेशनचे विश्वस्त सचीव, मुंबई महानगरपालिकेच माजी नगरसेवक, सांताक्रुझच्या साने गुरूजी आरोग्य मंदिराचे संस्थापक, इच्छामरणाच्या कायद्यासाठी आग्रह धरणारे थोर समाजसेवक व पुलोद सरकारच्या काळातील शिक्षणमंत्री, निष्ठावान व प्रामाणिक व्यक्तिमत्व प्रा. सदानंद वर्दे यांचे 29 जानेवारी 2007 रोजी त्यांच्या वांद्रे येथील राहत्या घरी वयाच्या 81व्या वर्षी दु:खद निधन झाले. मराठी अर्थशास्त्र परिषद त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

कार्यवाह - खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

# एडमंड एस.फेल्पस् आणि आधुनिक समष्टि अर्थशास्त्र

✦ अतुल देशपांडे, कोडैकॅनॉल.

*प्राध्यापक, कोडेकॅनॉल इंटरनॅशनल स्कूल, तामीळनाडू.*

एडमंड फेल्पस् ह्यांना नुकतेच 2006 मधील अर्थशास्त्रातील 'नोबेल' पारितोषिक प्राप्त झाले. एडमंड फेल्पस ह्यांचे 'समष्टि अर्थशास्त्राच्या' विकासातील योगदान मूलभूत स्वरूपाचे आहे. सद्यकालीन 'समष्टि अर्थशास्त्राच्या' विकासाची वाटचाल फेल्पस् ह्यांनी विकसित केलेल्या सिद्धांतनाच्या चौकटीवर खूप मोठ्या प्रमाणावर विसावलेली आहे.

**कामाची व्याप्ती**

नेड (बहुधा ह्या नावाने ते अधिक ओळखले जातात) फेल्पस् ह्यांच्या अर्थशास्त्रातील संस्मरणीय योगदानाची संक्षिप्त रूपरेषा देणे हे खरे तर जिकीरीचे काम आहे. त्यांनी मांडलेल्या अर्थशास्त्रीय संकल्पना व प्रतिमाने यांची व्याप्ती बरीच मोठी आहे. 'बेरोजगारीच्या नैसर्गिक दराविषयीची संकल्पना' आणि अपेक्षांवर आधारित असलेला फिलिप्स वक्र (1967,1968,1971) 'शोध बेरोजगारीचा', (1968,1969,1970), 'प्रेरक वा कार्यक्षम वेतन' (1968), कालसदृश पर्याप्त किंमत वृद्धीचे लक्ष्य (1967,1972,1978) बेरोजगारीच्या गतिशीलतेबाबतची दिसून येणारी 'विखुरलेली आणि विषम' वेतन निश्चितता (1977,1979) त्याच प्रमाणे किंमतवाढ न होण्याविषयीची परिस्थिती (1978) किंमत निश्चित करण्याविषयीचे 'ग्राहक बाजाराचे' (Customer Market) प्रारूप (1970,1994), 'दीर्घकालीन वृद्धीवाढ होण्याबाबतीतील शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या प्रसाराची नेमकी भूमिका वा त्यांचे योगदान' (1966), 'भौतिक भांडवल' (1961) आणि संशोधनात (1966) केल्या जाणाऱ्या गुंतवणुकीसंबंधीचे 'सुवर्ण नियम' (Golden Rules), 'बचतीच्या वर्तनाबाबत दिसून येणाऱ्या असातत्यतेतील गतिशीलता, (1968), 'सांख्यिकीय भेदाभेद' (1972), आणि नैसर्गिक बेरोजगारीच्या दरामध्ये दिसून येणाऱ्या आंतरिक (Endogenous) बदलासंबधीची 'संरचनावाद्यांची' (Structuralists) प्रारूपे या विषयांची त्यांनी मांडणी

केली.

नेड ह्यांच्या ह्या (बहुधा सर्वच) नवनिर्मित सिद्धांतांचा समष्टि अर्थशास्त्राच्या विकासावर खूप मोठ्या प्रमाणावर परिणाम झाल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे, तर ह्यातील अनेक बाबी अर्थशास्त्रज्ञांनी पुढे विकसित केल्या व त्यांना मान्यता मिळाली. उदाहरणादाखल काही बाबींचा उल्लेख ह्या ठिकाणी करता येईल. विझसॅकर ह्यांचे 'मात करण्याचे तत्त्व'(Overtaking Principle) फेल्पस् ह्यांच्या 'सुवर्ण नियमातून' विकसित झाले. कास (1972) ह्यांनी मांडलेले निष्कर्ष फेल्पस्‌कूपमन्स ह्यांच्या गतिशील अकार्यक्षमता सिद्धांतावर आधारलेले आहेत; लूकास (1972) ह्यांचे 'तर्कसंगत अपेक्षा सिद्धांत आणि व्यवसाय चक्र प्रारूप' 'फेल्पस् ह्यांच्या 'आयलंड पॅरबल' च्या माध्यमातून विकसित झाले. त्याचप्रमाणे,लूकास-प्रेसकॉट (1974) ह्यांनी मांडलेल्या 'समतोल' बेरोजगारीच्या विश्लेषणातही त्याचा उपयोग करून घेतल्याचे लक्षात येते; फेल्पस् ह्यांनी मांडलेली 'समतोल बेरोजगारीची' संकल्पना पुढे स्टिगलिट्झ् (1973) ह्यांनी अधिक विकसित केली. 'विखुरलेल्या आणि विषम वेतन निश्चिततेचे प्रारूप टेलर (1979,1980,1993) ह्यांनी पुढे अर्थमितिच्या आधारे अधिक विकसित केले. 'कार्यक्षमता वेतन प्रारूपाची' संक्षिप्तता कालव्हो (1979), शॅपीरो आणि स्टिगलिट्झ् (1984) ह्यांनी अभ्यासली; ओकून (1981) ह्यांच्या अर्थशास्त्रीय विश्लेषणात 'ग्राहक बाजार' संकल्पनेने केंद्रीय भूमिका बजावल्याचे लक्षात येते; ब्लॅनचार्ड आणि समर्स (1985) ह्यांनी 'श्रम बाजार पूर्वग्रहज (Hysteresis) परिकल्पना' अनुभवाच्या आधारे (त्यातील सत्यासत्यता) पडताळली; सद्यकालीन 'शुंपिटरप्रणित वृद्धी वाङ्मयाच्या विषयात' नेल्सन-फेल्पस् ह्यांच्या 'तांत्रिक प्रगतितील शिक्षणाच्या भूमिकेच्या' दृष्टिकोनाचा खूप उपयोग करून घेतला जातो; किंबहुना त्या वृद्धीवाङ्मयचा हा दृष्टिकोन महत्त्वाचा विषय आहे; लाएं-बसन आणि अन्य अर्थशास्त्रज्ञांनी (1997) फेल्पस्-पोलाक ह्यांनी मांडलेली 'काल-असत्यता पसंतीक्रमाची' संकल्पना पुढे अधिक विस्तृतरित्या विकसित केली; टेलर (1979) आणि सार्जंट (1999) ह्या दोहोंनी 'पर्याप्त किंमतवृद्धी नियोजनातील' ''फेल्पस् प्रश्न'' अधिक खोलात जाऊन अभ्यासला; जोन्स् (1995) आणि अन्य अर्थशास्त्रज्ञांच्या अलीकडच्या संशोधनात 'लोकसंख्या आणि तांत्रिक प्रगती' ह्यातील कार्यकारणभावावर (परस्परसंबंधावर) अधिक लक्ष्य दिल्याचे दिसून येते; ब्लॅनचार्ड, बीन आणि अन्य अर्थशास्त्रज्ञांच्या अलीकडच्या अर्थमितीवर आधारित संशोधनात फेल्पस् ह्यांच्या 'आंतरिक नैसर्गिक दर संरचनावादी' सिद्धांतनाची सांख्यिकीय सत्यासत्यता तपासून पाहण्याचे काम केल्याचे दिसून येते.

ह्या व ह्यासारख्या अगणित संकल्पना आणि प्रारूपांच्या विकासातील फेल्पस् ह्यांचे योगदान महत्त्वाचे आहेच. परंतु, 'एक मध्यवर्ती प्रकल्प' म्हणून त्यांचे प्राथमिक आणि मूलभूत योगदान काय? समष्टि अर्थशास्त्राच्या अभ्यासात, वेगवेगळ्या घर्षणांनी (Frictions) बद्ध असलेल्या बाजारात 'अपूर्ण माहितीचे' (Imperfect Information) स्थान काय आणि 'अपूर्ण ज्ञानातून' (Imperfect Knowledge) त्याचा एक परिणाम म्हणून कोणती गुंतागुंत निर्माण होते, ह्या दोहोंबाबत त्यांनी मांडलेले सिद्धांत आणि संकल्पना हे त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. गेल्या पस्तीस वर्षात समष्टि अर्थशास्त्रात जी महत्त्वाची भर टाकली गेली आणि सद्यकालीन समष्टि अर्थशास्त्र कशा प्रकारे पुढे चाललेले आहे, ह्यादोनही दृष्टिने फेल्पस् ह्यांचे काम खूप मोठे आहे. नवअभिजातवाद्यांनी कल्पिलेल्या 'पूर्ण माहिती आणि ज्ञान' रूपावलीला छेद देण्याचे कार्य फेल्पस् ह्यांनीच

प्रथमतः केले, असे आपणास म्हणता येत नाही. युद्धपूर्व काळात शुंपिटर, नाईट, केन्स आणि हाईक ह्यातील प्रत्येकानेच ह्या प्रकारचा विषय (अथवा आशय) मांडलेला होता. परंतु, त्यांच्या कल्पनांचा सर्वांनीच स्वीकार केला असे आढळत नाही आणि त्यांनी विकसित केलेल्या कल्पना मुख्यप्रवाहातील आर्थिक सिद्धांतात समाविष्ट केल्या गेल्या नाहीत. मात्र, 1960 व 1970 नंतर तौलनिक व्याप्ती आणि बल म्हणून नवअभिमतवाद्यांनी दिलेली सिद्धांताची चौकट स्वीकारून त्यातील मूळ गृहिततत्त्वांची फेरमांडणी करण्याच्या प्रयत्नांना सुरूवात झाली. ह्या दिशेने संशोधनाची चौकट, माहिती आणि ज्ञानाच्या नवीन संकल्पनांवर आधारून त्यादिशेने कार्य करण्याचे प्रथम श्रेय निश्चितच फेल्पस् ह्यांच्याकडे जाते. समष्टि आर्थिक सिद्धांताचे, पूर्वी उल्लेख केलेल्या विषयांच्या संदर्भात, पुनर्मांडणी करण्याचे काम प्रथमतः फेल्पस् ह्यांनीच केले, हे निर्विवाद सत्य आहे. एवढेच नव्हे, तर त्या दिशेने प्रत्यक्षपणे कोणते प्रयत्न केले गेले पाहिजेत हे त्यांनीच दाखवून दिल्याचे स्पष्ट दिसून येते.

## समष्टि अर्थशास्त्रातील ''फेल्पस् प्रतिमान''

ह्याठिकाणी आपण ''फेल्पस् प्रतिमानातील'' विविध मुद्यांचा (वा बाजूंचा) संक्षिप्त गोषवारा समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. 1960 पासून पुढे फेल्पस् ह्यांनी सूक्ष्म अर्थशास्त्रीय तत्त्वांच्या आधारे 'बेरोजगारी आणि किंमतवृद्धीची प्रारूपे विकसित करण्यास सुरुवात केली. त्या काळातल्या संशोधकांच्या पिढीसमोर ह्या दिशेने जाणे, हा एक नवीनच प्रयत्न होता. ह्या प्रारूपांचा मुख्य सैद्धांतिक आशय असा की उत्पादनसंस्था आणि श्रमिक ह्यांनी, सरासरी किंमत, वेतन आणि रोजगार ह्याबाबतीत अन्य उत्पादनसंस्था आणि श्रमिकांनी काय निर्णय घेतला आहे ह्या विषयीची माहिती अगोदर न मिळविता वा त्याविषयीचा कोणताही अंदाज अगोदर न बांधता, वर्तमान परिस्थितीत स्वतःचा निर्णय स्वतःच घेऊन टाकायचा, अशा प्रकारच्या गृहीतकाचा आपल्या प्रारूपामध्ये विचार करून पुढे 1970 च्या काळात त्यांनी 'विखुरलेल्या वेतन वा किंमत विषयीची बांधिलकी' (Commitment) ह्या गृहीतकाचा समावेश केला. ह्या गृहीतकाचा एक परिणाम असा की, उत्पादनसंस्थेस ती कार्य करीत असलेल्या पर्यावरणाविषयी कोणताही गैरसमज नसतो असे थोडा वेळ गृहीत धरले, तरी देखील उत्पादन संस्थेच्या बांधिलकीमुळे निर्णयप्रक्रियेतील 'प्रभावी अपेक्षित त्रुटी' अधिक परिणामकारक होऊ शकेल, असे प्रारूपाच्या विकसनात फेल्पस् ह्यांना जाणवले होते. सिद्धांतनाचा विकास म्हणून ह्यापुढचे एक पाऊल म्हणजे 1980 मध्ये त्यांनी विकसित केलेली प्रारूपे. ह्या प्रारूपांमधील महत्त्वाचे गृहीतक म्हणजे प्रत्येक उत्पादनसंस्था तिच्या बाजार वर्तनासंबंधीच्या अपेक्षा निश्चित प्रारूप वापरून ठरवीत असते. मात्र ती उत्पादनसंस्था असे गृहीत धरते की, अन्य उत्पादनसंस्थांना त्यांच्या अपेक्षा निश्चित करताना मूळ उत्पादनसंस्थेने जे प्रारूप वापरले आहे, त्या प्रारूपाविषयी माहिती नसते वा ते प्रारूप अन्य उत्पादनसंस्था लक्षात घेत नाहीत. फेल्पस् ह्यांनी 1990 मध्ये जी सूक्ष्म व समग्रलक्षी बिगर पैसावादी प्रारूपे विकसित केली त्या प्रारूपांचा मुख्य आशय असा की जरी आपण ''अपेक्षांमधील त्रुटी'' आणि ''किंमत निश्चितीच्या प्रक्रियेस लागणारा विलंब'' ह्या दोन गोष्टी वगळल्या तरी अर्थव्यवस्थेतील बाह्य घटकांकडून होणाऱ्या बदलांमुळे अथवा त्या कारणांनी समतोल बेरोजगारीच्या मार्गावर खूप मोठ्या प्रमाणावर आणि चांगलेच सातत्य असलेले परिणाम घडून येऊ शकतात. ह्या ठिकाणी आपणास एक गोष्ट लक्षात येते. ती गोष्ट म्हणजे जरी ''संरचनावाद्यांच्या'' ह्या साऱ्या प्रारूपांमधून बेरोजगारीच्या नैसर्गिक दरामध्ये कालबद्ध असा बदल घडून येतो व दरामधील

ह्या बदल घडून येत असताना अपेक्षांमधील त्रुटी दिसून येत नाही. असा एकूण सिद्धांताचा सूर दिसला, तरी फेल्पस् मात्र आपल्या प्रारूपांमध्ये समतोलाच्या बेरोजगारी दरातील अकार्यक्षमता ह्या गोष्टीचा सातत्याने पाठपुरावा करीत आहेत, असे लक्षात येते. ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे फेल्पस् ह्यांना सातत्याने जाणवत असलेली माहितीतील असमानता (Information Asymmetries)होय. अपूर्ण आणि असमान माहितीच्या काही बाजूंचा आता विचार करणे योग्य ठरेल.

## अपूर्ण माहिती, अपेक्षा आणि फिलिप्स् वक्र

पैसाविषयक धोरणाचा किंवा एखाद्या चलातील (Variable) केवळ नाममात्र बदलाचा वास्तव व्यवहारांवर आणि रोजगारावर काय परिणाम होतो, ह्या विषयाचे अत्यंत तर्कशुद्ध विश्लेषण फेल्पस् यांनी केले आहे. आर्थिक सिद्धांतातील सातत्याने भेडसावणारा प्रश्न म्हणजे पैसारूपी खर्चाच्या आकारमानातील वाढीमुळे वास्तव व्यवहारात फक्त तात्कालिक (अल्पकालावधीसाठी) वाढ होते, मात्र ही वाढ पैसारूपी वेतन आणि किंमती ह्यांमध्ये प्रमाणबद्धरित्या वाढ घडवून आणण्यात अपयशी ठरते व अशा वाढीचा.... सापेक्ष किंमती (Relative Prices)आणि वास्तव नगसंख्या ह्यावर कोणताही परिणाम दिसून येत नाही. असे नेमके का घडते ? फेल्पस् ह्यांच्या आर्थिक सिद्धांतातून ह्या प्रश्नाचे उत्तर मिळते. त्यांच्या मते 'वॉलरसच्या गृहीतकांवर आधारित नसलेल्या आर्थिक जगात वेतन आणि किंमत निश्चितीविषयींचे जे स्वरूप पहावयास मिळते, त्यात वर उल्लेखिलेल्या अवलोकनाचे उत्तर दडलेले आहे. ह्या प्रकारच्या जगात किंमत आणि वेतनात जुळवाजुळव घडवून आणून बाजार तात्काळपणे पूर्णत्वाकडे नेण्याच्या दृष्टीने (वेतन आणि किंमतीत संगती घडवून आणणारा) कोणीही 'लिलाव करणारा'(Auctioneer) असत नाही. ह्या संदर्भातील अधिक विस्तृत स्पष्टीकरणासाठी फेल्पस् एका अशा अर्थव्यवस्थेची लघुकथा मांडतात, की ज्या अर्थव्यवस्थेत प्रत्येक स्वतंत्र बेटावर (Island) वस्तूंचे उत्पादन केले जाते आणि त्याच बेटावर अशा वस्तूंचा स्वत:चा श्रमबाजार असतो. वेतन आणि रोजगारासंबंधीचे निर्णय, अन्य बेटांवर निर्णयप्रक्रिया काय चालू आहे, हे न पाहता वा तशा प्रकारची संधी उपलब्ध न झाल्यामुळे, प्रत्येक बेटाला स्वतंत्ररित्या घ्यावेच लागतात. ह्यामुळे वेगवेगळ्या बेटांवर अस्तित्वात असलेल्या लवचिक पैसाविषयक धोरणामुळे नाममात्र खर्चामध्ये जी वाढ घडून येते, त्या वाढीविषयीची तत्काळ कल्पना येण्याची गरज उरत नाही आणि त्यामुळे ह्या गोष्टीचा परिणाम म्हणून प्रत्येक बेटावर उत्पादित केल्या जाणाऱ्या वास्तव नगसंख्या आणि उपभोगावर परिणाम होऊ नये म्हणून वेतन आणि किंमत निश्चिततेत जी जुळवाजुळव घडवून आणावी लागेल त्याची गरज भासत नाही. निर्णय प्रक्रियेबाबत फेल्पस् ह्यांनी केलेल्या विश्लेषणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष वेतन आणि किंमत पातळी ह्या प्रत्यक्षपणे मोजता येणाऱ्या चलांबरोबरच (अर्थमिति प्रारूप रचनाकारासाठी-परिणाम घडून आल्यानंतर) परिणाम करणारे, 'सरासरी अपेक्षा' हेही चल तितकेच महत्त्वाचे आहे, हा त्यांचा विचारही लक्षणीय आहे. फेल्पस् ह्यांच्या प्रारूपांमध्ये (1967,1968 ) व्यक्तिगत उत्पादन संस्था ज्या प्रकारे रोजगार, उत्पादन, किंमत आणि वेतन निश्चितीचा निर्णय घेतात, त्या निर्णयप्रक्रियेवर एकूण उत्पादनसंस्थांनी अपेक्षिलेल्या सरासरी किंमत आणि वेतनाच्या पातळीचा किंवा त्यांच्यातील बदलाच्या दराचा परिणाम होत असतो हा विचार सातत्याने येताना दिसतो. हा विचार ह्या अर्थाने महत्त्वाचा आहे की, ह्यामुळे वास्तव चलांवर नाममात्र चलांचा कोणत्या प्रकारे परिणाम होतो, हे फेल्पस् ह्यांना स्पष्ट करता आले. त्याबाबतीत फेल्पस्

ह्यांच्या आधी केन्स ह्यांनी 'एकूण पुरवठा कोष्टक' निश्चित करतांना ह्या परिणामाचा विचार केलेला दिसतो. त्याचप्रमाणे 1960 मध्ये लोकप्रिय झालेल्या अर्थमितीवर आधारित फिलिप्स वक्राचा अन्वयार्थ लावताना ह्यासंबंधीचा विचार झाल्याचेही दिसून येते. फेल्पस् ह्यांनी जे स्पष्टीकरण दिले त्यामध्ये एक गोष्ट निश्चित होती व ती म्हणजे नाममात्र चलांचा वास्तव चलांवर परिणाम होताना तर्कनिष्ठ अथवा तर्कसंगत निर्णय प्रकियेचा नियम मोडला जात नाही. ह्या तर्कनिष्ठ निर्णय प्रक्रियेच्या मते निरपेक्ष किंमत पातळीचा (सापेक्ष किंमत पातळीच्या विरोधी) लोकांच्या निवडीवर परिणाम होता कामा नये, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. केन्स ह्यांचे एकूण पुरवठा कोष्टक काय अथवा फिलिप्स वक्राच्या अन्वयार्थाचा प्रश्न काय, फेल्पस् ह्यांच्या दृष्टिकोनातून ह्या दोन्ही प्रश्नांसंबंधी जर काही उपाययोजनेचा विचार करायचा असेल तर तो रोजगार (किंवा उत्पादन) आणि वेतन वा किंमतीच्या ''प्रत्यक्षातील व अपेक्षित पातळीतील'' फरकाच्या संबंधातून करावा लागेल.

फेल्पस् ह्यांनी केलेल्या विश्लेषणातून करता येईल असा युक्तिवाद म्हणजे पैसाविषयक चलांमधील अडथळ्यांचा वास्तव परिणाम अल्पकालावधीत महत्त्वाचा ठरतो. ह्या दोहोंचे शुद्ध स्वरूप (वा आंतरिक संबंध) फक्त तात्पुरत्या कालावधीत असते. त्याचप्रमाणे बाजारातील परिस्थितीसंदर्भातील व्यक्तिसापेक्ष अंदाज, बाजारात कायम स्वरूपी काय घडत आहे, ह्यापासून वेगळे असताच कामा नयेत. ह्यामुळे (किंवा ह्याचा परिणाम म्हणून) वास्तव व्यवहार आणि रोजगार ह्या गोष्टी त्यांच्या नैसर्गिक पातळीला पुन्हा परत येण्यासाठी उपकारक ठरतील. ज्याठिकाणी अपेक्षांची परिपूर्तता पूर्णपणे झालेली आहे, अशा ठिकाणी समतोलाची परिस्थिती दिसून येईल. ह्यादोनही शक्यतांबाबत दिसून येणारा परिणाम केवळ वास्तव चलांकडूनच घडवून आणता येईल. (फेल्पस्, 1967). पैसाविषयक धोरणाची व्यावहारिक पूर्तता म्हणून आणि एक तर्कशुद्ध सिद्धांतन म्हणून ''नैसर्गिक दर परिकल्पनेचा'' (फ्रिडमन ह्यांनी केलेल्या योगदानाशी देखील संबंधित, 1968) गेल्या पन्नास वर्षातील समष्टि अर्थशास्त्र विकासप्रक्रियेत खूप मोठा वाटा आहे. किंबहुना पैसाविषयक धोरणावर दूरगामी परिणाम करणारी ती एक महत्त्वाची कल्पना आहे, हे लक्षात येते. ह्या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवलीच पाहिजे व ती गोष्ट म्हणजे फेल्पस् ह्यांची 'नैसर्गिक दराची' संकल्पना कालानुरूप 'स्थिर' आहे, असे दर्शवीत नाही (त्यामुळे अगदी तंतोतंत रीतिने आकलन होते असे नाही) तसेच, त्या संकल्पनेचा अर्थ ''पर्याप्त'' असाही लावता कामा नये. मात्र एक गोष्ट खरी व ती म्हणजे ह्या संकल्पनेच्या अस्तित्वातून प्रतीत होणारी गोष्ट म्हणजे केवळ पैसाविषयक धोरणातून आपण काय व किती गोष्टी साध्य करू शकतो, ह्याची महत्त्वाची ''मर्यादा'' ही संकल्पना दर्शविते.

किंमतवृद्धी विषयीच्या अपेक्षा हे अत्यंत महत्त्वाचे स्थैतिक चल आहे, ह्या जाणीवेतून बँकांनी आपल्या एकूणच कृती बाबत अधिक जागरूक असले पाहिजे, कारण त्यांच्या कृतीमधून अपेक्षांमध्ये दिशाबदल (Shift) होऊ शकतो, ह्या संबंधीची जाणीव फेल्पस् ह्यांच्या कामातून झाली. ह्या संदर्भात फेल्पस् ह्यांनी केलेला आणखी एक युक्तिवाद असा की, पैसाविषयक धोरणाचा विचार ''आंतरकालिक नियोजनाचा प्रश्न (Intertemporal Planning Problem)'' म्हणून केला गेला पाहिजे (फेल्पस्, 1972, ) अशावेळी ह्या धोरणाचा प्रत्येक वेळी विचार करताना (परिणाम म्हणून) ह्या कडे दोन प्रकारे पाहता येईल. एक म्हणजे किंमतवृद्धी विषयीच्या अपेक्षा उत्क्रांत होत असताना ह्या धोरणाचा त्यावर काय परिणाम होतो (''अनुकूलक अपेक्षा'' नियम

''Adaptive Expectations''Rule, म्हणून ह्यासंबंधीचे प्रारूप विकसित झाले आहे आणि ह्या परिणामाचा एक निष्कर्ष म्हणजे भविष्यकाळातील अल्प कालावधीच्या फिलिप्स वक्राने दर्शविलेली विनिमयाची स्थाननिश्चिती कशी ठरली जाते, ह्या त्या दोन गोष्टी होत. पैसाविषयक धोरणासंबंधीचा हा ''आंतरकालिक नियोजन दृष्टिकोन'' ज्या मध्यवर्ती बँका 'किंमतवृद्धी लक्षाचे' धोरण आखतात, त्या धोरणाच्या केंद्राशी असतो, हे प्रकर्षाने जाणवते. पर्याप्त पैसाविषयक धोरणाने खाजगी क्षेत्रातील आकलन गतिशीलतेचे भान कसे ठेवले पाहिजे, ह्या विषयीचा प्रश्न हा आजच्या संशोधनाचा महत्त्वाचा विषय आहे. ह्या गतिशीलतेचे किती चांगल्या प्रकारे प्रारूप विकसित करता येईल, हाही आणखी एक प्रश्न आहेच.

### समतोल बेरोजगारीचे घटक

''नैसर्गिक दर'' निश्चित करणारे वास्तव घटक पहिल्या प्रथम फेल्पस् ह्यांनी निदर्शनास आणून दिले (1968) त्यांचे अपेक्षाकृत असे समतोलाचे प्रतिमान श्रमाच्या बाजारावर लक्ष केंद्रीत करते. श्रमिकांच्या उलाढालीची समस्या डोळ्यासमोर ठेवली, तर असे लक्षात येते, की बेरोजगारीचा दर समतोल मार्गाने निश्चित झालेल्या पातळीपेक्षा कमी ठेवण्याचा प्रयत्न झाला, तर अनपेक्षित आणि सातत्याने वाढत जाणारी वेतन किंमतवृद्धी सारखी समस्या भेडसावेल, असा अंदाज बांधता येतो.

सरासरी नाममात्र वेतनाचा लॉग '$W_t$' ह्या चिन्हाने दर्शवू. वेतन निश्चितिच्या समीकरणाचे स्वरूप फेल्पस् पुढील पद्धतीने निश्चित करतात.

$$W_t = \log\Psi(U_t, dN_t/dt) + W_t^e$$

$\Psi$, बेरोजगाराची सद्यकालीन पातळी, $U_t$ आणि श्रमिकाला रोजगार दिल्यामुळे रोजगारात होणाऱ्या वाढीची गती $N_t$ ह्या दोन गोष्टींचे घटते फलन आहे, असे फेल्पस् दर्शवितात. जर श्रम-दल (Labour Force) स्थिर आहे, असे गृहीत धरले तर वर उल्लेखिलेल्या परस्परसंबंधाचा परिणाम म्हणून आपणास बेरोजगारीची एकमेव स्थिर पातळी दिसून येते, ज्या पातळीला अपेक्षांची त्रुटी निर्माण होत नाही, आणि ह्या दराला अथवा पातळीला $\Psi(U^*, O) = 1$ असे आढळते. ह्या ठिकाणी फेल्पस् असे दर्शवितात, की हा स्थिर समतोलाचा बेरोजगारीचा दर सर्वसाधारणपणे धनात्मक असतो. समजा, धोरणातील प्रयोगशीलता म्हणून बेरोजगारीचा दर खूप खालच्या पातळीला ठेवण्याचा प्रयत्न केला गेला, तर त्याचा परिणाम म्हणून श्रमिकांनी अगदी मनापासून काम सोडून द्यायला तयार झालेच पाहिजे आणि तसे झाले तर उत्पादनसंस्थांमध्ये श्रमिकांना अधिकाधिक वेतन देण्यासंबंधीची अहमहमिका लागेल, कारण उत्पादनसंस्थांना श्रमिकांमध्ये केलेली गुंतवणूक अधिक सुरक्षित करावयाची असेल. ही परिस्थिती म्हणजेच 'अनपेक्षित वेतन किंमतवृद्धी' होय. समतोलाच्या बेरोजगारीविषयीचा हा जो युक्तिवाद ह्याठिकाणी मांडला गेला तो युक्तिवाद म्हणजे ह्याअगोदर जे ''कार्यक्षमता वेतन प्रतिमान'' विकसित केले गेले, त्यासंबंधीचे उदाहरण आहे.

एकाबाजूला हा स्थैतिक नैसर्गिक दर स्थिर आहे, अशी परिस्थिती असेल तरीदेखील अगदी सुरूवातीपासून नैसर्गिक दर निश्चित करणारे गतिशील घटक कोणते (केवळ अपेक्षिलेल्या समतोलापासून तात्कालिक फारकत घेतली जाईल अशी गतिशील परिस्थिती नव्हे) ह्या विषयीचे विवेचन फेल्पस् आपल्या लिखाणातून सातत्याने करीत आले आहेत. वर उल्लेखिलेल्या प्रतिमानातून एक गोष्ट प्रत्यक्षपणे स्पष्ट होते, व ती ही, की नैसर्गिक दर कालपरत्त्वे बदलत जाणारा असलाच पाहिजे. आधी उल्लेखिलेल्या समीकरणाच्या आधारे असे पाहता येईल की $W_t$ आणि $W_t^e$ ह्या दोहोंमध्ये बरोबरी साधली

की आपल्याला समतोल बेरोजगारी दराच्या मार्गाविषयीचे 'भेदीय वा विकलान' समीकरण (Differential Equation) मिळते. हा समतोल बेरोजगारीच्या दराचा मार्ग वर्तमानकालीन बेरोजगारीच्या दरापासून प्राप्त होतो. श्रमिकांना जास्त वेतन देऊ करून रोजगार देणे आणि श्रमिकांच्या अधिकाधिक वापरातून उत्पादकतेची झीज होणे (Employee Attrition - कामावरून कमी करणे ह्या एकाच अर्थाने न पाहता) ह्या प्रक्रियेतून वर्तमानकालीन बेरोजगारीचा दर अतिशय मंदगतीने बदलत राहतो आणि शेवटी तो स्थैतिक समतोलाच्या दरापाशी येऊन थांबतो. फेल्पस् ह्यांच्या लेखात ते सापेक्ष औपचारिक विश्लेषण म्हणून रोजगारीच्या वाढत्या सीमांत खर्च परिस्थितीत व्यक्तिगत उत्पादन संस्थेच्या पर्याप्त दराचीही चर्चा करतात असे दिसून येते.

नैसर्गिक दराच्या गतिशील बाजूंच्या सिद्धांताचा अधिक विस्तृत विचार फेल्पस् ह्यांनी आपल्या पुढील लिखाणात देखील चालूच ठेवला, असे दिसते (1972). हा आशय व्यक्त करणाऱ्या त्यांच्या पुढच्या लिखाणात ते बेरोजगारीच्या दरातील 'पूर्वग्रहज' (Hysteresis) ही कल्पना मांडताना दिसतात. फेल्पस् ह्यांच्या ह्या कल्पनेप्रमाणे बेरोजगारीत होणारी अल्पशी घट (कदाचित सुरूवातीच्या अपेक्षाकृत असमतोलामुळेही असेल) आंशिकदृष्ट्या पुन्हा भरून काढता येईल, अशी शक्यता नसते. ह्याचे कारण म्हणजे रोजगारातील घट श्रमिकांच्या कौशल्यात घट घडवून आणते किंवा श्रमिकांच्या दृष्टिकोनात नकारात्मकता आणते.

फेल्पस् ह्यांच्या ह्या कल्पनेचा परिणाम असा, की पुढे सातत्याने होत राहिलेल्या संशोधन कार्यात ह्या कल्पनेचा उपयोग करून घेण्यात आला, असे आढळते. विशेषकरून, युरोपमध्ये (1980 मध्ये) सातत्याने वाढत गेलेल्या बेरोजगारीच्या दराविषयीचे स्पष्टीकरण फेल्पस् ह्यांच्या ह्या कल्पनेत सापडते.

**ग्राहक बाजार**

फेल्पस् ह्यांच्या एकूण संशोधन कार्यक्रमाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे, की त्यांनी अपूर्ण स्पर्धा आणि बाजाराच्या गृहीतकांवर आधारित सूक्ष्म अर्थशास्त्रीय प्रतिमानांच्या (सहज आकलन होतील अशी) आधारे समग्रलक्षी आर्थिक परिस्थितीचे प्रभावी स्पष्टीकरण दिले. एरवी असे स्पष्टीकरण प्रमाणित नवअभिजातवादी सिद्धांतात बसविणे ही अत्यंत कठीण अशी गोष्ट आहे, हे सहज लक्षात येते. फेल्पस् ह्यांनी केलेल्या वास्तव चलाच्या स्पष्टीकरणाबरोबरच व्यवसाय चक्राच्या वर्तनासंबंधी केलेले विश्लेषणही तेवढेच महत्त्वाचे आहे. विशेषकरून, संशोधकांच्या विश्वात दीर्घकाळ अनुत्तरित असलेल्या व्यवसाय चक्रातील परिव्ययापेक्षा जास्त किंमतींच्या हालचालींचे स्पष्टीकरण नेमके काय, ह्यासंबंधीचे फेल्पस् ह्यांचे स्पष्टीकरण ही एक महत्त्वाची शक्यता आहे, हे नाकारून चालत नाही. फेल्पस् आणि विंटर (1970) ह्यांच्या एका प्रतिमानात फेल्पस् ह्यांनी पूर्ण स्पर्धेतील किंमत वर्तनाचे (प्रतिमान) सुस्पष्ट असे स्पष्टीकरण केले आहे. ह्या विशेष अशा प्रतिमानातून त्यांनी स्पष्ट केलेली (दर्शविलेली) गोष्ट म्हणजे पुरवठ्याच्या सीमांत खर्चामध्ये होणाऱ्या अल्पकालीन चढ-उतारांचे पूर्ण स्पष्टीकरण वस्तूंच्या किंमतीतून व्यक्त केले जाईल, असे नाही.

फेल्पस् आणि विंटर ह्यांच्या ''ग्राहक बाजारांच्या'' प्रारूपामध्ये, उत्पादनसंस्थांकडे अल्प कालावधीत त्यांच्या किंमतींमध्ये बदल घडवून आणण्याची मोठ्या प्रमाणावर क्षमता असते, ही गोष्ट गृहीत धरलेली आहे (वर्तमानकालीन उपलब्ध किंमतींच्या वितरणासंबंधी उत्पादनसंस्थांना अपूर्ण ज्ञान असते, हा वर उल्लेखिलेल्या गृहीतकाचा आधार

आहे). मात्र, दीर्घकाळात ही क्षमता नसते ह्याचे एक कारण असे, की एखाद्या उत्पादनसंस्थेची किंमत अन्य उत्पादनसंस्थांच्या किंमतीपेक्षा सर्वकाळ खूपच अधिक असेल, तर ती उत्पादनसंस्था सरतेशेवटी सर्व ग्राहकांना पूर्णपणे गमावेल. फेल्पस् ह्यांच्या श्रम बाजारा विषयक पहिल्या संशोधनात (ज्या ठिकाणी उत्पादनसंस्था खूपच कमी वेतन देतात त्या श्रमिकांना गमावतात) आणि त्यांच्या वस्तू बाजाराच्या अलीकडच्या संशोधनात (ज्यात ज्या उत्पादनसंस्था खूपच अधिक किंमत आकारतात त्या ग्राहकांना गमावतात) स्पष्ट साम्य दिसून येते. पूर्ण स्पर्धेच्या जगात हा विनिमय व्यवहार (आणि ह्यातून निर्माण होणारी गुंतागुंतीची पर्याप्तता) दिसून येईल, असे नाही. जी उत्पादनसंस्था तिच्या स्पर्धक उत्पादनसंस्थेपेक्षा कमी वेतन देईल किंवा अधिक किंमत आकारेल, त्या उत्पादनसंस्थेला तिच्या श्रमिकांना अथवा ग्राहकांना गमवावे लागेल.

आधुनिक समष्टि अर्थशास्त्रीय (विचारधारित) किंमत निश्चितीची प्रतिमाने अपूर्ण स्पर्धेची प्रतिमाने म्हणूनच आता सर्वसाधारणपणे ओळखली जातात. तसेच, व्यावसायिक चढउतारांमध्ये किंमत आणि सीमांत खर्चाच्या संबंधामध्ये सतत बदल होत असतो, हा विचारही सर्वमान्य झाला आहे. त्याचप्रमाणे आज असेही चित्र पहावयास मिळते, की विविध प्रतिमाने ही परिव्ययापेक्षा जास्त असलेल्या किंमतींच्या निरनिराळ्या प्रकारच्या हालचालींचा अथवा बदलांचा अगदी वेगळा आकृतीबंध असलेली आहेत. कदाचित, वेगवेगळ्या उत्पादनसंस्था एकमेकींशी व्यवहार करताना ज्या बाजारात कार्यरत असतात, त्या बाजारामधील फरक दर्शविण्याचेच कार्य ही निरनिराळी प्रतिमाने करत असावीत (पाहा, स्टिगलिट्झ, 1984, रॉटेंबर्ग आणि वुडफोर्ड, 1999). फेल्पस् आणि विंटर ह्या दोहोंनी गतिशील परिव्यय किंमतीच्या बदलाची जी विशिष्ट प्रतिमाने विकसित केली, ती (तशीच) वेगवेगळी परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी आजही वापरली जातात. ह्या प्रतिमानांचा फेल्पस् ह्यांनी पुढे समतोल चढ उताराच्या आपल्या अधिक विस्तृत प्रारूपांमध्ये उपयोग केला आहे (1994).

''नवीन केन्सवादी'' प्रतिमाने आणि विखुरलेले (विषम) करार पैसाविषयक धोरणाच्या आश्चर्यातून व्यवसायातील चढउतार कसे निर्माण होतात, ह्यासंबंधीचे ल्यूकास (1972) ह्यांचे प्रसिद्ध प्रतिमान हे 1970 मधील ''नवीन अभिजातवादी समष्टी'' आर्थिक विचारसरणीचे महत्त्वाचे उदाहरण आहे. अपूर्ण माहितीचे परिणाम ही ह्या आर्थिक विचारसरणीतील मध्यवर्ती कल्पना आहे, असे लक्षात येते. ल्यूकास ह्यांनी आपल्या प्रतिमानात फेल्पस् ह्यांनी सूचित केलेली ''बेटाची'' पार्श्वभूमी वापरली. मात्र त्यांनी ''तर्कनिष्ठ (विवेकाधिष्ठित) अपेक्षांचे'' गृहीतकही वापरल्याचे लक्षात येते. ह्या पार्श्वभूमीचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यामधून सूचित होणारे अर्थ, हे आहे. तर्कनिष्ठ अपेक्षांचा अर्थ असा, की सर्वच आर्थिक घटकांच्या (अभिकर्ते, उदाहरणार्थ, ग्राहक, उत्पादक, श्रमिक इत्यादी) प्रत्येक वेगळ्या क्षणी दिसून येणाऱ्या अपेक्षा, ह्या अपेक्षा 'बेसियन पद्धतीने' वृद्धिंगत होतात. (ह्या ठिकाणी वाचकाने संख्याशास्त्राच्या कोणत्याही पुस्तकातून 'Bayesian Updating' पाहावे) प्रतिमानाच्या माध्यमातून ध्वनित केलेल्या आकडेवारी निर्मितीच्या प्रक्रियेशी सुसंगत असतात असे गृहीत मांडले जाते. एवढेच नव्हे तर व्यक्तिगत घटकाच्या ''बेटावर'' निदर्शनास येणाऱ्या एकूण माहितीवर ह्या अपेक्षा परिणाम करणाऱ्या असतात, हे आणखी एक गृहीतक. ल्यूकास ह्यांच्या प्रतिमानातून माहितीच्या विकेंद्रीकरणाचे काय परिणाम होतात, ह्या विषयीचा जो सैद्धांतिक विकास घडून आला त्यातून फेल्पस् ह्यांच्या, 'पैसाविषयक

धोरणातील अनपेक्षित बदलांतून केवळ तात्कालिक वास्तव परिणाम दिसून येतात (''बेटाची पार्श्वभूमी कल्पिली तर'') व त्यासाठी ह्या धोरणातून पुढे येणाऱ्या नाममात्र ताठरतेची आवश्यकता नसते,' ह्या मूलभूत दृष्टीला पुष्टी मिळाली, त्याचप्रमाणे, ल्यूकास ह्यांचे प्रतिमान फेल्पस् आणि फ्रिडमन ह्यांनी मांडलेल्या ''नैसर्गिक दर परिकल्पनेच्या'' सिद्धांतावर अधिक जोर देताना दिसते.

एवढे असून देखील एक गोष्ट नजरेआड करून चालणार नाही व ती गोष्ट म्हणजे ''नवीन अभिजातवादी अर्थशास्त्र'' फेल्प ह्यांच्या प्रतिमानातून ध्वनित होणाऱ्या मतितार्थाचा आवश्यकतेपेक्षा थोडा अधिकच अर्थ सूचित करण्याचा प्रयत्न करताना दिसते. खरं म्हटलं तर ह्या अर्थशास्त्राने सूचित केलेली मतितार्थातील तीव्रता फेल्पस ह्यांना देखील अपेक्षित नव्हती किंवा ती तीव्रता त्यांनी मान्य केली होती, असे दिसत नाही. उदाहरणार्थ, एक असा युक्तिवाद केला गेला, की पैसाविषयक धोरण वास्तव व्यवहारावर परिणाम करू शकते. अर्थात त्या वास्तव व्यवहाराचे स्वरूप पूर्णपणे अपूर्वनियोजित (Random) असेल तरच. ह्याचाच अर्थ असाही होतो, की पैसाविषयक धोरणाचा समग्र परिस्थितींवर पद्धतशीर परिणाम होतो असे नाही. हा विचार मान्य केल्यास पैसाविषयक स्थिरता धोरण निरर्थक आहे, असेच म्हणावे लागेल. फेल्पस् ह्यांना हा आर्थिक विचार एक ''वरवरचे सत्य'' असाच भासला. ह्यातूनच ''नवीन केन्सवादी समष्टि अर्थशास्त्राचा'' विकास झाला (जरी ही संज्ञा त्यांनी प्रथम वापरलेली नसली). ह्या ''नवीन केन्सवादी समष्टि अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून पैसाविषयक स्थिरता धोरण वास्तव चलांमध्ये होणाऱ्या बदलांचा परिणाम (अथवा तीव्रता) कमी करू शकते अगदी तर्कनिष्ठ (तर्कसंगत) अपेक्षांच्या गृहीतकाची परिस्थिती अस्तित्वात आहे, असे मानले तरी.

ह्या चर्चेतील मध्यवर्ती कल्पना अशी होती की, वास्तव जीवनात (किंवा वास्तव देवाणघेवाणीत) वेतन आणि किंमतींमध्ये सातत्याने फेरबदल होत नाहीत. फेल्पस् ह्यांच्या अपूर्ण माहितीच्या परिणामांविषयक पूर्वीच्या शोधनिबंधामध्ये त्यांनी एक गोष्ट स्पष्ट केलेली होती व ती गोष्ट म्हणजे पैसाविषयक धोरणाचा (अपूर्ण माहितीच्या परिस्थितीमुळे) वास्तव चलांवर परिणाम होऊ शकतो, अगदी कोणत्याही प्रकारची विलंबाची परिस्थिती निर्माण झाली तरी. आपल्या, ''फेल्पस् व्हॉल्यूम'' (फेल्पस्, 1970, पान क्र. 3) ह्या ग्रंथाच्या सुरूवातीच्या 'ओळख सदरात' ते असे म्हणतात, की ''नवीन सिद्धांताच्या दृष्टिकोनातून, किंमत निश्चित करणाऱ्या घटकांकडून अथवा त्यांना निर्णय प्रक्रियेमध्ये लागणाऱ्या वेळेच्या बचतीची गरज असतेच, असे नाही. तसेच त्यांनी वारंवार एक गोष्ट स्पष्ट केली आहे व ती ही, की वास्तव व्यवहारात वा जगतात निरनिराळ्या घटकांमुळे दिरंगाई होते, (वर उल्लेखिलेल्या पानावर ते म्हणतात ''वेतनात वा किंमतीत त्रैमासिक वा वार्षिक बदल घडवून आणणे, हा तर सातत्याच्या प्रक्रियेतील नियमच आहे, मात्र सातत्याने उजळणी ही काही नैसर्गिक प्रक्रिया नव्हे''). आपल्या एका ग्रंथातील (फेल्पस् 1968 ) तिसऱ्या भागात फेल्पस् आणखी एक गोष्ट गृहीत धरतात व ते गृहीतक म्हणजे, वेतनातील फेरबदलासंबंधीच्या वाटाघाटी दर वर्षी होतात आणि निरनिराळ्या उत्पादन संस्थांच्या संदर्भात वेतनाची पातळी ही संपूर्ण वर्षभर भिन्न स्वरूपाची असते. (पान क्र. 698). ते ह्यापुढे आणखी एक मत नोंदवितात. त्यांच्या मते पैसाविषयक धोरणाचा एक परिणाम म्हणून किंमतवृद्धीचा दर आणखीनच वर जाऊ शकतो. मात्र अशा वाढीचे आकारमान, अस्तित्त्वात असलेल्या वेतनात ताबडतोब बदल घडवून आणला जात नसल्यामुळे, कमी केले जाऊ शकते. 1970 च्या मध्यात फेल्पस् ह्यांनी आपल्या ह्या संशोधन दृष्टिचा

समावेश, वेतन निश्चितिच्या तर्कनिष्ठ अपेक्षांवर आधारित असलेल्या प्रारूपांमध्ये, केल्याचे दिसून येते. कोलंबिया विद्यापीठातील जॉन टेलर आणि कालव्हो ह्या दोन सहकाऱ्यांच्या मदतीने फेल्पस् यांनी असे दाखवून दिले की, जरी अपेक्षा तर्कनिष्ठ विचारसरणीवर आधारित असल्या तरी देखील समग्र मागणीतील घसरण (ऋणात्मक बदल) नैसर्गिक दराच्या पातळीपासून उत्पादनात दीर्घकालीन घसरण घडवून आणू शकते. ह्या शोधनिबंधांपैकी पहिल्या शोधनिबंधात (फेल्पस् आणि टेलर, 1977) एक सर्वसाधारण सहज उमजेल अशी परिस्थिती कल्पिलेली दिसते. अशा परिस्थितीत (तर्कनिष्ठ अपेक्षांवर आधारित कार्य करणाऱ्या उत्पादनसंस्था असल्या तरी) उत्पादनसंस्थांना आधीच्या (पाठीमागच्या) वसंतऋतूच्या सुरवातीसच 'घटत्या किंमती' विषयीचा निर्णय घ्यावा लागतो. वर्तमानकालीन वसंत ऋतुतील घटना व त्या घटनांची परिणती ह्यासंबंधी आधीच काही सांगता येणे जरी अवघड असले तरी वर्तमानकालीन वसंतऋतुतील किंमत, मागील वसंतऋतुच्या सुरवातीला जी घटती किंमत निश्चित केलेली असेल तिच्याशी पुष्कळसे साम्य असणारी असते, असे त्यांनी कल्पिलेले दिसते. वेगवेगळ्या उत्पादनसंस्थांच्या संदर्भात वेतन पुनर्निर्धारणासाठी लागणाऱ्या विखुरलेल्या (अथवा विषय) वेळेच्या परिणामांचाही फेल्पस् ह्यांनी अभ्यास केला. ह्या अभ्यासातून त्यांनी असे दाखवून दिले की, विखुरलेल्या वेळेमुळे पैसाविषयक धोरणांच्या वास्तव परिणामांच्या सातत्यतेतील प्रमाणात वाढ होऊ शकते. सर्व वेतनांची पुनर्निश्चिती केली असली तर त्या प्रक्रियेस जितका वेळ लागला असता, त्यापेक्षा कितीतरी अधिक वेळ वास्तव परिणामांच्या सातत्यात दिसून येतो. तर्कनिष्ठ अपेक्षांवर आधारलेल्या वेतन, किंमत, उत्पादन गतिशीलतेच्या अर्थमितिवर आधारित प्रतिमानांमध्ये फेल्पस् ह्यांच्या दूरदृष्टीच्या सत्यासत्यतेविषयीचा पडताळा, टेलर (1979,1993) ह्यांनी आपल्या प्रतिमानांमध्ये अनुभवला. पुढे, उत्पादनसंस्थांच्या वेगवेगळ्या किंमतींमध्ये दिसून येणाऱ्या अहमहमिकेच्या परिणामांचे प्रतिमानीकरण (Modelling) कालव्हो (1983) ह्यांनी सिद्ध केले. ''नवीन केन्सवादी'' विश्लेषणात कालव्हो ह्यांचे हे किंमत तडजोडीचे प्रतिमान त्या क्षणापासून अधिक सामाईक मानदंड म्हणून स्वीकारले गेले.

## अपूर्ण ज्ञान आणि आकलनातील गतिशीलता

जरी 1985 नंतरचे फेल्पस् ह्यांचे काम तर्कनिष्ठ अपेक्षेच्या गृहीतकावर बेतलेले आहे असे आढळते, तरी देखील व्यक्तिच्या श्रद्धा आणि अर्थशास्त्रज्ञांच्या प्रतिमानातील गृहीतक ह्यांच्यातील परस्परसंबंधांच्या जवळीकीविषयी व्यक्त केल्या गेलेल्या वास्तव वादासंबंधी फेल्पस् ह्यांनी वारंवार शंका व्यक्त केलेली आढळते. विशेषत: पैसाविषयक धोरणाचे अल्पकालीन परिणाम पाहता असताना ह्या शंकेला अधिक जागा मिळते. फेल्पस् (1983) ह्यांनी त्या संदर्भात केलेला युक्तिवाद असे सूचित करतो की, पूर्णपणे तर्कनिष्ठ अपेक्षांचे गृहीतक, ज्या ठिकाणी व्यक्तिची पर्याप्त कृती केवळ तिच्या स्वत:च्या श्रद्धेबरोबरच (समग्र परिस्थितीबाबतचे आकलन) दुसऱ्यांच्या (अन्य व्यक्तींच्या) श्रद्धा काय आहेत ह्या विषयीची त्या व्यक्तिची श्रद्धा काय आहे ह्यावर अवलंबून असते, त्याठिकाणी विशेषकरून असंभवनीय आहे. श्रद्धांचे हे परस्परावलंबित्व अगणितक्रमवारी तयार करते, ह्यालाच ''वरच्या पसंतीच्या श्रद्धा (Higher order Beliefs) असे नांव आहे. फेल्पस् ह्यांनी ह्या संदर्भात असे सूचित केले की, वरच्या पसंतीच्या श्रद्धांची तात्काळ पुनर्निश्चिती करणे असमतोलाच्या परिस्थितीत असंभवनीय आहे. विशेषत: अशा कठीण परिस्थितीत की जेव्हा आता नेमके काय घडले आहे, ह्या विषयी लोकांना नेमके काय वाटते ह्या विषयीचा अंदाज बांधणे अवघड

आहे, अगदी घटकाभर आपण असे मानले की, व्यक्तींचे वर्तमानकालीन घटनांसांबंधीचे तारतम्य खूपच अचूक आहे, अशी स्थिती आहे ह्यातूनच, नाममात्र चलांचा वेतन व किंमतींच्या तडजोडीवर काय परिणाम होतो, हे पाहता असताना ही तडजोडीची प्रक्रिया काहीशी मंद असते, ह्या निष्कर्षाला पुष्टी मिळाली. तसेच, पैसाविषयक धोरणाचे वास्तव परिणाम, 1970 सालातील ''नवीन अभिजातवादी'' प्रारूपांनी निर्देशिल्यापेक्षा अधिक मोठे व दीर्घकाळ टिकणारे असतात, असेही ध्यानात आले. 1981 मध्ये फेल्पस् ह्यानी रोमन फ्रेडमन (फ्रेडमन आणि फेल्मस, 1983) ह्यांच्या समवेत जी परिषद आयोजित केली, त्यातून आर्थिक घटकासंबंधीचा भविष्यकालीन अंदाज व्यक्त करणाऱ्या चलांसंबंधीचे गतीविषयक नियम कोणते, ही बाब कशी शिकतात आणि त्यांच्या आकलनाचा समग्रलक्षी गतीशीलतेवर कोणता परिणाम होतो, ह्यासारख्या विषयांनी युक्त असलेल्या अधिक व्यापक (सुस्पष्ट) प्रारूपांना एक वेगळीच गती प्राप्त झाली असे आढळते. वर उल्लेखिलेल्या खंडाच्या प्रस्तावनेत ह्या प्रकरणाध्ये ह्या दोहोंनी अधिक आक्रमकरित्या असा युक्तिवाद केला की तर्कनिष्ठ अपेक्षांवर आधारित समतोलाच्या प्रारूपांमध्ये व्यक्तीच्या तर्कनिष्ठ दृष्टिकोनातून श्रद्धांची जुळवाजुळव (सुसंगती आणणे ह्या अर्थाने) करता येते, ह्या मांडल्या गेलेल्या गोष्टींसंबंधी हमी देता येत नाही. म्हणून मग समग्र गतिशीलतेची खात्री देणाऱ्या घटकांचे स्थान असलेले 'आकलन प्रारूप' विकसित करण्याची गरज आहे असे ह्या दोहोंनी ठामपणे मांडले. 1990 मध्ये ''नवीन अभिजातवादी'' अर्थशास्त्राच्या विकासात ह्या परंपरेतल्या बहुतेक अर्थशास्त्रज्ञांनी (उदाहरणार्थ, सार्जंट, 1993) ह्या दृष्टिकोनाचा स्वीकार केला, असे आढळते. आकलन गतिशीलतेचे समग्रलक्षी आर्थिक परिणाम हा विषय समग्रलक्षी अर्थशास्त्रातील वर्तमानकालीन विकास प्रक्रियेत सर्वात कळीचा मुद्दा आहे असे लक्षात येते.

## बेरोजगारीची आंतरकालिक सर्वसाधारण समतोल प्रतिमाने

अलीकडच्या वर्षांमध्ये फेल्पस् ह्यांच्या संशोधनाचा केंद्रीय बिंदू, बेरोजगारीच्या कारणांचे आकलन आणि विशेषत: 1980 नंतर युरोपियन संघात सापेक्षरित्या सातत्याने वाढत जात असलेली बेरोजगारी हा असल्याचे दिसून येते. फेल्पस् ह्यांच्या पूर्वीच्या श्रम बाजार विषयक विश्लेषणामध्ये अंतर्भूत असलेला अपेक्षांच्या असमतोलाच्या प्रश्नासारखा विषय (वा सर्वसाधारणत: पैसाविषयक घटक) मागे पडला व बेरोजगारीत दीर्घकालीन हिंदोळे (वा खरं तर सातत्यता, ''Long Swings'') ह्या सारख्या गोष्टी बेरोजगारीच्या प्रकारात का दिसतात (आढळतात), ह्या विषयातील रस वाढत गेल्याचे दिसून येते. त्यामुळे, फेल्पस् ह्यांनी बेरोजगारीच्या 'नैसर्गिक दरावरती किंवा त्यातील बदलावरती कोणते वास्तव घटक परिणाम करतात, ह्यासारख्या विषयावरती अधिक लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. विशेषत: ह्या विषयाचा विचार ते 1990 नंतर आंतरकालिक सर्वसाधारण समतोलाच्या प्रारूपाच्या आधारे करताना आढळतात. ह्या कामामधून ''संरचनावादी'' दृष्टिकोन पुढे आला व त्याचे स्पष्ट चित्र अधिक विस्तृतपणे आपल्याला फेल्पस् (1994) ह्यांच्या संशोधनात पाहावयास मिळते. बिगर-पैसाविषयक प्रारूपांवर अधिक जोर, वास्तव चलांमध्ये होणाऱ्या हालचालींचे परिणाम (अगदी तंत्रज्ञानात दिसून येणाऱ्या धक्क्यांचाही ह्यात समावेश आहे.) सर्वसाधारण समतोलाचे परिणाम आणि भांडवल संचय प्रक्रियेतील गतिशीलता. ह्या फेल्पस् ह्यांच्या अगदी अलिकडच्या कामामध्ये दिसून येणाऱ्या वैशिष्ट्यांचा अंतर्भाव किडलँड आणि प्रेसकॉट, लॉझर आणि अन्य अर्थशास्त्रज्ञ ह्यांनी 1980 मध्ये विकसित केलेल्या वास्तव व्यापार-चक्र सिद्धांतात झाल्याचे दिसून येते. मात्र फेल्पस् ह्यांचा

''संरचनावादी''दृष्टिकोन वास्तव व्यापारचक्र सिद्धांताहून काही महत्वाच्या बाजूंच्या दृष्टिकोनातून वेगळा आहे हे लक्षात घ्यावे लागते. ह्या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवणे गरजेचे आहे. ती गोष्ट अशी, की वास्तव व्यापार-चक्र सिद्धांताच्या प्रारूपामध्ये एक बाब गृहीत धरलेली आहे. उत्पादनसंस्था खूपच अधिक कार्यक्षम अशा घर्षणविरहित (Frictionless) स्पर्धात्मक बाजार व्यवस्थेत कार्यरत असतात हे ते गृहीतक. त्याचप्रमाणे, त्या उत्पादनसंस्था असमतोलाच्या परिस्थितीत (विशेषत: धक्क्यांच्या स्थितीत) त्यांना अपेक्षित असलेल्या समतोल प्रतिसादाचे गणन (मोजमापन) करू शकतात. आणि उत्पादनसंस्थांनाही खात्री असते, की समतोलाचा प्रतिसाद हा पर्याप्तच असला पाहिजे. मात्र, फेल्पस् ह्यांच्या कामामध्ये सातत्याने माहितीच्या अपूर्णावस्थेतून तयार होणाऱ्या घर्षणयुक्त बाजार परिस्थितीचा पाठपुरावा केला जात आहे, ही गोष्ट महत्त्वाची आहे. विशेषकरून, त्यांची बेरोजगारीविषयीची प्रारूपे असे गृहीत धरतात की अर्थव्यवस्थेत अनैच्छिक (Involuntary) व अकार्यक्षम बेरोजगारीची परिस्थिती असते. ह्या किंवा त्या प्रकारच्या ''कार्यक्षम वेतनाच्या'' ओढीमुळे बेरोजगारीची अकार्यक्षम पातळी सर्वसाधारणपणे अस्तित्वात असते. (1968). फेल्पस् ह्यांच्या अन्य काही प्रारूपांमध्ये असेही गृहीतक आढळते, की निरनिराळ्या वस्तूंचे बाजार हे अपूर्ण स्पर्धेनी युक्त असतात. फेल्पस् आणि विंटर ह्यांनी (1970)पहिल्या प्रथम आपल्या प्रारूपामध्ये ग्राहकाच्या, प्रवाहातील गतिशीलतेचा विचार केला (1970). ह्या त्यांच्या विचारातून व्यक्त होणारा आशय असा, की सीमांत खर्चापेक्षा जास्त आढळून येणाऱ्या अधिपरिव्यय किंमतीतील (Mark-up Over Prices) बदल, समतोल पातळीच्या रोजगारावर परिणाम करणाऱ्या निरनिराळ्या वास्तव चलांमध्ये बदल घडवून आणणारा एक महत्त्वाचा घटक असतो. फेल्पस् ह्यांच्या ''संरचनावादी'' दृष्टिकोनातून केल्या गेलेल्या लिखाणामध्ये सातत्याने मांडलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे वास्तव व्याजदरातील बदलांचा समतोलाच्या बेरोजगारी विषयक दरावर कोणता परिणाम होतो, ह्याविषयीचे विश्लेषण, किती प्रकारच्या वास्तव चलांमधील असमतोलामुळे बेरोजगारीवर परिणाम झालाच पाहिजे, ह्या महत्त्वाच्या घटकाचे विश्लेषण फेल्पस् ह्यांनी केल्याचे लक्षात येते. हे त्यांचे विश्लेषण आंतरकालिक सर्वसाधारण समतोल ह्या अभ्यासपद्धतीतून विकसित झाले. त्यांनी प्रतिपादिलेल्या वास्तव व्याज दराकडून समतोलाच्या बेरोजगारीत घट घडवून आणली जाऊ शकते, असा युक्तिवाद केला जातो. ही घट घडवून आणण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणुक सदृश्य व्यवहारांमध्ये कटौती आणता येईल, अशा प्रकारे विचार केला गेला. उदाहरणार्थ, मोठ्या प्रमाणाच्या (आकारमानाच्या) श्रम दलामध्ये केलेली गुंतवणूक (अगदी त्यांना अधिक वेतन देऊन कामावर ठेवूनच घेण्यासारखे प्रकार), वर्तमानकालीन अधिपरिव्यय किंमत कमी करून मोठ्या संख्येच्या ग्राहक संख्येमध्ये उत्पादनसंस्थांनी केलेली गुंतवणूक, ह्याचबरोबर अशा प्रकारच्या गुंतवणुकीमध्ये वाढ, की ज्या वाढीतून उत्पादनसंस्थेच्या श्रमदलाची उत्पादकता वाढू शकेल. ह्या विषयातील फेल्पस् ह्यांची रूची त्यांनी केलेल्या त्यांच्या आधीच्या कामामध्ये दिसून येते (फेल्पस् 1972). ह्यात समाविष्ट असलेल्या गोष्टी म्हणजे सरकारच्या राजकोषीय (Fiscal) भूमिकेचा आणि मध्यवर्ती बँकेच्या ताळेबंदाचा समग्र पुरवठ्यावर काय परिणाम होतो ह्या होत. ह्या संदर्भात फेल्पस् ह्यांनी केलेला युक्तिवाद असा, की, शासनाची अशी कृती की जी वास्तव व्याजदर वाढवून उत्पादनसंस्थांची अगोदरच अस्तित्वात असलेल्या, वेतन दरपातळीस श्रमिकांच्या मागणीत घट घडवून

आणते आणि सरकारच्या त्या कृतीतून समतोलाची रोजगारी कमी होते. ह्याच्या दुसऱ्या बाजूला सरकारची अशी कृती की जी कार्यरत लोकसंख्येच्या संपत्तीत वाढ घडवून आणते व त्यातूनच श्रमिक मागत असलेल्या वास्तव वेतनात वाढ घडून येते. ह्या आर्थिक विचारातील पुढील विकास फिटाऊसी आणि फेल्पस् (1986,1988) ह्यांनी सातत्यानी मांडलेल्या प्रारूपांमध्ये केलेला आढळतो. ह्या प्रारूपात मांडलेल्या आशयाचे मुख्य सूत्र असे की जागतिक वास्तव व्याज दरातील वाढ उत्पादनसंस्थांची रोजगार देण्याविषयीची इच्छा कमी करते, त्याचप्रमाणे ग्राहकांच्या संख्येत वाढ करणे वा असलेली ग्राहकसंख्या टिकविणे ह्यादृष्टीने देखील उत्पादनसंस्थांच्या कार्यात उदासीनता आणते, वा स्थिर भांडवल साठ्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने उत्पादनसंस्थांना नकारात्मक दृष्टीने ग्रासते. वर उल्लेख केलेला विषय आणि आशयाचे पूर्ण सिद्धांतन स्वरूप फेल्पस यांनी आपल्या रचनात्मक मंदी; बेरोजगारी, व्याजदर आणि परिसंपत्तीचा आधुनिक समतोल सिद्धांत'' (फेल्पस्, 1994) ( Structural Slumps : The Modern Equilibrium Theory of Umemployment, Interest and Assets) ह्या ग्रंथात अधिक काटेकोर व विस्तृतरित्या मांडले. ह्या ग्रंथात विकसित केलेल्या प्रारूपांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या सर्वसाधारण समतोल परिणामांचा विचार केला गेल्याचे आढळते. ह्या सर्वसाधारण समतोल परिणामांमध्ये समाविष्ट केले गेलेले विषय म्हणजे राष्ट्रातील लोकांनी ऐहिक उद्दिष्टांसाठी खाजगी संपत्तीचा केलेला संचय व त्याचा बेरोजगारीवर होणारा परिणाम, तसेच सार्वजनिक अधिकार कार्यक्रमातून लोकांना उपलब्ध होणाऱ्या ''सामाजिक संपत्तीच्या'' ("Social Wealth"ही संज्ञा फेल्पस् वापरतात.) वाढीमुळे बेरोजगारीवर होणारा परिणाम, श्रमधिष्टित सार्वजनिक खर्च आणि करांचा बेरोजगारीवरचा परिणाम; विशेषत: अवेतन उत्पन्नावरील कर प्रभावीपणे कमी करण्यासाठी रोजगारी व उत्पन्नावर लावलेल्या करांचा बेरोजगारीवर होणारा परिणाम इ. ह्यापुढच्या (अनुक्रमे येणाऱ्या) आपल्या कामात फेल्पस् आणि त्यांच्या सहकार्यांनी लोकसंख्येच्या बदलाबाबत परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास केल्याचे दिसून येते. ह्या घटकात अंतर्भूत असलेल्या गोष्टी म्हणजे वय आणि शैक्षणिक पातळी (साध्यता) विभागणीचा परिणाम, भविष्यकालीन उत्पादकतेच्या अपेक्षांमधील बदलाचा परिणाम, ह्या व ह्यासारख्या असंख्य गोष्टींचा अभ्यास त्यांनी केल्याचे आढळते.

हे सर्व घटक, अस्तित्वात असलेल्या वास्तव वेतनदराला, समतोलाच्या रोजगार परिस्थितीत सातत्याने हिंदोळे (बदल ह्या अर्थाने) निर्माण करीत असतात, असे फेल्पस् ह्यानी दाखवून दिले. अर्थातच, ही बाब कार्यक्षम वेतन घटकाचा परिणाम म्हणून वास्तव वेतन ताठरता सिद्धांताच्या चौकटीतच त्यांनी अभ्यासली. ह्यातून फेल्पस् ह्यांनी असे दाखवून दिले, की अकार्यक्षम बेरोजगारीत कालपरत्त्वे खूप मोठ्या प्रमाणावर बदल घडून येत असतात.

### शिक्षण आणि तंत्रज्ञानविषयक बदल

फेल्पस् ह्यांनी अर्थशास्त्राला दिलेले आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे दीर्घ कालीन आर्थिक वृद्धीच्या प्रारूपांवर त्यांनी केलेले काम, हे होय. ह्या ठिकाणी प्रस्तुत लेखाच्या लेखकांनी असे नमूद केले आहे की, ''फेल्पस् व्हॉल्यूम''(2001) ह्या ग्रंथाच्या ''एकूण विषय चौकटीत'' अधिक वृद्धी हा विषय थोडासा दूर राहत असल्यामुळे फेल्पस् ह्यांच्या वृद्धीसंबंधीच्या योगदानाची विस्तृत चर्चा केलेली नाही. मात्र, लेखकांनी असेही म्हटले आहे, की वृद्धीच्या सिद्धांताच्या (विशेषकरून 1960 सालातील) काही महत्त्वाच्या बाजूंच्या विकासासंदर्भात फेल्पस् ह्यांनी जे योगदान दिले, त्याविषयीची चर्चा लेखात केली आहे.

अगदी अलीकडच्या काळात, विशेषकरून 1990 मधील शुंपिटरप्रणित वृद्धी वाङ्मया बरोबरच, शिक्षण आणि तंत्रज्ञानविषयक बदलाच्या संदर्भात नेलसन आणि फेल्पस् ह्यांनी (1966) जो शोधनिबंध लिहिला त्याचे महत्त्व अर्थशास्त्रज्ञांच्या लक्षात आले आहे.

शिक्षणाचा, आर्थिक वृद्धीवर प्रथमदर्शनी जो परिणाम होतो तो त्याचा मनुष्यबळ भांडवल संचयाच्या दराच्या माध्यमातून होत असतो हा आधीचा दृष्टिकोन नेल्सन आणि फेल्पस् यांना मान्य नसल्याचे दिसून येते. त्यांच्या मते वृद्धी ही अशी प्रक्रिया आहे, की जी मनुष्यबळ भांडवलाच्या साठ्याच्या परिणामाकडून निश्चित होते, व ह्या परिणामातून नवनिर्मितीची क्षमता निर्माण होऊन, प्रगत तंत्रज्ञानविषयक बदलांना सामोरे जाण्याची परिस्थिती तयार होते. निरनिराळ्या देशांमध्ये आर्थिक वृद्धीच्या दरामध्ये जो फरक दिसून येतो, तो मुख्यत्त्वेकरून मनुष्यबळ भांडवलाच्या साठ्यातील फरकामुळे असतो (मनुष्यबळ भांडवल संचयातील दरामुळे असण्यापेक्षा) आणि त्या फरकामुळे उत्पादकतेतील फायदा प्राप्त करण्यासाठीच्या देशाच्या क्षमतेतील फरकामुळेही असतो. नेलसन आणि फेल्पस ह्यांचा हा दृष्टिकोन असे भाकीत करतो की, शिक्षणाचा मोबदला किंवा त्यावरील परतावा तंत्रज्ञानविषयक प्रगतीच्या दराचे वाढते फलन आहे. ह्या त्यांच्या विश्लेषणातून त्यांनी असे सूचित केले की, देशातील शिक्षणाची सरासरी पातळी केवळ प्रत्यक्षपणे शिक्षणविषयक धोरणातून आणि अप्रत्यक्षपणे संशोधन व विकासविषयक धोरणातून वाढलीच पाहिजे. शैक्षणिक कौशल्याचा तंत्रज्ञानविषयक प्रगतीशी संबंध प्रस्थापित करणारा नेल्सन आणि फेल्पस् ह्यांचा हा दृष्टिकोन गेल्या वीस वर्षातील वाढलेल्या वेतन विषमतेबाबत स्पष्टीकरण देण्यास अधिक उपयुक्त आहे, असे लक्षात येते. मोठ्या प्रमाणावरील विषमता ही शिक्षणाच्या वाढणाऱ्या परताव्यातून निर्माण झाली आहे, ही गोष्ट आता मोठ्या प्रमाणावर स्वीकारली गेली आहे. त्याचप्रमाणे, शिक्षणाच्या वाढत्या परताव्यातून, कौशल्य असलेल्या श्रमिकांच्या सापेक्ष पुरवठ्यात वाढ झाली आहे व यातूनच नवनिर्मितीच्या गतीमध्ये वाढ झाली आहे आणि मग पुढे शिक्षित व्यक्तीचा सापेक्ष मोबदला वाढला आहे.

## सारांश

एडमंड फेल्पस् ह्यांच्या आधुनिक समष्टि अर्थशास्त्रातील योगदानाचा विचार केला तर त्याची व्याप्ती थक्क करणारी आहे.

1. समष्टि अर्थशास्त्रातील गुंतागुंतीची चौकट, सूक्ष्म अर्थशास्त्राच्या संकल्पना आणि सिद्धांत वापरून अधिक सोपी, सरळ आणि व्यवहारोपयोगी करण्याचे काम फेल्पस् ह्यांनी केल्याचे सहज जाणवते.

2. नवअभिजातवादी अर्थशास्त्राची अभ्यासपद्धती जरी तार्किक दृष्ट्या सबल असली तरी प्रत्यक्ष व्यवहारातील आर्थिक प्रश्न समजून घेण्यास व त्यावर तोडगा सुचविण्यास अपूरी आहे, हे भान फेल्पस् ह्यांच्या कामातून अभ्यासकांना येईल.

3. आपल्या आर्थिक विवेचनातून, संकल्पांच्या आग्रहातून आणि अभ्यासपद्धतीच्या चौकटीतून फेल्पस् हे ''नवीन केन्सवादी तत्त्वप्रणालीकडे'' झुकतात, हे सहजच लक्षात येते.

4. आता समग्रलक्षी अर्थशास्त्रीय चौकटीचा विचार हा 'संरचनावादी' दृष्टिकोनातून झाला पाहिजे, हे त्यांचे मत असो वा ''आंतरकालिक सर्वसाधारण समतोलाच्या'' गरजेचे प्रतिपादन असो, ह्या गोष्टींनी (अभ्यासविषयक) समष्टि अर्थशास्त्राचा पाया अधिक बळकट करून, त्यातील व्यवहारोपयोगिता वाढविण्याचे कार्य तर केले आहेच. ह्यापेक्षाही

महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ''अपूर्ण माहिती, अपूर्ण ज्ञान'' ह्या वास्तव अभ्यासपद्धतीचा उपयोग करून समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासाला वेगळीच दिशा देण्याचे काम फेल्पस् ह्यांच्या योगदानातून झालेले आहे.

5. फेल्पस् ह्यांचे श्रद्धांसंबंधीचे विश्लेषण, विशेषकरून श्रद्धांमधील परस्परावलंबित्व आणि श्रद्धांचे पसंतीक्रमाने होणारे वर्तन ह्या साऱ्या गोष्टींसंबंधीचा विचार, 'संस्थावादी अर्थशास्त्राने (Institutional Economics)' केलेल्या विचाराच्या खूप जवळ जातो, असे आढळते. संस्थावादी अर्थशास्त्राच्या विकसनात ''श्रद्धा'' ही एक स्वतंत्र संस्था आहे. ग्राहकांच्या श्रद्धांची निर्मिती कशी होते, ह्यासंबंधीचे विस्तृत विवेचन संस्थावाद्यांच्या ''सामाजिक श्रद्धांच्या सिद्धांतात (Theory of Social Beliefs) सापडते. एवढेच नव्हे तर फेल्पस् ह्यांनी कल्पिलेल्या आंतरकालिक समतोलाचा विचार संस्थावाद्यांच्या ''बदला संबंधीच्या सर्वव्यापी दृष्टिकोनात''(Holistic Approach to Change) दिसून येतो. फेल्पस् बाजाराचे वर्तन समजून घेताना सर्वच आर्थिक घटकांच्या संदर्भात परिस्थितीबाबत ''आकलन करून घेणे'' म्हणजेच शिकणे ह्या प्रक्रियेविषयी जे मत व्यक्त करतात ते संस्थावाद्यांच्या ''उत्क्रांतीवादाच्या दृष्टिकोनाच्या''Evolutionary Approach ; विशेषत: थॉरस्टिन व्हेब्लन, गुन्नार मिर्डाल, जॉन केनेथ ग्रालब्रेथ ह्या व ह्यासारख्या अन्य संस्थावाद्यांच्या लिखाणात आढळून येणारी गोष्ट) खूप जवळ जाते, असे लक्षात येते. दोहो मधला आणखी एक दुवा म्हणजे बऱ्याच संस्थावादी अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचारांचा विकास (नवे संस्थावादी नव्हेत) वा विचारातील आशय केन्स ह्यांच्या आर्थिक विकासाच्या चौकटीच्या जवळ जातो, असे लक्षात घेता येईल. फेल्पस् ह्यांची आर्थिक विचारसरणी देखील ''नवीन केन्सवादी'' अशाच प्रकारे समजून घ्यावी लागेल. अर्थात ह्या साम्यस्थळांचा अर्थ असा नव्हे, की फेल्पस् ह्यांची गणना ''संस्थावादी अर्थशास्त्रज्ञ'' म्हणून करता येईल.

6. फेल्पस् ह्यांनी त्यांच्या निरनिराळ्या प्रारूपांमध्ये केलेला 'कालापव्ययाचा' (Time-Lag) विचार हा ते आत्यंतिक व्यवहारी आणि अधिक उपयुक्त दृष्टिकोनातून समग्रलक्षी अर्थशास्त्राचा विचार कशा प्रकारे करतात व एखाद्याने कसा केला पाहिजे, ह्या संबंधीचे हे एक अधिक समर्पक उदाहरण आहे.

7) पैसाविषयक धोरणासंबंधीचा त्यांचा विचार निश्चितच 'केवळ सिद्धांतन' ह्या सीमेच्या पलीकडे गेला आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये पैसाविषयक धोरणाच्या यशापयशाबद्दल सतत चर्चा चालू आहे असे दिसते. किंबहुना, काही आर्थिक प्रणालींच्या दृष्टीने पैसाविषयक धोरण दीर्घ कालीन आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने फारसे भरवशाचे नाही. फेल्पस् पैसाविषयक धोरणाला पूर्णपणे त्याज्य ठरवीत नाहीत. किंबहुना पैसाविषयक धोरणाचा विचार ''आंतरकालिक नियोजनाचा प्रश्न'' म्हणून केला गेला पाहिजे, हा त्यांचा दृष्टीकोन अगदी वेगळा आणि नवीन असल्याचे लक्षात ठेवले पाहिजे.

8) फेल्पस् ह्यांच्या अभ्यासपूर्ण व तर्कनिष्ठ दृष्टिकोनातून भविष्यकालीन अंदाज बांधण्याच्या त्यांच्यातील क्षमतेचा अनुभव येतो. त्यांच्यामते पैसाविषयक धोरणाने खाजगी क्षेत्रातील आकलन (शिकण्याची प्रक्रिया) गतिशीलतेचे भान कसे ठेवले पाहिजे, ह्या विषयीचा प्रश्न आजच्या संशोधकांनी अभ्यासास घेतला पाहिजे. एवढेच नव्हे, तर ह्या गतिशीलतेचा अंतर्भाव करता येईल, ह्या प्रकारचे प्रारूप विकसित करता येईल का, ह्या बाबतीत संशोधकांनी प्रयत्न करायला हवेत. पुढच्या संशोधक पिढ्यांसाठी हे खूपच महत्त्वाचे मार्गदर्शन आहे.

9) फेल्पस् ह्यांची जवळजवळ सर्वच प्रतिमाने ही

विकसित देशाच्या आर्थिक पार्श्वभूमीवर विकसित झालेली आढळतात. ह्या प्रारूपांचा विकसनशील देशांना फायदा किती ? ही प्रारूपे विकसनशील देशांच्या आर्थिक चौकटीत बसविता येतील का?

फेल्पस् ह्यांची आंतरकालिक सर्वसाधारण समतोल प्रारूपाची मूळ चौकट तशीच वापरता येईल. मात्र निरनिराळ्या आर्थिक चलांची (घटकांची) स्थैतिक बैठक आणि त्या चलांमधील गतिशीलतेचे स्वरूप ह्या अंगाने विकसनशील देशांमध्ये प्रारूप विकसनाचा मार्ग वेगळा आखावा लागेल. ह्यातील गृहीतकांच्या संदर्भात (त्यांच्या स्वरूपासंबंधी) अधिक परिस्थिती सापेक्ष विचार करावा लागेल. उदाहरणार्थ, विकसनशील देशांमधील श्रमाच्या बाजाराचे स्वरूप फेल्पस् कल्पितात त्यापेक्षा वेगळे आहे. समग्र श्रमबाजाराचा विचार करता बेरोजगारीचे स्वरूप केवळ ''अनैच्छिक'' आहे का वा रचनात्मक आणि अनैच्छिक ह्या फरकामधील रेषा धूसर आहे, ह्यासंबंधीचा विचार करावा लागेल. मग अशावेळी, ''कार्यक्षम वेतन परिकल्पना '' हे प्रारूप कितपत उपयोगी पडेल ? श्रमविषयक कायदे, सामाजिक सुरक्षा, श्रमाची शैक्षणिक (सरासरी) पातळी, देशवासीयांच्या खर्चाचे आकारमान, आर्थिक घटकांमधील तडजोडी विषयीच्या ताठरतेचे वेगळे स्वरूप, करसंरचना विषयक प्रश्न, उत्पादकतेवर अप्रत्यक्षपणे परिणाम करणारे असंख्य घटक. ह्या व ह्यासारख्या अन्य कितीतरी आर्थिक बाबींच्या संदर्भात विकसनशील देशात प्रारूप विकसन प्रक्रियेत, गृहीतक, परिस्थितीची ताठरता आणि गतिशील मापन प्रक्रियेत घालविला जाणारा वेळ ह्या तीन गोष्टींच्या दृष्टीने निश्चितच वेगळा विचार करावा लागेल.

फेल्पस् ह्यांच्या अर्थशास्त्रीय विचार प्रक्रियेत शासनाचा आर्थिक कार्यक्रम अंमलबजावणीतील हस्तक्षेप, अधिकाराचे राजकारण (Politics of Power) ह्या कधी स्पष्ट दिसणाऱ्या तर कधी छुप्या घटकांचा स्पष्टपणे, एक अभ्यासपद्धती म्हणून, विश्लेषणात उपयोग केला गेलेला नाही, असे दिसते. विकसनशील देशातील प्रारूप बांधणीत ह्या घटकांना टाळून मुळीच चालणार नाही.

मात्र, ''संरचनावादी दृष्टिकोन'', ''आंतरकालिक सर्वसाधारण समतोलाची चौकट'' ''वॉलरसच्या प्रारूपापासूनची फारकत'', ''तर्कनिष्ठ अपेक्षांच्या परिकल्पनेचा'' अगदी वेगळा विचार, ह्या समष्टि अर्थशास्त्र विकास प्रक्रियेचे सारे श्रेय फेल्पस् ह्यांच्याकडेच जाते.

**(फिलिप ॲगहिऑं, सेमन फ्रिडमन, जोसेफ स्टिगलिट्झ, माईकेल वुडफोर्ड. नोव्हेंबर 2001. यांच्या मूळ लेखावर आधारित )**

## संदर्भ सूची

1. "Phelps Volume I" (2001), 'Edmund S. Phelps and Modern Macroeconomics', Columbia University.

2. "Phelps Volume I" (2003),'Edmund S. Phelps and Modern Macroeconomics', Princeton University Press.

3. Internet Source

www 2. ggb.columbia.edu/faculty/jstiglitz.

✦✦✦

# केंद्रीय अर्थसंकल्प 2007-08

✦ शि. ना. माने, सातारा.
*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.*

अर्थसंकल्पाविषयी संसदेत व संसदेबाहेर जेवढी चर्चा होते, त्याप्रमाणात अर्थसंकल्पांतर्गत योजनांची वाईट स्थिती (त्यांत पूर्वीच्या अर्थसंकल्पांतर्गत अपूर्ण योजनांचाही समावेश होऊ शकतो) सुधारण्यासाठी खर्च करण्यांत येणाऱ्या प्रत्येक रूपयाचा हिशेब चुकता करण्यावर सार्वजनिक चर्चा क्वचितच होते.

'वार्षिक वित्तीय निवेदन' या घटनेतील नोंदीच्या स्वरूपातील केंद्रीय 07-08 च्या अर्थसंकल्पाकडूनच्या अपेक्षांपेक्षा त्यावरील कालसापेक्ष मर्यादा (अर्थसंकल्प एका वर्षासाठी मांडला जातो) स्पष्ट करणे, हा या लेखाचा प्रमुख हेतु आहे. घटनेत अर्थसंकल्प (Budget) या संज्ञेचा थेट उल्लेख नाही. म्हणून बहुचर्चित शिक्षणावरील सार्वजनिक खर्चाची प्रस्तावित वाढ व भूमीजलपुनर्भरण ही दोन क्षेत्रे नमुना म्हणून निवडली आहेत. मर्यादा स्पष्ट करण्यासाठी ती पुरेशी आहेत. पुष्कळदा अर्थसंकल्पाच्या कालसापेक्ष मर्यादांकडे दुर्लक्ष करून त्याची चर्चा केली जाते. त्याचप्रमाणे अर्थसंकल्पातील संपूर्ण प्रस्तावित निधि उपलब्ध होईल व संबंधित योजनेची कार्यदक्षतेने कार्यवाही होईल अशी गृहीते धरली जातात. परंतु प्रत्यक्षात तसे घडतेच असे नाही. म्हणूनच मळलेल्या वाटेने न जाता नव्या वाटेचे आकलन करण्याचा हा अल्प-स्वल्प खटाटोप आहे.

**शिक्षण, साक्षरता व शक्तता**

अर्थसंकल्पात शिक्षणावरील खर्चात किंवा परिव्ययात 34 टक्के वाढीचा प्रस्ताव आहे. दुसऱ्या शब्दात, स्थूल देशांतर्गत उत्पादिताच्या सध्याच्या 3.52 टक्क्यावरून सुमारे 3.66 टक्क्यापर्यंत त्यात वाढ होणार आहे. परंतु विकासप्रेरक शक्तता (Capabilities) व कार्यात्मक साक्षरता यांच्या संबंधात स्पष्ट व समयबद्ध कार्यक्रमाचा उल्लेख दिसत नाही.

1951 च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण साक्षरता प्रमाण 18.3 टक्के होते. आज ते 64.84 टक्कांपर्यंत वाढल्याचा तात्पुरता अंदाज आहे. परंतु दारिद्र्यात त्या प्रमाणात घट झाली नाही. या विसंगतीवर राष्ट्रीय नमूना सर्वेक्षणात (61 वी फेरी 2004-05) प्रथमच प्रकाश टाकण्यात आला आहे. वाचणे, लिहिणे व अंकाची प्राथमिक आकडेमोड यांच्यापुरती सीमित साक्षरता आज जवळजवळ कालबाह्य झाली आहे. आजची 64.84 टक्के साक्षरता सांकेतिक स्वरूपाची आहे. ती 'कार्यात्मक' किंवा उपलब्ध साधनसामग्रीचे पुरेसे नियंत्रण करून तिचा मितव्ययपूर्ण वापर करणे असे तिचे स्वरूप नाही, म्हणून तथाकथित साक्षरतेतील वाढीच्या प्रमाणात 'उत्पन्न दारिद्र्यात' (income poverty) क्वचित घट होते. 21 व्या शतकातील निरक्षरांविषयीचे ॲल्विन टॉफलर यांचे वचन प्रसिद्ध आहे. ते म्हणतात, ''जे वाचू शकत नाहीत किंवा लिहू शकत नाहीत ते 21 व्या शतकातील निरक्षर असणार नाहीत, तर जे (नवीन) शिकू (learn) शकत नाहीत, जुने शिकणे टाळू शकत नाहीत (Unlearn) आणि नवे परत शिकू शकत नाहीत (relearn) ते 21 व्या शतकातील निरक्षर असतील.'' येथे मार्च 29 एप्रिल 4, 1997 या द इकनॉमिस्टच्या Education and the wealth of nation मधील शिक्षणातील यश व आर्थिक विकास यांचातील आंतरसंबंधाचा संदर्भ देण्याचा मोह अनावर होतो. संबंधित विधान पुढीलप्रमाणे होते : ''शिक्षण ही जागतिक अर्थव्यवस्थेतील यशाची किल्ली आहे''. नंतर लगेच पुढील प्रश्न विचारण्यात आला होता :''परंतु शिक्षणातील यशाची किल्ली काय आहे?''[1] हाच प्रश्न आज अर्थसंकल्पातील वाढीव खर्चाच्या तरतुदीला चांगलाच प्रस्तुत ठरतो.

बदलत्या काळात सुसंगत कौशल्ये व गुणवत्ता प्राप्त करणे व ती आत्मसात करणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, जागतिक पातळीवरील साखरेच्या शुद्धतेचे 'इकुम्सा' प्रमाणक 150 आहे. भारतात ते 45 ते 85 इतके आहे. ते कौशल्य व ती गुणवत्ता निर्माण करणे व आत्मसात करणे हा प्रश्न महत्त्वाचा आहेच. त्याचबरोबर वर्तमान भारतातील शिक्षण पद्धतीतील 'अपव्यय' (Wastage) निवारण करणे हे एक आव्हान आहे. हे दोनही प्रश्न एकमेकांशी निगडित आहेत. येथे दोन प्रकारच्या अपव्ययांपैकी एका अपव्ययाचे (विशिष्ट पातळीवरील अभ्यासक्रम पूर्ण करण्यापूर्वी मध्येच शाळा/शिक्षण सोडणे व कुंठीतता) अलीकडे जे परिमाणात्मक विश्लेषण प्रसिद्ध झाले आहे त्याचा उल्लेख करू.

इकनॉमिक ॲण्ड पॉलिटिकल विकलीच्या जानेवारी 13-19,2007 च्या अंकात सुगीता उपाध्याय यांचा 'वेस्टेज इन इंडियन हायर एज्युकेशन' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. लेखिकेने त्यात पुढील दोन प्रकारच्या अपव्ययांचा उल्लेख केला आहे. (1) कुंठितता व मध्ये शाळा/शिक्षण सोडणे आणि (2) शिक्षण/प्रशिक्षणाचा सदुपयोग न होणे किंवा बेकारयोग्य (unemployable) मनुष्यबळ. लेखिकेने केलेले पहिल्या प्रकारच्या अपव्ययाचे परिमाणीकरण (quantification), राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (52 वी फेरी, 1998) व भारत सरकारने उपलब्ध केलेल्या 1993-94 मधील किंमतींवर आणि 1995-96 मधील अंदाजांवर आधारित आहे. 1995-96 मधील उच्च शिक्षणावर प्रत्येक विद्यार्थ्यांवर रू. 5812 सरकारी/सार्वजनिक खर्च करण्यात आला. त्याच वर्षात, मध्येच शिक्षण सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या होती 65.74 लक्ष म्हणजे त्यावर्षी रू. 305.66 कोटी इतका अपव्यय होता[2] आणि ती अपव्ययाची रक्कम त्यावर्षातील खर्चाच्या 8 टक्के होती. त्यात बेकार योग्यतेचा समावेश केला, तर एकूण अपव्यवयाचा फटका प्रतिवर्षी काही हजार कोटींच्या धरात जाईल.

या माहितीच्या आधारे अर्थसंकल्पातील 34 टक्के वाढीव खर्चाच्या प्रस्तावासंबंधात पुढील तीन

प्रश्न विचारू : एक, शिक्षणावर 34 टक्के वाढ केल्यामुळे (स्थूल देशांतर्गत उत्पादिताच्या सध्याच्या 3.52 टक्क्यावरून सुमारे 3.66 टक्क्यापर्यंत वाढ केल्यामुळे) अपव्ययाचे निवारण होईल काय ? दोन, समजा ते निवारण झाले नाही, तर कौशल्ये निर्माण करून ती आत्मसात करण्याचे आव्हान कसे पेलता येईल ? आणि तीन, अर्थसंकल्पात निव्वळ कागदी तरतूद करून एक वर्षात चिरेबंद असलेली संस्थात्मक चौकट आपोआप बदलेल काय ? उलट ती चौकट बदलेल, विकासाला चालना मिळेल, या भ्रमात जर सर्व संबंधित (धोरणकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, पालक) स्वस्थ बसणार असतील, तर रूडीयार्ड किपलिंग यांचा उंट त्याच्या पाठीवरील उंचवट्यातील (hump) बेगमीमुळे आत्मसंतुष्ट राहून सुस्तावला हे त्यांनी विसरू नये.

**पुनर्भरण किंवा जीर्णोद्धार (तलाव, तळी, धरणे ) :-**

जुन्या जलस्रोतांचा जीर्णोद्धार करण्यासाठी अर्थसंकल्पात सुमारे 1800 कोटी रू. ची तरतूद केली आहे. इंग्रजांच्या आगमनापूर्वी या देशातील कल्पक अभियंत्यांनी हजारो तलाव, तळी व धरणे बांधली. इंग्रज राजवटीत ती नामशेष झाली. त्यांचे पुनर्भरण करण्याची गरज आहे.

अहमदनगर येथील निजामशाहीच्या काळातील 22 बुरूजी भुईकोट किल्ला, त्याभोवतालचा 100-125 फूट रूंदीचा व तेवढ्याच खोलीचा खंदक आजही शाबूत आहे. भिंगारगावानजीकच्या नाल्यातून सायफन पद्धतीने खंदक एक-दीड दिवसात भरला जाई. परंतु काही उपद्व्यापी व उथळ ज्ञानाच्या इंग्रज अधिकाऱ्यांनी हे पाणी खंदकात कसे आणले आहे हे पाहण्यासाठी खोदकाम केले व सायफन कायमचा बंद पडला.

पुण्याजवळच्या कात्रज तलावातील पाणी पेशवाईतील अनुभवी अभियंत्यांनी खाजगी नळाने शनिवारवाडा व सदाशिव पेठेपर्यंत जलवाहिनीतून आणले होते. परंतु हे पाणीही इंग्रजी राजवटीतील अनभिज्ञ अधिकाऱ्यांच्या उत्साहामुळे त्यांनी केलेल्या खोदकामामुळे कायमचे बंद पडले.

नाशिक जिल्ह्यात मालेगाव व धुळे जिल्ह्यात मोसम-आरम व पांझरा नद्यांवर पेशवाईत बंधारे बांधण्यात आले. त्या नद्यांच्या पाण्यावर फड पद्धतीने हजारो एकर जमीन भिजत होती. परंतु या बंधाऱ्यांची डागडुजी वेळेत न झाल्यामुळे ही फड पद्धती कायमची बंद झाली.

भंडारा, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यात कल्पक अभियंत्यांनी पेशवाईत हजारो मालगुजारी तळी पूर्ण केली. त्यामुळे 50-60 हजार एकर शेतीला नियमित पाणी पुरवठा होत असे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळातील पाटबंधारे विभागातील उच्चविद्याविभुषित अभियंत्यांनी हजारो धरणे बांधण्याचे लक्ष्य पूर्ण केले खरे. त्यामुळे जलसंचयही झाला. परंतु प्राचीन काळातील मालगुजारी तळी कोरडी पडली. त्यांचे पानिपत झाले. म्हणून सात राज्यांतील निवडक तलाव, धरणे व तळी यांचे पुनर्भरण व जीर्णोद्धार करण्यासाठी एक सुरूवात म्हणून हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे. त्याचे कोणीही स्वागतच करील. परंतु ते स्वागत करताना मनात काही शंका निर्माण होतात. त्याचे प्रमुख कारण म्हणजे आजचे गैरपाणीव्यवस्थापन.

सध्याच्या 'प्रक्षोभक' पाणी प्रश्नाची विविध कारणे आहेत. त्यापैकी प्रमुख कारण आहे वाजवी पाणी किंमत निर्धारणाचा अभाव. उदा. 2005 च्या उत्तरप्रदेशातील रब्बी गहू पिका विषयीच्या उपलब्ध माहितीनुसार जल सिंचनाचा हेक्टरी परिव्यय होता रू. 2800 . मात्र शेतकऱ्यांकडून किंमत वसुल होत होती. फक्त रू. 70[3] दुसऱ्या शब्दात, तो परिव्यय किंमत महसूल कालव्याचे पाणी खेचण्यासाठी येणाऱ्या परिव्ययाच्या फक्त 2 टक्के होता. जी गोष्ट

शेतीसाठीच्या पाण्याची तीच कमीअधिक फरकाने पिण्याच्या पाण्याची. उदाहरणार्थ, 4 वर्षापूर्वी मुंबईसाठी 100-125 कि.मी. अंतरावरून जलवाहिनीमधून आणलेल्या पिण्याच्या पाण्याचा प्रति 1000 लिटरचा परिव्यय होता रू. 6. परंतु ग्राहकाकडून किंमत वसूल होत होती फक्त रू. 0.75. परिणाम ? (1) पाण्याचा अतिरिक्त वापर (2) भूजल पातळीत वेगाने घट आणि (3) प्रक्षोभक परिस्थितीचे रूपांतर प्रस्फोटक परिस्थितीत. रू. 14 लक्ष किंमतीच्या करोला गाडीची विक्री जर रू. 1 लक्ष इतक्या कमी मातीमोल किंमतीने झाली, तर लगेचच ती गाडी दुर्मिळ होईल आणि प्रत्यक्षात घडलेही तेच. ज्यावेळी पाण्याचे निष्कर्षण (extraction) त्याच्या नैसर्गिक स्रोतापेक्षा किंवा पुनर्भरणापेक्षा (recharge) जास्त होते, त्यावेळी अत्याधिक पाणी उपशाचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. पंजाब, हरियाणा, तामिळनाडु, राजस्थान व महाराष्ट्र या राज्यात ती प्रक्रिया अधिकतर 'वेगवान' होत आहे आणि धोरणकर्ते स्वत: उघडपणे कबूल करतात की यापुढेही ते पाणी प्रश्नाचे 'गोलमालीकरण'[4] (muddling through) करत राहणार. त्यामुळे लवकरात लवकर नवीन धरणांच्या बांधकामासाठीच्या गुंतवणुकीसाठी किंवा त्यांची डागडुजी करण्यासाठी पैसाही नसेल[5] किंवा लोकांसाठी पाणीही नसेल. 'नाही चिराग, नाही पणती' अशी गोंधळाची स्थिती निर्माण होणार. खरे तर त्या पराकोटीच्या गोंधळाच्या प्रक्रियेची लागण आतापासूनच चालू आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे कालव्याची मंजूर कामे पूर्ण करण्यासाठी निधिच नाही.

या पार्श्वभूमीवर आता भूमी जल पुनर्भरणाकडे वळू. पाण्याची वाजवी किंमत हा पाणी व्यवस्थापन व पाणी वितरणाचा कळीचा प्रश्न आहे. कोणत्याही नवीन आर्थिक कार्यक्रमांचे अंतिम यश त्याच्या कार्यदक्ष कार्यवाहीवर निर्भर असते. त्या कार्यदक्ष कार्यवाहीकडे हेतुत: दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. (तिचे समारोपात स्पष्टीकरण केले आहे) समजा, प्रस्तावित भूमीजलपुनर्भरणाचा कालबद्ध कार्यक्रम अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाला, व अंदाजित रू. 1800 कोटी इतकी रक्कमही उपलब्ध झाली आणि तिचा योग्य विनियोगही किंवा समुपयोजन झाला, तरी देखील योग्य किंमत धोरणाच्या अभावामुळे दीर्घ काळात भूमीजलपुनर्भरणाचे अपेक्षित लाभ मिळणार नाहीत. निव्वळ कालबद्ध अर्थसंकल्पात निधिची तरतूद केली म्हणजे सुधारणेच्या मार्गावरील संस्थात्मक कोंडी (bottleneck) फुटेल असे समजणे म्हणजे शुद्ध भाबडेपणा आहे.

**समारोप -**

एका बाजूला पाणी व्यवस्थापनासंबंधातील प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत. दुसऱ्या बाजूला वित्तमंत्री संसदेत व संसदेबाहेर वाढीव तरतूदींचा डंका पिटत असतात. लोक ते चालवून घेतात. त्यामुळे कोण कोणाला फसवत आहे या विषयी संभ्रम निर्माण होतो. भारतातील शिक्षण पद्धती व पाणी प्रश्न यांच्या संबंधातील मूलभूत आव्हानांना बगल देऊन अनाठायी काथ्याकूट करून धोरणकर्त्यांची 'गोलमाल' करण्याची प्रवृत्ती का निर्माण होते, हा प्रश्न भारतापुरता सीमित नाही. तिची लागण इतर देशांतही झाली आहे. विशेषत: 'ओइसीडी' देशांसाठी 13 फेब्रुवारी 07 रोजी प्रसिद्ध झालेल्या ''गोईंग फॉर ग्रोथ'' या तिसऱ्या वार्षिक अहवालात त्या प्रवृत्तीचा बोलका सारांश इकॉनॉमिक्स फोकस, (द इकॉनॉमिस्ट फेब्रुवारी 17-23,2007)मध्ये प्रसिद्ध झाला आहे. त्यात संरचनात्मक सुधारणांना विरोध का होतो व अस्तित्वात असलेली अर्थसहाय्ये व प्रशुल्के चालू रहावीत म्हणून आटापिटा का केला जातो, या प्रश्नांना प्रमेयबद्ध चौकटीत बसविण्याचा प्रयत्न केला आहे. सामान्य परिस्थितीत 'सहजशक्य तेवढ्याच सुधारणांचा वापर करणे'[6] (the art of the

possible) असे त्या प्रवृत्तीला संबोधण्यात आले आहे. धोरणकर्ते संरचनात्मक आर्थिक सुधारणा करण्यास धजत नाहीत. त्यासाठी आर्थिक संकटाची प्रतिक्षा करणे ते पसंत करतात. भारतातही तत्कालीन धोरणकर्ते उदारीकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी 1991 च्या पूर्वसंध्येच्या संकटाची वाट पहात होते. आज 2007-08 मध्ये तसे संकट दृष्टिपथात नाही म्हणून शिक्षण व पाणी यांच्या संबंधातील मूलभूत संरचनात्मक सुधारणा करण्याची टाळाटाळ होत आहे. हेच अर्थसंकल्पातील कालसापेक्ष मर्यादांचे मूळ संभवते.

### संदर्भसूची


1. 'Education and the wealth of nations', The Economist Leader, March 29-April 04, 1997.

2. Upadhyay, Sugeeta, 'Wastage in Indian Higher Eduation,' EPW, Jan. 13-19, 2007, PP. 163, 164.

3. India's Water Economy : Bracing For A Turbulent Future, John Briscoe and R.P.S. Malik (World Bank), Oxford University Press, 2006, PP. 7-8.

4. Ibid, P. xviii.

5. Ibid, P.xv.

6. The Economics Focus/The art of the Possible, The Economist, Feb. 17-23, 2007, P.78.


✦✦✦

## निवेदन

अर्थसंवादच्या एप्रिल-जून 2005 ते ऑक्टोबर-डिसेंबर 2006 या अंकात 'आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत - एक सिंहावलोकन ' ही लेखमाला प्रकाशित झाली. या लेखमालेत अंतर उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत (अर्थसंवाद ऑक्टोबर-डिसेंबर 2005) अंतरव्यवसाय संस्था आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत (अर्थसंवाद जानेवारी - मार्च 2006) या सिद्धांतांचे विवेचन करतांना एक मुद्दा स्पष्ट करता आला नाही. तो मुद्दा म्हणजे, 'या दोन्ही प्रकारच्या व्यापारात आपल्या देशातून अर्धसिद्ध वस्तू, कच्चा माल आयात करणाऱ्या देशाचे आपल्या देशाशी असलेल्या व्यावसायिक तसेच राजकीय संबंधांचा परिणाम देशादेशांमध्ये भेदभाव करण्यावर होतो का ?' हा मुद्दा विशद करता आला नाही. असेच काही सेवांच्या व्यापारात होत असते का? हे ही मांडता आले नाही. हे मुद्दे स्पष्ट करणारे संदर्भ मला मिळू शकल्यास मी अत्यंत आभारी राहीन. हे संदर्भ मला बी-2, फ्लॅटस् 1 आणि 2, सौदामिनी सोसायटी, कोथरूड, पौड रस्ता, पुणे - 41103 या पत्यावर कळवावेत, अशी विनंती मी अर्थसंवादच्या वाचकांना या निवेदनाद्वारे करीत आहे.

**सु.गो. भानुशाली**

# जॉन स्ट्यूअर्ट मिल (1806 ते 1873) : एक स्मरण

✦ लिला सर्वोत्तम कुळकर्णी, नाशिक.

*निवृत्त प्रपाठक (अर्थशास्त्र)*

**जॉ**न स्ट्यूअर्ट मिल यांचा जन्म सन 1806 मध्ये झाला. 2006 हे वर्ष त्यांचे द्विशताब्दी जन्मवर्ष होते. या निमित्ताने या विश्वविख्यात विद्वानाचे स्मरण करणे अत्यावश्यक वाटते. एकोणिसाव्या शतकातील एक उदारमतवादी विचारवंत अर्थशास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ता आणि राजकीय विचारवंत म्हणून त्यांची ख्याती आहे. तत्कालीन समाजाची योग्य जडणघडण करण्यासाठी राजकीय क्षेत्रात सक्रिय राहून त्यांनी चतुरस्त्र लिखाण केले. युरोपमधील भांडवलशाहीच्या संक्रमणावस्थे मध्ये नवीन राजकीय तत्त्वज्ञानाची उभारणी केली. व्यक्ती आणि शासन हे एकमेकास पूरक असतात, उपयुक्त असतात असा त्यांचा विश्वास होता.

जॉन स्ट्यूअर्ट मिल यांचे वडील अर्थतज्ज्ञ जेम्स मिल यांच्या मार्गदर्शनाखाली वयाच्या तिसऱ्या वर्षापासून शिक्षण सुरू झाले. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास सुरू केला. कोणतेही औपचारिक शिक्षण न घेता ते विद्वान म्हणून प्रसिद्ध झाले. अर्थशास्त्रातील सनातनवाद, राज्यशास्त्रातील उदारमतवाद आणि जेरेमी बेंथॅम यांचा उपयुक्ततावाद यांचा एकत्र मिलाफ जे. एस्. मील यांच्या लिखाणात सापडतो. याचवेळी इंग्लंडमधील कामगार संघटनाच्या आणि चार्टिस्ट चळवळींचा देखील परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. म्हणूनच समाजवादी दृष्टिकोनाचा उल्लेखही त्यांच्या लिखाणात आलेला आहे.

जे.एस्. मिल यांनी प्रचंड लिखाण केले. त्यातील विख्यात ग्रंथ म्हणजे (1)Principles of Political Economy (1948),(2) On Liberty (1859), (3) Utilitirianism(1863),(4) Consideration of Representative Government (1869).

मिल यांनी मुख्यत्त्वे करून डेव्हिड रिकार्डो यांच्या सारख्या प्रस्थापित अभिमतपंथी

अर्थतज्ज्ञांच्या विवेचनात सुधारणा करून त्यांची नव्याने मांडणी केली. त्यांनी विभाजन, विनिमय, उत्पादन विभाजनावरील परिणाम, अर्थव्यवस्थेचे स्वरूप, आर्थिक विकास, स्थैतिक अवस्था इत्यादी विषयांवर लेखन केले यापैकी काही महत्त्वाचे विचार आजही आपल्याला कालबाह्य वाटत नाहीत. विशेषकरून (अ) अभिमतपंथी विचारांची पुनर्मांडणी (ब) अर्थव्यवस्थेचे प्रारूप (क) आर्थिक विकास आणि स्थैतिक अवस्था आणि समाजवाद. या महत्त्वाच्या घटकांवरील मिल यांच्या योगदानाचा परामर्श प्रस्तुत लेखात घेतला आहे.

### अ. अभिमतपंथी विचारांची पुनर्मांडणी

अभिमतपंथी विचारसरणी बद्दल समाजात महत्त्व वाढावे आणि त्याचे उपयोजन व्हावे म्हणून त्यांनी हा प्रपंच केला.

#### 1. उपभोग आणि उत्पादन या विषयीचे विचार :

उपभोगाच्या विवेचनात उत्पादनाला देखील महत्त्व आहे. उत्पादनाची कार्यक्षमता वाढविणारा उपभोग हा उत्पादक उपभोग असतो. या संदर्भात मिल यांनी चैनीच्या वस्तुंचा उपभोग अनुत्पादक मानला आहे. श्रम+नैसर्गिक साधनसामग्री यापासून उत्पादन होते. श्रम हे शारीरिक आणि बौद्धिक दोन्ही प्रकारचे असतात. मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादन केले जाते. उत्पादन म्हणजे उपयोगितेची निर्मिती. अशी उपयोगिता निर्माण करणारे श्रमच उत्पादक असतात. या श्रमांमुळे निसर्गदत्त वस्तुत अथवा मनुष्यमात्रात कायम स्वरूपाची उपयोगिता निर्माण होते. अशाप्रकारे उपभोग देखील 'उत्पादक' आणि 'अनुत्पादक' असे असतात. स्वतःचे आरोग्य आणि कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी जो उपभोग घेतला जातो तो उत्पादक उपभोग होय. सुखोपभोग किंवा मनोरंजनासाठी जो उपभोग घेतला जातो तो अनुत्पादक उपभोग होय. हे चांगले की वाईट यावर त्यांनी भाष्य केले नाही. परंतु यामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक विषमतेबद्दल खंत मात्र व्यक्त केली.

#### 2. भांडवल विषयक विचार

संपत्ती म्हणजे संचय करण्यासारख्या वस्तुंचा नव्या उत्पादनासाठी अगोदर झालेल्या उत्पादनातून जो भाग बाजूला काढून ठेवला जातो तो भाग म्हणजे भांडवल होय. उत्पादक श्रमाला कामाला लावण्यासाठी जे भांडवल वापरले जाते, त्यातूनच श्रमिकांचा रोजगार निर्माण होतो. व त्यातूनच श्रमिकांच्या चरितार्थाची सोय होते. अशाप्रकारे भांडवल उत्पादक असते. भांडवलाचे दोन प्रकार मिल यांनी स्पष्ट केलेले आहेत ते असे, स्थिर भांडवल (Fixed Capital) आणि खेळते भांडवल(Working Capital).

उत्पादनाच्या अनेक फेऱ्यात स्थिर भांडवल प्रत्येक वेळी वापरले जाते, त्यामुळे त्याची झीज होत असते. यासाठीच घसाऱ्याची तरतूद असते. त्यातून भांडवलाचे नुतनीकरण होत असते. आजही असाच विचार केला जातो.

#### 3. मूल्य सिद्धांत

बाजारात मागणी व पुरवठ्याने वस्तुची किंमत ठरते हे मान्य करून त्यावर विशेष विवेचन मिलने केले. वस्तुच्या मूल्य निर्धारणात मागणीपुरवठा घटक महत्त्वाचे आहेत. परंतु वस्तुची किंमत देखील तितकीच महत्त्वाची आहे. किंमतीतील चढउतार एखाद्या वस्तुची मागणी व पुरवठा बदलवू शकतात. तसेच किंमत निर्धारणावर इतरही घटक परिणाम करतात. उदाहरणार्थ: (1) वस्तुची दुर्मिळता (2) अधिक उत्पादन खर्च (3) उत्पादनासाठी लागणारा कालावधी (4) उपभोक्त्याची विचार करण्याची प्रवृत्ती इत्यादी. हे स्पष्टीकरण देताना त्यांनी वस्तुच्या

उत्पादनखर्चाचे विश्लेषण केलेले आहे. वस्तुच्या उत्पादन खर्चात वेतन, नफा यांचा समावेश असतो. त्यांचा परिणाम किंमतीवर होतो. या किंमतीत खंडाचा समावेश नसतो.

### 4. विभाजनावरील विचार

यामध्ये (1) वेतन निधी (2) नफा निधी (3) खंड यावरील अभिमतपंथी किंवा प्रस्थापित विचार मान्य करून मिल यांनी त्यात सुधारणा सूचविल्या. निर्वाह-वेतन-सिद्धांत च्या जोडीला 'वेतन निधि' (Wage Fund) सिद्धांत देखील महत्त्वाचा आहे असे मत त्यांनी मांडले. उत्पादक आपल्या भांडवलातून प्रथम वेतन निधि हा वेगळा काढून ठेवतो. ते एक 'स्थिर चल' असते. कामगारसंख्येने वेतन निधिस भागले असता वेतनदर निश्चित होतात. कधी कधी भांडवलदार स्वत:चा खर्च, नफा कमी करून काही प्रमाणात हा निधि वाढवितात. यामुळे वेतनदर वाढतात. कधी कधी कामगारांची संख्या वाढली अथवा भांडवलदारींचा नफा वाढविला आणि वेतननिधी स्थिर असला तर वेतनदर घसरतात. या सिद्धांतावर नंतर खूप टीका झाली. आरंभापासून एक वादग्रस्त सिद्धांत म्हणूनच हा सिद्धांत प्रसिद्ध झाला.


नफ्याविषयी मिलने 'उपभोग परावृत्ती (Abstinence) सिद्धांत मान्य केला' भांडवलदारांना उपभोगपरावृत्तीबद्दल मिळणारे फल म्हणजे नफा होय. विश्लेषणाच्या ओघात यात आणखी काही घटकांचा उल्लेख मिल यांनी केला. उदाहरणार्थ, साहस, धोका पत्करणे, नफ्यासाठी योग्य संधी शोधणे, व्यवस्थापकीय परिश्रम, इतर परिस्थिती इत्यादी. या सर्व घटकांचा समावेश नफा मिळविण्यात असतो असे अगदी आधुनिक विचार त्या काळात मिल यांनी मांडले.

भांडवलदाराला किती नफा होईल याचे विवेचन देखील मिल ने केले. नफ्याचे प्रमाण महत्त्वाच्या दोन बाबी वर अवलंबून असते. (अ) एकूण उत्पादन (ब) उत्पादनासाठी लागणाऱ्या श्रमिकांच्या चरितार्थाचा खर्च. याचा अर्थ असा की नफा आणि वेतनदर परस्परसंबंधित आहेत. उत्पादनाचे प्रमाण वाढले तर नफा देखील वाढतो. कारण अत्योत्पादनाचा धोका नसतो. बाजारात पूर्ण स्पर्धा असते.

खंडाचा डेव्हिड रिकार्डो यांचा सिद्धांत मिल यांनी मान्य केला. ''जमिनीच्या उपजत, अविनाशी आणि सुपिकता या गुणांमुळे खंड निर्माण होतो''. जमिनदाराला तो मिळतो. निकृष्ट (सीमान्त) जमिनी देखील लोकसंख्येच्या आणि उत्पादनाच्या वाढीबरोबर लागवडीखाली येतात. दुर्मिळतेमुळे या जमिनींना देखील महत्त्व प्राप्त होते. त्याच्यातील लागवडीचा खर्च उत्पादक खर्च असतो. तो भरून निघण्याइतके उत्पन्न त्यात मिळते. खंड मात्र मिळत नाही. असा मिल यांनी निष्कर्ष काढला. खरे तर सविस्तर विश्लेषणात त्यांनी जमिनीचा वाढता उपयोग, दुर्मिळता आणि शास्त्रीय संशोधन व तंत्र यातून वाढविता येणारी जमिनीची उत्पादकता यांचा उल्लेख केलेला आहे. केवळ रिकार्डो च्या प्रभावामुळे त्यांनी 'दुर्मिळता खंड' किंवा 'आभासी खंड (Quasi Rent)' चा उल्लेख केला नाही तसे झाले असते तर मार्शल यांच्या पूर्वीच 'आधुनिक खंड सिद्धांताचा' जन्म झाला असता.

### ब) अर्थव्यवस्थेचे प्रारूप

अर्थव्यवस्था कशा (Model of Economy) स्वरूपाची असावी याबद्दल सविस्तर स्पष्टीकरण मिल यांनी दिले. अर्थात सूत्रात किंवा गणिती संज्ञेमध्ये त्यांनी या प्रारूपाची मांडणी केलेली नाही. त्यांच्या विचारांतून ही मांडणी करावयाची झाल्यास असे मांडावे लागेल -




कार्ल मार्क्सच्या विरोधाधिष्ठीत विकास या प्रतिमानाची येथे आठवण येते. व्यक्तिस्वातंत्र्य हे तत्त्व विरूद्ध 'विरोध तत्व' (Anti-Thesis) म्हणजे प्रातिनिधिक शासन असे मानले तर दोन्हीतून चांगल्या प्रकारे तयार होणारे संश्लेषण (Synthesis) म्हणजे कल्याणकारी राज्य (Welfare State) होय. पहिली दोन्ही तत्त्वे प्रथमदर्शनी परस्पर विरोधी वाटत असली तरी ती परस्परपूरक असावी असे मत मिल यांनी मांडले.

(1) व्यक्तिस्वातंत्र्य यामध्ये (i) व्यक्तीला निर्णय घेण्याची पूर्ण मोकळीक असते. (ii) व्यक्तिगतकृती-स्वातंत्र्य याचा इतरावर वाईट परिणाम होत नाही. (व्यक्तीची सद्सद्विवेक बुद्धी(अनाहतनाद) त्याला सदैव चांगल्या वर्तणूकीचा इशारा देत असते) (iii) स्त्रियांना स्वातंत्र्य देऊन त्यांचा आदर ठेवावा. (स्त्रियांना मतदानाचा हक्क असावा यासाठी आग्रह धरणारे जे.एस.मिल. हे पहिले विचारवंत असतील) (iv) अभिव्यक्ती स्वातंत्र्य आवश्यक असते. (v) स्त्री पुरुषांना सामाजिक जाचक बंधने नकोत. (vi) समाजातील अल्पसंख्याकांना हक्क असावेत (vii) सुखाची भौतिक वास्तव कल्पना असावी. व्यक्तीला जे सुख मिळते त्यात वस्तु-सेवा उपभोग, विपुलता हवी. सुखाची गुणवत्ता महत्त्वाची असते.(viii) सुखाच्या कल्पनेत नैतिक निकषाला महत्त्व असावेच.

अशाप्रकारे व्यक्ती, व समाज हे वस्तुसेवा सुखातून आत्मशोधाकडे जातात त्यामुळेच संपूर्ण समाजात सुख निर्माण होते.

**(2) प्रातिनिधिक शासन (Representative Government)**

शासन लोकशाही पद्धतीचे असावे. व्यक्तींनी आपले प्रतिनिधी निवडून द्यावेत. त्यांच्याकडून सरकार चालविले जावे. यासाठी खालील बाबींची आवश्यकता असते.

(i) व्यक्तिस्वातंत्र्यासाठी व्यक्तीला मतदानाचा अधिकार असावा (ii) सुशिक्षित व्यक्तींच्या हातात राजकीय सत्ता असावी. याचा अर्थ असा की निवडणूकीला उभी राहणारी व्यक्ती किंवा उमेदवार सुशिक्षितच असला पाहिजे. (iii) व्यक्ती आणि शासन कायम, एकमेकाला पूरक असावेत. त्यांच्या मध्ये कोणतेही गैरसमज अथवा दुरावा नसावा. (iv) बदलत्या समाजरचनेनुसार शासन देखील गतिशील असावे. (V) शक्यतोवर निर्हस्तक्षेप नीति असावी, परंतु अपरिहार्य परिस्थितीत शासनाने हस्तक्षेप करून, नियंत्रण आणावे.

येथे शासन म्हणजे कायद्याद्वारे नियंत्रण असे असले तरी एकंदर व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी शासनव्यवस्था असावी. सर्वसाधारणपणे व्यक्तिस्वातंत्र्य आणि कायदा म्हटले की त्या दोन भिन्न प्रवृत्ती वाटतात, म्हणून मिलचे मत असे आहे की त्या एकत्र असतील तर कल्याणकारी राज्याची निर्मिती होईल.

**(3) कल्याणकारी राज्य**

या संकल्पनेचे मूळ सुखवादी (Hedonism) विचारात आहे. समाज स्वतंत्र व्यक्तींचा बनलेला असतो. प्रत्येक व्यक्ती सुखाच्या शोधात असते. सर्व व्यक्तींच्या सुखाची बेरीज म्हणजे समाजाचे सुख होय. भांडवलशाही मजबूत करण्यासाठी उपयुक्ततावाद आणि सुखवाद यांची मदत झाली की कल्याण प्रस्थापित होते. कल्याण म्हणजे सुख, शांती आणि

समाधान मिळणे. व्यक्तींच्या सुखाची एकूण बेरीज म्हणजे समाज कल्याण, हे अबाधित राखण्यसाठी शासनाचे कायदे मदत करणारे असतात. याद्वारे लोकांची अभिव्यक्ती, हित, समाधान जपले जाते.

### क) आर्थिक विकास, स्थैतिक अवस्था आणि समाजवाद (Economic Development, Stationary State and socialism)


अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञांनी विकासाचा जो सिद्धांत मांडला तोच जे.एस. मिल यांनी स्वीकारुन, त्याचे सखोल विवेचन केले. आर्थिक विकास म्हणजे राज्याचे राष्ट्रीय उत्पादन अथवा उत्पन्न वाढणे. हे ''उत्पादन नैसर्गिक साधनसामग्री, श्रमशक्ती आणि भांडवल यांचे कार्य किंवा फलन आहे.''

$$Y = F (N, L, K)$$

Y = राष्ट्रीय उत्पादन, F= फलन, N = नैसर्गिक साधनसामग्री , L= श्रमशक्ती, K = भांडवल संग्रहण.

ॲडम स्मिथ, रिकार्डो, माल्थस, जे.बी.से. इत्यादी सर्वांचेच हे मत होते. तेच मत मिल यांनी मान्य केले. विश्लेषणात मात्र बऱ्याचशा सुधारणा त्यांनी केल्या. अप्रत्यक्षपणे (t) म्हणजे शास्त्रीय संशोधन आणि तंत्र या घटकांचा उल्लेख त्यांनी केला. नव्याने हे फलन मांडावयाचे झाल्यास $Y = F (N, L, K, t)$ असे करावे लागेल.

N, L, K, च्या मात्रा (आदानप्रदान मात्रा)जशा जशा वाढतील तसे प्रदान (उत्पादन) वाढत जाईल. आर्थिक विकास होईल.




या घटकापैकी भूमीचा (N) नैसर्गिक साधनसामग्री पुरवठा ताठर, शून्य लवचिक असतो. तिची मागणी मात्र प्रचंड वाढणारी असते. लोकसंख्या आणि उत्पादन जसे जसे वाढेल तसे तसे तिची मागणी वाढते. लोकसंख्या वाढत जाईल तसे श्रमिक संख्या (L) वाढत जाते. श्रमिकांचा पुरवठा वाढतो. भांडवल म्हणजे भांडवलदाराचे संचीत (K) योग्य संधीच्या प्रतिक्षेत असते हे सर्व घटक एकत्र आले की हळूहळू उत्पादन वाढत जाते. राज्यातील आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू होते. महत्तम आर्थिक विकास प्रक्रियेत नफ्याचा वाढता दर विकासाच्या प्रक्रियेला आणखी प्रेरित करतो. निकृष्ट प्रतिच्या जमिनीदेखील या स्थितीत लागवडीखाली येतात. यांच्यामध्ये उत्पादन वाढविण्यासाठी शास्त्रीय संशोधन आणि तंत्र उपयोगात आणले जाते. म्हणजेच t हा घटक वापरात येतो. शास्त्रीय संशोधन तंत्र विकासामुळे कामगारांची कौशल्ये देखील वाढतात. शेवटी अर्थव्यवस्था उन्नत स्थैतिक अवस्थेप्रत पोचते. (खंडित रेषेने आकृतीत दर्शविले आहे.)

या सर्व विश्लेषणात भांडवल संग्रहणाला अतिशय महत्त्व दिलेले आहे. बचत हा भांडवल संग्रहणाचा पाया आहे. एकूण उत्पन्न आणि शुद्ध उत्पन्न (आय) यातील फरकामुळे बचत निर्माण होते. विशिष्ट काळात उत्पादित अंतीम वस्तुचे बाजारमूल्य म्हणजे, एकूण प्राप्ती (उत्पन्न आय) यापैकी काही भाग वेतननिधी म्हणून ठेवला जातो. तसेच यंत्रादी भांडवल चालू स्थितीत ठेवण्यासाठी व त्यांच्या पुनरूज्जीवनासाठी देखील काही हिस्सा बाजुला काढून ठेवला जातो. त्याला 'घसारा' असे म्हणतात. या सर्वांचा अर्थ असा की एकूण उत्पन्नातून खंड, वेतन निधि, घसारा इत्यादी, वजा केल्यावर उर्वरित उत्पन्न ते शुद्ध उत्पन्न होय. आर्थिक विकास प्रक्रियेत हे उत्पन्न वरचेवर वाढते. कमाल आर्थिक विकासाची पातळी गाठल्यावर 'कुंठीत अवस्था' येते.

जमिनदाराना खंड मिळतो. परंतु भांडवलदारांच्या नफ्यात घट होते. पुढील गुंतवणूक कमी कमी होते. स्थैतिक अवस्थेत मात्र सर्व उत्पादन घटकांना पूर्ण रोजगार असतो. स्थैतिक अवस्थेची वैशिष्ट्ये -

1) भूमी या घटकाचा पुरवठा ताठर असल्यामुळे तिची मागणी सातत्याने वाढते. सुपीक जमीन मिळावी म्हणून उत्पादकात स्पर्धा निर्माण होते. परिणामी खंड वाढतात.

2) खंड वाढल्यामुळे अन्नधान्याच्या किंमती वाढतात. निर्वाह करणे श्रमिकांना अवघड जाते. परिणाम वेतनपातळी वाढवावी लागते. त्यामुळे नफ्यात घट होते.

3) बचती, आणि गुंतवणुकी घटतात. नफ्याचा दर शून्य होतो.

4) श्रमिकांचे वेतनदर वाढल्यामुळे त्यांची संख्या आणखी वाढते.(निर्वाह वेतन सिद्धांत) अन्नाची मागणी वाढते, पुन्हा खंड वाढतात व नफ्यामध्ये घट होते.

5) निकृष्ट दर्जाच्या जमिनी म्हणजे सीमान्त जमिनी देखील लागवडीखाली येतात. त्यांच्यावरील केवळ उत्पादन खर्चच भरून निघतो. हळूहळू ही परिस्थिती बदलत जाते.

6) लोकसंख्या सातत्याने वाढत गेल्यामुळे श्रमिकांचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त होतो. पुन्हा वेतनदर घसरून निर्वाह-वेतन पातळीवर येतात.

अभिमतपंथीना ही अवस्था म्हणजे स्थैतिक अवस्था समाधानकारक नसते असे वाटते. अर्थव्यवस्थेतील विकासाची प्रक्रिया येथे कुंठीत होते. नफा शून्य असतो. गुंतवणुकीची प्रेरणा नसते. बचती घटलेल्या असतात म्हणजे पुढे काय ? हा प्रश्न असतो.

जे.एस्. मिल यांनी मात्र स्थैतिक अवस्था ही अतिशय चांगली अवस्था असते असे म्हटले. अर्थव्यवस्थेची प्रगती वेगाने होत असताना काही काळ नफा घटण्याची प्रवृत्ती असते. बचत, भांडवल क्रिया थांबतात. परंतु ही अवस्था विपुल प्रगतीनंतर आलेली असते. भांडवलदाराची सांपत्तिक स्थिती सुधारलेली असते. श्रमिकांना पूर्ण रोजगार असतो. त्यांचे वेतन बऱ्यापैकी असते. त्यांची आर्थिक स्थिती सुधारलेली असते. समाजाची एकूण आर्थिक स्थिती संपन्नतेची असते. सर्वांच्या जवळ भरपूर संपत्ती साठलेली असते. संपत्ती आणि उत्पन्न वितरण व्यवस्थित झालेले असते. कोणालाच आर्थिक विवंचना नसतात. आपले जीवनमान उंचावण्यासाठी लोक सदैव दक्ष राहतात. भौतिक सुखाकडून ते आत्मशोधाकडे प्रवास करीत असतात. ज्ञान, संशोधन, कला, तंत्र, कौशल्ये इत्यादी मध्ये अफाट प्रगती झालेली असते. मिल यांच्या भाषेत -

> "This Condition of society so greatly perferable to the present is not only perfectly compatible with the stationary state but it would seem more naturally allied with that than with any other."

मिल यांची स्थैतिक अवस्थेची कल्पना रम्य, आशावादी आहे. कारण यामध्ये सुबत्ता, आर्थिक न्याय, आर्थिकेतर बाजुंची प्रगती गृहीत धरलेली असते. कार्ल मार्क्स यांच्या स्वप्नाळू (Utopia) समाजवादाची येथे आठवण येते.

जे.एस. मिल यांचा समाजवाद म्हणजे स्थैतिक अवस्थेतील संपत्ती व उत्पन्न याचे योग्य वाटप, सर्वांना न्याय्य हक्क, सर्व स्वातंत्र्ये आणि सुखी, समृद्ध समाजाची निर्मिती होय. हा समाजवाद उत्क्रांतीवादी, समन्वयक स्वरूपाचा आहे. यामुळे भांडवलशाही समाजवादाची न्याय्य पद्धती अस्तित्वात येऊ शकते. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर तिच्यातील दोष वेळच्यावेळी दूर केले, त्यात सतत सुधारणा केल्या तर अतिशय आदर्श

आर्थिक पद्धत निर्माण होईल. सुधारित भांडवलशाहीत वस्तुसेवा, सुख आणि भांडवल यांची योग्य विभागणी झालेली असते. हाच समाजवाद होय.

या अवस्थेत लोक संपूर्ण सुखात, आनंदात असतात. लोकसंख्या वाढती असली तरी शिक्षण, कलाकौशल्य यांचा प्रसार होत राहिल्यामुळे ''समान संधी'' चे वातावरण असेल. खाजगी मालमत्तेचे सर्वसामान्य दुर्गुण नाहीसे होतील. एकूण आपल्या समाजवादी विचारसरणीत मिल यांनी उदारमतवादाचाच पुरस्कार केला. समाजातील क्रांतीपेक्षा उत्क्रांतीला अधिक महत्त्व दिले.

जे.एस्.मिल यांचे अर्थशास्त्रातील स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. अर्थशास्त्रीय सिद्धांताना त्यांनी आधुनिक बनविण्यासाठी खूप परिश्रम घेतले ते अतिशय जिज्ञासु व बुद्धिमान होते. त्यांनी अपेक्षिलेला 'आर्थिक मानव' (Economic Man) हा आदर्श, विवेकी आणि पापभीरू असा आहे. त्याने निर्माण केलेला समाज, राज्य आणि अर्थव्यवस्था ही आदर्श न्याय्य अशी असेल. प्रत्यक्षात मात्र मिल यांचे हे स्वप्न व हा आशावाद खरा ठरला नाही. मिल यांची उदारमतवादी, आशावादी विचारसरणी प्रखर टीकेस पात्र ठरली. अर्थात यामुळे आदर्श समाज निर्मितीचे त्यांच स्वप्न कमी प्रतीचे ठरत नाही. या उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञाच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

### संदर्भसूची


1. Schumpeter, Joseph A. : 'History of Economic Analysis; George Allen & Unwin ; London, 1954.

2. कुलकर्णी सुहास /चंपानेरकर मिलींद : 'यांनी घडवलं सहस्त्रक' : रोहन प्रकाशन, पुणे 2005.

3.Blaug,Mark (1977), 'Economic Theory in Retrospect', Heinemann Educational Book Ltd., London.

4. Alelman, Irma; 'Theories of Economic Growth and Development; Stanford University Press, Amsterdam.

5. Roll Eric , A History of Economic Thought : Faber and Ltd. London.

6. फडणवीस मृणालिनी : 'विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत' ; श्री प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन, नागपूर.

7. देसाई, मुतालिक, थेवलेकर, दास्ताने : 'आर्थिक विचारांचा विकास' ; दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे.


✦✦✦

## निबंध लेखकांसाठी सूचना

अधिवेशनासाठी/अर्थसंवादसाठी शोधनिबंध पाठविणारे लेखक हे परिषदेचे सभासद असलेच पाहिजेत. अध्यक्षाकडे/संपादकाकडे निबंध पाठविताना आपला सभासद क्रमांक लिहावा. फक्त सभासदांचेच निबंध विचारात घेण्यात येतील. (आमंत्रित निबंध व लेख सोडून). आपण सभासद क्रमांक लिहीलेला नसल्यास आपला लेख विचारात घेतला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**कार्यवाह – खजिनदार**

# कुपोषण एक दृष्टिक्षेप

✦ सुनीता सिनगारे, औरंगाबाद.
*शिवछत्रपती महाविद्यालय, सिडको, औरंगाबाद.*

*(मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या श्रीरामपूर येथे झालेल्या ३०व्या अधिवेशनात सादर केलेल्या या शोधनिबंधाला परिषदेतर्फे दिले जाणारे ग.प्र. पिंपरकर व के.एच. ठक्कर ऋणमुक्ती पारितोषिक प्राप्त झाले आहे.)*

**प्रस्तावना**

कुपोषणाची समस्या गेल्या अनेक वर्षांपासून भारताला भेडसावत आहे. शिक्षण, विज्ञान, लोकजागृती, शासनाच्या योजना इत्यादीमुळे यात घट झाली आहे, तथापि जोपर्यंत देशात गरिबी राहणार तोपर्यंत कुपोषणाचे समूळ उच्चाटन होईल असे वाटत नाही. कुपोषणाला विशेषत: महिला व लहान मुले बळी पडतात. साधारणपणे गरोदरपणात अथवा तत्पुर्वी स्त्रिला मिळणाऱ्या अन्नातून 2200 उष्मांक (कॅलरीज) मिळणे गरजेचे असते. स्तनदा मातेसाठी 3000 उष्मांकांची गरज असते. त्याचप्रमाणे आहारातून पुरेशा प्रमाणात प्रथिने, कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह, जस्त, आयोडिन, जीवनसत्त्वे (अ,ब,क,ड,ई) इत्यादी पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हायला हवीत. मात्र ज्या कुटुंबाना पोटभर भाकरीच मिळत नाही किंवा जेवणात भाकरी बरोबर फक्त मीठ, मिरचीचाच सातत्याने अंतर्भाव असतो त्यांना फळे, भाज्या, तृणधान्ये, दूध, मांस, मासे, अंडी हे घटक कसे काय उपलब्ध होतील ? 'भुकेला कोंडा व उशेला धोंडा' या म्हणीप्रमाणे घोटभर दुधापासून पातेलेभर चहा तयार करून पिणाऱ्या गर्भवती महिलेस दररोज 100 ते 200 ग्रॅम दूध कसे काय मिळणार ? म्हणून कुपोषणाचा विचार केला तर एकट्या मेळघाटात मागील दहा वर्षात सात हजार बालमृत्यू झाल्याचे वृत्त आपण वाचतो. या ठिकाणी तीस हजार बालके कुपोषणग्रस्त असल्याचे स्वयंसेवी संस्थांचे म्हणणे आहे.

प्रस्तुत लेखात कुपोषणाच्या समस्येचा सविस्तर आढावा घेतला आहे. कुपोषणाच्या प्रश्नाचे उत्तर शोधत असतांना खालील बाबींचा विचार करणे आवश्यक ठरते.

**कुपोषण म्हणजे काय ?**

कुपोषण म्हणजे बाळाचे वजन त्याच्या वयास अनुसरून योग्य प्रमाणात नसणे. अशा प्रकारचे वय व वजन यांचे तक्ते उपलब्ध आहेत. या तक्त्यांप्रमाणे बाळाचे वजन नसल्यास ते किती प्रमाणात कमी आहे हे लक्षात घेऊन, 80 टक्क्यापेक्षा कमी वजन असल्यास बाळ कुपोषित आहे, असे समजले जाते. जन्मत: बाळाचे वजन कमी असणे हे कुपोषणाचे एक कारण असले तरी शंभर टक्के ते कुपोषणच असते असेही नाही. जन्माच्या वेळी वजन कमी असण्याचे जगात 16 टक्के प्रमाण असून भारतात ते 26 टक्के आहे.

जन्मत: वजन कमी म्हणजे 2.5 किलो ग्रॅमपेक्षा कमी वजनाचे बाळ. बाळाचा जन्म मुदतपूर्व झाल्यास वजन कमी असू शकते. गर्भधारणेच्या 37 आठवड्याच्या आत बाळ जन्मल्यास त्याचे वजन कमी असले तरी योग्य पोषणाद्वारे 2 ते 3 वर्षात त्याची योग्य वाढ होऊ शकते. मात्र योग्य पोषण न मिळाल्यास 1/3 बालके कुपोषित होतात. गर्भधारणेनंतर 37 ते 40 आठवड्या दरम्यान म्हणजेच मुदतपूर्ण केल्यानंतर बाळ जन्मल्यास गर्भधारणेच्या कालावधीत मातेला योग्य पोषण आहार न मिळाल्यामुळेही बाळाचे वजन कमी भरते.

पुरेसा आहार न मिळाल्यामुळे बाळाचे कुपोषण होते. बाळ 1 ते 3 वर्षाचे झाल्यावर हे स्पष्टपणे दिसून येते. अंगावरचे दूध बंद केल्यानंतर पुन्हा कुपोषण सुरू होते.

**कुपोषण कसे ओळखावे**

1. वयाच्या व उंचीच्या मानाने बाळाचे वजन कमी असणे.
2. बाळाच्या हातापायावर सूज असणे .
3. बाळाचे स्नायू आकसलेले (वाळलेले) दिसणे.
4. शरीरातील त्वचेखालील व चेहऱ्यावरील त्वचेत चरबीचे प्रमाण नसणे.
5. मूलाने सतत किरकिर करणे, रडणे, कमी हालचाल करणे, अशक्त असणे.
6. वैद्यकीय तपासणीमध्ये बाळाची भूक, ताप, त्वचेवर, सुरकुत्या, काळे डाग, लिव्हर सुजलेले, निस्तेज डोळे, खुंटलेली वाढ, मांसपेशी कमी होणे, अशी लक्षणे आहेत का हे तपासले जाते.
7. बाळाची रक्त व लघवी तपासून रक्तातील प्रथीने कमी/जास्त प्रमाण, लघवीतील युरीयाचे कमी प्रमाण, रक्तातील अमायनो ॲसीडचे वाढलेले प्रमाण तपासण्यात येते.

**कुपोषणाचे वर्गीकरण (गोमेझचे वर्गीकरण)**

खालील सुत्राच्या* आधारे बाळाचे वयानुसार असलेल्या वजनाची टक्केवारी काढतात हे वजन दर जर

1. 90 ते 110 टक्के असेल तर बाळ कुपोषित नसते.
2. 75 ते 89 टक्के असेल तर बाळ एक अंश कुपोषित असते असे मानले जाते. (अल्प प्रमाण)
3. 60 ते 74 टक्के असल्यास बाळ दोन अंश कुपोषित आहे असे मानले जाते. (मध्यम प्रमाण)
4. 60 टक्क्यांपेक्षा कमी असेल तर बाळ तीन अंश कुपोषित आहे (अति प्रमाण)

भारतीय बालरोग चिकित्सा तज्ज्ञ परिषदेचे वर्गीकरण मात्र खालील प्रमाणे आहे.

1. 80 टक्के पेक्षा जास्त असेल तर बाळ कुपोषित

$$\text{*बाळाचे त्याच्या वयानुसार असलेले वजन टक्के} = \frac{\text{बाळाचे खरे वजन}}{\text{बाळाच्या वयानुसार असावयास हवे ते वजन}} \times 100$$

(दवाखान्यात तक्ता उपलब्ध असतो.)

नाही.

2. 71 ते 80 टक्के असेल तर एक अंश कुपोषण आहे.
3. 61 ते 70 टक्के असेल तर दोन अंश कुपोषण आहे.
4. 51 ते 60 टक्के तीन अंश कुपोषण आहे.
5. 50 व त्यापेक्षा कमी टक्के असल्यास चार अंश कुपोषण आहे.

**कुपोषणाची कारणे**

जन्मत:च बाळाचे वजन 2500 ग्रॅम किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी वजनाच्या बाळाला अशक्त बाळ समजण्यात येते. भारतात 30 टक्के मुले ही जन्मत:च कमी वजनाची (कुपोषित) असतात. 8 ते 11 महिन्याच्या दरम्यान जास्तीतजास्त मुले कुपोषित होतात. जन्मत:च बाळाचे वजन कमी असण्याची मुख्य कारणे पुढील प्रमाणे आहेत.

1. बाळाच्या आईला योग्य आहार (समतोल) न मिळणे.
2. आईला लोहसत्त्व न मिळणे.
3. आईला खूप शारीरिक कष्ट करावे लागणे.
4. आईच्या आरोग्याकडे व तिच्या आजारपणाकडे कुटुंबातील लोकांचे दुर्लक्ष असणे.
5. कमी वयात मूल होणे.
6. वरचेवर बाळंतपण होणे.
7. दोन बाळंत पणात अंतर नसणे.
8. वातावरणातील अस्वच्छता, मोठ्यामोठ्याने आवाज करणारे कारखाने, रेल्वे मार्गाजवळ राहणे, अपुरा प्रकाश, जवळच कचराकुंडी, उघडी गटारे यामुळे श्वसनाचे रोग, त्वचेचे रोग, या सर्व बाबींचा परिणाम कुपोषणावर होतो.
9. आईच्या आरोग्याच्या तक्रारी.
10. आईला दूध पुरेसे नसणे.
11. स्तनपान लवकर बंद करणे.
12. बाळाला खाऊ घालण्याच्या चुकीच्या पद्धती.
13. जाहिरातीला भुलून बाजारातील तयार अन्नपदार्थ बाळाला देणे.
14. जन्मत:च बाळाला व्यंग असणे.
15. आर्थिक शोषणामुळे उपासमारीला तोंड द्यावे लागणे.
16. आहाराविषयी अज्ञान.
17. बाळंतपणानंतर पहिल्या दोन दिवसातील आईच्या दूधात असणारे घटक बाळाच्या लसीकरणाचे काम करतात. काही वेळा गैरसमजुतीमुळे नवजात बालक या महत्त्वाच्या घटकास मुकतो.
18. सामाजिक, धार्मिक, चाली, रूढी, परंपरा इत्यादी.
19. वैद्यकीय सोयींचा अभाव.

**पोषण व आरोग्य**

**अ) अन्नाचे वर्गीकरण (उत्पन्नावरून)**

1. वनस्पतीपासून - गहू, डाळ, भाजी
2. प्राण्यांपासून - अंडी, मटन, मासे

**ब) अन्नाच्या घटकांचे वर्गीकरण**

1. प्रथिने
2. चरबी
3. शर्करायुक्त
4. जीवनसत्त्वे
5. खनिजे

**क) अन्नाचे कार्यावरून वर्गीकरण**

1. शरीरबांधणी व वाढीसाठी अंडी, मासे, मटन
2. शक्तिवर्धक - साखर, तेल, तूप
3. संरक्षण घटकयुक्त - दूध, फळे, पालेभाज्या

बाळाच्या आरोग्यासाठी वरील 'ब' व 'क' मधील सर्व घटक आवश्यक आहेत. यातील एकाची कमतरता कुपोषण घडवू शकते.

**अ. अर्भक मृत्यूदर**

केरळमध्ये ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात

कुपोषणाचे व अर्भक मृत्यूदराचे प्रमाण जास्त आहे. मात्र इतर राज्यांच्या तुलनेत देशात केरळ मध्ये अर्भक मृत्यूदराचे प्रमाण कमी आहे. ओरिसा व मध्यप्रदेशात हे प्रमाण सर्वात जास्त आहे. ग्रामीण व शहरी भागा मध्ये महाराष्ट्राचा क्रमांक पहिल्या दोन मध्ये नसला तरी एकूण मध्ये मात्र अर्भक मृत्यु दर कमी असण्याच्या बाबतीत तो देशात क्रमांक दोनवर आहे. (पहा तक्ता क्र. 1)

भारतात 1960 साली 100 जन्मलेल्या बालकांपैकी फक्त 76 बालकेच आपल्या आयुष्याची पाच वर्षे पूर्ण करून सहाव्या वर्षात पदार्पण करू शकत होती. आता 2000 साली हे प्रमाण 90 पर्यंत पोहचले आहे. अद्यापही 10 टक्के बालके मरतात व यात कुपोषणाचा सिंहाचा वाटा आहे. (पहा तक्ता क्र. 2)

पाकिस्तान व बांगला देशा नंतर जन्मदराच्या बाबतीत , पाकिस्तान नंतर अर्भक मृत्यु दरात व पाच वर्षाखालील बालकांच्या मृत्यू दरात भारताचा क्रमांक लागतो (पहा तक्ता क्र. 3).

महाराष्ट्र शासनाच्या नोंदीनुसार 1999-2000 या वर्षात 23,995 बालमृत्यू नोंदले गेले. मात्र बंग समिती अहवालानुसार 79605 बालमृत्यू झाले. म्हणजेच फक्त 30 टक्के बालमृत्यूच्या नोंदी शासनाकडे होतात व इतर 70 टक्के बालमृत्यूची नोंद होत नाही. (पहा तक्ता क्र. 5)

**कुपोषणाचे अहवाल**

(1) महाराष्ट्र शासनाच्या (Human Development Report 2002 अन्वये) मानवी विकास अहवालामध्ये महाराष्ट्रात 49 टक्के गर्भवती महिला ॲनिमिक (रक्त/लोह कमी, अशक्त) आहेत.

महाराष्ट्रात वाढत्या स्त्रीभ्रुणहत्या (स्त्री गर्भाचा नाश) मुळे सध्या 1000 पुरूषांमागे फक्त 917 स्त्रिया आहेत.

महाराष्ट्रात, भारतातील एकूण एड्स् रोगांपैकी 50 टक्के रोगी आहेत. महाराष्ट्रात 80 टक्के दवाखाने शहरी भागात आहेत. महाराष्ट्रात एक लाख लोकसंख्येमागे 24 डॉक्टर आहेत. मुंबईत 49 टक्के लोक झोपडपट्टीत राहतात, जेथे कुपोषण अधिक आहे. महाराष्ट्रात ग्रामीण जनतेत 57 टक्के तर शहरी जनतेत 54 टक्के लोकांना पोटभर अन्न मिळत नाही.

(2) फ्रंटलाईन नावाच्या पाक्षिकाच्या (10 ते 23 सप्टेंबर 2005) अंकात प्रसिद्ध झालेल्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्राच्या 9 जिल्ह्यांमधे दोन महिन्यात 2306 बालके कुपोषणामुळे दगावली. महाराष्ट्राच्या कुपोषणाच्या प्रमाणात 1988 ते 2002 या 15 वर्षामध्ये फक्त 0.6 टक्के घट झाली.

राष्ट्रीय पोषण संनियंत्रण केंद्र (National Nutrition Monitoring Bureau) यांच्या अहवालानुसार महाराष्ट्रात 40 लाख बालके दोन ते चार अंश कुपोषित आहेत.

महाराष्ट्रात प्रतिवर्षी 1.60 लाख बालके कुपोषणाने मृत्यूमुखी पडतात. ज्याचे प्रमाण ग्रामीण आदिवासी व शहरी भागात अनुक्रमे 82 हजार, 23.5 हजार व 56 हजार आहे.

(3) संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव विकास अहवालात (2005) असे नमूद केले आहे की,

भारतात 30 टक्के बालके कुपोषित आहेत (एकत्रित) भारतात 5 वर्षाखालील वयाची 47 टक्के बालके कुपोषित आहेत. भारतात चार पैकी एक मुलगी व दहा पैकी एक मुलगा प्राथमिक शाळेत जात नाही.

(4) संयुक्त राष्ट्रसंघाचा आंतरराष्ट्रीय बालकांसाठी आकस्मिक निधी (UNITED NATIONS INTERNATIONAL CHILDREN'S EMERGENCY FUND) या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या अहवालाप्रमाणे, भारतात फक्त 30 टक्के जनतेस स्वच्छतेच्या सुविधा आहेत (Adequate Sanitation) फक्त 43 टक्के बाळांतपणे तज्ज्ञ दाई/नर्स मार्फत होतात. बाळंतपणात स्त्री मृत्यू प्रमाण 2

टक्के आहे. भारतात 14 टक्के मुलांना (वय वर्ष 5 ते 14) बळजबरीने कामाला (Labour) लावले जाते. वयाच्या 21 वर्षाखालील मुला-मुलींचे लग्नाचे प्रमाण 46 टक्के आहे. भारत सरकार आरोग्यासाठी 6 टक्के उत्पन्न व संरक्षणावर 20 टक्के उत्पन्न खर्च करते. भारतात 5 वर्षाखालील 23 लाख बालके दरवर्षी दगावतात व त्यातील अर्धी बालके कुपोषणामुळे दगावतात.

(5) वेळोवेळी वृत्तपत्रातील प्रसिद्ध अहवालप्रमाणे एप्रिल-मे 2004 मध्ये 807 बालके ठाणे, नाशिक, अमरावती, नंदूरबार व गडचिरोली या आदिवासी भागात कुपोषणामुळे दगावली.

महाराष्ट्रात एप्रिल ते ऑगस्ट 2004 या दरम्यान 15 आदिवासी जिल्ह्यांत 3231 बालके दगावली. महाराष्ट्रात 15 जिल्ह्यांमध्ये एका वर्षात 6 वर्षाखालील 9000 आदिवासी बालके मृत्युमुखी पडली.

नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात (आदिवासी भाग) 2005 मध्ये कुपोषणाने फक्त 3 महिन्यात 98 बालके दगावली. यातील 71 बालकांना चार अंश स्तराचे कुपोषण होते.

भारतात साधारणपणे दरवर्षी 2 कोटी मुले जन्मतात. त्यापैकी फक्त 30 लाख मुलेच मन, बुद्धी व शरीर या दृष्टीने निरोगी असतात. उरलेली मुले या बाबतीत आरोग्य रेषेच्या खालच्या पातळीवर असतात.

सन 2004 च्या लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात सरकारने दरवर्षी 1.60 लाख महिला बाळंतपणातच मृत्यू पावतात असे नमूद केले. याचा अर्थ 'सशक्त माता सशक्त बालक' ही कल्पना अजूनही आमच्या कुटुंब व्यवस्थेत रूजली नाही.

1992 ते 1997 मध्ये अमरावतीच्या मेळघाट भागात 5000 मृत्यू कुपोषणाने झाले.

**आदिवासी**

महाराष्ट्रात 47 आदिवासी जमाती असून त्यांची लोकसंख्या 73 लाख आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या ती 9 टक्के एवढी आहे. 33 टक्के आदिवासी शेतकऱ्यांजवळ 5 एकरपेक्षा कमी तर 54 टक्के आदिवासी शेतकऱ्यांजवळ 10 एकरपेक्षा कमी जमीन आहे. (आदिवासींच्या आरोग्याबाबतची माहिती तक्ता क्र. 9 मध्ये पहा)

**कुपोषण टाळण्यासाठी उपाय**

(1) खास सुरक्षा, लवकर कुपोषण ओळखणे, तातडीने उपचार करणे, दवाखान्यात दाखल करणे, प्राणवायु देणे, तपमान नियंत्रित ठेवणे, मद्यपान टाळणे, अंधश्रद्धा निर्मूलन, सेवाभावी संस्थांची मदत घेणे, जनतेचा सहभाग वाढविणे, वैद्यकीय सेवा घरोघरी पुरविणे, पतपुरवठा करणे, कुटुंब नियोजन सक्तीचे करणे, बालविवाह प्रतिबंध, पाळणा लांबविणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, अल्प किंमतीत संतुलीत आहार, बाळाला आईचे दूध भरपूर देणे किंवा पोटात नळी घालून दूध ओतणे, दूध 180 मि.ली./कि.ग्रॅ. बाळाच्या वजनामागे दर दिवशी द्यावे.

ग्रामीण व आदिवासी भागात लहान मुलांच्या कुपोषणाचे एक कारण म्हणजे स्तनदा माता आपल्या लहान मुलांना घरी ठेवूनच कष्टाची कामे करण्यासाठी बाहेर पडतात. अशा वेळी बाळांना आईचे दूध योग्यवेळी व पुरेशा प्रमाणात मिळत नाही. मुळात अशा मातांना सकस आहार उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या दुधातच पुरेशा प्रमाणात पोषक अन्नघटक उपलब्ध नसतात. अगदी सहज उपलब्ध होणारे अन्नघटक म्हणजे गुळ, शेंगदाणे, फुटाणे, हिरव्या पालेभाज्या, डाळी, कडधान्ये, केळी, गाजर, बीट देण्यात यावे. कुपोषण म्हणजे काय हे समजून घेतले तर ते सर्व कुपोषण टाळण्यासाठीचे उपाय असतील.

(2) कुपोषण टाळण्यासाठी आरोग्य शिक्षण

डॉक्टर, नर्स, आरोग्य रक्षक इत्यादी.यांच्या मार्फत देण्यात यावे

सोप्या भाषेत मोजक्या शब्दात, श्रोत्यांची आवड लक्षात घेऊन करमणुकीसारखे संदेश, कार्यक्रम, बाळाचे आरोग्य, स्वच्छता, रीतिरिवाज, खाद्यपदार्थ या बाबतची माहिती द्यावी.

व्याख्यानांद्वारे, चर्चा, भीत्तीपत्रक, चित्राद्वारे, घरोघर भेटी, सिनेमा, पथनाट्य, दूरदर्शन, प्रदर्शन, गाणी, आकाशवाणी, वृत्तपत्रे अशी माध्यमे उपयोगात आणावी.

माता, बालक, कुटुंबातील इतर व्यक्ती यांना अशा बातम्यांकडे लक्ष देण्यास प्रवृत्त करावे.

मातेला योग्य अन्नाबाबत माहिती द्यावी तसेच कमी खर्चाच्या पण पोषक अन्नाबाबतची माहिती देणे वातावरण, स्वच्छता, शिक्षण तसेच कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देणे.

**(13) शासनाचे प्रयत्न - (आदिवासी भागातील मेळघाट आकृतिबंध (Pattern)**

(1) आदिवासी भागात महाराष्ट्र शासनाने 'मेळघाट आकृतिबंध' अंमलात आणला.

रोख अनुदान व गर्भवती महिलांसाठी विशेष योजना राबविण्यात येतात.

या योजनेअंतर्गत रूपये 800/- रोख अनुदान गर्भवती महिलेस प्रत्येकी पाचव्या ते नवव्या महिन्याच्या दरम्यान देण्यात येते. यात औषधासाठी रूपये 400 व धान्यासाठी रू. 400/- प्रदान करण्यात येतात.

रोख रकमेचा वापर लाभार्थी इतरत्र करतात असे निदर्शनास आल्यामुळे रोख रक्कम देणे बंद करण्यात आले असून त्याऐवजी औषध व अन्नधान्य वाटप सुरू केले आहे.

आदिवासी पाड्या (वस्ती) मध्ये आरोग्य रक्षक नेमण्यात आले आहेत. त्यांच्यामार्फत मीठ साखर, पाणी, पाण्यात क्लोरीन मिसळणे इत्यादी प्रशिक्षण व सोयी पुरविण्यात येतात. फिरती आरोग्य पथके, तातडीची पथके निर्माण केल्याने मेळघाट आकृतीबंधामुळे बालमृत्युचे प्रमाण 50 टक्के घटले आहे. या योजनेचा खर्च रूपये 40 कोटी झाला. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्या, त्यांनी बाळाला व मातेला पोषण व आरोग्याकडे लक्ष देण्याचे काम केले. मेळघाट आकृतिबंधामुळे गडचिरोली, ठाणे, नंदूरबार व चंद्रपूर या जिल्ह्यातील आदिवासी भागात बालमृत्यूचे प्रमाण अनुक्रमे 51,40,50, व 38 टक्क्यांनी कमी झाले.

(2) इतर कार्यक्रम

राज्यात कुपोषण निर्मुलनासाठी राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य पोषण अभियान सुरू करण्यात आले आहे. याचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे. हे अभियान राज्यात सुरुवातीला 5 आदिवासी जिल्ह्यांसाठी काम करणार असून उर्वरित 15 जिल्ह्यातही लवकरच कामे सुरू करणार आहेत. अशा प्रकारचे अभियान देशात पहिल्यांदाच आरंभ करून महाराष्ट्राने अव्वल क्रमांक मिळविला आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत पुरक पोषण आहाराच्या दरात वाढ करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. यामध्ये 0 ते 6 महिने वयोगटातील मुलांना प्रतिबालक प्रतिदिन दोन रूपये दिले जातील व याचा लाभ 44.54 लाख लाभार्थींना होईल. 6 महिने ते 6 वर्ष वयोगटातील अतीकुपोषित (श्रेणी 3 व 4) मधील मुलांना प्रतिबालक प्रतिदिन 4 रूपये देण्यांत येतील व याचा लाभ 25 हजार लाभार्थींना मिळेल. गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता यांना प्रतिलाभार्थी प्रतिदिन चार रूपये देण्यात येतील व याचा लाभ 7.19 लाख लाभार्थींना होईल.

राज्यात नवीन 12,864 अंगणवाड्या सुरू करण्यात येत असून त्यातील 3500 अंगणवाड्या आदिवासी भागात, 1000 अंगणवाड्या मुंबईत व उर्वरित राज्यात इतरत्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात

आला आहे. राज्यात 64,124 अंगणवाड्या कार्यरत असून 72,77,209 मुले या योजनेचा लाभ घेत आहेत.

जन्ममृत्यूची अचूक नोंद केली जात आहे. बालकांचे नियमितपणे वजन घेतले जात आहे. श्रेणी 3 व श्रेणी 4 च्या कुपोषित बालकांची विशेष काळजी घेतली जात असून श्रेणी 2 मधील मुलांवर विशेष लक्ष देण्यात येत आहे.स्तनदा माताना स्तनपानाचे महत्त्व पटवून देण्यात येते .

अन्न नागरी पुरवठा विभागातर्फे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी अंत्योदय योजनेतंर्गत राज्यातील गरिबातील गरीब कुटुंबाना दरमहा 35 किलो धान्य, गहू दोन रूपये प्रति किलो व तांदूळ तीन रूपये प्रति किलो या अल्प दराने दरमहा वाटप करण्यात येते.

राज्य शासनामार्फत बालविकास कार्यक्रमांतर्गत एकात्मिक बालविकास योजना राबविली जाते. या योजनेत प्रत्येक तालुक्यात अंगणवाड्या, महिला, गर्भवती महिला, स्तनदा माता व बालकांची विशेष काळजी घेण्यात येते. यात नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण, पुरक पोषण आहार, पूर्व प्राथमिक शिक्षण इत्यादी बाबींचा समावेश होतो.

केंद्र शासनातर्फे आदिवासी विकासासाठी 350 पेक्षा अधिक विकास योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. पाचव्या योजनेपासून आजपर्यंत 5 हजार कोटी पेक्षा अधिक रक्कम त्यांच्या विकासासाठी शासनाकडून खर्च झाली आहे.

केंद्र शासनाकडून राज्याला 2005-06 साली एकूण 356.58 कोटी एवढे अनुदान मिळणार असून अनुदानाचा 55 कोटीचा पहिला हप्ता राज्य शासनास प्राप्त झाला आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्याला रू. 660 कोटी येत्या 5 वर्षासाठी मिळणार असून दरवर्षी रूपये 115 कोटी याप्रमाणे येत्या दोन वर्षासाठी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

आदिवासी जिल्ह्यांमध्ये पाडा स्वयंसेवक आणि डॉक्टर्सची भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. नंदूरबार, नाशिक, गडचिरोली, अमरावती व ठाणे या 5 आदिवासी जिल्ह्यांतील एप्रिल 2005 ते जानेवारी 2006 या काळात झालेल्या सर्वेक्षणात असे दिसते की, मुलांचे वजन आणि आरोग्य ह्याची तपासणी करण्यात आली. अभियानांतर्गत झालेले काम समाधानकारक आढळले. मुलांच्या वजनात वाढ झाल्याचे दिसून आले.

अंगणवाडी मधील पुरक पोषण आहार वितरणाचे काम महिला मंडळे, महिला बचतगट, स्वयंसहायता गटाकडे देण्यात येणार आहे.

## संदर्भसूची


1. Park Textbook of Preventive and Social Medicine17 वी आवृत्ती, डॉ. के. पार्क 2002.

2. भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली - 1999-2000 चा वार्षिक अहवाल.

3. युनिसेफ या संस्थेचा 'जगातील बालकांची अवस्था' या विषयाचा 2001 चा अहवाल.

4. आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्था यांनी ऑक्टो 2000 मध्ये जाहीर केलेला भारताचा राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ पाहणी अहवाल क्र. 2. 1998-99

5. अतिरिक्त संचालक, व्हायटल स्टॅटिस्टिक्स, आरोग्य व कुटुंब कल्याण महाराष्ट्र शासन पुणे यांचा वार्षिक अहवाल 1999-2000 व इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली 7.12.2002.

6. महासंचालक, आरोग्य सेवा नवी दिल्ली यांनी प्रसिद्ध केलेली ग्रामीण आरोग्याची आकडेवारी या विषयावर भारत सरकार तर्फे प्रसारीत वार्तापत्र

जून 1993

7. भारत सरकारचा 2001-02 चा वार्षिक अहवाल आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली 2002 .

8. अतिरिक्त संचालक व्हायटल स्टॅटिस्टीक्स आरोग्य व कुटुंब कल्याण महाराष्ट्र शासन पुणे यांचा 2003 वा वार्षिक अहवाल.

9. कुपोषणाच्या जनहित याचिकेवर उत्तर म्हणून 2005 मध्ये महासंचालक, आरोग्य सेवा मुंबई यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांना सादर केलेला अहवाल.

10. 'Frontline' 10 ते 23 सप्टेंबर 2005.

11. महाराष्ट्र राज्याचा मानव विकास अहवाल 2002

12. कुपोषणाच्या जनहित याचिकेवर उत्तर म्हणून 2005 मध्ये महासंचालक, आरोग्य सेवा मुंबई यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांना सादर केलेला अहवाल)

**तक्ता क्र. 1**

**अर्भक मृत्यूदर 1998**

| अ.क्र. | राज्य | ग्रामीण | शहरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | आंध्रप्रदेश | 75 | 38 | 66 |
| 2. | आसाम | 82 | 36 | 78 |
| 3. | बिहार | 68 | 51 | 67 |
| 4. | गुजरात | 71 | 46 | 64 |
| 5. | हरियाना | 72 | 58 | 69 |
| 6. | कर्नाटक | 70 | 25 | 58 |
| 7. | केरळ | 15 | 17 | 16 |
| 8. | मध्यप्रदेश | 103 | 56 | 97 |
| 9. | महाराष्ट्र | 58 | 32 | 49 |
| 10. | ओरीसा | 101 | 66 | 98 |
| 11. | पंजाब | 58 | 40 | 54 |
| 12. | राजस्थान | 87 | 60 | 83 |
| 13. | तामिळनाडू | 58 | 40 | 54 |
| 14. | उत्तरप्रदेश | 89 | 65 | 85 |
| 15. | प. बंगाल | 56 | 41 | 53 |

(स्रोत - भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली - 1999-2000 चा वार्षिक अहवाल)

**तक्ता क्र.2**

**5 वर्षांपर्यंत मुलांचे जिवंत राहण्याचे शेकडा प्रमाण**

| अ.क्र. | देश | 1960 | 2000 |
|---|---|---|---|
| 1 | भारत | 75.8 | 90.4 |
| 2. | श्रीलंका | 86.7 | 98.1 |
| 3. | बांगलादेश | 75.2 | 91.8 |
| 4. | पाकिस्तान | 77.3 | 89 |
| 5. | चीन | 77.5 | 96 |
| 6. | इंग्लंड | 97.3 | 99.4 |
| 7. | अमेरिका | 97 | 99.5 |
| 8. | जपान | 96 | 99.5 |
| 9. | सिंगापूर | 96 | 99.5 |

Park Text Book of Preventive and Social Medicine

**तक्ता क्र.3**

**भारत आणि इतर देशातील बालमृत्युचे प्रमाण**

| अ.क्र. | देश | जन्मदर एकहजार लोकसंख्ये मागे 1998 | अर्थक मृत्युदर मृत्युदर (2000) हजारी जिवंत जन्मलेल्या बालकांमागे | पाच वर्षाखालील बालकांचा मृत्युदर दरहजारी जिवंत जन्मलेल्या बालकांमागे (2000) |
|---|---|---|---|---|
| 1. | भारत | 25 | 69 | 96 |
| 2. | पाकिस्तान | 35 | 85 | 110 |
| 3. | बांगलादेश | 28 | 54 | 82 |
| 4. | थायलंड | 16 | 25 | 29 |
| 5. | श्रीलंका | 18 | 17 | 19 |
| 6. | चीन | 16 | 32 | 40 |
| 7. | स्विझरलॅन्ड | 11 | 3 | 4 |
| 8. | इग्लंड | 12 | 6 | 6 |
| 9. | अमेरिका | 14 | 7 | 8 |
| 10. | सिंगापूर | 14 | 4 | 4 |
| 11. | जपान | 10 | 4 | 4 |

(स्रोत - युनिसेफ या संस्थेचा 'जगातील बालकांची अवस्था' या विषया वरील 2001 चा अहवाल)

**तक्ता क्र.4**

**भारतातील मृत्यूदर 1000 लोकसंख्येमागे (कुपोषण व इतर सर्व कारणांमुळे)(1997)**

| वयवर्ष | शहरी | | | ग्रामीण | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण |
| 0-4 | 12.5 | 13.8 | 13.1 | 24.2 | 27.2 | 25.6 | 21.8 | 24.5 | 23.1 |
| 5-9 | 1.0 | 1.2 | 1.1 | 2.0 | 2.7 | 2.3 | 1.8 | 2.4 | 2.1 |
| 10-14 | 0.9 | 0.7 | 0.8 | 1.2 | 1.3 | 1.3 | 1.1 | 1.2 | 1.2 |
| 15-19 | 1.0 | 1.5 | 1.2 | 1.4 | 2.4 | 1.9 | 1.4 | 2.1 | 1.7 |

(स्रोत : आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्था यानी आक्टो. 2000 मध्ये जाहीर केलेला भारताचा 'राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ पाहणी अहवाल क्र. 2 1998-99')

**तक्ता क्र.5**

**जिल्हानिहाय वार्षिक बालमृत्यु**

| अ.क्र | जिल्हा | महाराष्ट्र शासनाकडे नोंदणी झालेले वार्षिक बालमृत्यू | डॉ. अभय बंग समितीच्या अहवालानुसार | अ.क्र. | जिल्हा | महाराष्ट्र शासनाकडे नोंदणी झालेले वार्षिक बालमृत्यू | डॉ. अभय बंग समितीच्या अहवालानुसार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | रायगड | 906 | 2366 | 17 | परभणी | 491 | 2947 |
| 2 | रत्नागिरी | 175 | 1802 | 18 | बीड | 789 | 2627 |
| 3. | ठाणे | 140 | 4699 | 19 | नांदेड | 304 | 3404 |
| 4. | अहमदनगर | 1602 | 4326 | 20 | लातूर | 589 | 2477 |
| 5. | धुळे | 746 | 2047 | 21 | उस्मानाबाद | 732 | 1677 |
| 6. | नंदूरबार | 512 | 1609 | 22 | अकोला | 531 | 1917 |
| 7 | जळगाव | 1891 | 3919 | 23 | वाशिम | 407 | 1253 |
| 8. | नाशिक | 213 | 4562 | 24 | अमरावती | 1148 | 2266 |
| 9. | पुणे | 1092 | 4410 | 25 | बुलढाणा | 1007 | 2347 |
| 10. | सोलापूर | 237 | 3368 | 26 | यवतमाळ | 1644 | 2493 |
| 11. | सातारा | 1212 | 3011 | 27 | भंडारा | 1468 | 2635 |
| 12 | कोल्हापूर | 757 | 3118 | 28 | चंद्रपूर | 774 | 2519 |
| 13. | सांगली | 652 | 2180 | 29 | गडचिरोली | 1035 | 1325 |
| 14 | सिंधुदुर्ग | 302 | 741 | 30 | नागपूर | 1196 | 1980 |
| 15 | औरंगाबाद | 483 | 2303 | 31 | वर्धा | 452 | 1179 |
| 16 | जालना | 508 | 2098 | | एकूण महाराष्ट्र | 23995 | 79605 |

स्रोत - अतिरिक्त संचालक, व्हायटल स्टॅटिस्टिक, आरोग्य व कुटुंब कल्याण महाराष्ट्र शासन पुणे यांचा वार्षिक अहवाल 1999-2000 व इकॉनॉमिक व पॉलिटिकल विकली 7.12.2002

**तक्ता क्र. 6**

**बालमृत्यु प्रमाण (1998-2000)**

| अ.क्र. | जिल्हा | वयाच्या 28 दिवसांपर्यंत नवजात अर्भक मृत्यूदर | वयाच्या एक वर्षापर्यंत अर्भक मृत्यूदर मृत्यूदर | 5 वर्षाखालील बालमृत्यूदर प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1. | नागपूर ग्रामीण | 48.7 | 65.9 | 70.2 |
| 2. | वर्धा ग्रामीण | 69.3 | 71.1 | 79.1 |
| 3. | गडचिरोली ग्रामीण | 65.6 | 80 | 91.7 |
| 4. | सांगली ग्रामिण | 33.8 | 39.9 | 45.9 |
| 5. | लातूर आणि उस्मानाबाद ग्रामीण | 43.1 | 56 | 72.2 |
| 6. | एकूण ग्रामीण | 53.3 | 66 | 76.1 |
| 7. | अमरावती आदिवासी | 47.2 | 77.3 | 94.4 |
| 8. | मेळघाट आदिवासी | 51.8 | 90.7 | 126.9 |
| 9. | गडचिरोली आदिवासी | 70 | 90.6 | 104.9 |
| 10. | यवतमाळ आदिवासी | 50.5 | 67.3 | 91.3 |
| 11. | नाशिक आदिवासी | 36.2 | 70.7 | 92.4 |
| 12. | रायगड आदिवासी | 54.3 | 79.7 | 108.7 |
| 13. | एकूण आदिवासी | 49 | 72.7 | 92.1 |
| 14. | नागपूर शहरीभाग | 47.2 | 68.2 | 86.6 |
| 15. | सर्व एकत्रित | 51.2 | 68.7 | 82.9 |

(स्रोत - इकॉनॉमिक अॅन्ड पॉलिटिकल विकली 7.12.2002)

**तक्ता क्र. 7**

**जनतेच्या आरोग्यासाठी सुचविलेले आवश्यक मनुष्यबळ**

| अ.क्र. | मनुष्यबळ | सुचविलेले आवश्यक मनुष्यबळ |
|---|---|---|
| 1. | डॉक्टर | एक - दर 3500 लोकसंख्येमागे |
| 2. | नर्स | एक - दर 5000 लोकसंख्येमागे |
| 3. | आरोग्य कर्मचारी | एक - दर 5000 लोकसंख्येमागे सामान्य भागात |
| | | एक - दर 3000 लोकसंख्येमागे डोंगराळ व आदिवासी भागात |
| 4. | प्रशिक्षित दाई | एक प्रत्येक गावासाठी (खेडे) |
| 5. | आरोग्य सहाय्यक | एक - दर 30000 लोकसंख्येमागे सामान्य भागात |
| | | एक - दर 20000 लोकसंख्येमागे डोंगराळ व आदिवासी भागात |

(स्रोत - महासंचालक, आरोग्य सेवा नवी दिल्ली यांनी प्रसिद्ध केलेली ग्रामीण आरोग्याची आकडेवारी या विषयावर भारत सरकार तर्फे प्रसारीत वार्तापत्र जून 1993)

**तक्ता क्र. 8**

**भारताची पंचवार्षिक योजना - आरोगयाबाबतची उद्दिष्टे**

| अ.क्र. | वर्णन | पहिली पंचवार्षिक योजना 1951-56 | नववी पंचवार्षिक योजना 1997-2002 |
|---|---|---|---|
| 1. | प्राथमिक आरोग्य केंद्रे संख्या | 725 | 22807 |
| 2. | प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे संख्या | - | 137292 |
| 3. | रूग्णखाटा संख्या | 125000 | 596203 |
| 4. | वैद्यकीय महाविद्यालये | 42 | 187 |
| 5. | दरवर्षी नवीन डॉक्टर संख्या | 3500 | 19000 |
| 6. | दंत महाविद्यालय संख्या | 7 | 105 |
| 7. | एकूण वैद्यकीय डॉक्टर | 65000 | 410800 |
| 8. | एकूण नर्सेस | 18500 | 776643 |

(स्रोत - भारत सरकारचा 2001-02 चा वार्षिक अहवाल आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय नवी दिल्ली 2002)

**तक्ता क्र.9**


**आदिवासींची आरोग्य स्थिती**

| अ.क्र. | प्रमाण | महाराष्ट्र | आदिवासी भाग |
|---|---|---|---|
| 1 | बाल मृत्यू दर | 59 | 110 |
| 2 | एकत्रित मृत्यु दर | 7.9 | 13 |
| 3. | माता मृत्यू दर | 2 | उपलब्ध नाही |
| 4. | जन्माच्या वेळी वजन कमी असलेल्या बाळांचे प्रमाण | 28 टक्के | 40 टक्के |
| 5. | कुटुंब आकार | 3.8 | 4.2 |
| 6. | प्रशिक्षित नर्स मार्फत बाळंतपण | 86 टक्के | 12 टक्के |

(स्रोत - अतिरिक्त संचालक व्हायटल स्टॅटिस्टिक्स् आरोग्य व कुटुंब कल्याण महाराष्ट्र शासन पुणे यांचा 2003 चा वार्षिक अहवाल)

**आकृती क्र. 1**

**आरोग्य शिक्षणाद्वारे कुपोषणाचे प्रमाण कमी करता येते.**



तिसावे वार्षिक अधिवेशन सूत्रसंचालकांचे अहवाल
चर्चासत्र पहिले

# भारतातील आर्थिक विचारांचा विकास

✦ सूत्रसंचालक - जगन्नाथ पाटील, सातारा.
*प्रपाठक, लालबहादूर शास्त्री कॉलेज, सातारा.*

**प्रस्तावना**

भारतातील आर्थिक विचारांच्या विकासाचा अभ्यास कौटिल्याच्या अर्थशास्त्रापासून करण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती दिसते. धोरणाबाबतचे नियम आणि आर्थिक तत्त्वांची सैद्धांतिक मांडणी या दोन भिन्न बाबी आहेत. धोरणासंबंधीच्या नियमांना अर्थपूर्णता प्राप्त करून देण्यामध्ये कौटिल्याचे योगदान महत्त्वपूर्ण होते असे असले तरी भारतातील आर्थिक विचारांच्या पद्धतशीर मांडणीला खऱ्या अर्थाने 19 व्या शतकापासून आरंभ झाला.

या विषयावर परिषदेच्या 36 सदस्यांनी निबंध सादर केले आहेत ही स्वागतार्ह बाब आहे. सादर केलेल्या निबंधांचे विषयानुसार खालील गटात वर्गीकरण करता येईल.

**निबंधांचे वर्गीकरण**

| | | |
|---|---|---|
| 1. महात्मा गांधींचे आर्थिक विचार | - | 5 निबंध |
| 2. आंबेडकरांचे आर्थिक विचार | - | 3 निबंध |
| 3. धनंजयराव गाडगीळ यांचे आर्थिक विचार | - | 4 निबंध |
| 4. जे.के. मेहता यांचे आर्थिक विचार | - | 2 निबंध |
| 5. दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार | - | 2 निबंध |
| 6. कल्याणकारी अर्थशास्त्रीय विचारावरील निबंध | - | 2 निबंध |
| 7. विविध भारतीय अर्थशास्त्रज्ञांचे विचार | - | 5 निबंध |

8. भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचारांचा तपशिलवार अभ्यास - 11 निबंध

9. इतर - 2 निबंध

**निबंधांचा सारांश**

**1. महात्मा गांधींचे आर्थिक विचार -**

रमेशचंद्र बेराड यांनी आपल्या या विषयावरील निबंधात गांधीजींच्या आर्थिक विचारांपैकी, विश्वस्ताची संकल्पना, साधी राहणी उच्च विचारसरणी, उत्पादक रोजगार व आर्थिक वृद्धिचे प्रतिमान आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे आहे असे मत मांडले आहे. संदीप देशमुख व सुधाकर जाधव यांनी आपल्या निबंधात गांधीजींच्या आर्थिक विचारांचा मूळबिंदू त्यांच्या ग्रामीण उद्योगामध्ये होता असे विचार मांडले आहेत. विश्वस्ताच्या संकल्पनेमुळे आर्थिक समानता निर्माण होण्यास मदत होईल असे स्पष्ट केले आहे. तेजस्विनी मुडेकर व अनघा पाठक यांनी आपल्या निबंधात गांधीजींच्या आर्थिक विचारांचा आढावा घेताना त्यांच्या अहिंसा व समता तत्त्वावर भर दिला आहे. आर्थिक प्रगती करताना समतोलासाठी व गळेकापू स्पर्धांना प्रतिबंध घालण्यासाठी गांधीजींचे विचार मार्गदर्शक ठरतात असे म्हटले आहे. उमेश राजदेरकर यांनी आपल्या निबंधात गांधीजींच्या आर्थिक विचारांच्या अंमलबजावणीतून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा विचार होतो असे स्पष्ट केले आहे. एस.व्ही. गीरसागर यांनी आपल्या निबंधात गांधीजींच्या आर्थिक विचारांचा परामर्श घेतला असून, समाजाच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने ग्रामोद्योग व वर्गसमन्वयाचा आधार घेता येईल असे म्हटले आहे.

**2. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार-**

संजीव लाटे व के.आर. सानप यांनी या विषयावरील आपल्या निबंधात आंबेडकरांचे शेती कामगार विषयक धोरण, संतती नियमन, शिक्षण, आर्थिक विषमता व रूपयाच्या प्रश्नाबाबतचे विचार मांडले आहेत. संतोष यादव व ज.फा. पाटील या लेखकद्वयांनी आपल्या निबंधात आंबेडकरांच्या शेती चलनविषयक धोरण व सार्वजनिक आयव्यय विषयक धोरणाची वास्तवता स्पष्ट केली आहे. आनंद कावळे यांनी आपल्या निबंधात आंबेडकरांच्या विविध आर्थिक विचारांचा आढावा घेऊन ते विचार वास्तवात कसे महत्त्वाचे आहेत ते स्पष्ट केले आहे.

**3. धनंजयराव गाडगीळ यांचे आर्थिक विचार**

ए.के. पाटील आणि आसिफ शिकलगार यांनी या विषयावरील आपल्या निबंधात गाडगीळांच्या भारतीय नियोजन व संघराज्य, कृषी-औद्योगिक सहकारी समाजरचना व जिल्हा नियोजन विषयक विचारांचा आढावा घेतला आहे. भारतामध्ये सामाजिक न्याय व आर्थिक विकास साधावयाचा असेल तर सहकार व जबाबदार सरकार याला पर्याय नाही ही गाडगीळांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे असे मत तिलोत्तमा चौधरी यांनी आपल्या निबंधात व्यक्त केले आहे. धनाजी पोवार यांनी आपल्या निबंधात गाडगीळांच्या विविध आर्थिक विचारांचा परामर्श घेतला असून आजच्या परिस्थितीतही कृषी-औद्योगिक सहकारी समाज व सहकारी लोकराज्याची संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे असे मत मांडले आहे. सुवर्णा पाठक यांनी आपल्या निबंधात गाडगीळांच्या संशोधन विषयक कार्याचा आढावा घेतला असून त्यांच्या विविध आर्थिक विचारांची उपयुक्तता तपासून पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

**4. जे.के. मेहता यांचे आर्थिक विचार**

विनायक देशपांडे व स्नेहा देशपांडे यांनी आपल्या निबंधात स्वातंत्र्योत्तर काळात जे.के. मेहता यांनी मांडलेला 'गरजाविरहित अर्थशास्त्र' हा भारतीय आर्थिक विचारांचे प्रतिनिधित्व करणारा विचार मानता येईल असे म्हटले आहे. श्रीराम पेडगांवकर

यांनी मेहता यांची इच्छामुक्ती संकल्पना व सामाजिक कल्याण विषयक विचारांचा तपशिलवार आढावा घेतला आहे.

### 5. दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार

प्रभाकर भावके यांनी आपल्या निबंधात दादाभाई नौरोजींच्या आर्थिक नि:सारण सिद्धान्ताची मांडणी करून तिची कारण परिणाम मीमांसा केली आहे. बाळासाहेब पाटील यांनी आपल्या निबंधात दादाभाई नौरोजींचा भांडवल नि:सारणाचा सिद्धान्त आजच्या जागतिकीकरणाच्या आर्थिक प्रक्रियेत कितपत लागू पडतो हे तपासून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या लाभांश, बोनस, भाग, स्वामित्व, व्यापारी सेवा इत्यादी माध्यमातून भांडवली शोषण करतात असा निष्कर्ष काढला आहे.

### 6. कल्याणकारी अर्थशास्त्रीय विचारावरील निबंध

ए.ए. डांगे व सुजाता पाटील यांनी आपल्या निबंधात महाभारतातील संदर्भासहित प्राचीन भारतीय कर नीती, कर महसुलीचा सार्वजनिक खर्चामध्ये वापर, करदर याबद्दल विवेचन केले आहे. शासनाने आपली महसुली जमा ही अनुत्पादक कारणासाठी वापरू नये हे धोरण प्राचीन भारतीय राजस्वाच्या लिखाणामध्ये स्पष्ट केले आहे. याचा पुनर्विचार महत्त्वाचा ठरतो असे म्हटले आहे. मधुकर खंदारे, भिमराव धेवारे व माधव गायकवाड यांनी आपल्या निबंधात महात्मा फुले, महादेव गोविंद रानडे, छत्रपती शाहु महाराज, बाबासाहेब आंबेडकर, गोपाळकृष्ण गोखले, अमर्त्य सेन यांच्या कल्याणविषयक आर्थिक विचारांचा परामर्श घेतला आहे.

### 7. विविध भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या विचारावर आधारित निबंध

विविध भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचारांचा संयुक्तपणे परामर्श घेण्याचा प्रयत्न विविध निबंध लेखकांनी केला असून यामध्ये शंकर हजारे, संदीप सूर्यवंशी, राहूल थोरात, रमेश कटके, आय. ए.निरगुडे , मंजुषा मुसमाडे, अरूणा सोनेगावकर यांचा समावेश होतो. या सर्वांनी कौटिल्य, दादाभाई नौरोजी, महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर, महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, रमेशचंद्र पंत यांच्या विचारांचा संयुक्तपणे आढावा घेतला आहे.

### 8. भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचारांचा तपशिलवार अभ्यास

डी.जी. चौगुले यांनी आपल्या निबंधात कौटिल्याच्या विविध आर्थिक विचारांचा आढावा घेतला आहे. सरला चौधरी यांनी व्ही.जी. काळे यांच्या आर्थिक विचारांचा परामर्श घेतला असून दारिद्र्य, औद्योगिक विकास, आर्थिक स्वातंत्र्य इत्यादी विषयक विचारांवर भर दिला आहे. उत्तम वाकोडकर यांनी आपल्या निबंधात आर्थिक सुधारणा काळात बी.आर. शेणॉय यांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता स्पष्ट केली आहे. वसुधा खांदेवाले यांनी आपल्या निबंधात गोपाळ गणेश आगरकर यांच्या आर्थिक विचारांचा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेस कितपत लाभ झाला आहे हे स्पष्ट केले आहे. रामदास माहोरे यांनी आपल्या निबंधात महादेव गोविंद रानडे यांच्या व्यापारविषयक विचारांचा आढावा घेतला आहे. रवींद्र ढाले, मिलिंद कुलट व राजेंद्र गव्हाळे यांनी आपल्या निबंधात पंजाबराव देशमुख यांच्या कृषीविषयक आर्थिक विचारांचा परामर्श घेऊन शेतकऱ्यांचा जीवनस्तर उंचावण्याकरिता काही उपाय सुचविले आहेत. राहुल म्होपरे यांनी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांची वास्तविकता आजमावण्याचा प्रयत्न केला आहे. एन.बी. गवारे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या शेती, उद्योग, सहकार, समाजवाद व आर्थिक नियोजन इत्यादी विचारांचे स्पष्टीकरण केले आहे. रवींद्र जोशी यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या अर्थकारणाची दिशा राष्ट्रहिताच्या दृष्टीने कशी

उपयुक्त आहे हे स्पष्ट केले आहे. आबासाहेब सूर्यवंशी व श्रीमंत बरूंगले यांनी आपल्या निबंधात अमर्त्य सेन यांच्या दारिद्र्य, दुष्काळ व कल्याणविषयक विचारांचा आढावा घेतला आहे. एस.जी. गावडे यांनी आपल्या निबंधात शिवाजी महाराजांच्या आर्थिक धोरणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**9. इतर**

निरज हातेकर व दिलीप बत्रास यांनी आपल्या निबंधात 19व्या शतकाच्या उत्तरार्धात व 20व्या शतकाच्या पूर्वार्धात प्रकाशित पण दुर्लक्षित राहिलेल्या चापेकरांच्या 'पैसा' या पुस्तकातील आर्थिक विचारांची मांडणी केली आहे. मुक्ता जहागिरदार यांनी आपल्या निबंधात 19व्या शतकातील प्रमुख भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या लिखाणातून व्युत्पन्न होणारी साम्राज्यवादी प्रक्रिया स्पष्ट केली आहे. तसेच ही प्रक्रिया सुपोषित व दृढमूल कशाप्रकारे होते याचे विवेचन केले आहे.

भारतातील आर्थिक विचारांचा विकास या विषयाची व्याप्ती मोठी आहे. निबंध लेखकांनी विविध मुद्यांचा परामर्श घेतला आहे.

या चर्चासत्रात प्रत्यक्षात 24 निबंध लेखकांनी आपल्या निबंधांचे सादरीकरण केले. प्रा. सुभाष दगडे यांनी अहवाल लेखनाचे काम यशस्वीपणे पार पाडले.

✦✦✦

## श्रद्धांजली
## प्राचार्य. डॉ. शामकांत देशपांडे

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद, खान्देश एज्युकेशन सोसायटी, जळगाव संचालित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्च, जळगाव येथील संचालक, प्रा. डॉ. शामकांत गोपाळराव देशपांडे यांचे जळगाव येथे दि. 8 फेब्रुवारी 2007 रोजी वयाच्या 51 व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या उभारणीत त्यांचा फार मोलाचा वाटा होता. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विधी सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य व वाणिज्य शाखेचे अधिष्ठाता म्हणून त्यांची कारकीर्द यशस्वी ठरली होती. जळगाव येथे ते सुप्रसिद्ध सनदी लेखापाल होते. अंदाजपत्रकाचे विश्लेषण ते अतिशय उत्तमरित्या करीत असत. अखिल भारतीय वाणिज्य परिषदेचे अध्यक्ष पदही त्यांनी भूषविले होते. मराठी अर्थशास्त्र परिषद त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

कार्यवाह - खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

चर्चासत्र दुसरे

# भारतातील स्वयं सहायता गट : पार्श्वभूमी व वाटचाल

✦ सूत्रसंचालक - मेधा देशपांडे, पुणे.

*प्रपाठक, ना.दा.ठा. महिला विद्यापीठ, पुणे परिसर*

### प्रस्तावना

**नो**व्हेंबर 2006 मध्ये रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर येथे आयोजित केलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 30 व्या राष्ट्रीय अधिवेशनात 'स्वयंसहायता गट : पार्श्वभूमी व वाटचाल' या अतिशय समयोचित विषयावरील चर्चासत्र पार पडले. औपचारिक वित्तसेवा सर्वदूर, विशेषत: ग्रामीण भागात पोचवून आर्थिक विकास अधिक समावेशक करण्यासाठी 1992 पासून नाबार्डच्या पुरस्काराने राबवल्या गेलेल्या 'स्वयंसहायता गट बँक जोडणी' या व्यष्टी वित्त यंत्रणेशी तसेच केन्द्र सरकारने 1999 सालच्या अंदाजपत्रकात घोषित केलेल्या स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेच्या अंमलबजावणीतील स्वयंसहायता गटाच्या सहभागाशी परिचित असणाऱ्या अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना समाजात पूर्वापार अस्तित्त्वात असणाऱ्या स्वयंसहाय्यता गटाचा सद्य:कालीन संदर्भ खुलासेवार स्पष्ट करण्याचे प्रयोजन नाही. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास, नियमित केलेल्या बचतीचे संकलन आणि त्यातून गरजेनुसार सदस्यांमध्ये कर्जवाटप करणे या उद्देशाने एकत्र आलेल्या, समान परिस्थितीतील 10-20 लोकांच्या स्वयंसहायता गटांनी, समाजातील दुर्बलांच्या छोट्या प्रमाणावरील गरजा पूर्वापार कार्यक्षमतेने भागवल्याचे दिसते. अशा दुर्बलांच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारी संवेदनक्षमता आणि लवचिकता असलेल्या, गटातील सदस्यांचा कर्जफेडीबाबत दबाव निर्माण करणाऱ्या स्वयंसहायता गटांची निर्मिती करून त्यांची सार्वजनिक बँकांच्या प्रशासकीय क्षमतेशी व संसाधनांशी सांगड घातल्यास ग्रामीण भागातील लोकांच्या आवश्यकतेनुसार वित्तसेवा पुरवणारी व्यावहारिक वित्तीय यंत्रणा निर्माण होऊ शकेल. या विश्वासाच्या आधारावर नाबार्ड ने 'स्वयंसहायता गट बँक जोडणी' या व्यष्टी वित्त यंत्रणेचा भारतात 1990 च्या

दशकात पुरस्कार केला. या व्यष्टि वित्त यंत्रणेच्या ग्रामीण भागातील लक्ष्य गटांपर्यंत वित्तसेवा पुरविण्याच्या बाबतीतल्या कामगिरीची दखल रिझर्व्ह बँकेच्या एप्रिल 1999 च्या मौद्रिक व कर्जविषयक धोरणात प्रथम घेतली गेली. या व या नंतरच्या धोरणातही 'स्वयंसहायता गट बँक जोडणी' या व्यष्टी वित्तयंत्रणेला बळकटी देणारी विविध धोरणे रिझर्व्ह बँकेने घोषित केली. अशा प्रकारे ही व्यष्टी वित्त यंत्रणा देशातील वित्तयंत्रणेच्या मुख्य प्रवाहात आली. तसेच केन्द्र सरकारच्या स्वयंरोजगारावर आधारित दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम बँकामार्फत राबवितांना स्वयंसहायता गटास कर्जदार केल्यास बँकांसारख्या औपचारिक वित्तिय संस्थांच्या चौकटीत अंतर्निष्ठ असणाऱ्या अनिवार्य समस्यांचे (कर्जदाराची अयोग्य निकड, कर्जफेडीचे अल्प प्रमाण, जास्त व्यवहार खर्च) निराकरण करण्याची शक्यता लक्षात घेऊन 1999 साली घोषित केलेल्या स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेत स्वयंसहायता गटांचा सहभाग केला गेला. या योजनेखाली स्थापन होणाऱ्या स्वयंसहायता गटातील राजकीय सहभाग लक्षात धेता संपर्क माध्यमातून या गटांना प्रसिद्धी मिळाली.

वरील विवेचनावरून स्पष्ट होणारे स्वयंसहायता गट चळवळीचे गरिबांच्या औपचारिक वित्तिय समावेशाच्या दृष्टीने असलेले महत्त्व, या वित्तिय समावेशाची, समावेशक आर्थिक वृद्धीसाठी असणारी आवश्यकता आणि जलद व समावेशक वृद्धिची दिशा दर्शविणाऱ्या अकराव्या योजनेचा आराखडा ही पार्श्वभूमी चर्चासत्राच्या वरील विषयाचे सद्य:कालीन महत्त्व स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. चर्चा सत्रात सादर झालेले निबंध व त्यातून चर्चेसाठी उपस्थित झालेले मुद्दे यांचा गोषवारा देण्याआधी चर्चासत्राच्या समयोचिततेची पार्श्वभूमी थोडी स्पष्ट करणे इष्ट ठरेल.

**चर्चासत्राच्या विषयाची समयोचितता**

अलीकडील काळात, विशेषत: अकराव्या योजनेच्या आराखड्याच्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवरील धोरणांच्या चर्चेचा रोख 'समावेशक वृद्धी आणि वित्तीय समावेशन' या कडे आहे. गेल्या तीन वर्षात भारतीय अर्थव्यवस्था जलद वृद्धीपथावर राहिली आहे. या काळात स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा वृद्धीदर सरासरी 8 टक्क्यांच्या वर आहे. वास्तव क्षेत्राच्या वृद्धीबरोबरच अर्थव्यवस्थेत वित्तीय घनीकरण झाले असून हे घनीकरण वास्तव क्षेत्राच्या वृद्धीस कारणीभूत झाल्याचा अभ्यासकांचा निष्कर्ष आहे. परंतु आर्थिक व वित्तीय विकासाच्या या समग्रपातळीवरील चित्राबरोबरच या विकासाच्या कक्षेबाहेर राहिलेल्या जनतेचे प्रमाणही नगण्य नाही. अलीकडील काळासाठी उपलब्ध असलेली आकडेवारी असे दर्शविते की देशातील 27.8 टक्के जनता 2004-05 या वर्षापर्यंत दारिद्र्यरेषेखाली होती. 1993-94 मध्ये हे प्रमाण 36 टक्के होते. किमान पातळीवर निश्चित केलेली दारिद्र्यरेषा लक्षात घेता दहा वर्षात इतक्या धीम्या गतीने कमी होणारे दारिद्र्याचे प्रमाण मान्य होण्यासारखे नाही असे अकराव्या योजनेच्या आराखड्यात स्पष्ट म्हटले आहे. वित्तीय समावेशाच्या बाबतीतील आकडेवारीही चिंतेची बाब आहे. राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण संघटनेच्या (NSSO) आकडेवारीवरून ग्रामीण भागातील कर्ज घेणारी 38.9 टक्के शेतकरी कुटूंबे सन 2002 मध्ये संस्थात्मक वित्तीय चौकटीच्या बाहेर होती. 1991 साली हीच टक्केवारी 30.6 टक्के होती हे विशेष. म्हणजेच वित्तीय घनीकरणाबरोबर वित्तीय विस्तार न होता उलट संकोचच झाल्याचे चित्र या आकडेवारीच्या आधारे स्पष्ट होते. विशेष म्हणजे हे चित्र औपचारिक वित्तीय सेवांचा विस्तार या क्षेत्रापासून वंचित राहिलेल्या पर्यंत पोचवण्याच्या उद्देशाने अवलंबलेल्या स्वयंसहायता गट बँक जोडणी या व्यष्टीवित्त यंत्रणेच्या झालेल्या संख्यात्मक वाढीच्या पार्श्वभूमीवर आहे हे लक्षात घेणे गरजेचे

आहे. या पार्श्वभूमीवर औपचारिक वित्तीय क्षेत्राच्या विस्ताराचा, किंबहुना समावेशक आर्थिक वृद्धीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या विकासाच्या टप्प्यात वित्तीय क्षेत्राची व्याप्ती वाढविणे हे आर्थिक वृद्धीचा वेग वाढविण्यासाठी आणि या वृद्धीचे समान विभाजन होण्यासाठी आवश्यक आहे. कारण देशातील ग्रामीण निमशहरी व शहरी भागांमधे लहान प्रमाणावरील उद्योगांची जोमाने वाढ झाली आहे. या उद्योगांना वित्तपुरवठा करून त्यांचे संगोपन करणे व त्यांच्या वृद्धीस चालना देणे आर्थिक वृद्धीसाठी आवश्यक आहे. स्वयंसहायता गटांवर आधारित व्यष्टी वित्त यंत्रणा हे आव्हान पेलण्यास समर्थ आहे का ? तसेच स्वयंसहायता गटांमार्फत स्वयंरोजगार निर्मिती साध्य करण्याचे केन्द्र सरकारचे धोरण यशस्वी झाले आहे का ? नसेल तर ते यशस्वी होण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे गरजेचे आहे ? यासाठी व्यष्टी वित्तापासून (Livelihood Finance) उपजीविकेच्या साधनांसाठी वित्त यापर्यंत व्यष्टी वित्त यंत्रणेचे उन्नयन होणे अपेक्षित असेल तर या नवीन प्रतिमानात स्वयंसहायता गटांची, स्वयंसेवी संघटनांची भूमीका कशी असेल ? या प्रश्नांची उत्तरे धोरणकर्त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. स्वयंसहायता गटांची पार्श्वभूमी व वाटचाल या विषयावरील चर्चासत्रात सादर झालेल्या निबंधातून, चर्चेतून या प्रश्नांवर काही प्रकाश टाकला आहे का ?

## चर्चासत्रातील निबंधांचा, चर्चेचा गोषवारा

चर्चासत्रात एकूण 29 निबंध सादर झाले. यांचे दोन भागात वर्गीकरण करणे शक्य आहे. यापैकी पहिल्या गटात स्वयंसहायता गट संकल्पना, स्वयंसहायता गटांच्या व्यष्टी वित्तयंत्रणेतील सहभागाची पार्श्वभूमी, त्यांची संख्यात्मक वाढ, गुणात्मक वाढीसाठीच्या उपाययोजना अशाप्रकारच्या वर्णनात्मक निबंधांचा समावेश करता येईल. या विषयावरील उपलब्ध अहवालातील बाबींचे प्रतिबिंब या निबंधात पडलेले आढळले. या चर्चासत्रात निबंधात नसलेले खालील मुद्दे उपस्थित ज्येष्ठ अर्थतज्ज्ञांनी मांडले.

1) स्वयंसहाय्यता गटांच्या व्यष्टी वित्त यंत्रणेतील सहभागानंतरच्या वाटचालीचा परामर्श घेतांना विविध योजनांखाली स्थापन होणाऱ्या स्वयंसहायता गटांचा वेगळा विचार होणे आवश्यक आहे. कारण रिझर्व्ह बँकेची धोरणे ही व्यष्टी वित्त यंत्रणेतील स्वयंसहायता गटांपुरती मर्यादित आहे.

2) 1993 पासून बँकांना जोडलेल्या स्वयंसहायता गटांची संख्या व त्यांनी केलेले कर्जवाटप यात प्रचंड वृद्धी झालेली दिसत असली तरी स्वयंसहायता गटांना सरासरी उपलब्ध असणाऱ्या कर्जाची रक्कम 2005 मार्च मध्ये रू. 42,659/- एवढी मर्यादित होती. गटातील सभासदात ही रक्कम विभागली गेल्यास ही रक्कम किफायतशीर उद्योग सुरू करून उत्पन्नात वाढ घडवून आणण्यास पुरेशी नाही.

3) स्वयंसहायता गट चळवळीने 'समावेशक वित्ताचे' उद्दिष्ट पूर्ण करणे अपेक्षित असेल तर विभागीय असमतोल दूर होणे आवश्यक आहे. नाबार्ड ची उपलब्ध आकडेवारी असे दर्शविते की, दक्षिणेकडच्या राज्यात या चळवळीने जोर धरला असला तरी उत्तर व उत्तरपूर्व भागातील राज्ये या बाबतीत मागे आहेत. यासाठी या असमतोलामागील कारणांचे विश्लेषण होणे आवश्यक आहे.

4) व्यष्टी वित्ताची नेमकी व्याख्या काय असावी ? ती फक्त कर्जाच्या मर्यादेच्या संदर्भात असावी का ? या धोरणात्मक पातळीवर चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांची आठवण करून दिली गेली. या संदर्भात उत्पन्नात व राहणीमानात वाढ घडवणे शक्य

व्हावे म्हणून गरिबांना त्यांच्या आवश्यकतेनुसार छोट्या प्रमाणात वित्तीय सेवांचा पुरवठा करणे' ही सुरूवातीला नाबार्ड ने केलेली व्याख्या 'वित्तपुरवठ्यापलिकडे जाऊन क्षमतांची निर्मिती प्रशिक्षण, स्वयंसहायता गटांच्या उत्पादित मालाचे विपणन, सूक्ष्म विमा' अशी समजणे आवश्यक आहे. कारण या सर्वांची एकत्रित परिणती गरिबांचा विकास घडवून आणण्यात होईल व्यष्टी वित्त यंत्रणेच्या यशस्वीतेसाठी हे आवश्यक आहे असे मत मांडले गेले.

चर्चासत्रात सादर झालेल्या निबंधांपैकी दुसऱ्या गटात दुय्यम माहितीवर आणि प्राथमिक माहितीवर आधारित व्यष्टी अध्ययनांचा समावेश करता येईल. विविध आर्थिक, सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी असलेल्या ग्रामीण, निमशहरी व शहरी भागात स्वयंसहायता गटांचे मूळ असल्यामुळे व्यष्टी वित्त यंत्रणेचे मूल्यमापन करण्यासाठी तसेच पुढील दिशा दर्शविण्यासाठी असे अभ्यास आवश्यक आहेत. हे अनुभवाधिष्ठित अभ्यास विश्लेषणात्मक असतील तरच धोरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतील .

या गटातील निबंधांपैकी टी.एल्. बारबोल यांचा निबंध व शरवरी कुळकर्णी आणि सुजाता पाटील यांचा निबंध प्रामुख्याने दुय्यम माहितीवर आधारित आहे. बारबोले यांनी उस्मानाबाद जिल्ह्यात महिला आर्थिक विकास महामंडळ या स्वयंसेवी संघटनेच्या पुरस्काराने निर्माण झालेले स्वयंसहायता गट, परंपरागत उद्योगांसाठी दिलेले कर्ज, स्वयंसहायता गटांनी सुरू केलेल्या उद्योगातील उत्पादित मालाचे विपणन इत्यादींचा आढावा त्यांच्या निबंधात घेतला आहे. या योजनेअंतर्गत सुरू झालेले उद्योग उदा. द्रोण तयार करणे, खडू, अगरबत्ती निर्मिती इ. कमी उत्पादकतेचे असल्याचे लक्षात येते.

शरवरी कुळकर्णी व सुजाता पाटील यांच्या निबंधात सांगली जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्राम रोजगार योजनेचा आढावा घेतला आहे. यशस्वी स्वयंसहायता गटांचे व्यवसाय पाहता म्हैस व गाय पालन, दुग्ध व्यवसाय व गांडुळखत निर्मिती व विक्री असे दिसतात. यापैकी गांडुळखत निर्मिती व विक्री हा व्यवसाय शहरी भागातही यशस्वी ठरू शकेल. या व्यवसायांच्या अर्थशास्त्राचा अभ्यास अधिक उद्बोधक ठरेल.

प्राथमिक माहितीवर आधारित निबंध कराड तालुक्यातील तीन गावातील, आंबेगाव तालुक्यातील व सातारा जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या सर्वेक्षणाच्या आधारे सादर केले आहेत. स्वयंसहायता गट निर्मितीची प्रक्रिया, निर्माण झालेले उद्योग, प्रशिक्षण, साक्षरता इ. बाबींची छाननी कराड तालुक्यातील तीन अभ्यासात आढळते. प्रभा कदम यांचा निबंध 660 सदस्यांच्या सर्वेक्षणावर आधारित असून यात 'स्त्री सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान' शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

या निबंधावर झालेल्या चर्चेत खालील मुद्दे मांडले गेले.

1) स्वयंसहायता गट निर्मितीतील राजकीय हस्तक्षेप थांबविणे गरजेचे आहे.

2) स्वयंरोजगार निर्मिती करतांना अधिक वैविध्य असणारे व जास्त उत्पादकतेचे उद्योग सुरू करणे गरजेचे आहे. हे प्रशिक्षणाने साध्य होईल.

3) स्वयंसहायता गट बंद पडण्याची कारणे शोधून काढून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय योजणे गरजेचे आहे.

वरील दोन गटातील निबंधा व्यतिरिक्त उल्लेख करावा असे दोन निबंध शैक्षणिक संस्थेच्या स्वयंसहायता गट निर्मितीच्या, कार्याच्या प्रशिक्षणातील सहभागासंबंधी होते. यापैकी उमेश राजदेरकर यांचा स्वयंसहायता गटांचे नेतृत्व आणि व्यवस्थापन यासंबंधीच्या अभ्यासक्रमाची माहिती देणारा निबंध विद्यापीठ पातळीवरचे कार्यक्रम

राबवणाऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. अर्थातच विद्यापीठाच्या दृष्टीने असणाऱ्या महत्त्वाच्या पलीकडे या अभ्यासक्रमाचे महत्त्व मानवी विकासाचे आश्वासक साधन बनलेल्या व्यष्टी वित्तयंत्रणेच्या यशस्वीतेच्या दृष्टिकोनातून आहे.

संक्षेपाने असे म्हणता येईल की, चर्चासत्रात समष्टि पातळीवरील स्वयंसहायता गट बँक जोडणी या व्यष्टीवित्तयंत्रणेचा आढावा घेणारे निबंध आणि व्यष्टी पातळीवरील या यंत्रणेच्या निर्मितीची प्रक्रिया, संपादन, अडचणी या विषयांना स्पर्श करणारे निबंध सादर झाले. झालेली चर्चा नवीन अभ्यासकांना दिशा दर्शक राहील यात शंका नाही. काटेकोरे संशोधन पद्धतीचा अवलंब करून केलेले अभ्यास अकराव्या योजनेतील वित्तीय समावेशकता आणि ' समावेशक विकास' या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी मार्गदर्शक ठरतील.

✦✦✦

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## अर्थसंवाद चा अंक मिळत नसल्यास

अर्थसंवाद आपणास नियमितपणे प्राप्त होत नसल्यास त्या बाबतची विचारणा प्रमुख संपादकांकडे करावी. आपण परिषदेचे आजीव सदस्य असल्यास किंवा वार्षिक वर्गणीदार असल्यास सदस्य क्रमांक देऊन पत्रव्यवहार प्रमुख संपादकाकडे करावा. आपला पत्ता स्पष्टपणे नमूद करावा. अंक पाठविण्याची व्यवस्था प्रमुख संपादकामार्फत करता येईल. अर्थसंवादसाठी वर्गणी ड्राफ्टने पाठवावी. अंक पाठविणे सोयीचे व्हावे या दृष्टीने सहकार्य करावे.

**कार्यवाह – खजिनदार**

## अंक परत आल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांचा पत्ता बदललेला असेल त्या सदस्यांनी आपला बदललेला पत्ता कार्यवाहांना लेखी कळवावा. म्हणजे कार्यालयातील दप्तरात आवश्यक तो बदल करून घेऊन त्या पत्त्यावर अर्थसंवाद चे अंक पाठविले जातील. पत्ता बदलल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणाने अर्थसंवाद चा अंक परत आल्यास त्यापुढील अंक पाठविण्याचे बंद केले जाते. सर्व आजीव सदस्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

**कार्यवाह – खजिनदार**

चर्चासत्र तिसरे :

# महाराष्ट्राच्या आदिवासी भागातील कुपोषण: समस्या व उपाय

✦ **सर्वोत्तम न. कुलकर्णी, नाशिक.**
*निवृत्त प्राध्यापक (अर्थशास्त्र)*

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या तिसाव्या वार्षिक अधिवेशनाचे तिसरे तांत्रिक सत्र 'आदिवासी भागातील कुपोषण' या विषयावर 27/11/2006 रोजी संपन्न झाले. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या जिल्ह्यातील एकूण 24 तज्ज्ञांचे शोधनिबंध या चर्चासत्रात चर्चिले गेले. एकूण 24 निबंध लेखकांपैकी 18 लेखक चर्चासत्रात उपस्थित होते व त्यांनी प्रत्यक्ष चर्चेत भाग घेतला.

या चर्चासत्रात दोन प्रकारचे शोधनिबंध अपेक्षित होते. पूर्वप्रकाशित साहित्यावर आधारित एकूण महाराष्ट्रातील आदिवासींच्या कुपोषण स्थितीचा मागोवा घेणारे लेख हा त्यातील पहिला प्रकार. या प्रकारात सुनिता सिनगारे, आर.एम. शिरसाठ, जी.डी. खरात, प्र.य. बुरटे, अलका रावणकर, एच. आर. तिवारी, योगेश पवार, श्रीराम कावळे, मृणालिनी तापस, आर. एस. सोळुंके- गावंडे, जयशिंगे, छाया जाधव, सर्वोत्तम कुलकर्णी व राम रसाळ, अनिल वाव्रे आणि रा. ना. भालेराव व रा. का. शिंदे यांच्या शोधनिबंधांचा समावेश होतो. ह्या सर्व लेखकांनी महाराष्ट्रातील एकुणच आदिवासींच्या कुपोषणाची स्थिती विस्ताराने मांडली. श्रीमती सिनगारे यांनी कुपोषणाची लक्षणे, निरनिराळ्या आदिवासी भागांतील कुपोषणाचे प्रमाण, पोषण व आरोग्य यांच्यातील सहसंबंध आणि बालमृत्यु दर यांच्या संदर्भात आदिवासी कुपोषणाच्या कारणांची चिकित्सा केली. चर्चेच्या अनुषंगाने भारतात सत्तर टक्के बालमृत्यु नोंदविलेच जात नाहीत याचा त्यांनी उल्लेख केला. एवढेच नव्हे तर या कुपोषितांच्या संख्येमुळे आणि आदिवासींमधील बालमृत्युच्या उच्चदरामुळे महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक प्रभावित झाल्याचे स्पष्ट मत नोंदवले . एच.आर. तिवारी यांनी मेळघाटामधील कुपोषणाचे वास्तव, कारणे आणि उपाय यांची सविस्तर चिकित्सा केली आहे. शासकीय आणि निमशासकीय संस्थांखेरीज स्वयंसेवी संस्था कुपोषण निवारण कार्यात मोलाची मदत करू शकतात असे तिवारी यांचे प्रतिपादन आहे. मृणालिनी तापस यांनी कुपोषणांची सविस्तर चिकित्सा करून आदिवासींचे

अल्प उत्पन्नच न्युनपोषण आणि कुपोषणाचे प्रमुख कारण असल्याचा मुद्दा मांडला. आदिवासी भागासाठी पोषण विषयक वेगळ्या धोरणाची गरज त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केली आहे. आर. एस. सोळुंके आणि जी.बी. गावडे यांनी अतिदुर्गम आदिवासी क्षेत्र असलेल्या बारा जिल्ह्यांतील कुपोषणाच्या कारणांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. एकात्मिक बालविकास कार्यक्रमांतर्गत बारा आदिवासी सघन जिल्ह्यात पूरक आहार कार्यक्रम राबविणे गरजेचे असल्याचे मतही लेखकद्वयांनी नोंदविले. श्रीरंग मंडाले यांनी महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषण : समस्या व उपाय हा संपूर्णपणे द्वितीय स्रोतावर आधारित विश्लेषणात्मक लेख लिहिला आहे. रा.ना. भालेराव यांचा शोधनिबंध अंशतः राज्याच्या समग्रलक्षी आर्थिक विश्लेषणावर आणि अंशतः नंदुरबार जिल्ह्यांतील आदिवासी पोषणाच्या स्थितिचे वर्णन 1995-96 ते 2004-05 या दहा वर्षातील माहितीच्या सूक्ष्म अध्ययनावर आधारलेले आहे. त्यांनी कुपोषणाची संकल्पना व स्वरूप आणि कुपोषणाचे दुष्टचक्र यांची चर्चा तर केलीच परंतु याखेरीज नंदुरबार जिल्ह्यातील कुपोषण विषयक साहित्याच्या सहायाने विवेचन केले आहे. या प्रकारातील अन्य लेख सर्वसामान्यपणे दुय्यम स्रोतावर आधारित माहितीवजा लेख आहेत.

शोधनिबंधांचा दुसरा प्रकार प्रामुख्याने विशिष्ट तालुका, जिल्हा किंवा विशिष्ट परिसराच्या सर्वेक्षणावर आधारित आहे. ते प्रामुख्याने प्राथमिक तथ्यसंकलनातून लिहिले गेले आहेत. वास्तविक राज्यभरातून जेव्हा शोधनिबंध सादरकर्ते येतात, तेव्हा त्यांनी आपआपल्या परिसराचे विशिष्ट विषयाच्या संदर्भात सुक्ष्म अध्ययन करणे अधिक आवश्यक असते. या प्रकारात मु.रा. इंगळे यांचा पातुर तालुक्यांतील आदिवासींचे दारिद्र्य व कुपोषणाची समस्या'', अश्विनी पेंडसे यांचा शहापूर, मुरबाड व मोखाडा तालुक्यांच्या आदिवासी कुपोषणाचा अभ्यास, एस. एस. नाईक आणि ए. के. वितोंडे यांचा अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट भागातील आदिवासी बालकांच्या कुपोषणाची समस्या, अनिल कृष्णराव वावरे आणि लालासाहेब नारायणराव घाटगे यांनी सातारा जिल्ह्यांतील बालकांच्या कुपोषणाचे चिकित्सक विश्लेषण केले आहे. नलिनी भोगावडे यांनी श्रीरामपुर तालुका ग्रामीण कुपोषण आणि उपाय यावर लेख लिहिला आहे. निता राजेंद्रकुमार चोरडिया यांनी महाराष्ट्रातील भिल्ल समाजाच्या कुपोषणाच्या समस्या यावर शोधनिबंध सादर केला. मात्र त्यांच्या लेखांतील आकडेवारी 1976 ते 85 या जुन्या कालखंडाची आहे. 1991 ते 2005 या कालखंडात ग्रामीण भागाची परिस्थिती आणखी शोचनीय झालेली आहे. याखेरीज स्वाती गंगाधर आदक यांनी नंदुरबार जिल्ह्यांतील कुपोषणाचा आढावा घेतला आहे. के.व्ही.भागवत यांनी धुळे जिल्ह्यांतील कुपोषण, समस्या व उपाय एक अभ्यास सादर केला आहे. या प्रकारातील शेवटच्या लेखात तानाजी गीते यांनी पुणे जिल्ह्याच्या आदिवासी क्षेत्रातील बाल कुपोषणाची कारणे व उपाय हे सूक्ष्म अध्ययन सादर केले. वास्तविक पुणे जिल्ह्यांत आदिवासी लोकसंख्या अत्यल्प आहे म्हणून आदिवासी कुपोषणाची समस्या सौम्य होत नाही हा त्यांच्या शोधनिबंधाचा मुख्य आशय आहे. बहुतांश चर्चा आदिवासी सघन जिल्ह्यांतील कुपोषणाविषयी होत असली तरी 'आदिवासी विरळ' जिल्ह्यात देखील आदिवासी कुपोषण तितकेच गंभीर असल्याचे त्यांनी आकडेवारीच्या सहायाने सिद्ध केले.

या चर्चेचा अहवाल महाराष्ट्र शासना कडे गेल्यास आणि त्यातील व्यवहार्य मुद्यांचे अंमलबजावणीत रूपांतर झाल्यास तर ही चर्चा फलदायी ठरेल असे अध्यक्षीय समारोपात सर्वोत्तम कुलकर्णी यांनी सांगितले. वेळे अभावी शोधनिबंधांवर चर्चा होऊ शकली नाही.

✦✦✦

# 'अर्थसंवाद' वार्षिक अहवाल : 2005-06

(खंड 29, अंक 1 ते 4)

✦ विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर.

*प्रमुख संपादक 'अर्थसंवाद', आणि प्रपाठक पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर.*

'अर्थसंवाद' चा 2005-06 या वर्षाचा अहवाल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांसमोर सादर करण्यात मला आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतील हा चौथा अहवाल आहे. या वार्षिक अहवालाच्या माध्यमाने आपण आपले हे विद्यानिष्ठ नियतकालिक कशा पद्धतीने प्रकाशित करीत आहोत याची जाणीव सर्व सदस्यांना करून देण्याची संधी मला लाभते.

सन 2005-06 हे 'अर्थसंवाद' चे एकोणतिसावे वर्ष आहे. या वर्षात आपण कायकाय साध्य करू शकलो या बाबतची माहिती आता पाहू या. प्रथमत: प्रकाशित साहित्य. एकंदर 17 स्वतंत्र लेख, 3 ग्रंथ परीक्षणे, 2 अर्थ शब्दांची वाट पाहे, 2 भाषणे, 1 पारितोषिक प्राप्त लेख, 5 अधिवेशन वृत्तांत, 3 विषयांची रूपरेषा, 3 संकीर्ण आणि 3 संपादकीय एवढे साहित्य आपण प्रकाशित केले. त्यासाठी एकंदर 33 लेखकांचा सहभाग लाभला. नेहमीच्या लेखकांबरोबरच काही नवीन लेखक यावेळी पुढे आले आहेत. त्यांना ही बाब उत्साहवर्धक वाटून भविष्यकाळात अधिक लिखाण करण्यास ते प्रोत्साहीत होतील. संभाव्य लेखकांनी सैद्धांतिक विषयावरील लिखाण अधिकाधिक करण्याचा प्रयत्न करावा. अर्थमिती, पर्यावरणाचे अर्थशास्त्र कल्याणाचे अर्थशास्त्र, पैसा, भांडवल बाजार या संबंधिच्या विषयांना हवा तेवढा न्याय अर्थसंवादमधील लिखानाच्या माध्यमाने प्राप्त झाला नाही. या विषयांवरील साहित्य प्राप्त झाल्यास अर्थसंवाद मधील लेखन अधिक समावेशक होऊन नियतकालिकाची उपयुक्तता वाढेल.

या वर्षातील अर्थसंवादचे वैशिष्ट्य म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत या विषयावरील प्रकाशित करण्यात आलेले चार लेख. अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना आपल्या या नियतकालिकाच्या माध्यमाने या एकाच विषयावर मोठ्या प्रमाणात

लेखन सामग्री प्राप्त होऊ शकली. या व्यतिरिक्त व्यवसाय प्रक्रिया बाह्यस्रोतासारख्या नवीन विषयावर देखील पुरेशी माहिती अर्थसंवाद मधुन प्राप्त होऊ शकली. या वर्षीच्या चार अंकात आंतरराष्ट्रीय व्यापार, जागतिकीकरण, अर्थसंकल्प, दारिद्र्य निर्मूलन, ग्रामीण विकास, प्रादेशिक आर्थिक प्रश्न , पाणी व्यवस्थापन, मूल्यवर्धित कर हे विषय प्रामुख्याने समाविष्ट करण्यात आले. स्त्री केंद्री दृष्टिकोनातून केंद्रीय अर्थसंकल्पाचे विश्लेषण (Gender Budgeting) अशा विषयाचा देखील अंतर्भाव यंदाच्या अंकात करण्यात आला. वर्षभरात विविधांगी प्रकाशित झालेल्या लेखांचे, अर्थसंवादच्या वाचकांनी उस्फुर्तपणे स्वागत केले. छापलेल्या मजकुरात बरीच विविधता राखण्याचे श्रेय अर्थसंवादच्या लेखकांना जाते.

वाचकांना अर्थसंवादचा अंक दीर्घकाल प्रतिक्षे नंतर प्राप्त होतो याची मला खंत वाटते. वितरणात येणाऱ्या अडचणी, खंडीत विद्युत प्रवाह, कागदाच्या उपलब्धतेतील अडचणी, छापखान्यांचे वेळापत्रक, जाहिरातींसाठी करावी लागणारी प्रतिक्षा या व्यतिरिक्त अपेक्षित लेख ठरल्या वेळी हाती न येणे हा देखील एक महत्त्वपूर्ण घटक दिरंगाई होण्यास कारणीभूत आहे. दर्जेदार लेख हाती आल्यानंतरच छपाईचे काम गोगलगाईच्या गतीने पुढे सरकत राहते. संभाव्य लेखकांनी आपल्या लेखनासाठी विशिष्ट क्षेत्र निवडून लेख वेळेवर पाठविल्यास अंकाचे वेळापत्रक पाळणे शक्य होईल. अर्थात काही लेखक याला अपवाद आहेत आणि त्यांचे लेख वेळेच्या आत प्राप्त होतात हे देखील नमूद करणे आवश्यक आहे.

वार्षिक वर्गणी बरेचदा मनीआर्डरने पाठविण्यात येते. विशेषत: शैक्षणिक संस्थांची वर्गणी मनीऑर्डने प्राप्त झाल्यास नेमकी कोणत्या संस्थेने वर्गणी पाठविली याचा अंदाज येत नाही. पाठविणाऱ्याचे नाव व पत्ता नमूद न केल्याने अंक संबंधित संस्थांना पाठविता येणे शक्य होत नाही त्यामुळे वर्गणी फक्त डिमांड ड्राफ्टनेच पाठवावी असे सुचवावेसे वाटते. वार्षिक वर्गणीचा ड्राफ्ट 'मराठी अर्थशास्त्र परिषद' याच नावाने पाठवावा. ड्राफ्टने आता वार्षिक वर्गणी प्राप्त व्हावयास लागली आहे ही समाधानकारक बाब आहे. परंतु संपादक अर्थसंवाद मॅनेजर अर्थसंवाद या नावाने देखील वर्गणीदारांनी ड्राफ्ट पाठविले. बँकेत ते जमा होऊ न शकल्याने ड्राफ्ट परत पाठवावे लागले. त्याकरिता लागणाऱ्या टपाल खर्चात अनावश्यक वाढ झाली. हा खर्च टाळता येऊ शकतो. वर्गणीदारांनी ड्राफ्ट पाठवितांना काळजीपूर्वक मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच पाठवावा.

अर्थसंवादचे वार्षिक वर्गणीदार वर्गणीचे नूतनीकरण वेळेवर करत नाहीत. बरेचदा कोणाला कोणते अंक पाठवावे यांच्या नोंदी करणे देखील जिकरीचे काम होते. अंकांच्या नेमक्या किती प्रती छापाव्या याचा अंदाज बांधणे यामुळे शक्य होत नाही. वार्षिक वर्गणीचे नुतनीकरण दरवर्षी मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत झाल्यास अंकाच्या वितरणाबाबतचे नियोजन करणे सोयीचे होईल.

आता 'अर्थसंवाद' संबंधीचा काही महत्त्वाचा तपशील आपणापुढे ठेवतो. ह्या आधारे अर्थसंवादच्या वाटचाली बाबत एका दृष्टिक्षेपात कल्पना येऊ शकेल.

**अर्थसंवाद - सर्वसाधारण तपशील**

तक्त्याच्या आधारे खालील प्रमुख निष्कर्ष प्राप्त होऊ शकतील.

1. अंकांच्या एकूण खर्चात लक्षणीय वाढ झाल्याचे सत्कृतदर्शनी आढळून येते. हा खर्च गत वर्षाच्या तुलनेत रू.11,884 ने वाढला. अंकांच्या एकूण प्रतींची संख्या देखील जवळपास 422 ने वाढली. नव्याने सदस्य संख्येतील वाढ ही एक स्वागतार्ह बाब आहे. असे असले तरी ही बाब आत्मसंतुष्टपणाची मानून चालणार नाही. अनेक नव्या आणि जुन्या महाविद्यालयांच्या आणि काही

तक्ता

**अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती**

| तपशील | 2003-04 | 2004-05 | 2005-06 |
|---|---|---|---|
| 1. चारही अंकांच्या एकूण प्रती | 5,380, | 5,843 | 6,265 |
| 2. चारही अंकांची एकूण पृष्ठ | 418 | 412 | 413 |
| 3. चारही अंकांचा एकूण खर्च (रु.) | 1,56,699 | 1,58,142 | 1,70,026 |
| 4. दर नगाचा सरासरी खर्च (रु.) | 29.13 | 27.06 | 27.14 |
| 5. दर पृष्ठाचा सरासरी खर्च (रु.) | 0.28 | 0.26 | 0.26 |
| 6. जाहिराती पासून उत्पन्न (रु.) | 27,000 | 30,000 | 46,200 |

विद्यापीठाच्या ग्रंथालयापर्यंत अर्थसंवाद अजून पोचू शकलेला नाही, ही गोष्ट चिंतनीय मानावी लागेल. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे व कृषी महाविद्यालये आपल्यापासून दूर आहेत. राज्यातील कला, वाणिज्य शाखांच्या सर्व महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अर्थसंवाद घेतला जाईल यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता वाटते. अर्थशास्त्रावरील आवश्यक नियतकालिकांच्या यादीत 'अर्थसंवाद' चा समावेश बहुसंख्य महाविद्यालयांमध्ये व्हावा.

2. चारही अंकांच्या एकूण खर्चात छपाईच्या खर्चाचे प्रमाण 81 टक्क्यांपर्यंत झाले आहे. छपाईच्या खर्चाखालोखाल 15 टक्के खर्च टपालावर येतो. इतर बाबींवर होणारा खर्च 4 टक्क्याच्या आसपास आहे.

3. अहवाल वर्षातील चार अंक मागील वर्षाप्रमाणेच वेगवेगळ्या आकर्षक रंगसंगतीत छापण्याचा प्रयत्न केला. अर्थसंवादच्या अंतर्बाह्य स्वरूपाची गुणवत्ता कायम राखुन देखील प्रती अंक सरासरी खर्च तसेच प्रती पानाचा सरासरी खर्च पूर्वी प्रमाणेच कायम ठेवण्यात यश मिळाले आहे (0.26 अंक प्रती पान). अंकांच्या प्रति वाढल्यामुळे मिळणाऱ्या वाढत्या अनुमाप प्रत्ययाने इतर कारणानी होणाऱ्या परिव्यय वाढीला इथे प्रभावशुन्य बनविले आहे असे म्हणता येईल. म्हणजे सदस्य नोंदणी वाढवून प्रतींची संख्या वाढविली तर आपण इतर भाववाढीला समर्थपणे तोंड देऊ शकतो असे वाटते.

4. आपल्याला येणाऱ्या खर्चाची भरपाई करण्यासाठी आपण मर्यादित प्रमाणावर जाहिराती छापतो. अहवाल वर्षात जाहिरातीपासूनचे उत्पन्न रू. 46,200 प्राप्त झाले. गत अनेक वर्षांच्या तुलनेने ते वाढले असून अपेक्षेएवढे आहे. एकूण 12 पानांपैकी 10 पानांवर आपण जाहिराती छापू शकलो. परिषदेचे कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले यांनी अत्यंत महत्वपूर्ण भूमिका या बाबतीत वठवली. जाहिराती मिळविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करीत असतात. त्यांचा विशेष उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो. प्रा. गोखलें व्यतिरिक्त परिषदेचे माजी अध्यक्ष व्यं.सु. पाटणकर, कार्याध्यक्ष ज.फा. पाटील तसेच अर्थसंवाद सल्लागार मंडळ सदस्य रामकृष्ण सोळुंके यांचे देखील योगदान जाहिराती मिळविण्याच्या बाबतीत महत्त्वपूर्ण ठरले. प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. व्यं. सु. पाटणकर,

डॉ. ज. फा. पाटील आणि डॉ. रामकृष्ण सोळुंके यांचे मन:पूर्वक आभार. ज्या जाहिरातदारांनी आमच्या आवाहनाला सक्रिय प्रतिसाद दिला त्यांचे आम्ही ऋणी आहोत. अहवाल वर्षात अर्थसंवादची दोन पाने जाहिरातीविना कोरी राहीलीत यामुळे आपण सात ते आठ हजाराच्या उत्पन्नाला मुकलो ही बाब देखील वाढलेल्या जाहिराती पासूनच्या उत्पन्नासोबतच ध्यानात घेणे आवश्यक वाटते.

अंकाच्या आर्थिक जबाबदारीचे ओझे हलके करण्यात पूर्वीप्रमाणेच यावर्षीही 'भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली' तसेच 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई' यांच्याकडून वार्षिक अनुदान रूपाने मदत मिळाली. या दोन्ही संस्थांनी अर्थसंवाद बद्दल नेहमीच उदार दृष्टिकोन ठेवला आहे. परिषदेच्या वतीने या दोन्हीही संस्थाचे मी आभार मानतो.

'अर्थसंवाद' ची वर्षभरातील जबाबदारी सांभाळण्यात मला मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव ठोंबरे, कार्याध्यक्ष डॉ. ज.फा. पाटील, कार्यवाह प्रा. चारूदत्त गोखले, सहायक संपादक प्रा. रवींद्र जोशी , 'अर्थसंवाद' च्या सल्लागार मंडळाचे सदस्य आणि परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य यांचे सहकार्य लाभले. मुद्रणशोधन च्या कार्यात मला माझे स्नेही डॉ. किशोर महाबळ,आणि डॉ. मोहन काशीकर (प्रपाठक राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ) यांची साथ लाभली. या सर्वांचा मी ऋणी आहे.

अंकाची छपाई सुबक आणि काळजीपूर्वक करून देण्यात टेक्नो एंटरप्रायझेसचे मनिषा आणि मदन पालोरकर, स्पार्क असोसिएट्सचे शैलेष देशपांडे यांनी विशेष परिश्रम घेतले. अंक वितरणाच्या कामात निलेश धोटे यांनी मोलाची मदत केली. अर्थसंवादच्या अनेक सदस्यांनी, वाचकांनी, लेखकांनी समक्ष भेटीत आणि पत्राने अर्थसंवाद दर्जेदार होण्याच्या दृष्टीने अनेक मौलिक सूचना केल्या. अर्थसंवादचा दर्जा वाढविण्याचे दृष्टीने या सूचनांचा नक्कीच उपयोग होतो. अर्थसंवादचे वाचक जागरूक आहेत हे याचे द्योतक मानले पाहिले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

✦✦✦

## एकतिसाव्या अधिवेशनाचे स्थानिक कार्यवाह

ऑक्टोबर /नोव्हेंबर 2007 मध्ये श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी जिल्हा सोलापूर येथे होणाऱ्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 31 व्या अधिवेशनाचे स्थानिक कार्यवाह म्हणून प्रा.लक्ष्मीकांत तायडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याची कृपया परिषदेच्या सदस्यांनी नोंद घ्यावी. त्यांचा पत्ता पुढील प्रमाणे -

**डॉ. लक्ष्मीकांत तायडे**
प्रपाठक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी - 413411 जिल्हा सोलापूर
दूरध्वनी - 95/02184 224013, भ्रमणध्वनी - 94225 32657

कार्यवाह -खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

# तिसावे वार्षिक अधिवेशन : कार्यवाहांचा अहवाल

✦ चारूदत्त गोखले, जळगाव
*कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद.*

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे राष्ट्रीय स्तरावरील तिसावे वार्षिक अधिवेशन 26, ते 29 नोव्हेंबर 2006 या कालावधीत रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर येथे आयोजित करण्यात आले होते. अधिवेशनाच्या अध्यक्षपदी अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर पुणे येथील दिलीप सयाजीराव कदम होते.

अधिवेशनाचे उद्‌घाटन मा.ना. बाळासाहेब थोरात, कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते व रयत शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे, मा. आमदार जयंतरावजी ससाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. व्यासपीठावर मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष दिलीप कदम, कार्याध्यक्ष ज.फा. पाटील, कार्यवाह खजिनदार चारूदत्त गोखले, कुंडलिक शिंदे, प्राचार्य ज्ञानदेव म्हस्के, प्राचार्य सर्जेराव ठोंबरे, स्थानिक कार्यवाह प्रा. अशोक गाढवे आदी उपस्थित होते.

''मुक्त अर्थव्यवस्थेत एका बाजूला देश महासत्ता बनण्याच्या वाटेवर आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्याला संपन्नता कशी निर्माण करून देणार ? यासह दारिद्र्य रेषेखालील माणसाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठीचा गंभीर प्रश्न उभा आहे. याबाबत मराठी अर्थशास्त्र परिषदेने शासनाला मार्गदर्शन करावे, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या हे सध्या सर्वात मोठे आव्हान आहे. यातून मार्ग काढण्यासाठी काय करता येईल ? हे अर्थतज्ज्ञांनी सांगितले तर शासन त्याचे स्वागत करेल'' असे आवाहन आपल्या उद्‌घाटनपर भाषणात कृषिमंत्री ना. बाळासाहेब थोरात यांनी केले.

अध्यक्षीय भाषण ॲड. रावसाहेब शिंदे यांनी ''अर्थतज्ज्ञ व सरकार हे दोन्ही घटक जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या समस्या सोडविण्यास असमर्थ ठरल्याचे

सांगून यावर जनताच तोडगा शोधुन काढू शकेल'' असे मत व्यक्त केले.

अधिवेशनाचे अध्यक्ष दिलीप कदम यांनी बदलत्या अर्थव्यवस्थेचा आढावा घेत सामाजिक उन्नतीसाठी तसेच देशाच्या आर्थिक विकासासाठी शिक्षण हे सर्वव्यापी व्हावे. शिक्षण हा अर्थव्यवस्थेचा मुख्य घटक असून समाजातील शेवटच्या थरापर्यंत ते पोहोचल्यास आपल्या देशाचा आर्थिक विकास दर उच्च राहील असा विश्वास व्यक्त केला.

शिर्डी संस्थानचे अध्यक्ष आ. जयंत ससाणे यांनी आपल्या भाषणात कामगार व शेतीच्या प्रश्नांवर या अधिवेशनात साधक-बाधक चर्चा व्हावी असे मत व्यक्त करून अधिवेशनास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कार्याध्यक्ष ज.फा पाटील, कार्यवाह-खजिनदार चारूदत्त गोखले यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

प्रारंभी दीपप्रज्वलनाने अधिवेशनाचे उद्घाटन झाले. स्वागत व प्रास्ताविक अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव म्हस्के यांनी केले. यावेळी अर्थवेध स्मरणिकेचे व विविध क्रमिक पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्थानिक कार्यवाह अशोग गाढवे यांच्या आभारप्रदर्शनानंतर उद्घाटन समारोहाची सांगता झाली.

26 नोव्हेंबर 2006 रोजी सायंकाळी 6.30 वा रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष रावसाहेब शिंदे यांचे महात्मा गांधीचे विचार व जीवनकार्य या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण व प्रभावी भाषण झाले. त्यानंतर आलेल्या सर्व प्रतिनिधींनी शिर्डी संस्थानाला भेट दिली.

27 नोव्हेंबर 2006 रोजी संध्याकाळी सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, भारतीय रिझर्व्ह बँकेचे प्रमुख आर्थिक सल्लागार व पुणे विद्यापीठाचे कुलगुरू नरेन्द्र जाधव यांचे व्याख्यान झाले. ''एकीकृत विकासदर वाढत असतांना रोजगार निर्मितीचा वेग मंदावत आहे. गरीब व श्रीमंतात निर्माण झालेली दरी भरून काढली नाही तर देशाच्या सामाजिक स्थैर्याला सुरंग लागणार'' असे विचार नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

अधिवेशनाच्या तीन दिवसांच्या कालावधीत एकूण चार चर्चासत्रे पार पडली. दि. 26 नोव्हेंबर 2006 रोजी झालेल्या दुपारच्या सत्रात भारतातील आर्थिक विचारांचा विकास या विषयावर चर्चासत्र झाले. या चर्चासत्राचे सूत्र संचालन जे. एस. पाटील, सातारा यांनी केले. दि. 27 नोव्हेंबर 2006 रोजी सकाळी भारतातील स्वयंसहायता गट-पार्श्वभूमी व वाटचाल या विषयावर दुसरे चर्चासत्र झाले. त्याचे सूत्रसंचालन मेधा देशपांडे, पुणे यांनी केले. याच दिवशी दुपारी महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषण-समस्या व उपाय या विषयावर झालेल्या चर्चासत्राचे सूत्र संचालन सर्वोत्तम कुळकर्णी, नाशिक यांनी केले.

28 नोव्हेंबर 2006 रोजी सकाळी लोकोपयोगीतांचे खाजगीकरण -प्रश्न व पर्याय या आयत्या वेळच्या विषयावर झालेल्या चर्चासत्राचे सूत्रसंचालन सुहास सहस्रबुद्धे, सांगली यांनी केले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून अर्थतज्ज्ञ अनिल बोकील, औरंगाबाद व निर्लेप उद्योगसमूहाचे अध्यक्ष, उद्योजक राम भोगले उपस्थित होते.

27 नाव्हेंबर 2006 रोजी संध्याकाळी प्रा. दिलीप कदम यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेला 197 सभासद उपस्थित होते. सभेच्या सुरूवातीला अर्थसंवादचे भूतपूर्व संपादक रवींद्र दोशी, तसेच विद्या पित्रे व मो.वि. भाटवडेकर या दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली व त्यानंतर सभेच्या रितसर कामकाजाला सुरूवात झाली. सभेत घेण्यात आलेले काही महत्वपूर्ण निर्णय पुढील प्रमाणे -

1) ऑक्टोबर/नोव्हेंबर 2007 मध्ये होणाऱ्या एकतिसाव्या अधिवेशनासाठी श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर यांचे निमंत्रण एकमताने स्वीकारण्यात आले.

2) एकतिसाव्या अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले (अ) कायदा आणि अर्थशास्त्र (ब) भारताच्या कृषी क्षेत्रावरील अरिष्ट (क) महाराष्ट्रातील नागरीकरण : कारणे, स्वरूप आणि परिणाम.

3) बार्शी, जि. सोलापूर येथे होणाऱ्या एकतिसाव्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी. पी.बी. कुलकर्णी प्राचार्य बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी ता. पलूस जि. सांगली यांची बहुमताने निवड झाली.

4) 2007 ते 2010 या कालावधीसाठी संतोष दास्ताने, पुणे यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली.

5) 2007 ते 2010 या कालावधीसाठी कार्यकारी मंडळावर (1) बबनराव खामकर, मुंबई विद्यापीठ (2) बा. पा. पाटील, शिवाजी विद्यापीठ (3) तानाजी गिते, पुणे विद्यापीठ या तिघांची निवड झाली.

6) घटना दुरूस्तीचा प्रस्ताव प्रदिर्घ चर्चेनंतर मंजूर करण्यात आला तो पुढील प्रमाणे - निवडणुकीस उभी राहणारी व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान दोन वर्षे आधी परिषदेची आजीव सभासद असावी. निवडणूकीसाठी मतदान करणारी व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान दोन वर्षे आधी परिषदेची आजीव सभासद असावी.

**पारितोषिके**

1) अधिवेशनात सादर झालेल्या उत्कृष्ट शोधनिबंधासाठी देण्यात येणारे ग.प्र. पिंपरकर पारितोषिक व के.एच. ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे अमर्त्य सेन पारितोषिक सुनीता सिनगारे, औरंगाबाद यांच्या कुपोषण-एक दृष्टिकोन या निबंधाला देण्यात आले.

2) अर्थसंवाद मधील 2005-06 या वर्षातील सर्वोत्कृष्ट लेखास दिले जाणारे मो.स. भावे पारितोषिक वसंत पेठे यांच्या 'गरिबी निर्मूलन आणि आर्थिक विकास, 21व्या शतकासाठी नवीन प्रतिमान' (खंड 29, अंक 3 पान 245) या लेखास देण्यात आले आहे.

3) वर्षभरात प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट ग्रंथास दिले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक अरूणा सोनेगावकर, नागपूर यांच्या आनंदवन प्रकल्पाची यशोगाथा- सामाजिक व आर्थिक विकासाची या ग्रंथाला देण्यात आले.

4) पुणे विद्यापीठात एम.ए. अर्थशास्त्रात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास स्व. भाऊसाहेब गेणूजी दरेकर पाटील स्मृती पारितोषिक यंदापासनू सुरू करण्यात आले. यंदाचे पारितोषिक प्रविण रमेश पोतदार या विद्यार्थ्यास देण्यात आल.

5) वार्षिक अधिवेशनात महिला प्रतिनिधीने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट निबंधास यंदापासून पद्मजा गंधे पारितोषिक सुरू करण्यात आले. पुनम जाधव व विद्या सुतार कराड यांनी सादर केलेल्या खराडी गावातील स्वयंसहायता गट- एक व्यष्टी अभ्यास या निबंधाला सदर पारितोषिक प्रदान करण्यात आले.

6) वार्षिक अधिवेशनात विद्यार्थी प्रतिनिधीने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोध निबंधास यंदापासून ज. फा. पाटील पारितोषिक सुरू करण्यात आले. यंदा हे पारितोषिक धनाजी मोहनराव पवार, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या डॉ धनंजयराव गाडगीळ यांचे आर्थिक विचार या शोधनिबंधास देण्यात आले.

दि. 25 नोव्हेंबर 2007 रोजी दु. 1.30 वा अधिवेशनाचा समारोप झाला. समारोप समारंभासाठी पाथर्डीचे तरूण व तडफदार आमदार राजीव राजळे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून औरंगाबादच्या निर्लेप उद्योग समूहाचे अध्यक्ष उद्योगपती राम भोगले व औरंगाबादच्या अर्थक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्थतज्ञ अनिल बोकील उपस्थित होते. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून उद्योजकता वाढवली पाहिजे, त्यासाठी येणारी आव्हाने अर्थतज्ज्ञांनी स्वीकारून देशाला नवी दिशा देण्याचे कार्य करणे गरजेचे आहे. जगाच्या बाजारपेठेत भारताचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत.' असे प्रतिपादन आमदार राजळे यांनी केले. आमदार राजळे यांनी अत्यंत नर्मविनोदी शैलीत जागतिक अर्थव्यवस्थेचे अनेक पदर उलगडून दाखविले. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी रावसाहेब शिंदे होते. 'तत्वज्ञानापेक्षा प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. अर्थतज्ज्ञांनी झोपडपट्टीतल्या गोरगरिबापर्यंतचे प्रश्न सुटतील अशा प्रकारचे आर्थिक धोरण तयार करून सरकारला तशा शिफारशी कराव्यात' असे प्रतिपादन शिंदे यांनी केले. याप्रसंगी परिषदेचे अध्यक्ष दिलीप कदम व कार्याध्यक्ष ज.फा. पाटील यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. स्थूल अर्थशास्त्राची मूलतत्त्वे या प्रथम वर्ष बी.ए. साठी परिषदेच्या सभासदांनी मानधन न घेता लिहीलेल्या पुस्तक लेखकांचा यथोचित सत्कार याप्रसंगी करण्यात आला.

प्रतिनिधींच्या वतीने महेश बडवे, जळगाव व राहूल म्होपरे कोल्हापूर यांनी आपली मनोगते व्यक्त केली. महाविद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव म्हस्के यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य व स्थानिक कार्यवाह अशोक गाढवे यांच्या आभार प्रदर्शनानंतर व उपस्थिती प्रमाणपत्र वाटपानंतर तीन दिवस चाललेल्या अधिवेशनाची यशस्वी सांगता झाली.

✦✦✦

## प्रा. ज.फा. पाटील पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेत विद्यार्थी वर्गाचा शोधनिबंध लेखनाद्वारे सहभाग वाढवून त्यांची संशोधनवृत्ती जागृत करण्याच्या उद्देशाने गुरूवर्य प्रा. डॉ. ज.फा. पाटील यांच्या नावाने त्यांनी वयाची 65 वर्षे पूर्ण केलीत, या निमित्ताने काही विद्यार्थी व स्नेह्यांनी मिळून परिषदेला रू. 25,000/- ची देणगी दिली आहे. निधीच्या व्याजातून दरवर्षी परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात विद्यार्थी सभासदाने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास प्रा. डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक दिले जाईल. विद्यार्थी सभासदांकडून कमीत कमी पाच शोधनिबंध सादर झाल्यासच पारितोषिक दिले जाईल. शोधनिबंध वैयक्तिक किंवा संयुक्त रितीने विद्यार्थी सभासदानेच लिहीलेला असावा.

कार्यवाह – खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद
## एकतिसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एकतिसावे वार्षिक अधिवेशन श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर येथे ऑक्टोबर/नोव्हेंबर 2007 मध्ये आयोजित होणार आहे. प्राचार्य पी.बी. कुलकर्णी, सांगली हे अध्यक्षस्थान भूषवितील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित कण्यात आले आहेत.

1) कायदा आणि अर्थशास्त्र
2) भारताच्या कृषी क्षेत्रावरील अरिष्ट
3) महाराष्ट्रातील नागरीकरण : कारणे, स्वरूप आणि परिणाम

या विषयांची रूपरेषा 'अर्थसंवाद' च्या याच अंकात देण्यात आली आहे. चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील. त्या विषयावर निबंध मागविले जात नाही.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2,000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 300 शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा पाठविल्याखेरीज त्याविषयाचा निर्णय अध्यक्षांकडून पाठविला जाणार नाही. निबंध लेखक हा मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असलाच पाहिजे.

निबंध मराठीत असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे /विद्यापीठाचे/शैक्षणिक व अन्य संस्थांचे नाव, व आपला सभासद क्रमांक हा सर्व तपशील मराठीतच देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहिलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

31 ऑगस्ट,2007 ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत :

डॉ. पी.बी. कुलकर्णी
प्राचार्य ,बाबासाहेब चितळे महाविद्यालय
भिलवडी. ता. पलूस जि. सांगली -416 303
दूरध्वनी - कार्यालय -95/02346-237260
निवास- 95 / 02342 - 222223
भ्रमणध्वनी -98906 60023

**चारूदत्त गोखले**
कार्यवाह-खजिनदार

# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

(1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

(2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

(3) जी माहिती एम.ए. पर्यतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण निबंधात असू नये; कारण ते सर्वांना माहित असते. माहितीतील सांख्यिकीय संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य ठरेल.

(4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारे संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

(5) निबंधात वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

(6) निबंधात शक्य तो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश', आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यांतील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

(7) निबंधातील आकडेवारी, संदर्भ सूचक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

(8) निबंधाची माहिती केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषेतून केवळ भाषांतरित नसावे.

(9) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

(10) निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा (300 शब्द)

निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

# 1. कायदा व अर्थशास्त्र

✦ **ज. फा. पाटील, कोल्हापूर.**
*भूतपूर्व अध्यक्ष व विद्यमान कार्याध्यक्ष*
*मराठी अर्थशास्त्र परिषद.*

**बा**र्शी येथे होणाऱ्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 31 व्या वार्षिक अधिवेशनाच्या एका चर्चासत्रासाठी 'कायदा व अर्थशास्त्र' हा विषय नियोजित केलेला आहे.

या विषयावर शोध निबंध लिहिणाऱ्यांना पुढील काही मार्गदर्शन पर मुद्दे लक्षात घेता येतील.

1. राजसत्तेचा जन्म, सामाजिक करार या संकल्पनेच्या माध्यमातून झाला. रूसो, लॉक यांची सामाजिक कराराची कल्पना अर्थशास्त्र व कायदा यांच्या संदर्भात प्राथमिक आधार व समावेशक कायदा मानावा लागेल. यातूनच कर, खर्च व कर्ज यासंबंधी अभ्यास करणारे राजस्व निर्माण झाले.

2. Family, Private Property and the State या आपल्या ग्रंथामध्ये मार्क्स व एंगल्स यांनी कुटुंब, खाजगी मालमत्ता व राज्य यांच्यातील परस्पर आर्थिक संबंधाबद्दल कायद्याची रचना कशी असते हे स्पष्ट केले.

3. सर्वसाधारणपणे व्यक्तीच्या कुटुंबाच्या खाजगी मालमत्तेच्या उत्पन्नाच्या, खर्च करण्याच्या व रोजगाराच्या संबंधित निर्णयस्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण, नियोजन, नियमन करणे ही राज्याची जबाबदारी असते. त्यातून आर्थिक कायदे निर्माण होतात. विशेषत: जमिनीची मालकी व तिचे वारस हक्क या गोष्टी महत्वाच्या ठरतात.

4. उत्पादन, व्यापार, मागणी आणि पुरवठा यावर आधारित असलेली

बाजारव्यवस्था व त्या बाजार व्यवस्थेत विक्रेता किंवा ग्राहक म्हणून सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या हक्काचे संरक्षण, फसवणूकी पासून संरक्षण व त्यासाठी आर्थिक कराराशी संबंधित कायदे महत्वाचे ठरतात. माल व त्याचा दर्जा, वजन, आकार, त्याची प्रति नग किंमत व्यवहारपूर्तीचा कालखंड, करारभंग झाल्यास शासन व त्याची व्यवस्था याही गोष्टी अर्थशास्त्र व कायदा यांना जवळ आणतात.

5. व्यापार असो, उत्पादन असो, वितरण असो किंवा वाटप असो वेतनदर, कामाचे तास, कामाची परिस्थिती, सुविधा, सामाजिक सुरक्षा या संबंधात कायदेशीर व्यवस्था असावी लागते. कामगार संघटना संबंधी देखील कायदे करावे लागतात.

6. भांडवल व भांडवल बाजार व त्यासाठी चलन आणि पतव्यवस्था याबद्दलही कायदे करावे लागतात. आता बहुराष्ट्रीय संस्था अस्तित्वात आल्या आहेत. त्यासंबंधात अतिशय क्लिष्ट अशी कायदेशीर रचना उत्क्रांत झालेली आहे. त्यासंबंधात आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक कायदेही महत्त्वाचे ठरतात.

7.राष्ट्राची अर्थव्यवस्था कार्यक्षमतेने चालवण्यासाठी व सर्वसंबंधित घटकांचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी एक व्यापक संस्थात्मक रचना निर्माण करावी लागते. प्रत्येक संस्थेच्या उद्दिष्टाबद्दल, कार्यपद्धतीबद्दल एक लिखित मांडणी करावी लागते. तिलाच कायदा म्हणतात. यामध्ये शासन, न्यायव्यवस्था, चलन आणि पतव्यवस्था, स्पर्धात्मक बाजार व्यवस्था, वारसा हक्क व खाजगी मालमत्ता, नियोजन व कामगार संबंध, आर्थिक धोरण (चलन धोरण आणि राजस्व धोरण) व करार भंग यासंबंधी कायदेशीर तरतूद करावी लागते.

8. विविध आर्थिक रचना म्हणजेच भांडवलशाही, समाजवाद, साम्यवाद, मिश्रव्यवस्था, सरंजामशाही, हुकुमशाही या उपरोक्त संस्थांना वेगवेगळे कायदेशीर स्वरूप देण्याचा प्रयत्न असतो.

9.साधारणत: असे दिसते की, मार्क्स, हिक्स, रॉबिन्स, केन्स, मार्शल मस्ग्रेव्ह, मिर्डाल, ग्रालब्रेथ, व्हेब्लेन, कोर्स, टूलॉक, अॅन्थोनी डॉऊन्स, पॅरेटो, बुकॅनन, सॅम्युअलसन, बर्गसन, केनेथ ॲरो यासारख्या संस्थात्मक अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक व्यवहारासाठी कायदेशीर चौकट अती महत्वाची असते हे आग्रहपूर्वक मांडलेले दिसते.

10. गेल्या 20-25 वर्षात अर्थशास्त्र आणि कायदा यांच्यातील घनिष्ट संबंधा बद्दल वाढत्या प्रमाणात लेखन होत गेले आहे. याबाबतीत एकत्रितपणे अद्ययावत माहिती देणारे काही ग्रंथ खाली नमूद केले आहेत. त्यांच्या संदर्भ यादीतून आणखी मार्गदर्शन मिळू शकेल.

(1) Economics of Law, Torts contracts, Property, Litigation लेखक थॉमस जे. मिसेली, प्रकाशक - ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस 1997.

(2) Economics and the Law : From Posner to Post Modernism लेखक स्टीव्हन जी. मिडेमा व निकोलस मुक्युरो, प्रकाशक प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस, 1997.

(3) Law and Economics : Alternative Economic Approaches to legal and regulatory Issues, लेखक मागरिट ओपेल, हेमर आणि निकोलस मुर्क्युरो, प्रकाशक - एम. ई. थार्प, वर्ष 2005

(4)Comparative Law and Economics लेखक उगो मटटेई, प्रकाशक -युनिव्हर्सिटी ऑफ मारीगनप्रेस 1997.

(11) स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचा आर्थिक इतिहास तपासल्यास अर्थकारण आणि कायदा यांच्यातील घनिष्ट संबंध स्पष्ट करण्यासाठी

जमीन विषयक कायदे, वेतनविषयक कायदे, औद्योगिक कलह संबंधित कायदे, मक्तेदारी विरोधी कायदे, सामाजिक सुरक्षा कायदे, बँकिंग विषयक कायदे, बाजारविषयक कायदे, आयात-निर्यात संबंधी कायदे व राजस्वविषयक कायदे तसेच नियोजनविषयक कायदे याचाही विचार करता येईल. अगदी ताजे उदाहरण म्हणून 'स्पेशल इकॉनॉमिक झोन' च्या कायद्याच्या संबंधात निर्माण झालेली राष्ट्रीय चर्चा लक्षात घेता येऊ शकेल. शेवटी एवढेच म्हणता येते की, कोणत्याही समाज व्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीला ग्राहक या नात्याने स्वत:च्या समाधानाचे कमालीकरण करण्यासाठी उत्पादक किंवा विक्रेता या नात्याने नफ्याचे कमालीकरण करण्यासाठी किंवा पर्यायाने त्रासाचे किंवा तोट्याचे किमानीकरण करण्यासाठी प्रचलित कायद्याच्या चौकटीतच प्रयत्न करावे लागतात. एका अर्थाने कायदे व्यक्तींच्या आर्थिक हक्कांचे संरक्षण व संवर्धन करीत असताना समाजाच्या कोणत्याही घटकाच्या आर्थिक हितसंबंधावर इतरांच्या स्वच्छंदी, लहरी किंवा आग्रही वर्तवणूकीमुळे अतिक्रमण होऊ नये याची काळजी घेत असतात.

✦✦✦

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारिपोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रू. 501/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. 1 जानेवारी ते 31 डिसेंबर 2006 या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना यंदाच्या स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी इत्यादींसाठी चारूदत्त गोखले, कार्यवाह-खजिनदार मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्याशी संपर्क साधावा ('अक्षय, प्लॉट नं. 10, प्रोफसर्स कॉलनी, जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे, जळगाव-425 001, दूरध्वनी (निवास)- 950257 2252375') विहीत नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथांच्या 4 प्रतिसह कार्यवाहांना 31 ऑगस्ट 2007 पर्यंत मिळावेत.

कार्यवाह - खजिनदार

# 2. भारताच्या कृषीक्षेत्रावरील अरिष्टे

✦ अ. रा. पडोशी, गोवा.

*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.*

### प्रस्तावना

सद्य:स्थितीमध्ये भारताच्या कृषिक्षेत्रास ग्रासणाऱ्या ज्या समस्या/ जी संकटे/ जी अरिष्टे आहेत, त्यासंबंधीचे आपापले शोधनिबंध लेखकांनी या विभागामध्ये सादर करावयाचे आहेत. या संदर्भामध्ये शेतीचे जागतिकीकरण, शेतमालाचा आंतरराष्ट्रीय खुला व्यापार, तसेच खाजगीकरण इ. घटकांचा शेतीवरील अरिष्टांशी संबंध आहे का ? असल्यास कसा आणि किती ? याचे विवेचन शोधनिबंधामध्ये अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे शेतीवरील अरिष्टाचे स्वरूप, त्याची कारणे, अरिष्टांचे गांभीर्य, तसेच त्यावरील शक्य ती उपाययोजना याचा उहापोह शोधनिबंध लेखकांनी करावा ही अपेक्षा आहे. जागतिकीकरणासारख्या घटकांचा आपण अभ्यास केलेल्या अरिष्टांशी 'संबंध नाही' असे आपले मत असल्यास तसे अवश्य नोंदवावे.

'भारताच्या कृषिक्षेत्रावरील अरिष्टे' हा विषय तसे पाहिल्यास खूपच व्यापक आहे. शोधनिबंध लेखकांच्या माहितीसाठी काही महत्त्वाच्या अरिष्टांचा उल्लेख करणे लेखकांना मार्गदर्शक ठरेल. महत्त्वाची अरिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतील - (1) कृषिक्षेत्राची गेली काही वर्षे कुंठित झालेली वृद्धी (Growth) (म्हणजे कृषिक्षेत्राची पुरेशा वेगाने वृद्धी न होणे) (2) अन्नधान्याचे वेगाने न वाढणारे उत्पादन आणि अन्नधान्याची दरडोई उपलब्धता (3) कृषिक्षेत्रामधील बेराजगारी/वेगाने न वाढणारी रोजगारी (4) कृषिक्षेत्रावरील कुंठित झालेली भांडवली गुंतवणूक व त्याचे परिणाम (5) कृषिमालाची संभाव्य मुक्त आयात व त्यापासून संभवणारे दुष्परिणाम (6) कृषिक्षेत्राची घटती लाभप्रदता (7) कृषिविकासामध्ये सरकारचा घटता सहभाग/खाजगीकरण (8) कृषिक्षेत्रामधील दारिद्र्य (9) कृषिक्षेत्रामधील (म्ह. शेतकऱ्यांचा) कर्जबाजारीपणा इ.इ. वर उल्लेख न झालेला

असा दुसरा एखादा घटक/घटना भारतीय कृषीक्षेत्रावरील अरिष्ट आहे असे वाटत असल्यास त्यावर शोधनिबंध लिहिण्यास हरकत नाही. मात्र असा घटक/घटना कृषिक्षेत्रास अपायकारक (harmful) आहे हे शोधनिबंधातून सिद्ध होणे आवश्यक आहे.

कोणत्याही अरिष्टासंबंधी शोधनिबंध लिहीत असतांना त्या त्या अरिष्टा संबंधीची प्रस्तावना, संक्षिप्त इतिहास, त्या अरिष्टाचे सध्याचे स्वरूप, त्या अरिष्टाची प्रमुख कारणे, त्याचे कृषिक्षेत्रावर शेतकऱ्यावर, तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकणारे दुष्परिणाम आणि त्यावरील उपाययोजना इ. प्रमुख घटकांचा समावेश शोधनिबंधामध्ये असणे इष्ट आहे. आपल्या शोधनिबंधामध्ये आवश्यक ती आकडेवारी द्यावी. या निमित्ताने स्वत: मिळविलेली आकडेवारी (Primary data) देता आल्यास अधिकच बरे ! शेती हा स्थानिक परिस्थितीप्रमाणे बदलणारा विषय (Location Specific) असल्यामुळे वरीलपैकी एखाद्या अरिष्टामुळे एखाद्या भागातील - उदा. खेडे, तालुका इ. शेतीवर प्रत्यक्ष दुष्परिणाम कसा झाला आणि त्यातून संबंधित शेतकऱ्यांनी मार्ग काढला असल्यास- कसा मार्ग काढला, काय उपाययोजना केली इ. चे विवरण/ विश्लेषण (Case Study) शोधनिबंधामध्ये स्वागतार्ह आहे.

आपल्या शोधनिबंधामध्ये विश्लेषणावर अधिक भर असावा. कृषिवरील अरिष्टांचे विवरण करीत असतांना या अरिष्टाची कारणमीमांसा करणे अत्यंत आवश्यक आहे. असे झाले तरच उपाययोजना तर्कसंगत होऊ शकेल. शोधनिबंध आणि त्यातील निष्कर्ष हे जास्तीतजास्त वस्तुनिष्ठ (Objective) राहतील याची पुरेशी काळजी घ्यावी. (उदा. जागतिकीकरण हे कृषिवरील कित्येक अरिष्टांना जबाबदार धरले जात असले तरी आपल्या शोधनिबंधा मध्ये आपण ज्या अरिष्टाचा अभ्यास केला आहे त्याला जागतिकीकरण खरेच जबाबदार आहे का, याचा पूर्ण विचार व्हावा)

'भारताच्या कृषिक्षेत्रावरील अरिष्टे' हा विषय अनुभवजन्य व उपयोजित (Empirical & Applied) स्वरूपाचा आहे. त्यामुळे कृषिवरील अरिष्टांचे निवारण व्हावे या दृष्टिने उपाय योजना सुचविण्यासाठी शोधनिबंधामध्ये भरपूर वाव आहे. शोधनिबंध लेखकांनी अरिष्टांचे/समस्येचे विश्लेषण करून न थांबता, समस्येची सोडवूणक करण्यासाठी उपाय योजना अवश्य सुचवाव्या. मात्र उपाय योजना सुचवितांना ती उपाय योजना, सादर केलेला पुरावा व निष्कर्ष यांचेशी सुसंगत असावी. तसेच आपली उपाययोजना सुचवितांना जे उपाय यापूर्वी अनेक वेळा सुचविले गेले आहेत (उदा. कमी व्याजाने कर्जे, बी बियाणे खते इ. वर अनुदान, व्याजमाफी, कर्जमाफी, सरकारने शेतमाल खरेदी इ.इ.) त्याची पुनरुक्ती टाळता आल्यास पहावे. तसेच आपण अभ्यास केलेल्या खेडे तालुका इ. क्षेत्रासाठी विशिष्ट व वेगळा असा एखादा उपाय असल्यास अवश्य सुचवावा.

शोधनिबंध लिहितांना योग्य अशी संशोधन पद्धती वापरावी, शोधनिबंधामध्ये दिलेले संदर्भ दर्जेदार-शक्यतो आर्थिक नियतकालिके, आर्थिक वृत्तपत्रे यांतील असावे. आकडेवारी शक्य तेवढी अद्ययावत असावी. मराठी अर्थशास्त्र परिषदेने शोधनिबंध लेखकांसाठी जी सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत त्यांचे शक्यतो पालन व्हावे.

✦✦✦

# 3. महाराष्ट्रातील नागरीकरण : कारणे स्वरूप आणि परिणाम

✦ दि. व्यं. जहागिरदार, अमरावती

*भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,*
*संचालक, सेंटर फॅर इकॉनॉमिक्स अॅन्ड सोशल स्टडीज, अमरावती.*

### 1. प्रास्ताविक

**लो**कांचे वास्तव्य कोणत्या क्षेत्रात वा भागात आहे यावरून नागरी क्षेत्रात आणि ग्रामीण क्षेत्रात राहणारे लोक या आधारे लोकसंख्येचे वर्गीकरण केले जाते. एकूण लोकसंख्येपैकी किती प्रतिशत लोकसंख्या नागरी क्षेत्रात शहरांमध्ये वास्तव्य करते यावरुन नागरीकरणाचे स्वरूप लक्षात येते. एकूण लोकसंख्येपैकी नागरी क्षेत्रात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण वाढत गेल्याचे दिसत आहे. यालाच आपण नागरीकरणाची प्रवृत्ती म्हणतो. मात्र नागरी क्षेत्र कसे ठरवावे याबद्दल विविध देशांमध्ये पूर्णत: समान निकष नाहीत. पण त्यात जवळपास सारखेपणा दिसतो. भारतात जनगणना करतांना नागरी वा शहरी क्षेत्राचे निकष दर्शविले आहेत. त्यात लोकसंख्येचा आकार, घनत्व आणि बिगर शेती व्यवसायात काम करणाऱ्यांचे प्रतिशत प्रमाण अशा निकषांचा आधार घेतला आहे.

नागरीकरणाचे विविध पैलू असतात. नागरीकरणाचे बदलते स्वरूप, नगर रचना, व्यक्तींचे होणारे स्थलांतरण, औद्योगिकरण, घरबांधणीच्या समस्या, नागरी क्षेत्रातील विविध पायाभूत सेवांचे विशेषत: वाहतूक व्यवस्था, रस्ते, पिण्याचे पाणी इ.चे प्रश्न नागरी प्रशासन व्यवस्था, नागरी राजकारण-समाजकारण, प्रदूषण, झोपडपट्ट्यांचा गंभीर प्रश्न, वाढती गुन्हेगारी, नागरी संस्कृती, कला व भाषा इ. विविध पैलू सहजपणे डोळ्यासमोर येतात. याचा अर्थ असा की, नागरीकरणाचा संबंध हा सर्वसाधारणपणे सामाजिक शास्त्रे, विज्ञान व तंत्रविज्ञान, तसेच भाषा व साहित्याशी आहे. नागरीकरणाचे स्वरूप समजण्यासाठी अशा विविध पैलूंचा विचार करणे आवश्यक आहे या विविध पैलूंचा कशा प्रकारे अभ्यास करावा आणि सर्वंकष दृष्टिने विविध समस्यांवर कसे उपाय सुचवावेत हे नागरीकरणाचा अभ्यास

करणाऱ्यांसमोर आव्हान आहे.

विकास प्रक्रिया आणि नागरीकरण यांचा परस्पर संबंध आहे. नागरीकरणामुळे औद्योगिकरण तसेच औद्योगिकरणामुळे नागरीकरण असा हा परस्परांवर प्रभाव टाकणारा संबंध आहे. कधी-कधी औद्योगिकरण न होता देखील नागरीकरण झाल्याची उदाहरणे आहेतच. नागरीकरणाच्या प्रक्रियेतून पायाभूत सुविधांमध्ये वाढ होते, बाजारपेठा विस्तारतात, तांत्रिक क्षेत्रात बदल होतात. त्यांचा कृषि क्षेत्रावर परिणाम होतो व आर्थिक विकासाची गती वाढते. सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्येही नागरीकरणामुळे प्रभावित होतात. विशेषत: स्त्री-पुरूष समानता, बंधुत्व, स्त्री स्वातंत्र्य इ. मूल्यांवर त्याचा अनुकूल परिणाम होतो. अर्थात हे ही खरे आहे की, घरांची टंचाई, झोपडपट्टींची निर्मिती, प्रदूषण, गुन्हेगारी अशा गंभीर समस्याही निर्माण होतात.

भारतात नागरीकरणाच्या बाबत पंचवार्षिक योजनांमध्ये जी धोरणे स्वीकारलीत आणि अंमलात आणलीत त्यावरून असे दिसेल की, सहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत घरबांधणी कार्यक्रमावरच भर दिल्या गेला. आठव्या योजनेत प्रथमत: नागरी विकासाला स्वतंत्र क्षेत्र म्हणून स्थान दिल्या गेले. इ.स. 1983 मध्ये योजना आयोगाने नगर विकास नियोजन, नगर विकासासाठी पतपुरवठा, नगर विकासाचे व्यवस्थापन आणि गरिबांसाठी घरे व गलिच्छ वस्त्यांची सुधारणा या चार विषयावर अध्ययन व समस्या दूर करण्यासाठी कृतीदले स्थापन केलीत. 1985 मध्ये केंद्र सरकारने नागरीकरणाविषयी राष्ट्रीय आयोग स्थापन केला. आयोगाच्या शिफारशींवर फारशी चर्चा झाली नाही.

भारतीय राज्य घटनेत 73 वी आणि 74 वी घटना दुरुस्ती फार महत्त्वपूर्ण मानली जाते. 73व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायतींना आणि 74 व्या घटना दुरुस्तीमुळे नगरपालिकांना घटनात्मक स्वीकृती प्राप्त झाली आहे. नगरपालिकांच्या निवडणूका, निर्वाचित उमेदवारांमध्ये स्त्रिया व मागासवर्गीयांना आरक्षण इ. महत्त्वाच्या बाबी नगरपालिकांच्या कार्यपद्धतीवर प्रभाव टाकणाऱ्या आहेत. वास्तविक पाहता शहरात स्वच्छता राखण्याचे काम नगरपालिका/महानगरपालिकांचे प्राथमिक कार्य आहे. पण गेल्या काही वर्षांपासून शहरांमध्ये जागोजागी कचरा आढळून येत होता. कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे ''बर्मन समिती'' स्थापन झाली व समितीच्या शिफारशीनुसार नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2000 केंद्र सरकारने पारीत केला. महानगरपालिका आणि अ श्रेणी नगरपालिकांनी महाराष्ट्रात घनकचरा गोळा करणे, त्याची विल्हेवाट लावणे यासाठी विशेष कृती केल्याचे दिसत आहे.

नागरीजीवनाविषयी भारतीयांनी शेकडो वर्षांपासून आपापली मते व्यक्त केली आहेत. कौटिल्याने नागरी जीवनाचे समर्थन केले होते. नगरांच्याबाजूने आणि विरूद्ध विविध प्रकारची मते आजही व्यक्त होताना दिसतात. अनेकांना शुद्ध हवा आणि खेड्यातील हिरवळ भुरळ पाडते. मात्र खेड्यातील अन्य बाबींविषयी ते काहीच वक्तव्य देत नाहीत. नगरे-शहरे आणि खेडी एकाच अर्थव्यवस्थेचा भाग आहेत. अनेक वेळा असे दिसते की विकासाची धोरणे नागरी भागाकडे अधिक झुकलेली असतात. कधी-कधी नागरी क्षेत्र ग्रामीण शोषण करतात असेही म्हटले जाते. अनेकांना नगरांचे अस्तित्व कृत्रिम वाटते. नागरीकरण हा विकासातील टप्पा आहे. जे. जेकॉब (The death and life of Great American cities1961) यांनी म्हटले आहे की, नगरे ही देखील मधमाशांच्या पोळ्यांएवढी नैसर्गिक आहेत! बऱ्याचदा ग्रामीण भागातून शहरी भागात होणाऱ्या स्थलांतरणावर टीका केली जाते. आज लाखो लोक शहरांकडे धाव घेतात कारण शहरात त्यांना जगण्याची संधी प्राप्त होते. ते ज्या भागातून आले असतात तेथे या संधी नसतात.

शहरांमध्ये अपप्रवृत्ती, गुंडगिरी असली तरी अनेकांना ते ज्या भागातून आलेत त्यांच्या तुलनेत शहरात राहणे सुरक्षित वाटते.

भारतामध्ये नागरीकरणाचा इतिहास अभ्यासला तर साधारणत: चार प्रकारच्या प्रक्रियांमधून नागरीकरण विकसित झाले आहे. त्या प्रक्रिया पुढील प्रमाणे आहेत : 1) सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रिया 2) राज्यकारभाराशी संबंधित प्रक्रिया 3) आर्थिक विकास प्रक्रिया आणि (4) भौगोलिक प्रक्रिया.

नागरीकरणाच्या प्रवृत्तीवर शासनाच्या धोरणाचा परिणाम स्पष्टपणे जाणवतो. विशेषत: नागरीकरणाच्या ज्या विविध समस्या आहेत त्या हाताळण्यात नागरी प्रशासन आर्थिक कारणांमुळे यशस्वी होत नाही. सरकारला याबाबतच प्रभावी उपाय अंमलात आणावे लागतात. वार्षिक योजनांमध्ये व अंदाजपत्रकाद्वारे नागरी समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाला धोरण ठरवून कृती करावी लागते.

गेल्या 15 वर्षांपासून जागतिकीकरणाचे वारे आपल्याकडेही वाहत आहे. जागतिकीकरणाचा शहरांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास गेल्या 20 वर्षांपासून होत आहे. त्यातून 'जागतिक शहर' ही नवी संकल्पना उदयास येत आहे. जागतिक आर्थिक व्यवहारात एखाद्या शहराचा सहभाग केवढा आहे ? अशा शहरांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अस्तित्व किती? आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे तेथे कार्य किती आहे ? परकीय चलनाचे व्यवहार किती होतात ? शहराला 'बाजार मूल्य' मानून ते वाढविण्याचा प्रयत्न शासन व निगम क्षेत्र करतात. महाराष्ट्रात मुंबई शहराला असा दर्जा मिळू शकतो. 10-15 वर्षानंतर पुणे शहरही असा प्रयत्न करू शकेल.

**2. नागरीकरण**

जागतिक पातळीवर नागरीकरणाची प्रक्रिया ही औद्योगिक क्रांतीनंतर सुरू झाली असे मानले जाते. आजच्या जगाची जी विविध वैशिष्ट्ये आहेत त्यापैकी महत्वपूर्ण वैशिष्ट्ये हे की जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी 47 प्रतिशत लोकसंख्या नगरांमध्ये/ शहरांमध्ये रहाते. नागरीकरणाच्या विविध व्याख्या केल्या जातात. शेती व्यवसायातून दुसऱ्या व्यवसायात जाण्याच्या प्रयत्नातून नागरीकरण निर्माण होते. शेती सोडून व्यापार, उद्योग, अन्य सेवांची निर्मिती अशा क्षेत्रात कार्य करू लागतात. आशिष बोस यांच्या मते, नागरीकरणाची प्रक्रिया ही स्थलांतराची प्रक्रिया होय. ओल्सनच्या मते खेड्यातील लोक नगराकडे जाणे म्हणजे नागरीकरण होय. नागरीकरण हे नगरांच्या मूळ लोकसंख्येतील वाढ आणि बाहेरून आलेले स्थलांतरीत व नगरातून बाहेर गेलेले यावरून निर्धारित होते. औद्योगिकरण, दळणवळण सोयींमधील वाढ, वाहतूकीच्या साधनांमधील वाढ, व्यापार व शैक्षणिक सुविधा, प्रशासकीय व्यवस्था इ. बाबींचा स्थलांतराशी संबंध आहे. प्रादेशिक नियोजनाचाही नागरी क्षेत्रांच्या वाढीवर प्रभाव पडतो. नागरी क्षेत्राच्या विकासासाठी नियोजनाचीही गरज भासते.

भारतात नागरी क्षेत्र किंवा शहरी क्षेत्र जनगणनेनुसार पुढील निकष ठरविण्यात आले आहेत.

अ) ज्या वस्तींमध्ये महानगरपालिका, नगरपालिका, कँटॉनमेंटस् बोर्ड, स्थापन झाले आहेत अशा वस्त्या की ज्या शासनाने नगर म्हणून मान्य केल्या आहेत.

ब) खालील निकष पूर्ण करणाऱ्या वस्त्या

1) पाच हजारापेक्षा जास्त संख्या
2) दर चौ कि.मी. ला 400 पेक्षा अधिक लोकसंख्येचे घनत्व
3) बिगर कृषी व्यवसायात 75 प्रतिशत लोकसंख्या कार्यरत

शहरे/नगरांचे वर्गीकरण लोकसंख्येच्या आधारावर 6 श्रेणींमध्ये केले आहे. त्यामध्ये श्रेणी 1 मध्ये जेथे लोकसंख्या 1 लाखाहून जास्त आहे अशा नगरांचा अन्तर्भाव होतो. त्याची सारणी पुढील प्रमाणे आहे.

| श्रेणी | लोकसंख्या |
|---|---|
| श्रेणी 1 | 1 लाखाहून अधिक लोकसंख्या |
| श्रेणी 2 | 50 हजार ते 1 लाख लोकसंख्या |
| श्रेणी 3 | 20 ते 50 हजार लोकसंख्या |
| श्रेणी 4 | 10 ते 20 हजार लोकसंख्या |
| श्रेणी 5 | 5 ते 10 हजार लोकसंख्या |
| श्रेणी 6 | 5 हजारापेक्षा कमी लोकसंख्या |

इ.स. 1988 मध्ये राष्ट्रीय नागरीकरण परिषदेने 1 लाखाहून जास्त लोकसंख्या असणाऱ्या शहरांचे 6 वर्ग केलेत. त्यापैकी सी-6 वर्गात 1 कोटीपेक्षा अधिक लोकसंख्या असणारी शहरे अन्तर्भूत होतील तर सी-5 मध्ये 50 लाख ते 1 कोटी लोकसंख्या असणाऱ्या शहरांचा अंतर्भाव होतो.

भारतात इ.स. 1901 मध्ये नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 11 प्रतिशत होती; 1951 मध्ये हे प्रमाण 17.6 टक्के झाले तर 2001 च्या जनगणनेनुसार भारतात नागरी लोकसंख्या 27-80 प्रतिशत होती. या काळात नगरांच्या संख्येतही 1834 वरून 5400 पर्यंत वाढ झाली. नागरीकरणाची ही प्रवृत्ती विविध प्रांतामध्ये वेगवेगळी होती.

महाराष्ट्रात इ.स. 2001 मध्ये नागरी लोकसंख्या ही 42.4 प्रतिशत होती. इ.स. 1991 मध्ये नागरी लोकसंख्या 39 प्रतिशत होती. या दहा वर्षात नागरी लोकसंख्या 3.4 प्रतिशतने वाढली तर भारतीय स्तरावर ही वाढ 2.1 प्रतिशत होती. महाराष्ट्रातील नागरीकरणाचे स्वरूप महसूल विभाग निहाय आणि जिल्हा निहाय पाहता येईल. इ.स. 2001 मध्ये कोकण महसूल विभागात नागरी लोकसंख्या त्या भागातील एकूण लोकसंख्येच्या 75.07 प्रतिशत होती तर औरंगाबाद महसूल विभागात हे प्रमाण 24.58 टक्के होते. मुंबई जिल्हा व उपनगरे या दोन जिल्ह्यात शंभर टक्के नागरी लोकसंख्या असून गडचिरोली जिल्ह्यात नागरी लोकसंख्या जेमतेम 7 प्रतिशत आहे ! भारताप्रमाणे महाराष्ट्रातही नगरांच्या संख्येत वाढ झाली आहे. 2001 च्या जनगणनेनुसार नगरांची संख्या 378 होती. त्यापैकी सर्वात जास्त म्हणजे 134 नगरे श्रेणी-3 मध्ये म्हणजे 20 हजार ते 50 हजार लोकसंख्या असणाऱ्या श्रेणीत होती. तर 40 नगरांची प्रत्येकी लोकसंख्या 1 लाखापेक्षा जास्त (श्रेणी -1) होती. महाराष्ट्राच्या एकूण नागरी लोकसंख्येपैकी 54 प्रतिशत लोकसंख्या मुंबई, ठाणे व पुणे या जिल्ह्यामध्ये आहे महाराष्ट्राच्या नागरीकरणाबाबत विविध आकडेवारी अशा प्रकारे दर्शविता येईल(जनगणना अहवालांच्या द्वारे ही माहिती सहज उपलब्ध होऊ शकते. वेबसाईटवर देखील ही माहिती प्राप्त होईल).

**3) शोधनिबंधांसाठी काही महत्त्वाचे विषय**

महाराष्ट्रातील नागरीकरणाचे स्वरूप, समस्या या विषयावर शोधनिबंध तयार करण्यासाठी पुढील महत्त्वाचे विषय सुचविता येतील :

1) महाराष्ट्राच्या स्थापनेपासून नागरीकरणाच्या प्रवृत्तीचे विवेचन (1961-2001)

2) महाराष्ट्रातील नागरीकरणाची अन्य राज्यांमधील नागरीकरणाशी तुलना.

3) महाराष्ट्रातील महसूल विभाग निहाय नागरीकरणाची प्रवृत्ती. विविध महसूल विभागातील नागरीकरणाच्या प्रवृत्तीमधील तफावत आणि त्याची कारण मिमांसा.

4) महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यामधील नागरीकरणाचे स्वरूप. विशिष्ट जिल्ह्याचे संदर्भात नागरीकरण प्रवृत्तीचा आढावा.

5) नागरी विभागातील साक्षरता दर, स्त्री पुरूष प्रमाण, अनुसूचीत जातीचे प्रमाण, इ. घटकांच्याबाबतीत असणारी स्थिती .

6) नागरीकरण प्रभावित करणाऱ्या घटकांच्या द्वारा नागरीकरण प्रवृत्तीचे विश्लेषण .

7) नगरांमध्ये अनौपचारिक क्षेत्रात वाढ होत आहे. विविध व्यवसाय करणारे हजारो व्यावसायिक यात अन्तर्भूत आहेत. त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप,

त्यातून प्राप्त उत्पन्न, त्यांनी मिळविलेले कर्ज, त्यांच्या व्यवसायातील अडचणी इ. बाबत पाहणी करता येईल.

8) नागरीकरणाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे झोपडपट्यांची/गलिच्छ वस्त्यांची निर्मिती, रिकाम्या मैदानावर, रेल्वे लाईनच्या बाजूला, नाल्यांच्या कडाने, शासकीय जमिनीवर अनाधिकृतरित्या झोपडपड्या निर्माण होतात. मुंबईसारख्या शहरात 50 प्रतिशत लोकसंख्या तर अनेक शहरांमध्ये ही 30 प्रतिशत लोकसंख्या झोपटपट्टीत राहते. एखाद्या झोपडपट्टीची पाहणी करून तेथील सोयी सुविधा, कुटुंबाचा आकार, शिक्षणाचा स्तर, व्यवसाय इ. बाबत माहिती गोळा करता येईल. झोपडपट्टीच्या बाबत शासकीय धोरणांचा आढावाही घेता येईल.

9) नागरी क्षेत्रातील रस्ते, वाहतूक व्यवस्था, पाणी पुरवठा, घरबांधणी अशा आधारभूत संरचनेचा अभ्यास शहर पातळीवर करणे शक्य आहे.

अ) महाराष्ट्रात शहरांमधील रस्ते विकास कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यरत असते. महाराष्ट्रातील 17 शहरांमधून उड्डाणपूल, रस्ते उभारणी, रूंदीकरण इ. कार्य चालू आहे . त्यामध्ये खाजगीकरणावर भर दिला जात आहे.

ब) शहरांमध्ये पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा नागरी प्रशासनाद्वारे तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे होतो. पाणी पुरवठ्याचा खर्च आणि त्यापासून मिळणारी प्राप्ती यांच्यात तालमेल आहे का ? पाणी पुरवठ्याचे दर कसे ठरविले गेलेत अशा मुद्यांचा परामर्श घेता येईल.

क) महाराष्ट्रातील बहुतेक शहरांमधून मलनिस्सारणाची स्थिति अत्यंत असमाधानकारक आहे. शहर निहाय ह्या स्थितीचे स्वरूप स्पष्ट करून त्यात कशा सुधारणा शक्य आहेत ?

ख) शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा होतो. त्यासाठी घनकचरा व्यवस्थापनाची (Solid Waste Management) स्थिती कशी आहे. जमा केलेल्या कचऱ्याचे पुढे काय केले जाते ? काय करता येऊ शकते ? घन कचरा किती जमा होतो ? इ. बाबींवरही निबंध लिहता येईल.

3) शहरांमध्ये प्रदूषणाची समस्या भेडसावत आहे. प्रदूषणाची कारण मीमांसा व शहरात होत असलेले प्रदूषण याबाबत तांत्रिक दृष्ट्याही विवेचन करणे शक्य आहे.

10) नागरी प्रशासन विविध स्रोतांद्वारे उत्पन्न प्राप्त करते. त्यामध्ये मालमत्ता कर (घर/फ्लॅट/ व्यापारी दुकाने/प्रतिष्ठाने)हा अत्यंत वादग्रस्त विषय आहे. हा कर कोणत्या निकषांवर लावला पाहिजे याबाबत बरीच चर्चा चालू आहे. काही अभ्यासकांनी मालमत्तेचा आकार, शहराच्या कोणत्या वस्तीत ती मालमत्ता आहे अशा निकषांबरोबर आणखी 8-10 निकष सुचविले आहेत. ते निकष वापरात येतील का? मालमत्ता कर बसविण्यात बरेच राजकारण-हितसंबंध असतात. मालमत्ता करांचे मूल्यांकन दर चार वर्षांनी केले जाते. या संबंधात विशिष्ट महानगरपालिका/ नगरपालिकांच्या संदर्भात अभ्यास केला जाऊ शकतो.

11) नागरी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे व गुन्हेगारी आढळून येते. याचाही अभ्यास केला पाहिजे. त्यादृष्टीने कायदे व पोलीस यंत्रणा कितपत प्रभावी आहेत याचा आढावा घेता येईल.

महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या संदर्भात वरील विषयांव्यतिरिक्त आणखी काही मुद्दे असू शकतात. त्यासाठी नागरीकरणावरील तात्त्विक दृष्टिने लिहलेली पुस्तके, अहवाल आणि लेखांचा आधार घेता येईल. समंकासाठी द्वितीय समंक उपलब्ध आहेत. तसेच प्राथमिक समंकही प्राप्त करता येतील. यादृष्टीने काही पुस्तके/लेख पुढील प्रमाणे सांगता येतील (शोध निबंधाला शीर्षक देतांना आपण निवडलेल्या विषयाशी संबंधित शीर्षक देणे उचित ठरते.)

1) Ashish Bose & others (1978) :

Population Statistics in India. Vivas Publishing House New Delhi.

2) Kopardekar S.D. (1987) Managing Urban Development All India Institute of local self Govt. Mumbai.

3) Govt. of India : Census Reports, 1991 (Series 14, Maharashtra) 2001.

4) Palritkar Sneha (2002) : Legal frame work for Municipal Solid waste management in India. All India Institute of Local self Government, Mumbai.

5) Paul Demeny (1991) : "Trade offs between Human Numbers and Material Standards of Life in Kinssly Dan's & Bernstam's book, Resoures, Environment and Population oxford

6).R. Ramchandra (1989) : Urbanisation and Urban systems in India Oxford University Press.

7) Shukla Vibhuti (1996) : Urbanisation and economic Growth Oxford University Press.

8) जहागिरदार दि.व्य. (1992) नागरीकरण : स्वरूप आणि काही वाद प्रश्न अर्थसंवाद खंड 16 अंक 3

9 )दातार माधव (1998) नागरीकरण आणि आर्थिक अभिवृद्धी (ग्रंथ परिक्षण) अर्थसंवाद, खंड 22, अंक 2

10) फाटक विद्याधर (2004) : नागरीकरण स्वरूप, समस्या व धोरण, आजचा सुधारक, ऑक्टो-नोव्हे.

11) बोंगिरवार प.ल. (2004) : नगरांचा निरंतर विकास : काळाची गरज, आजचा सुधारक, ऑक्टो- नोव्हे.

12) मुळ्ये संजीवनी (1999) : महाराष्ट्रातील नागरीकरण : विकासास पोषक की घातक अर्थसंवाद खंड 23 अंक 2

13) महाराष्ट्र शासन (2002) : महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल

14) महाराष्ट्र शासन : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (विविध वर्षांचे अहवाल)

(महाविद्यालयीन ग्रंथालयात सहजपणे प्राप्त होऊ शकणारी पुस्तके, लेख व अहवालांची ही मर्यादित यादी आहे.)

✦✦✦

## व्यवस्थेतील बदल

अर्थसंवादची 2007-08 या वर्षासाठी वार्षिक वर्गणी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्या नागपूरच्या पत्त्यावर कृपया फक्त डिमांड ड्राफ्टनेच पाठवावी. मनिऑर्डरने पाठवू नये. अर्थसंवादसंबंधीचा सर्व पत्रव्यवहार कृपया प्रमुख संपादकांशीच करावा. डी.डी. पाठवितांना संपूर्ण पत्ता सुवाच्य अक्षरात नमूद करावा. ड्राफ्ट 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने पाठवावा.

**कार्यवाह – खजिनदार**

# 2006-2007 या वर्षात झालेले आजीव सभासद

1) धोरण मंगला रामेश्वर (अमरावती)
2) रायभोग राजश्री आनंद (अमरावती)
3) नाईक वैशाली कल्याणराव (अमरावती)
4) ताडे संतोष नामदेवराव (अकोला)
5) दांदडे संजय मोतीराम(बुलढाणा)
6) वानखडे साधना ग. (अकोला)
7) धूम संदेश तुळशीराम (जळगाव)
8) सय्यद सादिक बशीर (अहमदनगर)
9) जाधव छाया दिनेश (पुणे)
10) काळे उदय श्रीकृष्ण (बुलढाणा)
11) गायकवाड नयना श्रीकृष्ण (सांगली)
12) बोदगिरे विलास शंकर (सातारा)
13) म्होपरे राहूल शंकर (सांगली)
14) सुतार विद्या शिवाजी (सातारा)
15) पाटील अण्णा काका (कोल्हापूर)
16) यादव संतोष बबनराव (सातारा)
17) शेषभरे सुधीर यशवंत (सांगली)
18) सदामते मोहन गोविंद (सांगली)
19) वाईंगडे राजकुमार अण्णासो (कोल्हापूर )
20) पाटील विजयकुमार अप्पासाहेब(सांगली)
21) खानाज विरूपक्ष रघुनाथ (कोल्हापूर)
22) सपाटे माधुरी गजानन (कोल्हापूर)
23) पाटील रघुनाथ धोंडी (कोल्हापूर)
24) कांबळे अण्णा भिमा (कोल्हापूर)
25) चव्हाण सीमा रविंद्र (अहमदनगर)
26) देसाई विजय भिमाप्पा (कोल्हापूर)
27) वाघमारे कबीर पांडुरंग (कोल्हापूर)
28) भामरे संजय वसंत (जळगाव)
29) संदे राजेसाहेब नबी (सांगली)
30) यादव किरण तानाजी (सांगली)
31) पवार किरण शंकर (कोल्हापूर)
32) मोरे विनोद झामा (जळगाव)
33) खेडकर विश्वनाथ बाजीराव (अहमदनगर)
34) शिंदे राजेंद्र यशवंतराव (अहमदनगर)
35) समेळ शिरीष चंद्रकांत (रायगड)
36) चौधरी विवेक अण्णाराव (अमरावती)
37) आघाव रघुनाथ गोविंदराव (अहमदनगर)
38) कोर रघुनाथ डी. (ठाणे)
39) मढवी सुरेश टी. (ठाणे)
40) महाडिक तानाजी जनार्धन(सोलापूर)
41) जाधव साहेबराव लक्ष्मण (सांगली)
42) पोतदार प्रविण रमेश(पुणे)
43) दराडे गणेश बाबुराव (बुलढाणा)
44) उदगीरकर टी.के. (कोल्हापूर)
45) शिरसाठ राजेंद्र माधवराव (नाशिक)
46) खरात गोपीनाथ दिनकर (पुणे)
47) आवळे मनिषा विनय (चंद्रपूर)
48) सालके सुनिल रामराव (पुणे)
49) सावंत संभाजी शिवाजी (कोल्हापूर)
50) पाटील पुष्पलता भिकनराव (अहमदनगर)
51) फु लसुंदर श्रीकांत मारूती (पुणे)
52) कुलकर्णी अश्लेषा अनिल (नाशिक)
53) होले गणपत बबन (पुणे)
54) बजाज अर्चना वल्लभदासजी (अमरावती)
55) राहाणे कृष्णा शंकर (नाशिक)
56) बाबर सोमेश्वर नारायण (औरंगाबाद)
57) शिंगाडे बापुसाहेब निवृत्ती (अहमदनगर)
58) हवेलीकर रोहिणी अशोक (औरंगाबाद)
59) काटदरे विवेक वसंतराव(जळगाव)
60) महाजन प्रविण पांडुरंग (जळगाव)
61) कुळकर्णी शरवरी शरद (सांगली)
62) शिंदे आशालता बाळासाहेब (सांगली)

# 2006-2007 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 1) | प्राचार्य, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी (बारामती) | 6900/- |
| 2) | हिंदुस्तान जागरण ट्रस्ट (पुणे) | 5000/- |
| 3) | डॉ. अरूण अडसूळ (बारामती) | 5000/- |
| 4) | प्रा. शि. ना. माने (सातारा) | 5000/- |
| 5) | सौ. प्रतिभा बोरवणकर (मुंबई) | 5000/- |
| 6) | प्रा. चारूदत्त गोखले (जळगाव) | 4000/- |
| 7) | र.पु. कुरूलकर (औरंगाबाद) | 3000/- |
| 8) | डॉ. माधवराव चितळे (औरंगाबाद) | 2000/- |
| 9) | प्रा. ग.र. गोखले (पुणे) | 2000/- |
| 10) | के.बी.काटे (कोल्हापूर) | 1500/- |
| 11) | शशीकला सावंत (मुंबई) | 1100/- |
| 12) | डॉ. नारायण अंबर्डेकर (सांगली) | 1050/- |
| 13) | संध्या डे (नागपूर) | 1001/- |
| 14) | प्रा. अश्विनी पेंडसे (कल्याण) | 1001/- |
| 15) | के.बी. दिवटे (धुळे) | 1001/- |
| 16) | प्रा. एल.ए. अवघडे (पुणे) | 1000/- |
| 17) | विजयसिंग जाधव (सांगली) | 1000/- |
| 18) | नेताजी पवार (कोल्हापूर) | 1000/- |
| 19) | वामनराव सावंत (रत्नागिरी) | 1000/- |
| 20) | डॉ पंढरीनाथ पवार (कोल्हापूर) | 1000/- |
| 21) | संजय महाजन (रायगड) | 1000/- |
| 22) | एन.एम. पाटील (अमरावती) | 1000/- |
| 23) | चंद्रनील पर्यटन (पुणे) | 1000/- |
| 24) | विभावरी सुलाखे (पुणे) | 1000/- |
| 25) | प्रा विवेक चौधरी (अमरावती) | 1000/- |
| 26) | पी.जे. काटोले (अमरावती) | 1000/- |
| 27) | डॉ.सुरेश जगताप (अमरावती) | 1000/- |
| 28) | प्रा. विजय कांत (अमरावती) | 1000/- |
| 29) | प्रा. जे. व्ही. गायकवाड (अमरावती) | 1000/- |
| 30) | वनिता चोरे (अमरावती) | 1000/- |

# 2006-2007 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 31) | मंगला धोरण (अमरावती) | 1000/- |
| 32) | सौ. राजश्री रायभोग (अमरावती) | 1000/- |
| 33) | सौ वैशाली नाईक (अमरावती) | 1000/- |
| 34) | प्रकाश कांबळे (सातारा) | 1000/- |
| 35) | भ.ह. कुलकर्णी (सांगोला) | 1000/- |
| 36) | बी.के छाजेड (धुळे) | 1000/- |
| 37) | एम. डी. पाध्ये (औरंगाबाद) | 1000/- |
| 38) | प्रभा देशपांडे (नवी दिल्ली) | 1000/- |
| 39) | बी.एम. पाटील (पंढरपूर) | 1000/- |
| 40) | के.एस. बोकील (पुणे) | 1000/- |
| 41) | सदानंद वर्दे (पुणे) | 1000/- |
| 42) | आर.आर. बेराड (नाशिक) | 1000/- |
| 43) | मुरलीधर कुलकर्णी (ठाणे) | 1000/- |
| 44) | मोरेश्वर ताटके (ठाणे) | 1000/- |
| 45) | तिलोत्तमा चौधरी (चाळीसगांव) | 1000/- |
| 46) | आशा झंवर (अंबरनाथ) | 1000/- |
| 47) | सौ. अल्का मानकर (बुलढाणा) | 1000/- |
| 48) | शितलकुमार दादा पाटील (सांगली) | 1000/- |
| 49) | दैनिक तरूण भारत (बेळगांव) | 1000/- |
| 50) | सु.द. बाळ (नागपूर) | 1000/- |
| 51) | डॉ विकास चित्रे (पुणे) | 1000/- |
| 52) | विणा देवस्थळी (मुंबई) | 1000/- |
| 53) | बबनराव आदिक (श्रीरामपूर) | 1000/- |
| 54) | डॉ. सुभाष टकले (हिंगोली) | 1000/- |
| 55) | ए.पी. कुंटे (हिंगोली) | 1000/- |
| 56) | डॉ. राम देशमुख (नांदेड) | 1000/- |
| 57) | डॉ. बबन खामकर (सिंधुदुर्ग) | 1000/- |
| 58) | डॉ. क्यू. जे. तांबोळी (कोल्हापूर) | 1000/- |
| 59) | डॉ. जे.बी. कुलकर्णी (कोल्हापूर) | 1000/- |
| 60) | डॉ.इ. के. पोळ (वाई) | 1000/- |

# 2006-2007 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 61) | सौ. अंजली कुलकर्णी (नागपूर) | 1000/- |
| 62) | आर.एन. भालेराव (अमळनेर) | 1000/- |
| 63) | एन.टी. पाटील (तळोदा) | 1000/- |
| 64) | अरविंद नगरकर (पुणे) | 1000/- |
| 65) | एम.एम. शिंपी (धुळे) | 1000/- |
| 66) | विनायक धाणेकर (पुणे) | 1000/- |
| 67) | गंगाधर कायंदे पाटील (नाशिक) | 1000/- |
| 68) | स.रा. नाडकर्णी (मुंबई) | 1000/- |
| 69) | श्रीमती शकुंतला राईलकर (मुंबई) | 1000/- |
| 70) | प्रा. अशोक गाढवे (श्रीरामपूर) | 1000/- |
| 71) | प्रा. अे.पी. चौधरी (जळगाव) | 1000/- |
| 72) | प्रा. पी.आर. चौधरी (जळगाव) | 1000/- |
| 73) | प्रा. श्रीरंग मंडले (मालवण) | 1000/- |
| 74) | प्रा. पी.बी. लांडगे (रत्नागिरी) | 1000/- |
| 75) | प्रा. नारायण अंबर्डेकर (सांगली) | 1000/- |
| 76) | प्रा. बी.आर. सोनवणे (सिल्लोड) | 1000/- |
| 77) | संदेश तुहशीराम धूम (भुसावळ) | 1000/- |
| 78) | सोहिणी गिरीश देशपांडे (सांगली) | 1000/- |
| 79) | वसंत माने (कोल्हापूर) | 1000/- |
| 80) | डॉ. शंकर पाटील (सोलापूर) | 1000/- |
| 81) | सौ. एन. के. भोगावडे (श्रीरामपूर) | 1000/- |
| 82) | सौ. शशिकला सप्रे (पुणे) | 1000/- |
| 83) | डॉ. के.एच. शिंदे (सातारा) | 1000/- |
| 84) | डॉ. रामकिसन चौधरी (लातूर) | 1000/- |
| 85) | डॉ. बी.बी. पावडे (नांदेड) | 1000/- |
| 86) | डॉ. जयंत भोयर (हिंगोली) | 1000/- |
| 87) | प्रा. माधव पलमंटे (लातूर) | 1000/- |
| 88) | डॉ विकास सुकाळे (नांदेड) | 1000/- |
| 89) | प्रा. आय. ए. निरगुडे (श्रीरामपूर) | 1000/- |
| 90) | प्रा. नलिनी अंबारे (बुलढाणा) | 1000/- |

# 2006-2007 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 91) | प्रा. सुलोचना मानकर (अकोला) | 1000/- |
| 92) | प्रा. एस. जे. फुलारे (अहमदनगर) | 1000/- |
| 93) | प्रा. अरविंद रायखेलकर (सोलापूर) | 1000/- |
| 94) | श्री. मुकेश चोथाणी (नाशिक) | 1000/- |
| 95) | श्री. प्रकाश महिंद्रे (पुणे) | 1000/- |
| 96) | सुरेश ढाके (जळगाव) | 1000/- |
| 97) | प्रा. राजेन्द्र रसाळ (पुणे) | 1000/- |
| 98) | प्रा. सुरेश मगरे (नाशिक) | 1000/- |
| 99) | प्रा. सुभाष भालेराव (शहादा) | 1000/- |
| 100) | प्रा.मनिषा कर्णे (मुंबई) | 1000/- |
| 101) | प्रा. विद्या कचरे (पुणे) | 1000/- |
| 102) | प्रा. वसंत जुगळे (कोल्हापूर) | 1050/- |
| 103) | प्रा. नाना गवारे (पाटोदा) | 1000/- |
| 104) | प्रा. अशोकराव मोडक (ठाणे) | 1000/- |
| 105) | प्रा. शेख बादशहा इब्राहिम (परळी) | 1000/- |
| 106) | प्रा. सुधाकर अंभोरे (अमरावती) | 1000/- |
| 107) | प्रा. सौ. विभा सावरकर (अमरावती) | 1000/- |
| 108) | प्रा. विजय कवीमंडन (वर्धा) | 1000/- |
| 109) | प्रा. केशव घोरूडे (ठाणे) | 1000/- |
| 110) | प्रा. सुभाष माने (उस्मानाबाद) | 1000/- |
| 111) | प्रा. सुनिल रत्नपारखी (सोलापूर) | 1000/- |
| 112) | प्रा. उत्तरांगिणी वानखेडे (परभणी) | 1000/- |
| 113) | प्रा. अभिमन्यू बच्छाव (धुळे) | 1000/- |
| 114) | सौ. साधना फडणवीस (मुंबई) | 1000/- |
| 115) | प्रा. के.एम. भोसले (सातारा) | 1000/- |
| 116) | प्रा. एस.एस. हुशंगाबादे (अकोला) | 1000/- |
| 117) | प्रा. मोहन सदामते (सांगली) | 1000/- |
| 118) | प्रा. विरूपाक्ष खानाज (इचलकरंजी) | 1000/- |
| 119) | प्रा. के. व्ही. निंबाळकर (ठाणे) | 1000/- |
| 120) | डॉ. व्ही.एम. इंगवले (सिंधुदुर्ग) | 1000/- |

## 2006-2007 या वर्षात इमारत निधी दिलेल्या सभासदांची नावे

| | | |
|---|---|---|
| 121) | प्रा.बी.एस. म्हस्के (औरंगाबाद) | 1000/- |
| 122) | प्रा.विनायक गोवीलकर (नाशिक) | 1000/- |
| 122) | सौ. विद्या सोहनी (नाशिक) | 1000/- |
| 124) | डॉ. व्ही.एस. वाघमारे (नाशिक) | 1000/- |
| 125) | श्री. के.व्ही. कुलकर्णी (नाशिक) | 1000/- |
| 126) | प्रा. मुकुंद इंगळे (अकोला) | 1000/- |
| 127) | प्रा. सौ. वर्षा नेहेते (जळगाव) | 1000/- |
| 127) | डॉ. पी.व्ही. मोहिते | 1000/- |
| 128) | प्रा. आर. वाय. माहोरे (नागपूर) | 1000/- |
| 129) | प्रा. पुष्पा तायडे (वर्धा) | 1000/- |
| 130) | प्रा. सुमित्रा पवार (भुसावळ) | 1000/- |
| 131) | प्रा. एल.एम. चौधरी (जळगाव) | 1000/- |
| 132) | प्रा. डॉ. आर.एस. चिरमाडे (जळगाव) | 1000/- |
| 133) | प्रा.जालिंदर यादव (सांगली) | 1000/- |
| 134) | प्रा. मधुकरराव गोपनपल्लीवार (लातूर) | 1000/- |
| 135) | प्रा. शामराव कुळकर्णी (ठाणे) | 1000/- |
| 136) | प्रा. शांतीलाल जावळे (श्रीरामपूर) | 1000/- |
| 137) | प्रा. डॉ. नाना नामदे (नाशिक) | 1000/- |
| 138) | प्रा. डॉ. तानाजी गिते (पुणे) | 1000/- |
| 139) | प्रा. राजेश चव्हाण (अमरावती) | 1000/- |
| 140) | प्रा. डॉ. सुधा मोकाशी (ठाणे) | 1000/- |
| 141) | प्रा. बालाजी सुरवसे (सिंधुदुर्ग) | 500/- |

### मराठी अर्थशास्त्र परिषद
### सभासद वर्गणीत वाढ

1 एप्रिल 2007 पासून आजीव सभासद वर्गणी रू. 1200 /- च्या ऐवजी रू. 1500 /- तर साधारण (वार्षिक)वर्गणी रू. 250/- च्या ऐवजी रू. 300/- पर्यंत वाढविण्यात आली आहे, याची कृपया नोंद घ्यावी . अर्थसंवादची ग्रंथालयासाठी असलेली वर्गणी मात्र पूर्वी प्रमाणेच रू. 250/- कायम राहील.

**कार्यवाह – खजिनदार**

# अर्थसंवाद

## (खंड 30, 2006-07)

## (अ) लेखसूची

### स्वतंत्र लेख


1 अर्थ शब्दांची वाट पाहे 172-74

2 अर्थसंकल्प 2006: राजकोषीय शहाणपणा, शिस्त आणि कायदा 3-7,

3 अर्थसंकल्प आणि कृषी पत पुरवठा 24 - 33

4. अनुभवनिष्ठ नोबेलविजेते अर्थशास्त्रज्ञ एडमंड फेल्पस 265-70

5 आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत - एक सिंहावलोकन 107-21, 193-212

6. ऊसाचे दर-युद्ध: काल्पनिकता आणि वास्तवकिता(पूर्वार्ध/उत्तरार्ध) 220-36, 306-18

7. एडमंड एस्. फेल्पस् आणि आधुनिक समष्टि अर्थशास्त्र 319-34

8. किरकोळ विक्रीक्षेत्र आणि प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक 82-90

9. केंद्रीय अर्थसंकल्प 2007-08 335-39

10. गत दशकातील केंद्रीय अर्थसंकल्पाचा आढावा 8-23

11. गरिबी निर्मूलन आणि आर्थिक विकास: 21 व्या शतकासाठी नवीन प्रतिमान (उर्वरित भाग) 68-81

12. जागतिकीकरण, नागरीकरण व मागास प्रदेशांचा विकास 213-19

13. जॉन केनेथ गालब्रेथ 48-67

14. जॉन स्ट्यूअर्ट मिल (1806 ते 1873) : एक स्मरण 340 - 46

15. डॉ बाबासाहेब आंबेडकर आर्थिक विचार 158-63

16. पूर्व विदर्भातील तलाव सिंचन सांस्कृतिक वारसा 237-64

17. भारतातील कृषी सहकारी वित्तपुरवठा चळवळ - एक दृष्टिक्षेप 164-71

18. महाराष्ट्र राज्याचे अंदाजपत्रक आणि अनुशेष निर्मूलन 34-47

19. महाराष्ट्रातील मानवी विकासासंबंधी काही मुद्दे 271-81

20. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे दुष्काळ निवारणात्मक धोरण 141-57


### भाषणे


1 जागतिकीकरण व भारताच्या शिक्षण क्षेत्रातील आर्थिक आव्हाने. (30 वे वार्षिक अधिवेशन अध्यक्षीय भाषण) 289-305

2. नवे आर्थिक धोरण : काही पैलू (वि.वि. बोरकर स्मृती व्याख्यान, मराठवाडा अर्थशास्त्र परिषद वार्षिक अधिवेशन) 134-40

3. भारतीय बँकांची पुनर्रचना स्वरूप आणि प्रयोजन 122-33


### पारितोषिक प्राप्त लेख


1 कुपोषण एक दृष्टिक्षेप 347-59

## ग्रंथ परीक्षण

1 आर्थिक जगत 188 - 91

2. आनंदवन प्रकल्पाची यशोगाथा- सामाजिक व आर्थिक विकासाची 91-96

## पीएच. डी. प्रबंधाचा सारांश

1. कोल्हापूर शहरातील नागरी सहकारी बँका मधील नेतृत्व 175 -87

## अधिवेशन वृत्तान्त

1 अर्थसंवाद वार्षिक अहवाल 2005-06 371-74

2. कार्यवाहांचा अहवाल 375 -78

3. भारतातील आर्थिक विचारांचा विकास 360 -63

4. भारतातील स्वयंसहायता गट -पार्श्वभूमी व वाटचाल 364 -68

5. महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषण- समस्या व उपाय 369-70

## विषयांची रूपरेषा

1 कायदा व अर्थशास्त्र 381-83
2 भारतातील कृषीक्षेत्रातील अरिष्टे 384-85
3.महाराष्ट्रातील नागरिकरण -कारणे स्वरूप आणि समस्या 386-91

## संकीर्ण

1.जळगांव जिल्ह्याच्या लोकसंख्येतील बदलते स्त्री-पुरूष प्रमाण एक समस्या 282 - 85

2. नरेन्द्र जाधव- पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू पदावर नियुक्त 174
3. मराठवाडा अर्थशास्त्र परिषद अधिवेशन कार्यवृत्तान्त 286 -88
4. संपादकीय - (i)अर्थसंकल्प 2006 1-2
(ii) भूतपूर्व प्रमुख संपादक रवीन्द्र दोशी 97 -100

## श्रद्धांजली

1. अर्थसंवादचे भूतपूर्व प्रमुख संपादक रवीन्द्र दोशी 101 - 02
2. मोरेश्वर विष्णू भाटवडेकर 105 - 06
3. रवीन्द्र दोशी - एक प्रसन्न व्यक्तिमत्व 103 - 04

## (आ) लेखक सूची

## स्वतंत्र लेख

1. कांबळे, गौतम 158-63
2. कुरूलकर, र.पु. 34 -47
3. कुलकर्णी, अंजली 24 - 33
4. कुळकर्णी, लिला सर्वोत्तम 3 40 - 46
5. गोविलकर, विनायक 3 -7
6. चव्हाण, हिरालाल 164 -71
7. जोशी, वसुधा 82-90
8. जुगळे, वसंतराव 220 -36,306-18
9. तायडे, पुष्पा 271 -81
10. दातार, माधव 213 -19
11. दांडगे,रमेश 158 - 63
12. देशपांडे, अतुल 319- 34
13. नामदे , ना.भा. 237- 64
14. पाटील , ज.फा. 141- 57

15 पेठे, वसंत प्रभाकर 68 - 81

16 भानुशाली, सु. गो. 48-67,107-21, 193-212

17. माने, शि.ना. 172-74, 265-70, 335-39

18. म्हस्के, भगवान 8 - 23.

19. म्होपरे, राहूल शं. 141 - 57.

## भाषणे

1. कदम, दिलीप 289-305

2. जोशी, प्रभाकर 122-33

3. दास्ताने, संतोष 134 -40

## पारितोषिक प्राप्त लेख

1. सिनगारे, सुनीता 347 - 69

## ग्रंथ परीक्षण

1. कुळकर्णी, सर्वोत्तम 91-96, 188-91

## पीएच. डी. प्रबंधाचा सारांश

1. कट्टी, विद्यावती प्रल्हाद 175 - 87

## अधिवेशन वृत्तान्त

1 कुळकर्णी, सर्वोत्तम 369-70

2. गोखले, चारूदत्त 375-78

3. देशपांडे, मेधा 364-68

4. देशपांडे, विनायक 371-74

5. पाटील, जगन्नाथ 360-63,

## विषयांची रूपरेषा

1. जहागिरदार दि. व्यं. 386 -91

2. पडोशी अ.रा. 384 -85

3. पाटील, जे. एफ्. 381 -83

## संकीर्ण

1. गंभीर, एस. एन. 282 - 85

2. देशपांडे, विनायक श्रीधर 1-2, 97-100,174

3. पटाईत, जगन्नाथ 286-88

## श्रद्धांजली

1. कुरूलकर, र.पु. 103 - 04

2. पाटणकर, व्यं.सु. 105 - 06


3. भानुशाली, सु.गो 101 - 02

## इ. अंकांचा तपशील

| अंक | तिमाही | पृष्ठे |
|---|---|---|
| 1 | एप्रिल-जून, 2006 | 1-96 |
| 2 | जुलै-सप्टेंबर, 2006 | 97-192 |
| 3 | ऑक्टोबर-डिसेंबर, 2006 | 193-288 |
| 4 | जानेवारी-मार्च, 2007 | 289 - 400 |

हे त्रैमासिक चारूदत्त गोखले यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता आदर्श प्रिंटिंग अँण्ड पॅकेजिंग, नागपूर -440012. येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, 'अक्षय', प्लॉट नं. 10, प्रोफेसर्स कॉलनी, जिल्हा उद्योग केन्द्राच्या मागे, जळगाव. 425001 येथे प्रसिद्ध केले.


MGA
MARUTI GENUINE ACCESSORIES
BE GOOD TO YOUR MARUTI
GENUINE PARTS
AVOID SPURIOUS SPARES
MARUTI Finance
MARUTI Insurance
With Best Compliments from
best and Smart Car seller of Maruti suzuki
मानराज मोटर्स प्रा. लि.
अजिंठा रोड, एम.आय.डि.सी., जळगांव-४२५ ००३.
फोन : २२१२१२१, २२, २३, २४,
फॅक्स : २२१२१२५, मो. : ९४२२२७११२२ ते १२९ पर्यंत
GROUP



आता सूर्यकिरणांचे बहुविध उपयोग
अन जोडीला जैन गुणवत्ता !
जैन सौरबंब
जैन सौरबंब
सूर्याचे उष्णतेवर पाणी तापविण्याची स्वतंत्र यंत्रणा.
नको वीज. नको रॉकेल. नको गॅस. नको लाकूडफाटा.
जवळजवळ शून्य मेंटेनन्स. दोन मॉडेल्स्
व सोयीस्कर अशा विविध क्षमतेत उपलब्ध.
जैन ज्योत कंदील
७ वॅटचा सीएफएल दिवा. भरपूर स्वच्छ प्रकाश.
१२ व्होल्टची सील्ड मेंटेनन्स फ्री बॅटरी.
अत्यंत कार्यक्षम इलेक्ट्रॉनिक सर्किट, सोलर पॅनल.
जैन-ज्योत होम लाइटिंग सिस्टिम
७ किंवा ९ वॅटचे लॅंप + डीसी फॅन
किंवा ब्लॅक ॲंड व्हाईट टीव्ही लागेल अशी यंत्रणा.
दररोज ३-४ तास वापर शक्य.
सोबत बॅटरी, सोलर पॅनेल अशी स्वयंपूर्ण यंत्रणा.
ग्राहकाच्या आवश्यकतेनुसार सिस्टिम उपलब्ध.
जैन ज्योत
जैन ज्योत पथ दिवे
एकाच खांबावर उभी राहणारी स्वयंपूर्ण यंत्रणा.
११ वॅट सीएफएल ट्यूब व सोलर पॅनेल,
चार्जिंग बॅटरीसह परिपूर्ण यंत्रणा.
जैन सोलर
अधिक माहितीसाठी लिहा.
जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि., सौरऊर्जा विभाग जैन हिल्स, जळगाव.
फोन: ०२५७- २२६००१३, २२६००११/२२; फॅक्स: ०२५७- २२६११२२/३३;
ई-मेल: agripark@jains.com or solar@jains.com, वेबसाईट: www.jainsolar.com